श्रीभाऊसाहेब महाराज उमदीकर यांची
जावक पत्रें व टिपणें, १९५९, या ग्रंथातील

पत्रांची नवीन मांडणी

(तिथी-तारीख-मजकूर यांनुसार केलेली)

पद्मा कुलकर्णी

२०१५

27.7.16 (NMDD)

श्रीभाऊसाहेब महाराज उमदीकर यांची
जावक पत्रें व टिपणें, १९५९, या ग्रंथातील

पत्रांची नवीन मांडणी

(तिथी–तारीख–मजकूर यांनुसार केलेली)

पद्मा कुलकर्णी

२०१५

आवृत्ती पहिली २०१५

प्रकाशिका :
सौ. अश्विनी अविनाश जोग
मंदार अपार्टमेंटस्
१०१, रेल्वे लाईन्स, सोलापूर- ४१३ ००१
दूरध्वनी : ०२१७/२३१८२४४

© प्रकाशिका

मुद्रक :
लोकमंगल प्रिन्ट ॲण्ड पॅक प्रा. लि.,
१२२, इंडस्ट्रियल इस्टेट,
होटगी रोड,
सोलापूर- ४१३ ००५

मूल्य :- २००/-

श्रीरेवणसिद्धेश्वर मंदिराचे महाद्वार, रेणागिरी (रेणावी)

निर्गुण प्रभूंनी रेवणसिद्धांचा अवतार घेऊन रेणागिरीवर लीला केली.

श्रीकाडसिद्धेश्वराचे प्राचीन मंदिर, सिद्धगिरी



काडसिद्धेश्वरांचा अवतार घेऊन प्रभू वेगाने सिद्धगिरीस आले.

श्रीनिंबरगी महाराजांची समाधी, निंबरगी



नारायण नावाने प्रभू निंबरगीस प्रकट झाले.

श्रीनिंबरगी महाराजांची समाधी, इंचगेरी



तपश्चर्येने त्यांनी जीवन्मुक्ती साधली.

B1

पूर्वसूरींना वंदन

भारतातील अध्यात्माच्या इतिहासात नाथपंथाला आगळे स्थान आहे. नऊ नाथांची नावे नेहमी घेतली जातात. यांपैकी रेवणनाथ किंवा रेवणसिद्ध यांच्यापर्यंत निंबरगी संप्रदायाची पाळेमुळे जाऊन पोचतात. एका दृष्टीने रेवणसिद्धांना निंबरगी संप्रदायाचे मूळ पुरुष मानता येईल. सातारा जिल्ह्यातील कऱ्हाड गावाजवळ रेणागिरी किंवा रेवणगिरी नावाच्या लहानशा टेकडीवर प्रसन्न परिसरात यांचे देखणे देऊळ उभे आहे.

रेवणसिद्धांच्या परंपरेत पुढे काडसिद्ध नामक संत होऊन गेले. त्याच संप्रदायात नंतर गुरुलिंगजंगम महाराज या अलीकडील काळातील निंबरगी संप्रदायाच्या मूळ पुरुषाचा उदय झाला. हेच निंबरगी महाराज या नावाने प्रसिद्धीस आले. प्रपंचात सदाचरण आणि परमार्थात नामस्मरण हे त्यांच्या दीर्घ जीवनाचे सूत्र होते. कोल्हापूर-बेळगाव मार्गावरील सिद्धगिरी येथे त्यांना गुरूपदेश मिळाला. सिद्धगिरी हे एका टेकाडावर वसलेले निसर्गरम्य प्रदेशातील मंदिरसंकुल आहे. गडकोटावरील ही मंदिरे विशेष प्रेक्षणीय आहेत. या संतश्रेष्ठांना वंदन करून व त्यांचे आशीर्वाद घेऊन आपण पुढे पाऊल टाकणार आहोत.

श्रीनिंबरगी महाराजांची विशेष प्रसिद्ध नसलेली एक आरती पुढे दिली आहे.

निंबरगी महाराजांची आरती

मंगल मंगल मंगलवेन्नि । निंबरगि मुनिगे आरति एन्नि ।

निंबरगि मूल पीठद गुरुईत । काडसिद्धन शिष्यवरनीत ।
अनुग्रह पडेदु मरळि बंदु । मूरु पट्टतप माडिदवगे ।। १ ।।

तपव माडि सिद्धनाद । प्रपंच परमार्थ सरिमाडिरेंद ।
बरि प्रपंच नीरिन होम । बरिगैयिंद पोगुवुदुंटे ।। २ ।।

ओंदे नामव हिडियिरेंद । ओंदे दृष्टिय निरिसिरेंद ।
ओंदे गुरुविन नंबिरेंद । सुलभ मुक्तिय मार्ग तिळिइरेंद ।। ३ ।।

51

(चराचराचे मंगल, सदाकाली मंगल, सर्वत्र मंगल असे शब्द मुखातून येऊ द्या. निंबरगी महाराजांची आरती उजळा.

ते निंबरगी पीठाचे मूळ गुरू आहेत. काडसिद्ध मुनींचे श्रेष्ठ शिष्य आहेत. सद्‌गुरूंचा अनुग्रह मिळवून ते परत आले. त्यांनी तीव्र साधनाचे डोंगर रचले. अशा या गुरूंना आरती ओवाळा ॥ १ ॥

उग्र तप करून त्यांनी सिद्ध ही पदवी मिळवली. प्रपंच व परमार्थ नेटके करा असा जगाला संदेश दिला. केवळ प्रपंचात राहणे हे पाण्याने केलेल्या होमासारखे व्यर्थ आहे. सद्‌गुरूंकडे जाताना काहीतरी पारमार्थिक पुंजी जवळ पाहिजे. रिकाम्या हाताने म्हणजे काहीच योग्यता नसताना त्यांच्याकडे जाणे बरोबर आहे का ? ॥ २ ॥

एकच नाम हृदयात दृढ धरा. एकाग्रतेने दृष्टी ठेवा व एकाच गुरूंवर निस्सीम श्रद्धा ठेवा. सुलभ मुक्तीचा हाच मार्ग आहे असा सद्‌गुरूंनी उपदेश केला ॥ ३ ॥)

निंबरगी महाराजांची ही आरती गुरुराव नारायण देशपांडे यांनी केली आहे. ते गुरुदेवांचे शिष्य. ते श्रेष्ठ गायक होते. त्यांच्या प्रभावी गायनाचे एक उदाहरण देता येईल. २६.११.१९५१ रोजी गुरुदेवांचे एक व्याख्यान बेळगावला राणी पार्वतीदेवी कॉलेजात झाले. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे व्याख्यानाच्या आधी गुरुरावांनी पद म्हटले. त्या दिवशी त्यांनी 'तू तो रामनाम सुमिर जग लडवा दे' हे पद इतक्या तल्लीनतेने व भावपूर्णतेने म्हटले की गुरुदेव गहिवरले. ते बोलायला उठले पण काही क्षण त्यांच्या मुखातून शब्द फुटेना. गायक संपूर्ण वातावरण कसे बदलू शकतो याचे हे जिवंत उदाहरण. त्यांच्या गायनाबद्दल गुरुदेव एकदा म्हणाले होते, 'गुरुराव गात असताना त्यांचा श्वास, मन व शरीर हे सर्व शांत असतात. नेमात असेच व्हावयास पाहिजे. कोणतीही गोष्ट करताना स्थिरता हवी.'

(६)

अनुक्रमणिका

प्रकरण		पृष्ठ
१	आज माझे मन असे बोलते...	७
२	पूर्वपीठिका	११
३	काही टिपणे	१७
४	पत्रे	२१
परिशिष्ट १	परिशिष्ट १ चा खुलासा	३४५
	पत्रांच्या बदललेल्या क्रमांकांचा तपशीलवार तक्ता	३४६
परिशिष्ट २	पत्रांच्या मूळ (पुस्तकातील) क्रमांकांचे नवीन क्रमांक देणारे कोष्टक	३९०
परिशिष्ट ३	लहानसा शब्दकोश	३९५
परिशिष्ट ४	पत्रांतील अवतरणांचे मूळ संदर्भग्रंथ	३९६
परिशिष्ट ५	लेखणी खाली ठेवता ठेवता...	४००

श्रीभाऊसाहेब महाराज

जडमूढां अज्ञानां नामे उद्धरिसी ।...
उमदीप्रभुराज नामे प्रसिद्ध झालासी ॥
—गणपतराव पवार

श्रीभाऊसाहेब महाराज

कृपाघना तुज वर्णन करितां ।
शेषहि शिणला तव गुण गातां ॥
—अक्कूबाई बेळगावकर

श्रीभाऊसाहेब महाराज



साधुर संगति सदानंद । सद्गुरू वस्तु निजानंद ॥
—शिवलिंगव्वा

जिथे संत तिथे निरंतर आनंद.
सद्गुरू आनंदमय अंतिम तत्त्व आहेत.

प्रकरण १

आज माझे मन असे बोलते...

७.९.२०१४

श्रीभाऊसाहेब महाराजांच्या पत्रांचे पुस्तक जेव्हा जेव्हा वाचायला घेत असे तेव्हा तेव्हा मनात विचार येई की या पुस्तकाचे पुन्हा संपादन होणे जरूर आहे. पूर्वीच्या संपादकांनी कष्टांकडे न पाहता अतीव भक्तीने मूळ पत्रे पुस्तकरूपाने आपल्या हाती दिली. त्यांचे साधकांवर महान उपकार आहेत. तरीही पुस्तकात बऱ्याचशा त्रुटी राहिल्या आहेत. त्या दूर केल्या पाहिजेत असे वाटत राही. हे काम आपणच करावे अशी मनात कल्पना आली तेव्हा पत्रांची मांडणी सुसंगत करावी एवढाच माफक उद्देश होता. पत्रांचा विचार मनात येऊन जाऊन घोळत असे. त्यात मन तसे फार गुंतले नव्हते. २००० सालच्या आसपास प्राथमिक तयारी झाली पण एकूण योजना कागदावरच राहिली. १०-१२ वर्षे तशीच गेली.

२८ डिसेंबर २०१३ रोजी मी मुंबईला गेले त्या वेळेस काम करायचेच अशा निश्चयाने सर्व साहित्य बरोबर घेतले. ते नेले नसते तर जीवनातील खऱ्या आनंदाला मी मुकले असते. मुंबईला मी आणि पत्रांचे काम इतकेच माझे जग होते. बाहेरच्या घडामोडींशी कमीत कमी संपर्क ठेवला, नाहीच ठेवला म्हटले तरी चालेल. अज्ञातवासच होता तो. वातावरण अनुकूल होते. पत्रे वाचत राहिले. वाचता वाचता प्रत्येक पत्राचा थोडक्यात सारांश लिहून ठेवला. तो डोळ्यांपुढे ठेवून माझ्या बुद्धीला भावला तसा पत्रांचा क्रम लावला व या नवीन क्रमाने पत्रे लिहून काढली. काम संपल्याचा आनंद झाला पण दुःखही झाले. योजना पार पडल्याचा संतोष होता पण लगेचच आता महाराजांचे अनुसंधान सुटते की काय अशी भीती वाटली. एकीकडे समाधान व दुसरीकडे धास्ती अशी चित्तवृत्ती दोलायमान झाली. पत्रे डोळ्यांपुढून हलेनात. ती अविरत रुंजी घालू लागली. स्वस्थ बसू देईनात. अजून हे चालूच आहे, पत्रांची अनावर

ओढ लागली आहे. नामाचा लाभ झाल्यापासून उणीपुरी ६० वर्षे नामाची संगत आहे. नेमात समाधान आहे. पारमार्थिक कार्यात उल्हास आहे. वेळोवेळी विविध प्रकारे गुरुकृपेची प्रचिती आली आहे, अडचणींतून मार्ग निघाला आहे. संप्रदायातील संतांची थोडीफार साहित्यसेवाही घडली आहे. एवढीच माझी कमाई होती. बिंदूचे दर्शनसुद्धा कधी झाले नव्हते, तेज-नाद यांचा अनुभव दूरच. पण त्यांची गोडी चाखली नव्हती म्हणून खंतही नव्हती. एका प्रकारच्या समाधानात होते. अज्ञानातले सुख ! पण आज जी ओढ लागली आहे याचे कारण माझी पालटलेली मानसिकता. पत्रे लिहिण्याच्या ७/८ महिन्यांत नकळत माझ्यात बदल झाला. काय घडले या काळात ? जे घडले ते इतके हळूहळू घडत होते की त्याची जाणीवच झाली नाही. सुरुवातीस, तिथी व तारखा म्हणजे पत्रांचा क्रम लावण्याची केवळ साधने आहेत अशीच समजूत होती. पावलापावलाने त्यांना काही वेगळा अर्थ येऊ लागला. आपल्या मौनाच्या भाषेत त्या माझ्याशी बोलू लागल्या, काहीबाही खुणावू लागल्या. गावांच्या नावांचाही प्रकार तोच. दिवस जात होते, मी मनापासून पत्रे लिहीत होते. केव्हापासून कोण जाणे पण आणखी एक गोष्ट घडू लागली. गावाचे नाव पत्रात आले की त्या गावचे साधक समोर आल्यासारखे भासू लागले. त्यांची वैशिष्ट्ये, वेषभूषा (कल्पनेतली) निश्चित झाली. १९०६ मध्ये श्री. जांभळीकरांनी त्या वेळेच्या इंचगेरी मठाचा नकाशा काढला आहे. इंचगेरीचा उल्लेख पत्रात आला की त्या नकाशात दाखवलेली नंदेप्पांची खोली भासमान होऊ लागली. नंदेप्पा (माझ्या कल्पनेतली त्यांची मूर्ती) तिथे वावरताना दिसू लागले. अंबुराव महाराज डोकावू लागले. तिथीही आपले काम बजावू लागल्या. चैत्र शु. ३ हे शब्द पत्रात आले रे आले की साधुबुवांची प्रतिमा हजर होई. चैत्र शु. ३ ही त्यांची पुण्यतिथी. त्या दिवसाच्या उल्लेखाबरोबर साधुबुवांची उंचीपुरी, आजानुबाहू, भगव्या वस्त्रांतली माझ्या कल्पनेतली त्यांची छबी पुढे येई. २४.१२.१९१० ही तारीख पत्रे वाचून वाचून मनात ठसली होती. या दिवशी शिवलिंगव्वांनी पंढरपूरहून साधकांना पत्र लिहून महाराजांच्या व पांडुरंगाच्या भेटीचे वर्णन केले होते. ती तारीख पत्रात दिसली आणि डोळ्यांपुढे पंढरपूरचा सोहळा

सरकू लागला. शिवलिंगव्वांचे दर्शन मात्र फार म्हणजे फारच धूसर होते. या सगळ्या गोष्टी अगदी सहजपणे घडल्यासारख्या आणि अगदी खऱ्याखुऱ्या जाणवत होत्या. पण हा चलत्‌चित्रपट मूक होता. दृश्य होते पण आवाजाचा मागमूस नव्हता. आणखी काही दिवस गेले आणि आता मी दिसणाऱ्या दृश्यात स्वतः भाग घेत आहे असा अनुभव येऊ लागला. बदल किती सूक्ष्म रीतीने होत होता, ते कळत नव्हते. इंचगेरी ते निंबरगी या रस्त्यावरून पागोटेवाल्या साधकांसमवेत मी चालत होते. मी अनुभवाच्या जगात बुडले होते. हाताने लिहीत होते खरी पण जणूकाही मी या गावचीच नव्हे असे वाटत होते. १९१३ सालची पत्रे आली आणि महाराजांचे निर्याण जवळ आले या कल्पनेने माझ्या जिवाची उलघाल झाली. मात्र या सगळ्या घटनांचा अनुभव ज्या वेळेस पूर्ण तंद्री लागे तेव्हाच येई. नंतर मग डोळ्यांपुढे काही नसे, सगळे अदृश्य होई. जे उरे ते म्हणजे समोरचे कागद व हातातली लेखणी. हळहळ वाटे व पुन्हा त्या अनुभवांची वाट पाहणे चालू होई.

दिसामासी आणखी बदल झाले. हलके, तरल सूर कानांवर येऊ लागले. कोणीतरी लिहीत होते आणि कोणीतरी सांगत होते. पण शब्द कळत नव्हते. आता शब्दही स्पष्ट झाले. ते पत्रातलेच शब्द होते. लिहिणारी मीच. महाराज सांगत होते. मी पत्रांतला मजकूर पाहून लिहीत नव्हते तर ऐकून लिहीत होते. बोलण्याचा ढंग परिचयाचा होता. कन्नड मातृभाषा असणारी व्यक्ती ज्या लकबीने मराठी बोलते तीच लकब. काही स्वर लांबवणे, काही शब्दांवर जोर. ही शैली मला घरच्या ५० वर्षांच्या अनुभवाने अंगवळणी पडली होती. महाराज त्याच पद्धतीने पत्रातला मजकूर सांगत होते आणि मला स्पष्ट ऐकू येत होते. देवाच्या जवळिकेची ही प्रचिती मला सर्वस्वी नवीन होती. सर्वस्वी अपूर्वाईची होती. मी आनंदाच्या गौरीशंकरावर चढून बसले होते. त्या अनुभवाचे शब्दांशी वाकडे आहे.

महाराजांची पत्रे ही काय चीज आहे याचा याचि देही प्रत्यय आला. महाराजांच्या पत्रांच्या ट्रंका सुरक्षित आहेत की नाही हे स्वतः पाहण्यास गुरुदेव अशक्तता विसरून प्लॅटफॉर्मवरून चालत का गेले याचे कोडे उलगडले.

अखेरी अखेरीस ते सारखी पत्रे वाचून घेत होते ते समजले- नव्हे उमजले. आत्मानंदाची झलक अनुभवली. क्षणभर का होईना जगाचा विसर पडला. गुरुदेवांनी हा आनंद हिमालयाच्या मापाने प्राप्त करून घेतला होता. माझा आनंद उपनिषदांच्या भाषेत बोलायचे झालेतर बालाग्रशतभागाइतका, म्हणजे केसाच्या टोकाच्या शंभराव्या हिश्शाएवढा होता. पण त्याची जातकुळी तीच होती. परतत्त्वस्पर्श म्हणजे काय ते जाणवले. कृतार्थतेने मन भरून गेले. ही किमया घडवून आणण्याची महाराजांची शक्ती किती विराट असेल ! ही प्रत्यक्ष ईश्वरी शक्ती.

क्षणभर टिकणाऱ्या या अनुभवांनी मी मोहरून गेले. पत्रे पुन्हा पाचारण करत आहेत. पत्रे लिहिली त्या वेळेला मी काही पत्रे गाळली होती. शेतीबद्दलचा मजकूर, नुसता महाराजांचा या गावाहून त्या गावाला जाण्याचा कार्यक्रम किंवा अधिकतर अनेकांना नुसते नमस्कार असलेली पत्रे घेतली नव्हती. वास्तविक अशा पत्रांतून महाराज परमार्थासाठी किती भ्रमंती करत होते, अथवा त्यांचा लोकसंग्रह किती दांडगा होता याची कल्पना येते. पण त्यांत पारमार्थिक दृष्टीने विशेष काही नाही अशा समजुतीने ती सोडून दिली होती. आज असे जाणवत आहे की ही चूक झाली. पत्रे गाळण्याचा अधिकार मला कुणी दिला ? केलेली चूक दुरुस्त झालीच पाहिजे या कल्पनेने पछाडले आहे. आता ठरले, ती सगळी पत्रे लिहायची. ती लिहिताना महाराजांचे शब्द आणखी ऐकू यावेत ही कूटस्थातील भावना (सहसा कळत नसते ती) आता लपून राहत नाही. त्यासाठीच तर मी पत्रे लिहीत असेन. येतील का मला महाराजांचे शब्द ऐकायला ? येतील का बरं ? गुरुकृपेला काय अशक्य आहे ?....

प्रकरण २

पूर्वपीठिका

१. श्रीभाऊसाहेब महाराजांची पत्रे हा संप्रदायाचा एक अमोल ठेवा आहे. पूर्वी गुरुदेवांच्या सिटिंगच्या वेळी कधी कधी ती वाचली जात. साधकांच्या कानांवरून जात. पण ती कानांवरून जाऊन थोडा फायदा झालातरी मनापर्यंत पोचत नसत कारण पत्रे तशी अवघड आहेत. ती समजावी म्हणून थोडी सोपी करणे व मुख्य म्हणजे त्यांचा क्रम बदलणे जरूर होते. या गोष्टी का कराव्याशा वाटल्या त्याला आणखीही कारणे आहेत.

२. अ. पत्रांचे वर्गीकरण तारखेची, बिनतारखेची व मोठी (ज्ञानमार्गाची) असे केले आहे. दोन भिन्न निकषांवर हे झाले आहे. मोठी पत्रे एकतर तारखेची असतात किंवा बिनतारखेची असतात, तिसरा वर्ग जरूर नाही. एखादे पत्र ज्ञानमार्गाचे म्हणून वेगळे काढले तर त्याच्या तारखेकडे दुर्लक्ष होते आणि संदर्भही चुकतो. वास्तविक ज्ञानमार्गाची पत्रे सर्वत्र विखुरलेली आहेत. त्यांना वेगळी काढण्याची आवश्यकता नाही.

आ. काही तारखेची पत्रे बिनतारखेच्या पत्रांत व बिनतारखेची तारखेच्या पत्रांत गेली आहेत.

इ. काही पत्रे जशीच्या तशी दोनदा छापली गेली आहेत. अशा जोड्यांपैकी काही वेळा एका पत्रावर तारीख असून दुसऱ्यावर नाही. त्यामुळे तेच पत्र दोन वेगळ्या जागी गेले आहे. उदाहरणार्थ, पत्रे १३० व २००.

ई. पृष्ठ १०८ व पृष्ठ १२० यांवरील तळटीपा बरोबर नाहीत.

उ. पाठोपाठ घडलेल्या घटनांसंबंधीची पत्रे दूर दूर गेली आहेत.

ऊ. काही पत्रांवरील तारखा किंवा तिथी बरोबर दिसत नाहीत.

एकंदरीत पुन्हा संपादन करणे जरूर आहे. वरील गोष्टी दोष काढण्याच्या हेतूने अजिबात नोंदल्या नाहीत. पूर्वीच्या संपादक मंडळाचे फार उपकार झालेले आहेत पण पुस्तकावर एक नजर मात्र टाकली पाहिजे; पत्रे साधकांनी

वाचावी म्हणून.

३. आता पत्रांचा क्रम लावताना मूळ पुस्तकाप्रमाणे तारीखवार पत्रे लावली आहेत. जिथे तारीख नाही तिथे तिथीवरून किंवा मजकुरावरून अंदाजाने ती काढली आहे. अशाच पद्धतीने मुळात चुकीच्या असलेल्या तारखा बदलल्या आहेत. उदाहरणार्थ, १५५ पत्रावर माघ व. ९ अशी तिथी असून १२.९.१९१२ तारीख आहे.पण माघ महिना सप्टेंबरमध्ये येत नाही, शिवाय, शिवरात्रीच्या उल्लेखाने पत्र माघातले आहे हे स्पष्ट होते. मग तारीख कोणती येईल ते पाहावयाचे. मागचे, २५० हे पत्र माघ शु. १२ चे असून तारीख १९.२.१९१२ आहे. या दोन पत्रांत तिथीनुसार १२ दिवसांचा फरक आहे. म्हणून तसाच तारखेत हवा. १९.२.१९१२ नंतर १२ दिवस, म्हणजे साधारण १ ते ३ मार्च येते. पुढच्या पत्राशी जुळण्यासाठी ही तारीख १.३.१९१२ धरली आहे. प्रदेश, तिथींची वृद्धी-क्षय, एका दिवसात कधीकधी दोन तिथी येणे, यांमुळे १-२ दिवसांचा फरक मानावा लागतो. असो. तारखा व तिथी बदलण्याचे हे तंत्र आहे. मागच्या-पुढच्या तिथींशी व मजकुराशी मेळ घालण्याचा सतत प्रयत्न करायचा. 'श्री गुरुदेव रानडे यांचा पारमार्थिक पत्रव्यवहार' या ग्रंथावरून काही तारखा मिळवल्या. बाबासाहेब संगोराम यांचे लेख व टिपणे यांचा खूप वेळा आधार घेतला. इतके सव्यापसव्य करूनही एकदमच गाडी अडून बसत असे. काही केल्या मेळ बसत नसे. मग नाइलाजाने पूर्ण मेळ घालण्याचा नाद सोडावा लागला. अशा जागा फार नाहीत, हाच त्यांतल्या त्यात दिलासा.

४. पाठोपाठ येणाऱ्या पत्रांत कधी कधी काही लागाबांधा नसे. उलट दुसरीकडचे एखादे पत्र जुळत असे. अशा वेळेला जुळणारे पत्र उचलून योग्य जागी ठेवणे भाग होते. पण छापील पुस्तकातली एकत्र बांधलेली पत्रे मधूनच उचलायची कशी ? उपाय होता. प्रत्येक पत्र स्वतंत्र कागदावर सुटे लिहिणे. दिसायला साधा पण प्रत्यक्षात आणायला महा कर्म कठीण असा हा मार्ग. पण गुरुकृपा फळली. श्री. ना. शं. कुलकर्णी यांनी सगळीच्या सगळी पत्रे सन २००० च्या आसपास सुटी सुटी लिहून दिली. वय फक्त ८०. त्यांचे किती उपकार झाले याचे स्मरण झाले की हात जुळतात.

५. तिथी व तारीख यांचा मेळ कसा घातला हे वर आले आहे. बिनतारखेची पत्रे तारखांच्या पत्रांच्या ओघात कशी आणायची ही फारच मोठी समस्या होती. तिथी व तारखा बऱ्याच वेळेला फटकून असतात. त्यांची व्यवस्था मजकुरावरून आणली, त्याचे एक उदाहरण पाहू. सुरवातीस पत्रे वाचताना प्रत्येक पत्राचा सारांश लिहिला होता त्याचा फार उपयोग झाला. तिथींचा उपयोग मर्यादित होता कारण तीच तीच तिथी दरवर्षी येते आणि शक तर (दोनचार पत्रे सोडली तर) नोंदलेला नाही. मग राहिला मजकूर. तारीख नसलेल्या २४९ पत्रात आहे की साळींच्या खरेदीसाठी ५ रुपये पाठवले आहेत. पत्र पौष शु. १३ चे आहे. २०९ पत्रात आणखी साळी घेण्याची सूचना आहे. याची तिथी पौष व. ७ म्हणजे ८-९ दिवसांनंतरची आहे. या पत्रावरही तारीख नाही. पुढे माघ शु. १ या १०.२.१० चे ११८ क्रमांकाचे पत्र म्हणते की साळी घरापर्यंत पोचवाव्या. नंतर फाल्गुन शु. १० च्या २५० क्रमांकाच्या बिनतारखेच्या पत्रात साळी पोचल्याचे आले आहे. दूर गेलेली पत्रे जवळ आणून २४९-२०९-११८-२५० हा क्रम लावल्यास मजकूर तर जमतोच पण पौष-माघ-फाल्गुन या महिन्यांतील तिथीही जमतात. म्हणून ही साखळी जमवली. पत्रांची जागा बदलताना ती का बदलली हे त्या त्या पत्रावर टिपण लिहून स्पष्ट केले आहे. एकूण ८० च्या वर असलेल्या बिनतारखांच्या पत्रांपैकी सुमारे ६० पत्रे अशा पद्धतीने मुख्य प्रवाहात आणली.

६. हे करत असताना पुष्कळ वेळा आधार सूक्ष्म असे. एखाद्या गावाचा, घटनेचा, नावाचा, ओझरता उल्लेख, सप्ताहाची तयारी, महाराजांचा कार्यक्रम अशा काड्यांनी बुडत्याला आधार मिळाला ! मग मला संस्कृतमधील एका विनोदी चुटक्याची आठवण झाली. २०-२५ माणसांचे एक एकत्र कुटुंब होते. घरात नित्याचाच एखादा पै-पाहुणा असे. कुणा सुनेच्या माहेरचा, मुलीच्या सासरचा असे. इतर नातलगही हजेरी लावत. पाहुणचार घेऊन तो १-२ दिवसांत निरोप घेई. एकदा एकजण बरेच दिवस मुक्काम ठोकून होता. हा कोण असा प्रश्न पडल्याने त्याला कुटुंबप्रमुखाने विचारले, ‘आपण कुणाला भेटायला आला आहांत ? आपले व आमचे काय नाते आहे’ ? तो उत्तरला-

अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरुः ।
बादरायणसंबंधात् यूयं यूयं वयं वयम् ।।

(माझ्या गाडीचे चाक बोरीच्या (बदरी) लाकडाचे आहे. तुमच्या दारात बोरीचे (बदरी) झाड आहे. हा बदरी-बदरीवरून येणारा (बादरायण) संबंध सोडला तर तुमच्या घरचे तुम्ही आणि आमच्या घरचे आम्ही.)

बिनतारखेची पत्रे तारखांच्या पत्रांत घुसवताना मी असा बादरायण संबंध तर लावत नाही ना अशी शंका मनात तरळली. एखाद्या नावाच्या धाग्यावर मी युक्तिवादाच्या मनोऱ्यावर चढते आहे का ? पण मग विचार केला- असेना का बादरायण संबंध, पत्रांमध्ये सुसंगती येते आहे तर जरूर तो लावायचा. चुकीचा असेल, कुणाला पटणार नाही, पण मला त्याचा आधार मिळत आहे, मग तो वापरायचा. बरे, मला त्यातून काही मिळवायचे नाही, तेव्हा अशी जुळणी करायची. या विचाराने काम चालू ठेवले.

७. पत्रांत संतवाङ्मयातील बरीच अवतरणे आहेत. ती बोली भाषेमुळे अशुद्ध झाली आहेत. पत्रे लिहिताना ती तशीच ठेवली आहेत. नंतर पत्राखाली नोंद करून ती शुद्ध स्वरूपात लिहिली आहेत. त्यांचा संक्षिप्तपणे संदर्भही तिथेच टिपला आहे. या संदर्भांचा पुरा तपशील पुस्तकाच्या अखेरीस परिशिष्ट ३ मध्ये सापडेल. कित्येक अवतरणे पुन्हा पुन्हा आली आहेत. ज्या पत्रात ती पहिल्या प्रथम येतात तिथे नोंदींत त्यांचा संदर्भ दिला आहे. तोच तो संदर्भ वारंवार दिला नाही.

८. पत्रांची भाषा विजापूर जिल्ह्याच्या आसपासच्या प्रदेशातील आहे. ही मराठी असलीतरी वाक्यरचना कन्नड वळणाची आहे. त्या काळी प्रचलित असलेली संक्षिप्त रूपे खूप आहेत. ती जमली तिथे उलगडून लिहिली आहेत. भाषेला थोडे मराठी वळण दिले आहे. विचार अवघड, भाषा अवघड, मग महाराजांचा उपदेश ठसावा कसा ? तो पचला तर पाहिजे ? पत्रे फार वाचली जात नाहीत ही आधीच वस्तुस्थिती आहे, ती वाचली जावीत ही तळमळ आहे म्हणून अर्थाची हानी न करता आवश्यक तो बदल (शब्दांचा) करून पत्रे लिहिली आहेत. जमेल तिथे शब्दांचा अर्थ कंसात दिला आहे. तसेच अवघड

वाक्यांचे सारही तिथेच कंसात देण्याचा प्रयत्न केला आहे.

९. पत्रावर बऱ्याच वेळा ज्या गावाहून पत्र लिहिले त्याचा उल्लेख नसतो. अशा वेळी संदर्भावरून ती गावे ठरवली आहेत. ही नावे, बदललेल्या तिथी किंवा तारखा ओळखू येण्यासाठी तेवढा भाग अधोरेखित केला आहे. कधी कधी तर फक्त शुद्ध किंवा वद्य इतकाच तिथीत फरक करावा लागला. तारखेतील एकच आकडा बदलावा लागला. अधोरेखित करून त्यांना उठाव दिला आहे.

१०. शुद्धलेखनाबद्दल मी फार आग्रही होते. आजही आहे. पण आता बोटांवर माझा ताबा नाही. चुका होतात. कधीतरी दुसराच प्रश्न येतो. अनुस्वार द्यावा की नाही ? आहांत / आहां (तुम्ही हुशार आहांत अशा वाक्यात) इथे 'हा' वर अनुस्वार आहे की नाही ? जाणत्यांना विचारले तेव्हा दोन मते आली. नव्या शुद्धलेखनाच्या नियमानुसार अनुस्वार नको असे एक मत आले, पण बहुवचन असल्याने तो हवाच असे दुसरे मत आले. मी दुसरे मत स्वीकारले. (कारण मी सर्व ठिकाणी अनुस्वार दिला होता !!) फार चिकित्सा केली नाही, व्याकरणाच्या गल्ली-बोळांत शिरले नाही. अशी एखादीच जागा. इतरत्र नियमांप्रमाणे लिखाण केले आहे.

११. पत्रांचा क्रम लावताना येणाऱ्या अडचणी व त्यांतून निघण्याचे उपाय वर नोंदले. मात्र काही पत्रांनी आव्हान दिले. ती कुठेही बसेनात.मग ती जागच्या जागी राहू दिली. एका पत्रात महाराजांनी डॉक्टरना बोलावल्याचे होते. तारीख-तिथी काही नाही. हे पत्र कुठेही जाऊ शकते, नक्की जागा सांगता येत नाही. मग ते जागीच ठेवले. पत्रांचा मी लावलेला क्रमच बरोबर आहे असा आग्रह नाही.

१२. १७५ व १७६ ही तारीख असलेली पत्रे महाराजांच्या निर्याणाच्या पाच आठवडे आधी लिहिलेली आहेत. वास्तविक तिथे पत्रव्यवहार संपला. पण दोन बिनतिथीची व बिनतारखेची पत्रे बाजूला काढली. १९० पत्रात उपदेश असून ते पत्र महाराजांचा संदेश म्हणून अखेरी अखेरीस आणले आणि पत्र १७९ हे महाराजांनी श्रीगोंदवलेकर महाराजांना लिहिलेले पत्र अगदी शेवटी घातले. यातील दोन संतांच्या पत्रभेटीतून दोघांचेही आपल्याला आशीर्वाद

मिळावे ही भाबडी भावना. पत्रलेखन तिथे संपले आहे.

१३. एकूण लिखाणाचा आढावा घेता येईल. पत्रे वाचून वाचून, एक क्रम लावून, काही पत्रे गाळून, लिहून काढली. ६.९.२०१४ पर्यंत हे काम संपले. नंतर पत्रे गाळण्याची चूक लक्षात आल्यावर (किंवा महाराजांचे शब्द ऐकण्याच्या ओढीने) गाळलेली पत्रे लिहून ती पूर्वीच्या तंत्राने जुन्या लिखाणात बसवली. मग सर्वच पत्रे सलगपणे दुसऱ्यांदा लिहिली. या वेळेस पत्रांतील अवतरणे शुद्ध स्वरूपात लिहिली. २५.९.२०१४, घटस्थापना, अश्विन शु. १ शके १९३६, या दिवशी सुरवात करून हे काम २३.१.२०१५ माघ शु. ३ शके १९३६ (त्याच दिवशी गणेशजयंती होती) या महाराजांच्या पुण्यतिथीला संपवले. पुन्हा तीच स्थिती. काम सोडवेना. मग पत्रांतील अवतरणे मुळात होती तशाच स्वरूपात, महाराजांनी उच्चारली तशीच लिहावी व खाली नोंद करून शुद्ध स्वरूपात लिहावी अशा विचाराने ज्येष्ठ शु. १० शके १९३७, २८ मे २०१५ या गुरुदेवांच्या पुण्यतिथीला तिसऱ्या वेळेस लेखन सुरू केले. गात्रे थकली होती, चुका होत होत्या पण काम चालू ठेवले. या वेळेस मात्र एकटीच्या जिवावर काम झाले नाही. मदत अनायासे मिळाली हीच महाराजांची कृपा. हे लिखाण आषाढी एकादशी, शके १९३७, २७.७.२०१५ रोजी समाप्त झाले. आता पत्रे पुन्हा पुन्हा वाचत राहणे यातच आनंद मानायचा. पण... पण... आशा सुटत नाही. वाचताना कधीतरी मला महाराजांचे शब्द पुन्हा ऐकायला येतील का ?

प्रकरण ३

काही टिपणे

१. श्रीभाऊसाहेब महाराजांच्या पत्रांच्या पुस्तकाचा वाचकांना परिचय आहे हे गृहीत धरले आहे. त्यातल्या १-२ गोष्टी सहज कळाव्या म्हणून ही टिपणे आहेत.

२. पत्रे वाचता वाचता मनाच्या श्लोकांचा उल्लेख येतो. एखादाच चरण असलेला श्लोक पूर्णपणे शोधू गेल्यास अडचण येते. कारण सामान्यतः प्रचलित असणारी २०५ श्लोकांची संहिता महाराजांनी वापरली नसून २१० श्लोक असलेली संहिता वापरली आहे. ती पाहिली की श्लोक क्रमांक जुळतात. २०५ श्लोकांच्या संहितेत भर घातली गेली की २१० च्या संहितेतून ५ श्लोक काढले गेले आणि हे कुणी, केव्हा केले काही माहिती नाही. असो. पत्रांच्या पुस्तकात 'रामदास स्वामींनी मनाच्या ओढीबद्दल २१० श्लोक केले आहेत' असा स्पष्ट उल्लेख ५८ पत्रात आहे (पृ. ८१). निंबरगी महाराजांच्या वचनांचे 'महाराजरवर वचन' पुस्तक बाबाचार्य काव्य यांनी प्रसिद्ध केले. त्यातही २१० श्लोकांची संहिताच वापरली आहे.

३. पत्रांमध्ये पैशांचा हिशोब लिहिताना पूर्वीची रेघी पद्धत वापरली आहे. पै, पैसा, ढब्बू पैसा, आणा, चवली, पावली, अधेली, रुपया अशी नाणी असत. कवडी, दमडी, शिवराई असे शब्दही होते. बिनकिमतीचे असा त्यांचा अर्थ असावा. कवडी हे नाणे नाही, शिवराईबद्दल काही माहिती नाही. 'देखने मे ढब्बू, चलने मे शिवराई' असा एक वाक्प्रचार होता. दमडीची किंवा कवडीची अक्कल नाही, असे म्हणत. त्याचा अर्थ काही अक्कल नाही. मला जशी आठवते तशी नाण्यांची पट खालीलप्रमाणे :-

३ पै = १ पैसा. पैशाची खूण उभी रेघ (।)

२ पैसे = १ ढब्बू पैसा. त्याला खूण नाही.

२ ढब्बू पैसे = १ आणा. एक आण्याची खूण आडवी रेघ (–)

२ आणे = १ चवली. तिला खूण नाही.

२ चवल्या = १ पावली किंवा ४ आणे. खूण उभी रेघ (।)

२ पावल्या = १ अधेली किंवा ८ आणे. तिला खूण नाही.

२ अधेल्या = १ रुपया. हा आकड्यात लिहितात.

जमाखर्च लिहिताना रुपया आकड्यात, नंतर पावली, आणा व पैसा यांच्या खुणा करतात. इतर नाण्यांची किंमत खूण असलेल्या नाण्यांच्या पटीत होई. शून्य दाखविण्यास ८अशी खूण असे. तिला आळे असे म्हणत.

चार आण्यांपेक्षा जास्त आणे असतील तर पावली आणि आणा अशा खुणा असत. उदाहरणार्थ ५ रुपयानंतर १० आणे असतील तर ५ रुपये आकड्यात, नंतर दोन पावल्या म्हणजे दोन उभ्या रेषा ॥ व दोन आणे = असे लिहीत. पैसे असतील तर त्याच्या उभ्या रेषा. शून्य असेल तर आळे. पै कशी लिहित ते आज मला आठवत नाही. एक उदाहरण घेऊ.

४४ म्हणजे ४४ रुपये

४४। म्हणजे ४४ रुपये, १ पावली किंवा ४४ रुपये चार आणे.

४४।- म्हणजे ४४ रुपये, १ पावली व १ आणा किंवा ४४ रुपये पाच आणे.

४४ ।-। म्हणजे ४४ रुपये, १ पावली, एक आणा व एक पैसा किंवा ४४ रुपये सव्वापाच आणे.

४४।८। म्हणजे ४४ रुपये एक पावली, शून्य आणे व १ पैसा किंवा ४४ रुपये सव्वाचार आणे.

महाराजांनी पुष्कळ हिशोब या पद्धतीने लिहिला आहे हे पत्रांत दिसून येते.

४. पत्र लिहिणाऱ्याने स्वतःचा पत्ता पत्रात लिहिलाच पाहिजे याबद्दल महाराज आग्रही होते. 'आलेल्या पत्रावर स्वतःचा पत्ता नव्हता म्हणून उत्तरास विलंब झाला' (पृ. १०१-१०२) असे सुचवले आहे. 'आपले ठिकाण, नाव, गाव, पत्ता लिहून कळवावे' (पृ. ८८). श्रीगुरुदेवांच्या पत्रांची सुरवात 15 A Hastings Road किंवा Allahabad University अशी होई हे सर्वांना माहीत आहे. आलेल्या पत्राला उत्तर लिहिलेच पाहिजे व तेही लागलीच गेले

पाहिजे असा महाराजांचा दंडक होता. श्रीगुरुदेव रानडे यांची पारमार्थिक पत्रे हे पुस्तक पाहिले की महाराज किती तत्परतेने पत्रोत्तर लिहीत असत ते ध्यानात येते. पत्र लिहिणारी व्यक्ती उत्तराची अपेक्षा करते; पत्र काही कामासाठी लिहिलेले असते. काम होण्यासारखे नसलेतरीही उत्तरी तसे कळवले पाहिजे. मठाच्या कामासंबंधीची पत्रे वेळेवर गेलीच पाहिजेत. 'तपेली थोरली तीन पोचल्याचे, दिल्याचे, किंमत व शिल्लक किती आहे, ते लिहिण्यास पत्र घातले पण उत्तर नाही' (पृ. १७४) अशी नापसंती महाराज दाखवतात. प्रपंचातील गोष्टींची आठवण होते, परमार्थातील बाबी मागेच पडतात अशी महाराजांची तक्रार आहे.

५. विविध गावी राहणाऱ्या आणि अनेक व्यवसाय करणाऱ्या मंडळींना पत्रे गेली आहेत. अर्थात् शिष्यवर्गाचा त्यांत मोठा वाटा आहे. पत्रातल्या मायन्यावरून पत्र कुणाला लिहिले आहे हे कळतेच असे नाही कारण कधी कधी तिथे स्पष्ट नाव नसते. पूर्वीच्या संपादकांनी काही पत्रांवर अशा व्यक्तींचा उल्लेख केला आहे. नानासाहेब म्हणजे महाराजांचे वडील बंधू आणि कृष्णराव, रामराव व भीमराव ही तीन मुले, यांना बरीच पत्रे आहेत. कृष्णराव व भीमराव हे महाराजांनी सांगितलेल्या मजकुराची पत्रे लिहीत. इतर पत्रलेखकही होते. ज्या गावी महाराज असत, त्या गावचा एखादा शिष्य पत्र लिहिण्याचे काम करत असे. महाराजांबरोबर फिरतीवर जाणाऱ्या शिष्यांच्या हातची खूप पत्रे आहेत.

६. पत्रांत अपरिचित शब्द बरेच आहेत. ते शब्द कोशातही मिळत नाहीत. जतुल्ला, माविजा अशा शब्दांपाशी आपले घोडे अडते. पहिल्याच पत्रातला पहिलाच शब्द कळला नाही त्याची मनाला टोचणी लागली होती. विजापूर पूर्वी अदिलशाहीच्या अंमलाखाली असल्याने उर्दू, फारसी असे शब्दही आहेत. शेतीव्यवहाराच्या पत्रांतून त्यांचे प्राबल्य आहे. त्यांचे अर्थ दिले नाहीत ही चुटपूट होती पण गुरुबंधू-भगिनींनी हात दिला. शब्दरत्नाकर वगैरे कोश पाहून खूपशा शब्दांचा अर्थ सांगण्याचे काम पाच मंडळींनी केले. पाचामुखी परमेश्वर ! परिशिष्ट ३ मध्ये काही शब्दांचा लहानसा कोश जोडला आहे.

७. छायाचित्रे, एकूण पुस्तकाची मांडणी, अर्थव्यवस्था, छपाईचे व्यवस्थापन वगैरे बाबी अंगावर घेण्यासाठी जुनी मंडळी पुढे सरसावली.

महाराजांचा विडा कुटण्याचा खलबत्ता, महाराजांच्या खडावा, महाराजांच्या अस्थी व त्यांचे हस्ताक्षर ही चार छायाचित्रे या पुस्तकात घालण्यास श्री. दीपक आपटे यांनी परवानगी दिली. त्यांचे आभार मानणे म्हणजे त्यांच्या औदार्याला कमीपणा आणणे आहे. या मंडळींची मदत ही आभारापलीकडची कामे आहेत. सर्वांच्या गुरुभक्तीची जाणीव ठेवून सद्गुरुस्मरण करत राहणे एवढेच हातांत आहे.

प्रकरण ४

पत्रे

१. पत्र लिहिताना सुरवातीस त्या पत्राचा मूळ पुस्तकातला क्रमांक व पुस्तकातला पानाचा क्रमांक घातला आहे. १९५९ सालच्या पुस्तकातील कोणते पत्र आपण वाचत आहोत हे यावरून समजते.

२. आता पत्रांचा क्रम बदलला आहे. पत्रे ज्या क्रमाने लिहिली जातील तो अनुक्रम समासामध्ये 'नवीन क्रमांक अमुक' असा नोंदला आहे. हे क्रमांक १ ते २६६ असे ओळीने येतील. पत्रांमधील तिथी–तारीख–मजकूर यांनुसार हा नवीन क्रम लावलेला आहे. साहजिकच तो मूळ पत्रांतील क्रमांकाहून वेगळा आहे.

३. पत्र कुणाला गेले आहे हे जिथे स्पष्ट नाही तिथे मूळ पुस्तकातील पत्राच्या डोक्यावरची सूचना ग्राह्य धरली आहे व ते नाव पत्राच्या सुरवातीस लिहिले आहे. ते नाव अधोरेखित केले आहे.

४. पुस्तकात शेवटचे पत्र २६२ आहे. परंतु १३० अ हे एक पत्र पुस्तकात जास्त आहे. तसेच २५३ पत्र एकच नसून २५३ अ आणि २५३ आ अशी दोन पत्रे आहेत. २२२ पत्रात (१) व (२) अशी दोन पत्रे आहेत. म्हणजे आता २६५ पत्रे झाली. पत्रांचा क्रम लावताना १९७ या पत्रात वास्तविक दोन पत्रे आढळली. ती १९७ व १९७ अ अशी केली. म्हणजे एकूण पत्रे २६६ झाली. ती नवीन अनुक्रमाने पुढीलप्रमाणे लिहिली आहेत.

	पत्र १	**पान १**
नवीन क्रमांक १	उमदी	पौष/माघ १२.१.१८६५

श्री

सोनन (श्रीमान्) श्री मोकदमानी हळी पो (परगणे) करजगी यांस,

व्यंकटेश खंडेराव देशपांडे पो (पाठवणार) मजकूर सुरू. सन १२७४ फसली[1] पो (पासून) मजकूर गावगना (गावासंबंधी) जे हक्क रुसुमाचे (वसुलाचे) एकंदर आमचे देशपांडेपणाबद्दल सरकारातून १८२९ तारीख ७ जानेवारीचा हुकूम यासोबत पा (पाठविला) आहे. त्याअन्वये आकार पोचून यालगत उत्तर कळवावे. तारीख १२ जानेवारी सन १८६५ इसवी.

सही– व्यंकटेश खंडेराव देशपांडे

नोंद :-

१. इसवी सन किंवा श्री. शालिवाहन शक याप्रमाणे फसली ही कालमापनाची रीत आहे. इसवी सन व फसली यांत ५९०/५९१ वर्षांचे अंतर असते.

xxxxx

पत्र २ **पान १**

नवीन
क्रमांक परगणे करजगी आषाढ/श्रावण
२ ...७.१८६७

श्री

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री बाळकृष्ण पंडितमामा[1] जहागिरदार मौजे निवरगी वडिलांचे चरणारविंदसेवेशी, आप्त मार्तंडराव[2] नाना देशपांडे, परगणे करजगी याचा चरणी मस्तक ठेवून, त्रिकाली नमन करून शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. वडिलांकडून बोलावण्याकरिता घोडा व राजश्री भीमराव[3] यास पाठवावयाचे होते. हे मज बालकाकडून व्हावयाचे, परंतु तीर्थरूप राजमान्य राजश्री यशवंतराव आबा गुरुवारीच येणार होता म्हणून चि. सौ. काशीबाईस सोमवारी श्रीसंगमनाथ देवाचा उत्सव पाहण्यास दोन दिवस पाठवून देणे व आणखी दोन दिवस राहून परत आणणे असा बेत होता. परंतु आजपर्यंत वडीलही

आले नाहीत आणि घरी दुसरे कोणी नाही हे आपण समक्ष पाहिले आहेच. असे असून मज बालकावर शब्द ठेवणारे पत्र पाठवलेत. त्यास माझ्याकडे काही उपाय नाही. आपण तो सुज्ञच आहां. मजकडून चूक झाल्यास क्षमा करावी. मज बालकाला शक्ती नाही. आणखी दोन चार दिवसांनी सौ. गंगाबाईस बोलावणे पाठवून आणणार आहोत. त्या आल्यावर चिरंजीवीची (सौ. काशीबाईंची) रवानगी करून देतील. आताचे आपले बोलावणे परत झाले यास्तव मज बालकावर राग न होता मनापासून पूर्ण कृपा असावी हेच मागणे मज बालकाचे आहे. मज बालकाला अधिक लिहिणे शक्य नाही. ही विज्ञापना.

याच पत्री श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नारायण पंडित[४] यांना शिरसाष्टांग नमस्कार. वर वडिलांस लिहिले आहे यावरून सर्व समजेलच. आपण प्रत्यक्ष पाहून वडिलांकडून मला दोष देवविला. बरे, असो. उपाय नाही. बोलावणे निरुपायामुळे परत करावे लागले होते...

नोंदी :–

१. महाराजांचे श्वशुर.

२. महाराजांचे वडील बंधू, त्यांना बरीच पत्रे आहेत.

३. हे भीमराव कोणी नातेवाईक असावेत. महाराजांचे चिरंजीव नव्हेत.

४. पंडित घराणे म्हणजे महाराजांची सासुरवाडी. हे निवरगीचे जहागिरदार होते. बाळकृष्ण पंडित, बापू पंडित, नारायण पंडित, अण्णा पंडित, तात्या पंडित, कलो पंडित, दादा पंडित अशी बरीच नावे येतात यांपैकी कुणाकुणाचे महाराजांशी काय नाते आहे कळत नाही. अप्पण्णा, अण्णप्पा अशीही नावे येतात. महाराजांची व निवरगीकरांची शेतीमध्ये व इनामामध्ये भागीदारी असल्याचे ३ व ४ या पत्रांवरून कळते. या संदर्भात थोडी कुरबुरही होती.

XXXXX

	पत्र ३	पान २
नवीन क्रमांक ३	उमदी	मार्गशीर्ष / पौष २७.१२.१८६९

श्री

ती. राजमान्य राजश्री बाळकृष्ण पंडितमामा जहागिरदार मौजे निवरगी, वडिलांचे सेवेशी, बालक व्यंकटराव भाऊचा दोन्ही कर जोडून त्रिकाल शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना. ता. २७ माहे डिसेंबर सन १८६९ इसवीपावेतो वडिलांचे आशीर्वादिकरून सुखरूप असो. विज्ञापना. पत्र मुद्दाम लिहिण्याचे कारण, मौजे शिवणगी येथील इनामाबद्दल तुम्हांकडून त्या खटल्यात मुखत्यार आहांत. हल्ली आज तारखेपासून आठ दिवसांत जतेस कारभारीसाहेबांकडे हजर होऊन सनदपत्र वगैरे जो पुरावा करणे, तो करण्याबद्दल मामलेदारसाहेब, ठाणे उटगी, यांजकडून तारीख २० माहे डिसेंबर १८६९ ची नोटीस आज तारखेस पावली. आता आपण मुदतीचे आत खुद्द जाण्याचा जरूर बेत केला पाहिजे. कारण प्रसंग शेवटीचा आहे. पुन्हा या इनामाबद्दल हरकत, तक्रार वगैरे बिलकूल चालणार नाही, हे आलेल्या नोटिशीची प्रत करून पाठवली आहे, त्यावरून समजून येईल. याजकरिता तेथे खर्च पडणार आहे तो घेऊन आपण येथे निघून यावे. कोणतीही अडचण दाखविण्याची ही वेळ नव्हे. येथे आपण आल्यावर वडिलांचे[१] विचाराप्रमाणे पुढे काय तजवीज करणे ती करू. सारांश आपण पत्रदर्शनी जरूर निघून येणे. आपणांस बनत नसल्यास तसे मुद्दाम पत्र पाठवावे, म्हणजे मी येण्याचे करतो. सारांश सदरहू खटल्याबद्दल वडिलांचे विचाराखेरीज मजला कोणतेही करणे समजल्याशिवाय करवत नाही. सदरहू खटला वंशपरंपरा इनामाचा आहे, याजकरिता निघून येणे. जतेस नेमलेल्या नोटिशीचे मुदतीत आपले मत समजण्यास विलंब लागल्यास सदरी दोष मजवर नाही. कोर्टाबद्दल वकिलाकडून पत्र आले आहे की या महिन्यात निकाल होईल, कळावे. वडिलांप्रत विशेष काय

लिहिणे ? विज्ञापना.

ती. वेदमूर्ती राजमान्य राजश्री बापू पंडित यांस साष्टांग नमस्कार. सदर वरील मजकूर लिहिला आहे त्यावरून समजून येईल. जर वडील गावी नसतील तर मुदत जवळ आहे व जरुरीचे काम कसे करावयाचे व खर्चाबद्दल मुद्दाम उद्या संध्याकाळपर्यंत समजले पाहिजे. मीच जतेस जावे तर तेथे अनेक कारणांच्या अडचणी आहेत. याबद्दल वडिलांस माहीतच आहे. त्यासंबंधी कळवावे व खर्चावयास पाठवून द्यावे म्हणजे बरे पडेल. कळावे, ही विज्ञापना. नोटिशीची नक्कल खाली लिहिली आहे.

नोंद :-

१. वडील म्हणजे दोघे मोठे बंधू असावेत.

xxxxx

पत्र २१४ पान २११

नवीन
क्रमांक
४

(टिपण :- महाराज निवरगीस सासुरवाडीच्या मंडळींना भेटावे म्हणून गेले होते. पण बापू पंडितांची भेट होऊ शकली नाही. त्यावर महाराजांची ही प्रतिक्रिया आहे. महाराजांनी संस्थानची मामलत नाकारली म्हणून सासऱ्यांचा व एकूण निवरगीकरांचा रोष झाला. भेटायला गेले असता बापू भेटले नाहीत. ही घटना महाराजांच्या वयाच्या तिशीच्या आसपासची असावी असा अंदाज आहे. म्हणून पत्राची तारीख १८७०-७५ दरम्यान धरली आहे. पुस्तकात हे पत्र खूप पुढे आहे. पण या तारखेनुसार इथे आणले आहे.)

परगणे करजगी श्रावण शु. १०

१८७०-७५ च्या दरम्यान

श्री

श्रीमंत वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री बापू पंडित जहागिरदार, संस्थान मौजे निवरगी स्वामींचे चरणसेवेशी, सेवक व्यंकटराव भाऊ देशपांडे, परगणे करजगी याचा कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना. तागायत श्रावण शु. १० पावेतो आपले अनुग्रहेकरून एकंदर लहान थोर मंडळी खुशाल असो. विज्ञापना. आपणांकडून अलीकडे पत्र वगैरे येत नसल्यामुळे वडील मंडळींची अवकृपा झाली की काय म्हणून मी सेवक एकंदर आपल्या मंडळींचे चरणदर्शन घेऊन यावे म्हणून आलो होतो. तो एकंदर वडील मंडळींच्या भेटीचा लाभ झाला, त्यात आपली भेट झाली नाही,हे फार आम्हांकडून गैरशिस्त झाले. त्यात आमचे पुण्य कमी. त्यामुळे आपली भेट झाली नाही असे समजलो. पंडितराव व आम्ही मिळून आलो होतो. सायंकाळी फराळ करताच वाटाड्या बरोबर देऊन रात्रीच रवाना केले. शुक्रवारी प्रहराचे आत पोचलो. आपणांस कळावे. वरकड मजकूर तो ठीकच आहे. आपणांकडून वारंवार पत्र येऊन समाचार घेत असावा. मी आपला आहे अशा विषयी मी लिहावे यात तात्पर्य नाही. अभिज्ञच आहां. कळावे. फार काय लिहिणे शक्य नाही. ही विज्ञापना.

ताजा कलम- वज्रचूडामंडित कुंकुमशोभित ती. सौभाग्यवती मातोश्रींस शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. मज बालकावर चौघांसारखी कृपा व आशीर्वाद संपूर्ण असावा या विषयीच चरणांस मागणे आहे. त्यात न्यून पडू नये. त्यात मुलाकडून गैर झाले तरी क्षमा करण्याचा अधिकारही वडिलांकडेच आहे. सारांश चालवून घेणे वडिलांकडेच आहे. मी फार लिहावे असे नाही. कळावे, ही विज्ञापना.

ताजा कलम- रा. कलो पंडित, तात्या पंडित वगैरे मंडळींस नमस्कार सांगावा. मातोश्री आत्यास शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. नारायण पंडित यांचे कुटुंब आले की नाही कळवावे. ही....

पत्र २१५   पान २१२

नवीन क्रमांक ५

(टिपण :– हे पत्र २१४ पत्राचा ताजा कलम असल्यासारखे आहे. २१४ पत्रात दोन वेळा ताजा कलम आहे. हा तिसरा !)

परगणे करजगी   श्रावण शु. १०
१८७०–७५ दरम्यान

हेच पत्री वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नारायण पंडित व तात्या पंडित यांच्या चरणी मस्तक ठेवून भाऊचा त्रिकाळी नमस्कार. विज्ञापना. इकडील सर्व मंडळी आनंदात खुशाल आहेत. आपल्यांकडून आनंद मजकूर लिहून खुलासा करावा हेच पायांपाशी मागणे फार फार आहे. अभिज्ञच आहांत. पुष्कळ संकेताने लिहिलेल्या अक्षरांकडे लक्ष जात नाही. देहस्वभावच आहे. तत्रापि लक्ष दिले तरी चुकीचा अर्थ धरूनच बसतो, यास उपायच नाही. असो. सुज्ञांप्रति विशेष लिहिणे नकोच आहे. मुख्य सुबुद्धी ठेवणे, आनंद मानणे या ज्ञानोबाने सांगितलेल्या गोष्टी आहेत. तसेच आहांत. सर्व प्रकारे आनंदात वेळ जावा असे करावे, अशी प्रार्थना फार आहे. कळावे, ही विज्ञापना.

पत्र ४   पान ४

नवीन क्रमांक ६

उमदी   चैत्र/वैशाख
२५.५.१८८६

श्री

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री रामचंद्ररावअप्पा अण्णा देशपांडे

परगणे करजगी व बरडोल, व मौजे टाकळी कुलकर्णी, जोशी, पाटील मौजे जिरंकलगी व कुलकर्णी मौजे हळ्ळी बालगाव, राहणार मौजे हळ्ळी, मुक्काम उमदी वडिलांचे सेवेशी,

बालक भीमराव बाबा देशपांडे, परगणे मजकूर, याचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत तारीख २५ माहे मे सन १८८६ इसवीपावेतो वडिलांचे आशीर्वादेकरून उत्तम असो. विशेष. आपणांस विनंती लिहिण्यास कारण मौजे हळ्ळी येथील वाड्याची दुरुस्ती, तसेच इमला नसून (नासून ?) सर्व जीर्ण होत चालले आहे, त्यासाठी आपण काही मनावर घेतले असता तयारी करावी व सर्वांस उपयोगी पडावे अशी इच्छा आहे. हे कर्तव्य होण्यास आपलेवाचून दुसऱ्यांकडून योग नाही, म्हणून लिहिले आहे. तर काय विचार करता ते चिरंजीवास कळवावे. बरडोल महालाचे देशपांडेपणाचे हक्क व रुसुमाची नेमणूक इंडी तालुक्यात येत आहे. ते जिरंकलगीकर व निवरगीकर यांचे हिश्शास गेल्याकारणाने तेथील उत्पन्न ते घेतात. पूर्वीपासून दोन चार डोके (पिढ्या) होऊन गेले. तेथे 6५6४ पाच आणे चार पैसे[1] हिस्सा त्यांचेकडे गेला. जिरंकलगी पाटीलकीचे वतन वडील घराणे पांडुरंग हरिहर याजकडे आहे. हळ्ळी, बालगाव गावाचा कुलकर्णीपणा हे आमचे वतन असून पूर्वी आमचे वंशिक (पूर्वज) ३/४ डोके होऊन गेले असतील, त्यांनी मालेगावकरांना बक्षीस दिले असे सांगतात. हळ्ळीचा वाडा बांधण्यास मालेगावकरांनी पैसे दिले त्या उपकारास्तव दोन्ही गावांचे कुलकर्णीपण दिले असे आमचे वडील म्हणतात. जिरंकलगीकरांनी दोन्ही गावांचे कुलकर्णीपण दिले (कुणाला दिले ?) म्हणून आमचे आजोबांस पाटिलकीत हिस्सा दिला नाही. (संदर्भावरून देशपांडे यांना कुलकर्णीपण दिले असावे.) तेथील उत्पन्न तेव्हाचे कारकीर्दीत १०००/१२०० रुपये येत होते म्हणून आमचे आजास करजगी महालाचे उत्पन्नाचा सोलापूर मुक्कामी फैसलनामा (निर्णय) करून सर्व भाऊबंदांनी मिळून विद्यमान पंचसाहेबांसमोर ठराव करून घेतला व करजगी महाल दिला. त्याचा दाखला घरी आहे. सुमारे

२०० वर्षे झाली असा अंदाज आहे. १२२० फसलीत आमच्याकडे होता. कागदपत्रांवरून अंदाज लागेल. तेव्हा करजगी महाल पडीक असून काही उत्पन्न येत नव्हते. आमचे आजे भोळे म्हणून त्यांस करजगी महाल दिला. टाकळी येथील कुलकर्णीपणाचा व जोशीपणाचा तिसरा हिस्सा दिला तो आजतागायत चालला आहे. इनाम वगैरे उत्पन्न निवरगीकरांनी आमचे हिश्शाचे निम्मे घेतले आहे. ते हळ्ळी बालगावचे मावीजा (आगाऊ रक्कम) म्हणून धरून घेतले आहे. बाकी निम्मे इनाम जिरंकलगी येथील अप्पा बंडोबा वगैरे आजोबा आहेत त्यांचेकडे लावणीस आहे. अलीकडे १० वर्षे त्याचे काहीच उत्पन्न आमचे वडिलांस दिले नाही. त्याचा विचार करणे आवश्यक आहे. कारण चाललेल्या वहिवाटीचा वसूल काही न विचारल्याने राहिला आहे. त्याप्रमाणे टाकळी दप्तर घरी आहे, त्यात दाखला आहे. योग्य कागदपत्रे आहेत तर त्याचा विचार काय तो करावा. निवरगीकरांकडे निम्मे इनाम असलेले आमच्या आजाचे दस्त त्यांचेजवळ आहे म्हणून ऐकतो, ते खरे-खोटे[2], विचार करावयाचा आहे. सारांश, हळ्ळीचा वाडा आमचेकडे आहे तो दुरुस्त करणे आहे. इनाम जिरंकलगीकरांकडून सोडवून घेणे आहे. कुकट (फुकट ?) न विचारता निम्मी जमीन वडिलांनी त्यांचेकडे सोडली आहे. तसे कागदपत्र आहेत. करिता लौकर विचार करणे आहे. निवरगीकरांकडे निम्मी जमीन असलेले खरे खोटे करायचे आहे. याप्रमाणे येथील मजकूर झाला. करजगी महालात तेथील भाऊबंदांचा संबंध नाही. बरडोल महालात आमचा संबंध नाही. याप्रमाणे वडील चालत आले तैसे चालणे आम्हांस भाग आहे. करजगी महालातला चौथाई हिस्सा उटगीकरांना देण्याचे सोलापूरच्या पंचांचे कागदपत्र आहेत. तैसे न होता आमचे आजे खंडेराव आनंद यांचेपासून निम्मे निम्मे चालले आहे. तसे आमचे वडील चालत आहेत. करजगी महालात आजोबांपासून काही गावांचे इनाम आमचे नावाने आहे. ते आमचेकडे कायम चालले पाहिजे कारण वाडवडील चालत आले. तसे कागदपत्र भीमराव उटगीपर्यंत चाललेली घरे आहेत. त्यांचे नावाने त्यांचेकडे, आमचे नावाने

आमचेकडे. बाकी इनामाचा खर्च निम्मा निम्मा देणे आहे. रुसुम निम्मा निम्मा घेत आहेत. फक्त उटगीकरांकडे घेर्डी महालाचे इनाम सात गावांचे आकार ८० रुपये, चौथाई वजा जाता ६० रुपयांपैकी निम्मे आम्हांला दिले पाहिजे. तो आज देतो, उद्या देतो अशी टाळाटाळ करत सन १२७१, ७२, ७३, ७४ पासून आजपर्यंत सर्व हिस्सा तेच घेत आहेत. त्याचा विचार लौकर करावयाचा आहे. त्याप्रमाणे भीमराव व त्याचा मुलगा अण्णा यांचे स्वदस्तुरचे दस्त आहेत. तुमचे अनुमतीशिवाय परभारे उत्पन्न घेणार नाही असे कागदपत्र असूनही न विचार केल्याने, घेर्डी महालाकडे न गेल्याने, मोघम झाले. आता उपयोग नाही. लौकर व्यवस्था केली पाहिजे. सरकारी खर्च त्याचे नावाने आहे, तो करून देतो म्हणून सांगतो पण दिला नाही. खटपट न केल्याने फुकट निम्मे उत्पन्न जात आहे. हे गैर आहे. वडिलांचे सुस्तीमुळे असे झाले. झाले ते झाले. पूर्वीचे त्याचे काही ऋण असेल म्हणून असे झाले की काय देवास ठाऊक. आता लौकर याचा विचार करावा. डफळापूर, संक, भिवरगी, तिकोंडी ३ (४ ?) गावांचा रुसुम अदमासे ४०/५० रुपये येतो. त्याचीही वर लिहिलेल्या घेर्डी महालाप्रमाणे अवस्था झाली आहे. फुकट अर्धा रुसुम त्यांचेकडे जात आहे. त्याचा लवकर विचार करावा. भिवरगीचे इनाम समाईक असूनही सन १२७० पासून २७ रुपयांप्रमाणे आकार भीमराव यांनीच घेतला आहे. त्याची लौकर खटपट करावी. कागदपत्र आहेत. वडिलांचे सुस्तीमुळे राहिले आहे. तिकोंडी जमीन त्यांचेकडे हिश्शाने आहे. सारांश, घेर्डी उत्पन्न ७ गावांचे, संक उत्पन्न ३ गावांचे असे एकूण १० गावांचे उत्पन्न व भिवरगी गावाचे उत्पन्न सन १२७३-७४ पासून १२९४ फसलीपर्यंत उत्पन्न त्यांनी घेतले, ते रीतीप्रमाणे त्यांचेकडून घेणे आहे. पुढे निम्मा निम्मा वसूल घ्यावयाचा आहे. याप्रमाणे लौकर बंदोबस्त करावा. संस्थान जतपैकी रुसुम निम्मा घेत आहेत. निम्मे निम्मे खर्च असलेले काही गावांचे इनाम आम्हांस निम्मे न देता आपणच घेत आहेत. त्याचा विचार करावयाचा आहे. आता आमचे वडिलांकडे चालत आलेले इनाम

खालीलप्रमाणे -

१ मौजे उमदी	६ मौजे बेळोडगी
२ मौजे सोनलगी	७ मौजे बालगाव
३ मौजे सोडी	८ मौजे हळ्ळी
४ मौजे सलगर बुद्रुक	९ मौजे चिकलगी
५ मौजे सिवणगी	१० मौजे सलगर खुर्द

ही गावे आजोबांपासून वाटून घेतली आहेत. काही जमीन पाव आमचेकडे जास्ती आहे कारण या महालांत वडील आम्ही आहो म्हणून त्याचे वडिलांनी ठेवले आहे. त्याचेवर आमच्या वडिलांनी व भीमरावांनी मिळून जमीन वाटून घेतली ती-

११ मौजे बोबलाद	१५ मौजे तिकोंडी
१२ मौजे आकलवाडी	१६ मौजे सिरनांदगी
१३ मौजे पोट	१७ लोणारमाचे
१४ मौजे बुर्गी खुर्द	१८ मौजे हुलजंती

ही अलीकडे वाटून घेतली आहेत. याप्रमाणे कागदपत्र आहेत. बाकी वाटून घेण्याची गावे खालीलप्रमाणे-

१९ मौजे जिती	३० मौजे अंकलगी
२० मौजे डिकसाळ	३१ मौजे कागनरी
२१ मौजे कात्राळ	३२ मौजे गुरविनाळ
२२ मौजे करनाळ	३३ मौजे करोळी
२३ मौजे कागष्टगी	३४ मौजे गिरगाव
२४ मौजे जंगलगी	३५ मौजे कोलगिरी
२५ मौजे सोन्याळ	३६ मौजे बोर्गी बुद्रुक
२६	३७ मौजे लवगी
२७ मौजे सोर्डी	३८ मौजे लवंगा
२८ मौजे आसंगी	३९ मौजे निंबोणी
२९ मौजे जालिहाळ	

शिवाय धर्मादाय इनाम खाली लिहिल्याप्रमाणे-

४० मौजे सुसलाद   ४२ मौजे सिदनाथ

४१ मौजे उटगी   ४३ मौजे मिरवाड

येणेप्रमाणे धर्मादाय वजा जाता बाकी गावे निम्मी निम्मी खर्ची असल्याप्रमाणे समाईक लावणी करावयाची आहे. याप्रमाणे सालोसाल गुमास्ते याचे कागदपत्र व लावणीपत्र आहेत. यादी आहे. याप्रमाणे काही वहिवाट असून काही उटगीकरांकडे जास्त उत्पन्न जात आले ते वडिलांचे सुस्तीने झाले आहे. तरी तुम्ही लौकर विचार करावा. सुसलाद इनाम पूर्वी कैलासवासी आनंदराव मल्हारांनी धर्मादाय दिले असून त्याच्यावर उटगीकरांच्या आज्यांनी हुमालपत्र (हमीपत्र) करून दिले आहे. दरम्यान उटगी मुक्कामी भीमराव व आमचे वडील यांनी ताकीदपत्र दिले. यावरून समाईक इनाम धर्मादाय दिले आहे असे सिद्ध झाले, हे तुम्हांस कळावे. आता त्या उटगीकरांचे म्हणणे पाव जमीन जास्ती आहे ती परत द्यावी. ती जास्तीची जमीन पूर्वी आजा पणजा यांनी काय समजुतीने दिली आहे त्याच्यावर आजपर्यंतच्या वहिवाटीप्रमाणे चालावे असे कागदपत्र भीमरावांनी लिहून दिले आहेत. असे असून त्यात हिस्सा मागणे गैर आहे असा मजकूर आहे. शिवाय उमदीचा निम्मा मळा पूर्वी बोर्गीकरांनी वडील व आजे यांस ठकवून जुलमाने लिहून घेतला आहे. सलगर बुद्रुक जुलमाने सिंतरून (फसवून) दोन्ही इनामे जुलूम कपट करून घेतली आहेत. त्यांचा अंमल जुलूम कपट करून साधून घेतला आहे. त्याचा विचार करणे आहे. आपण जोराने (बळ वापरून) परत घेतला तरी पाप लागणार नाही असे आजे सांगत होते, असे वडील सांगतात.

याप्रमाणे मजकूर तुम्हांस आमचे वडिलांचे सांगण्यावरून लिहिला आहे. तरी वडील अण्णा, दादा, तात्या, तुम्ही सर्वच एक विचाराने चालून सोयीने सोयीने लोकांना व कचेरी अंमलदारांना अनुकूल करून विचार करावयाचा आहे. रीतीवाचून उर्मटपणा दांडगाई करू नये. युक्तीने, मसलतीने, गुप्तपणाने साधून घ्यावयाचे आहे. रिवाज वाईट. शिवाय एक वेळ अब्रू गेली तर परत येणार नाही. करिता आपले महत्त्व व

थोरपणा राखून वागणूक करावी. सर्वांबरोबर स्नेह असावा, परंतु तो ज्याचे त्यापरीच असावा. सर्वांशी चांगले बोलावे. आपले महत्त्व राखून घ्यावे. कोणास अंतःकरण देऊ नये व दिले नाही असे लोकांस कळू देऊ नये, अशी मतलबाची वागणूक असावी. नेहमी एक असामी कचेरीत असावा. त्याचा सर्वांस आधार असतो, आपले कार्य साधून येते. घरी व गावी रिकामा दिवस घालवू नये. त्याने महत्त्व कमी होते. कचेरीत असल्याने महत्त्व वाढते. ज्ञान, बुद्धी जास्त प्राप्त होतात. एकाने नेहमी महालात फिरावे. एकाने शेतमळ्याची व्यवस्था करावी. एकाने घरचा बंदोबस्त ठेवावा. याप्रमाणे सर्वांनी व्यवस्था ठेवण्याबद्दल वडिलांचे आज्ञेवरून लिहिले आहे. एका ठिकाणी बसून रिकामा वेळ घालवल्यास दरिद्रपणा येऊन प्रपंचात आबदा भोगावी लागते. शिवाय कज्जा उत्पन्न होतो. हलक्या किंवा कमी योग्यतेच्या माणसांशी स्नेह केला असता त्याचे संगतीगुणाने तेच गुण प्राप्त होतात. आपले महत्त्व व थोरपणा जाऊन कमी योग्यतेत शिरून हलकटपणा येतो. थोर वर्तणूक राहत नाही. याकरिता आपले महत्त्व व गौरव राखून असावे. आपल्या पदरी माणसे असतात त्यांचे कल्याण करत जावे. होईल तेवढे त्यांना द्यावे. त्यांच्याविषयी दुजा भाव करू नये. कारण पदरच्या आपल्या माणसांची काही आशा असते. आपली त्यांच्यावर कृपादृष्टी असावी असे वडिलांचे सांगणे आहे, म्हणून लिहीत आहे.

सारांश, जे जे करणे, देणे, घेणे, वागणे, सर्वांत व सर्वच गोष्टींत सत्य रीतीने असावे. एकवचनी असावे. मागे एक पुढे एक असू नये. जे करणे आहे ते कर्तृत्व केल्यावाचून 'करीन' असे बोलू नये. गुप्त असावे. आपल्यापेक्षा कमी योग्यतेचे माणसांवर विश्वास ठेवून स्नेह करू नये. केला तरी विश्वास धरू नये. धरलातरी नेहमी आपले गृहछिद्र सांगू नये. सांगितलेतरी त्याचे बुद्धीने वागू नये. तसे वागले असता तो घरातले घरात सर्वांस मूलबापास, भाऊबंदास, स्त्रीपुरुषास कज्जा लावून तिकडली गोष्ट इकडे, इकडली गोष्ट तिकडे सांगून सर्वांत कज्जा लावून देऊन आपण प्रतिष्ठेने सर्वांस हित केल्यासारखे दाखवतो व सर्वांकडून

आपले कार्य करून घेतो. या इच्छेने लुच्चे लोकांची वागणूक असते. शेवटी त्यांची परीक्षा होते परंतु ज्या वेळेस भ्रम लावून कज्ञा लावला तेव्हाच आपले महत्त्व व पदवी गेली. त्या भ्रमात वागल्यामुळे हे झाले. म्हणून आधीच हुशारीने असावे. आपले गृहछिद्र, घरातील गोष्टी, आपली अडचण आपली आपण सोसावी. आपले अंतःकरण हलक्या लोकांस देऊ नये. आपले उद्योग ज्या ज्या वेळी जे जे करणे ते युक्तीने बुद्धीने आपले महत्त्व राखून करावे. रिकामा वेळ घालवू नये. हरटे बडवीत (गप्पा झोडीत) कोठे बसू नये. दररोज सकाळी, संध्याकाळी विचार करावा की, आम्ही या बारा तासांत काय उद्योग केला, त्यापासून काय फायदा झाला ? हा विचार आपलेजवळ नेहमी असावा. हे चुकल्यास काही फायदा, सुख, होणार नाही, दरिद्रपणा चुकणार नाही. कज्ञा चुकणार नाही. भ्रमात राहिल्याने भ्रम वाढत जाऊन दुष्टांच्या संगतीने आपले महत्त्व व योग्यता निघून जाते. जन्मभर हलक्या लोकांत वागणूक होते. पदवी असली तरी काय उपयोग ? अत्यवस्थ माणूस जसा भूमिभार होऊन राहतो, त्या मासल्याची अशा माणसाची वागणूक होते. म्हणून लिहिले आहे. आपले उद्योग नेहमी आज्ञेप्रमाणे (नियमाप्रमाणे) मनःपूर्वक केले असता रिकामा वेळ फावत नाही व दुष्ट कर्मे होत नाहीत. दुष्टांची संगत लागत नाही. सर्वांचे त्या योगाने कल्याण होते. स्वार्थबुद्धी येत नाही. आलीतरी तसे वागण्यास सवड होत नाही. म्हणून आपला आपला उद्योग करावा. सकाळी, दोन प्रहरी, संध्याकाळी, तीन वेळा होईल तितका आपल्या शक्तिनुसार देवाचा नेम करावा. नेम अगदी चुकू नये. संध्याकाळी नेमाने होईल तितकी पोथी वाचावी. शक्ती असेल तर देवास कापूर उजळावा. नंतर आपले धर्माप्रमाणे (उद्योगाप्रमाणे) योग (काम) करावा. म्हणजे प्रपंच परमार्थ दोन्ही साधून, या बेताने वागणारास ईश्वर निरंतर सुख व शांती देईल. त्याचेजवळ बिलकूल खेद राहणार नाही. म्हणून वडिलांचे सांगण्यावरून तुम्हा वडिलांस मी बालक लिहून कळवीत आहे. फार लिहिण्यास शक्ती नाही. चूक असल्यास क्षमा करावी. आपले मन चुकीच्या मार्गाने जाऊ लागल्यास,

तेव्हाच चूक सुधारून युक्तीने शहाणपणाने वागण्याची बुद्धी व्हावी हेच मागणे आहे. कळावे, ही विज्ञापना.

ताजा कलम– ही सर्व हकीकत सर्वांना समजण्याकरिता, माहिती होण्याकरिता लिहिली आहे. ज्या ज्या प्रसंगी जे जे पुढे येईल ते ते युक्तीने, शहाणपणाने, समाधानाने करत जावे. देव करील ते खरे आहे. त्याच्या भरवशावर वागावे असे वडिलांनी सांगितले आहे. भ्रमाची भीती आहे. भ्रमात पडून दिवस व्यर्थ जातात. आयुष्य व्यर्थ जाते. मागे कोणी सर्व बंदोबस्त करून गेले नाहीत. त्यांनी काही बरोबर नेले नाही. पुढे आमचीही गत त्याचप्रमाणे आहे. म्हणून देवाकडे लक्ष ठेवून जे जे प्रसंगी अडचण येईल, ते ते वेळी देवाचे नामस्मरण करून कार्य करावे. मी करतो असा भ्रम ठेवू नये. सारांश, मुख्य मन, बुद्धी, युक्ती तीन्हीही ईश्वरास अर्पण करून तो करेल ते होवो असे समजावे. कळावे.

नोंदी :–

१. 6५6४ म्हणजे– पाच आणे चार पैसे असे पुस्तकात आहे.

6 = शून्य पावली

५ = ५ आणे

6 = शून्य आणे

४ = पै

असा हिशोब करता येतो. परंतु ५ आणे का लिहिले ? १ पावली व १ आणा असे का नाही ? तसेच ४ पै का लिहिले ? १ पैसा व १ पै का नाही ? केवळ रेघीत लिहायचे तर ते 6।–।– असे लिहावे लागेल. म्हणजे शून्य रुपया, १ पावली, एक आणा, एक पैसा व एक पै. हा रुपयाचा तिसरा हिस्सा आहे हे स्पष्ट आहे.

२. निवरगीकरांच्या दप्तराचे खरे–खोटे करण्याचा उल्लेख आहे. एकूण ३–४ पत्रांवरून त्यांची मनोवृत्ती कळते.

XXXXX

पत्र २५४ पान २४६

नवीन
क्रमांक
७ (टिपण :- हे पत्र पुस्तकात बिनतारखेच्या पत्रांत गेले आहे. पण त्याच्यावर तारीख आहे. त्यानुसार इथे आणले आहे.)

परगणे करजगी माघ
१४.२.१८८७

श्री

नक्कल

श्रीमंत राजश्री रावसाहेब देशमुख पोा (?) चार व जहागिरदार पाा (परगणे) जत व करंजगी. साहेबांचे सेवेशी, यादी (करारनामा). व्यंकटेश खंडेराव देशपांडे पाा (परगणे) करजगी सूर सन १२९६ पाा करजगी पोा मौजे कात्राळ येथील आमचे इनाम नंबर ७९ एकर २०६२७ आकार १० ची जमीन, यावरील जप्ती मोकळी व्हावी म्हणून तारीख २ ऑगस्ट १८८३ सन, फसली १२९३ अर्ज केल्याची चौकशी होऊन काम चालू होते. अखेर जप्तीची मोकळीक झाली अशा निकालाचा समज (समाचार) मिळाला नाही, म्हणून हा अर्ज आपले कदमांस (पायांस) केला आहे. तरी कृपाळू होऊन जप्ती सुटका केली पाहिजे हे लिहून दिले. ता. फेब्रुवारी १८८७

(मागच्या बाजूचा मजकूर) :-

नक्कल १

तात्या पंडित यांचे नावे अर्ज ता. १४/१८८७ सिवणगी जप्ती मोकळी व्हावी म्हणून. मुखत्यार व्यंकटेश खंडेराव

नक्कल २

लवगा इनाम वाडावा (वाढीव हिस्सा) देण्यास कबूल, परंतु मल्लप्पा लोणारीकडून वसूल देववावा म्हणून.

१४ फेब्रुवारी १८८७

सही व्यंकटेश खंडेराव

नक्कल ३

कात्राळ जमी इनाम मोकळे व्हावे म्हणून ता. १४, १८८७ फेब्रुवारीस अर्ज केला.

सही व्यंकटेश खंडेराव देशपांडे

पत्र ५ **पान १२**

नवीन

क्रमांक जत अश्विन

८ १६.१०.१८९२

श्री

धोंडिबा यास कळावे की सालमजकूर नवीन कायद्याप्रमाणे कबुलायत नोंदून घेणे आहे. करिता जतेस येऊन लायब्रीनजीक आमचे चिरंजीव राहतात तेथे येऊन नोंदवून घ्यावे. अगर दर १ आण्याचा स्टँप आणून ठेवावा. आम्ही आलेवेळी स्टँप नाही असे म्हणू नये. तुम्ही स्टँप आणेपर्यंत आमचा मुक्काम तेथे होईल व त्याचा खर्च पडेल म्हणून आगाऊ सूचना आहे. ही गोष्ट गोपाळराव पाटील यांस विचारून समजूत करून घ्यावी. चुकू नये. साऱ्याचा आकार व दाणे दरसाल एक पायली याप्रमाणे तीन सालच्या तीन पायल्या व टपाल हशील (खर्च) १ आणा याप्रमाणे आकार तयार असावा. स्टँप दोन आणून ठेवावे म्हणून आगाऊ सूचना व ताकीद आहे. तेव्हा सबब ऐकणार नाही हे पक्के समजावे. कळावे.

K. V. Deshpande

देशपांडे उमदीकर, मुक्काम जत

नवीन
क्रमांक

९ (टिपण :- पत्रावर महिना ११ घातला आहे पण मजकुरात ऑक्टोबर असे आहे. म्हणून तारखेत ११ ऐवजी १० केले आहे. प्रस्तुत पत्र हे १.१०.१८९५ चे असून, पत्र क्रमांक ६ हे ६.१०.१८९५ चे आहे. म्हणून ६ क्रमांकाच्या पत्राआधी ७ क्रमांकाचे पत्र घेतले आहे.)

जत अश्विन शु. १३
१.१०.१८९५, मंगळवार

श्रीगुरुसमर्थ

राजमान्य राजश्री बाळाजीपंत दादासाहेब डॉक्टर मुक्काम सावळगी इलाखा जमखंडी स्वामीजींचे चरणसेवेशी,

सेवक रामा[1] उमदीकर देशपांडे मुक्काम जत याचा अति नम्रतेचा सन्मानपूर्वक शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. अश्विन शु. १३ १ ऑक्टोबर १८९५ मंगळवारपावेतो श्रीसद्गुरुनाथसमर्थकृपेकरून वडील अप्पा वगैरे मंडळी आनंदरूप असो. विज्ञापना. आम्हांस येथे येऊन एक महिना-जास्तच-झाला. येथेच आहोत. आपले कार्ड उमदीकडे गेल्याने समजले नव्हते. काल घरच्या मंडळींनी पाहण्यास पाठविले. ते वाचून मनन झाले. सौभाग्यवती मातोश्रींबद्दल हकीकत होती. त्यात मनास दुःख होते असा मजकूर होता. आपल्या मनाला धीर यावा व समाधान व्हावे असा अर्थ केला पाहिजे. प्रवृत्तिमार्गाने जरी अर्थ केला तरी हाच अर्थ निघतो की दुःख दूर झाले. उत्तम कुळीच्या प्राण्याला आपल्या कर्तव्याची जाणीव असते. ज्यांनी जन्म दिला त्यांची काळजी वाटते. त्यांची सेवा व्हावी असे वाटते. जगात सुखात असावे अशी रात्रंदिवस काळजी असते. सेवेत काही न्यून आले तर दुःख होते. पण ते दुःख दूर झाले असे समजावे. ठरलेल्या मार्गाने गेली म्हणून

सौभाग्यवती म्हणावे. जे झाले ते बरोबर झाले. मातोश्री उत्तम मार्गाने गेल्या (त्यांना अखेरीस त्रास झाला नसावा), त्यात आनंद मानावा, असे म्हणणे चूक नाही. माया दोन प्रकारची आहे. एक प्रकार म्हणजे देहसंबंधाने माया (प्रेम) वाटते. हा एकदेशी अर्थ झाला. दुसऱ्या प्रकारची माया प्रज्ञावंतांस कळून येते. त्यासाठी साधुसंतांचे वाक्य खरे मानावे. ते असे आहे– जोवर दुःखसंपर्क झाला नाही, तोवरच आनंदाने, नेमाने स्मरण करत असावे. या स्मरणाने दोन्ही प्रकारच्या मायेने वाटणारे दुःख वाटत नाही. तुकाराम महाराज आईवडिलांविषयी फारच रात्रंदिवस काळजी करत होते. परंतु दुःखाचा प्रसंग घडला. आईवडील हयात असतानाही त्यांचे स्मरण चालू होते. त्या योगाने दुःखाचा प्रसंग समजून घेतला. काळजीचे जे दुःख होते ते मागचे भय देवाने तोडले. आता कुठे मनास विश्रांती देऊन स्मरण करावे असा निश्चय करून अभंगच केले. ते अभंग तुकारामांच्या गाथ्यात आहेत ते ठाऊकच आहे. अभिज्ञच आहांत. हा मजकूर सर्व प्रवृत्तीचा झाला. आता निवृत्तीचा अर्थ खोल आहे. तो प्रज्ञावंतांस सहज समजणार आहे. असो. दुःख जे आहे, ते देहाच्या काळजीने होते. निवृत्ती शब्द जो आहे, तो आत्मारामाचा आहे, म्हणून देहाला कळत नाही. देहासंबंधाने दुःख मानत असतो. आत्म्यासंबंधी खोल अर्थ म्हणजे दु–जो–आहे–तो; काळजी दूर झाली ख–जो–आहे–तो खऱ्या रीतीने काळजी दूर झाली. गुरुआज्ञेप्रमाणे, प्रज्ञेने (शहाणपणाने) वागल्याने काळजी खरी दूर झाली असे आत्मारामाचे म्हणणे आहे. कूट अर्थ असा दोन प्रकारचा आहे. खोल अर्थ अंतःकरणात गेला म्हणजे समाधान होते. याबद्दल 'ज्याचे अंतःकरण शुद्ध त्यासी करणे न लगे बोध' असे मनात आणून स्मरणपूर्वक, नेमाने, कट्टाने नेम करून आनंदात वेळ काढावा. हाच उत्तम कुळीच्या प्राण्यास उत्तम मार्ग आहे. जसा विचार करतो तसेच भोगावे लागते. श्रीमंत सद्गुरुराजांचे स्मरण असले म्हणजे तीच पदवी असते, अशी जाणीव ठेवून तशी वागणूक ठेवावी. सर्व प्रसंग देवाच्या मर्जीप्रमाणे होतात असा आनंद मानून समाधानी असावे, असे दासाचे विनयपूर्वक

मागणे आहे. मी माझ्या मतीने काही लिहिले नाही. वडिलांचे आज्ञेवरून लिहिले आहे. सर्व प्रकारची तसदी दिली त्याची माफीच होईल व करालच असे समजून सर्व हकीकत कळविली आहे. दासबोध अध्याय १० समास ६ यात 'जग जे भ्रमरूप आहे'[२] व मनाचे श्लोकांत दासाने फारच बोध मनास केला आहे, ते ठाऊकच आहे, असो. आपल्या अंतःकरणातील खरे अंतःकरण समर्थांकडे देऊन श्रुत केल्याने सर्वभावे मनास आनंदच होईल अशी आनंदाची कल्पना करून सर्व प्रकारे स्मरणातच असावे. कळावे. कृपा, लोभ व दया व ममता पूर्ण भक्तीकडे असो द्यावी ही विज्ञापना.

आपला रामा

नोंदी :-

१. महाराजांचे द्वितीय चिरंजीव. हे लौकर गेले (१९०१). एकदा रस्त्यावरून जाताना ते महाराजांच्या पुढे चालत होते. भविष्य जाणणारे महाराज म्हणाले, 'रामराया, मी पुढे व तू मागाहून जावे हे योग्य. पण तूच पुढे जात आहेस'. थोड्याच दिवसांत रामराय वारले.

२. भ्रमरूप विश्व स्वभावें । तेथें काय म्हणोन सांगावें ॥ -(दासबोध, १०.६.३६.)

xxxxx

पत्र ६ पान १२

नवीन क्रमांक	जत	अश्विन व. ३
१०	नानासाहेबांना पत्र	६.१०.१८९५, रविवार

श्रीसद्गुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक भाऊचा त्रिकाळी शिरसाष्टांग

नमस्कार. विज्ञापना. वडिलांचे व श्रीसद्गुरुसमर्थनाथांचे कृपेने सर्व आनंदरूप आहे. वडिलांकडून पत्र व जिन्नस वगैरे आले ते सर्व पावलेचे उत्तर लिहिलेच आहे. आता कुसूर व बावळगावचे जे लिहिले आहे ते जमत नाही. कळावे. पुढे तुमच्यापुढे आणखी आल्यास गुंडाचार्य पुराणिक महाराज आहेत अगर कोणीतरी असतील, तर तेथेच पक्का खात्रीचा विचार करून मर्जीप्रमाणे करावे. फक्त उमदीस त्यांनीच यावे. दोन रोजांचा वट अन्नखर्च अंदाजे ५०/७५ व मुलास अहेराबद्दल वट ७५/१००/१५० पर्यंत अमुक, त्यांच्या संतोषाप्रमाणे असावा. अगर आपल्या गावीच करतो असे असल्यास दोन्ही खर्च त्यांनीच सांभाळावे. आम्ही आमची खुषी असेल ते मुलीवर घालू. जे कमी पडेल ते त्यांनीच भूषण सांभाळावे. विचारवंत संभावित मंडळी बरोबर येतील त्यांचे विचाराने तुम्ही व रामप्पा भोसेकर मिळून ठरवावे. पूर्वीचे आप्त असतीलतर त्यांचा विचार तुमच्या मर्जीप्रमाणे करावा. सारांश मनात अंदेशा संशय येईल ते करू नये. यात माझे मत घ्यावे असा विचार मनात अगदी आणू नये. जे जे प्रसंगी जे जे घडून येईल ते ते खरे आहे अशा विचाराने करीत जावे. कळावे. वडिलांप्रत विशेष लिहिणे शक्य नाही ही विज्ञापना. रामाने लिहिलेले पत्राचा लखोटा निवरगीस चडचण बाजारमंडळींसमवेत रवाना करावा. कळावे. फार लिहिलेले समजेल असे काही नाही. सारांश आपले मनास विश्रांती मिळावी व कसलीही दगदग असू नये व दुसऱ्यांसही आनंद संतोष व्हावा, आपले कार्य आनंदात साधून घ्यावे अशा विचाराने केले म्हणजे झाले. उगीच लिहिणे सांगणेचे काय काम आहे ? आपण वडीलच आहां. मी लिहावे असे काये आहे ? कळावे, ही विज्ञापना.

	पत्र ९	पान १७
नवीन	(टिपण :- तारखेप्रमाणे ९ क्रमांकाचे हे पत्र ८ च्या आधी येते.)	
क्रमांक	उमदी	पौष व. ७
११	काशिनाथपंत चांदवडकरांना पत्र	१०.१.१८९६

श्रीगुरुसमर्थ

अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. तारीख १०.१.१८९६ पावेतो श्रीसद्गुरुकृपेने सुखरूप असो. विशेष. तुमचे विनंतिपत्र चडचण टपालातून, होर्ती टपालातून इतर तीन चार पत्रांबरोबर येऊन पोचले. त्यानंतर कृष्णाजीपंतांच्या नावावर आलेले पत्र पोचले. त्या चार पाच पत्रांचे उत्तर इकडून मुद्दाम लिहून पाठवले आहे. कृष्णाजीपंतांच्या पत्राचे उत्तर पोचले. बाकीची का पोचली नाहीत कळत नाही. असो. आता लिहिलेले पत्रातील मजकूर समजून घेऊन काही काळजी करू नये असे सांगितले आहे. दोन्ही तिन्ही पत्रांतील हशील समजून... उत्तर लिहून पाठवलेले पत्र का पोचले नसेल याचे फार आश्चर्य वाटते. बरे, असो... कोणत्याही प्रकारे काळजी न करता निष्ठूर होऊन (निश्चयाने) नेमनिष्ठा अंतःकरणापासून ठेवून राहण्यास सांगितले आहे. त्यायोगे सर्व प्रकारे आरोग्य होऊन आनंद आनंद होईल बरे, काशिनाथपंत. इकडील वर्तमान आनंद आहे. एकंदर मंडळी व विजापूर मंडळी खुशाल आहेत. यंदा मार्गशीर्षाचा उत्सव आनंदाने थाटात झाला. मंडळी सर्व आली होती. दर पौर्णिमेस काही मंडळी येतात. तुम्हांकडील खुशालीचे व हे पत्र पोचल्याचे, तसेच तुमच्या उद्योगाचे सविस्तर उत्तर जरूर जरूर लिहावे. तुमच्या घरची मंडळी सर्व...

(अपूर्ण)

पत्र ३९ पान ५५

नवीन

क्रमांक

१२ (टिपण :- पत्रातील एका वाक्यावरून हे पत्र इथे आणले. पत्र क्रमांक ३९ मध्ये 'काशिनाथपंतांच्या पत्रात तुम्हांला लिहिले आहे' असे वाक्य आहे. क्रमांक ९ चे पत्र काशिनाथपंतांना आहे. त्या धाग्याने पत्र इथे आणले.)

जत चैत्र/वैशाख

रामराव वैद्यांना पत्र .. मे ...

श्रीगुरुसमर्थ

राजमान्य राजश्री रामराव वैद्य मुक्काम शहर विजापूर स्वामीजींचे चरणसेवेशी, सेवक भीमा[1] उमदीकर मुक्काम जत याचा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तारीख ... मे ... पावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. तुम्हांस परवा काशिनाथपंतांच्या पत्रात लिहिलेच आहे. आपल्या पायाचे दुःख असेलतर, कसर असेलतर मलम करावे. नीट झाले असेलतर ठीकच आहे. शंखभस्म भटीने (गरम करून) करावे. तुत्या भस्म करावे. पिंपळसाल जाळून त्याची पूड करावी. दोन वाट्या खोबरे जाळून पूड करावी. बदाम बी काढून भिजवून, तुपात तळून पूड करावी. चिकण्या सुपाऱ्या ८-१० जाळून पूड करावी. राळ व गाईच्या लोण्यात लिहिल्याप्रमाणे सर्व २-३ भार[2] याप्रमाणे जाळून बेताने आठही जिन्नस मिसळावे. तीन चार दिवस रात्रंदिवस एक गडी लावून घोटवावे. तुत्या व शंखपूड दोन्ही दोन तीन मासे[3] अगर इतर जिन्नस पाहून त्या बेताने मिसळून तयार करावे. नंतर दररोज मलम लावावे. सकाळ-संध्याकाळ लावून वर विड्याचे पान बांधावे. याप्रमाणे आठ दहा रोज, जास्तच, लावावे. पथ्य मात्र करावे. फार दिवसांचे दुःख असलेतरी मलम लावावे. दररोज सकाळ-संध्याकाळ तृप्ती होईपर्यंत साखर घ्यावी. भोजनात तूप, साखर, चपाती असे गव्हाचे खाणे असावे. हे वीस रोज करावे. गरिबी असलीतरी करावेच लागते. म्हणजे तत्काळ प्रचिती येते. अगर भाकरी, तूप, वरण वगैरे घ्यावे. सारांश, आपण वैद्यच आहांत. याप्रमाणे सर्व केलेतर उपयोगी पडेल. कळावे. एकंदर मंडळींस नमन शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. रामराव होर्तीकर यांचे नाव, गाव, पत्ता ठाऊक असल्यास हे पत्र रवाना करावे. तिकिट लावावे. तसदीबद्दल माफी व्हावी. त्यांना उत्तर लिहिलेतर पत्ता वगैरे कळववा व तिकिट असावे असे कळववावे. अगर नको असेलतर मर्जीप्रमाणे करावे. आपणांकडील, पडसलगीकडील सर्व हकीकत

लिहावी. सर्वांस नमस्कार सांगावा.

स्मरणाने असलेतर त्याचीच योग्यता येते. सारांश, अभिज्ञच आहांत. मी लिहावे असे नाही. निष्काम भक्ती म्हणजे बाप मला वाढवतो असे मुलाचे ठिकाणी काहीच नसते. अज्ञानाने काही समजत नाही. पण एक मात्र ठरलेले असते की माझा धर्म बापाच्या आज्ञेप्रमाणे वागावे. एवढ्या धर्माने बाप मुलास निरंतर सुखात ठेवून त्याचे कल्याण करतो. तसा भक्तीच्या ठिकाणी थाट व्हावा, भक्ती वाढवावी, अशा हेतूने भक्ती निरंतर वाढवू लागला म्हणजे देव निरंतर सुखात ठेवतो. भक्तीच्या ठिकाणी कामना नसावी. भक्तीच करावी, वाढवावी, थाटात उत्सव करावा असे मनात ठेवून भक्ती चालवावी. तसे करीतच आहांत. तत्रापि वडिलांचे आज्ञेने उत्तरात कळवले आहे. मी शक्तिहीन आहे. लिहू शकत नाही. तुमच्या मनात येईलच असे समजून भक्ती चालवावी, वाढवावी. वडिलांनी असे करण्यास, नेमाने वागण्यास फार फार प्रार्थना केली आहे. ती श्रुत व्हावी. कळावे. लोभ, ममता असू द्यावी, ही विनंती.

आपला

भीमा उमदीकर देशपांडे

ताजा कलम :–

२ सुपारी चिकणी ८, दोन रुपये भार जाळून घालाव्या

२ खोबरे दोन वाट्या जाळून घालावे

२ बदाम बी तळून दोन रुपये भार घालावे

२ पिंपळसाल जाळून घालावी रु॥ भार

·।।· तुत्या भस्म करून अर्धा तोळा

·।।· उंची शंखभस्म अर्धा तोळा

२ राळ तोळा, जास्त असलीतरी हरकत नाही.

६ / ७ भार लोणी गाईचे. एक पाव. जास्त असलेतरी हरकत नाही.

८ आठ जिन्नस तुमचे मर्जीप्रमाणे अदमास पाहून तीन चार रोज दगडाच्या थोरल्या खलबत्त्यात घालून घोटवावे. नंतर पाहिजे ते दुःख जुने ४–८ वर्षांचे असलेतरी मलम लावले असता नीट होते. परंतु पथ्य असले

पाहिजे. खाणे ते साखर, दूध, तूप तृप्तीपर्यंत दररोज घ्यावे लागते. एकवीस रोजपर्यंत घ्यावे व मलम लावावे. याप्रमाणे करावे.

नोंदी :-

१. भीमराव हे महाराजांचे तृतीय चिरंजीव. अनेक पत्रे यांना गेली आहेत. ते पुष्कळ पत्रांचे लेखकही आहेत.

२. भार म्हणजे वजन. हे रुपयांत मोजत. इथे रुपया हे पैशाचे गमक नसून वजनाचे असते. पत्राच्या ताज्या क़लमात काही पदार्थांचे वजन 'रुपये भार' असे दिले आहेच. पूर्वी व्हिक्टोरिया राणीचा छाप असलेला चांदीचा रुपया होता. पदार्थांचे वजन, किती रुपये दुसऱ्या पारड्यात घातले ते पाहून ठरत असे. २ रुपये भार म्हणजे एका पारड्यात २ रुपये व दुसऱ्यात पदार्थ.

३. मासा हेदेखील वजनाचे गमक आहे. गुंजा-मासा-तोळा अशी भांजणी होती. ग्रॅमची वजने सुरू होण्यापूर्वी अलीकडेपर्यंत तोळा हे माप प्रचलित होते, ते विशेषतः सोने-चांदी यांच्या वजनात वापरत.

xxxxx

	पत्र ८	**पान १६**
नवीन क्रमांक	जत	वैशाख व. ८/९
१३	रामरावांना पत्र	५.५.१८९६, मंगळवार

श्री

आशीर्वाद उपरि. वैशाख व. ८/९ मंगळवारपावेतो उत्तम आहोत. विशेष. परवा परसाबरोबर जिन्नस आले व सदाशिव आला. जिन्नस पोचले. बाकी सर्व आनंदरूप आहे. मंडळींस संतसभेस त्रिकाळी दंडवत व नमस्कार सांगावा. दोन आरत्या पाठवल्या आहेत. तरी फार फैस करून (स्वर रुंदावून /दीर्घ करून) उतार स्वराने म्हणून, उंच स्वराने

शेवटी म्हणून, आणखी शेवटच्या चरणी उताराने म्हणाव्या. अशी धाटी उंच व उतार स्वराने ठेवावी. जमवून सावकाश फैस, अक्षरे धाटीवर म्हणावी. मोडी अक्षरांत धाटी व उंच-उतार लिहून पाठविले आहेत त्याप्रमाणे बसवावी. सारांश, स्वर सोडू नये. दोन तालावर, नंतर पुढची अक्षरे तिसऱ्या अर्ध्या तालावर म्हणावी. असे सर्वांनी मन घालून पाहावे. बाकी सर्व आनंद आहे. वडिलांस त्रिकाळी नमस्कार सांगावा. कुळाने वसूल दिला असल्यास ते उत्तरात लिहावे. परवा मी असताना याद दिलेले ते ठाऊकच आहे. फक्त हळ्ळीकराने दिले नव्हते. आता भोसे, घेर्डी, अंकलगी, जिती वगैरेंचा वसूल आला की नाही ते लिहावे. हा आशीर्वाद. तारीख ५ मे १८९६.

अंबुराव[१], पत्र व आरत्या लखोट्यात घातल्या आहेत. गोंधळी वगैरे जिगजीवणीस जाणाऱ्याबरोबर रवाना केल्यास गोपाळराव[२] इंचगेरीस रवाना करतील. लखोटा बंद करून रवाना करावा हा आशीर्वाद.

भिमू कुलकर्णीला जाण्यास सांगावे. त्याचेबरोबर ३-४ जानवीजोड पाठवावे. लखोट्यात पत्र व जानवी पाठवावी. कळावे, हा आशीर्वाद.

अंबुराव, पत्र वाचून, बंद करून जिगजीवणीस रवाना करावे.

सदाशिव येथे आला आहे. लवकर पाठवून देतो. परसाने सर्व जिन्नस दिले, ते पावले. परसप्पाला दोन रुपये उसने दिले आहेत. उमदीस गेल्यावर जतेला जाणाऱ्याबरोबर पाठवून देतो असे सांगितले आहे. त्यांनी दिल्यावर इकडे येणाऱ्यासमागमे देऊन पाठवावे. कळावे.

नोंदी :-

१. श्रीअंबुराव हे १८९६ च्या पत्रात प्रथम भेटल्यापासून अखेरपर्यंत भेटतच राहतात. समर्थांचे कल्याण तसे महाराजांचे अंबुराव अशी पदवी त्यांनी मिळवली होती. त्यांनी इंचगेरी मठ पहिल्यापासून संभाळलाच, शिवाय महाराजांच्या निर्याणानंतर साधकांना नाम देण्याचेही मोठे कार्य केले.

२. गोपाळराव म्हणजे अंबुरावांचे वडील बंधू.

XXXXX

पत्र १० **पान १८**

नवीन
क्रमांक जत अधिक ज्येष्ठ[१] शु. ५
१४ १७.५.१८९६, रविवार

श्रीसद्गुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री कृष्णाजी मेलगिरी सुतार मौजे तदलबागी गोसावी यांस, शरणार्थी कृष्णाजी[२] व्यंकटेश उमदीकर, मुक्काम जत, याचा कृतानेक दंडवत नमस्कार. पत्ता – लायब्रीनजीक उमदीकर देशपांडे घर. विनंती, विशेष. अधिक शु. ५ रोज रविवारपावेतो श्रीसद्गुरुमहाराज यांच्या अनुग्रहेकरून सर्व आनंदरूप असो. विज्ञापना.

तुमचे पत्र पावले, लिहिलेला मजकूर समजला. त्याप्रमाणे सर्वत्र मंडळींस नमन शिरसाष्टांग नमस्कार. नेमाबद्दल फार फार नमस्कार आहे म्हणून सांगण्याविषयी वडिलांची आज्ञा आहे. बाकी सर्व मजकूर आनंदरूप आहे. सारांश, अभिज्ञ मंडळीच आहांत. ज्ञानाविषयी ध्यानात येतच असेल. त्याबद्दल लिहावे असे काही नाही. तत्रापि तुम्ही अधिकार दिला व लिहिण्याचे सुचवले त्या योगाने ज्ञानाचा मजकूर लिहिण्यास सुरवात केली. तेव्हा तिकडील सूचनेचाच हा मजकूर आहे असे समजण्यास काय हरकत आहे ? असो. 'ज्ञानास मूळ जे अग्नीच'[३] व 'भक्तीस मूळ विरक्ती'[४] याप्रमाणे ज्ञानेश्वरीत श्रीज्ञानोबा महाराज म्हणतात. याचे मनन, मननकर्त्यास समजून येईल (अर्थ समजेल.) मन जे आहे ते संबंधावरून भक्ती अमान्य करून परभारे आपले कार्य होण्याची इच्छा करते. या संबंधी कबीरदास महाराजांचे वाक्य– 'मन जाय तो जान दो । शरीर मत नही जाना'[५]. अशा अभ्यासावरून मनाची चंचलता निघून जाते. उत्तम अभ्यासाने आनंद होतो. नंतर वरील ज्ञानाचा व विरक्तीचा मजकूर आपोआप तेव्हाच कळून येतो. सदभ्यासीवरून तूक (योग्यता) देखील कळून येते. 'तुका उतरला तुकी । नवल झाले तिन्ही लोकीं' ।।[६] असे तुकाराम महाराजांचे वाक्य

॥२॥ नित्य करितो ४७ कीर्तन। होते माझे अनुष्ठान॥
॥३॥ तुका बैसला विमानी। संत पाहती लोचनी॥
॥४॥ देव भावाचा भुकेला। तुका वैकुंठाशी नेला॥

आहे[६]. वसिष्ठ महाराजांकडे येऊन एका बहुरूप्याने प्रार्थना केली. वसिष्ठांनी विचारले, 'योगमार्गाचे सोंग घेशील काय ?' असे म्हणाल्यावरून तो बहुरूपी होय म्हणाला. तेव्हा समाधी लावून श्वासोच्छ्वास चढवून बसला. तेव्हा तसाच काही वेळ गेला. तेव्हा वसिष्ठ महाराजांचे अंतःकरणात दया आली व त्या प्राण्याचा व्यर्थ वेळ गेला म्हणून अभयहस्त ठेवल्याने हुषार (जागा) झाला. वसिष्ठ महाराज म्हणाले, 'काय मागतोस माग', असे म्हणाल्यावरून तो बहुरूपी म्हणाला, 'महाराज सलाम आहे, मला तसरीब द्यावी' (निरोप द्यावा.) असे म्हणाल्यावर वसिष्ठ महाराज हसले. असो. अंतःकरणात आपापले विषय असल्याने मनाचा पांगडा (हट्ट, हाव) फिटत नाही. तो सुख होऊ देत नाही, हा स्वभाव आहे. असो. मन बलवत्तर करून सर्व इंद्रिये नेमाकडे लावली असता स्मरणाने आठवण धरून, गुरुकृपेचा व नेमाचा अभ्यास कट्टाने केला असता कूटस्थातील अंतःकरण (मन, विचार) सर्व कळून येईल. मुख्य ज्ञानोबा महाराजांचे म्हणणे, 'ज्याचे अंतःकरण शुद्ध । तयासी करणे न लगे बोध'[७]। हे समजूनच आहां. दासबोधात वाक्ये आहेत– 'इकडे तिकडे हिंडून आला, तेच धरून बसला, ते अवलक्षण'[८]. दुसरे वाक्य, 'लोकाचे बोली लागला तो सर्वस्व बुडाला'[९] त्याकरिता दुसरे वाक्य, 'असा जो बिनआधारी असलातरी त्याने असा करावा की नेम धरावा निकट बाष्कळपणाची वटवट करूच नये'[१०]. 'अरे करंट्या सदैव होसी व सुख पावसी'[११] हे समजूनच आहांत. सारांश, लिहिण्यास आज्ञा करून, ही सर्व वाक्ये ठाऊक असून मजकडून लिहवून घेतली, तेव्हा ती तुमची तुम्हांलाच मिळाली असे म्हणण्यात काहीच चूक नाही. तत्रापि 'वाघाचे पिलू वाघापुढे निर्भयाने उड्या मारते म्हणून त्यास अधिकच आनंद'[१२], तसा तुम्हांपुढे सलगीने सर्व कळविले म्हणून क्षमाच कराल असे समजून लिहिले आहे. ही सर्व हकीकत वडिलांनी सांगितल्यावरून लिहिली आहे. सर्व मंडळींस त्रिकाळी नेमाबद्दल अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. सर्व संतसभा मंडळींस नमस्कार फार फार आहे म्हणून वडिलांचे सांगणे आहे, ते प्रविष्ट करीतच आहां.

अभिज्ञच आहां. कळावे. बहुत काय लिहिणे ? कृपा–लोभ करावा ही विनंती. 'जेनी वंद्य जो भावे करावा'[१३], यापासून सुख, संतोष, आनंद आनंद होतो. त्याकरिता सर्वांनी नेम करून नेमाने आपापले अनुकूलतेप्रमाणे नेम करावा. नेमाने, कट्टाने नेम करून, नेम चालवावा अशी वडिलांची फार फार प्रार्थना आहे असे सर्वांस कळवावे. सर्व अभिज्ञच आहेत. त्यांना प्रार्थना कळवून सर्वांस त्रिकाळी नेमाबद्दल शिरसाष्टांग नमस्कार आहे असे प्रविष्ट करावे अशी वडिलांची प्रार्थना आहे. कळावे.

नोंदी :–

१. पत्रावर अधिक शु. ५ अशी तिथी आहे. लगतच्या मागच्या पत्राची तारीख ५.५.१८९६ असून, प्रस्तुत पत्राची १७.५.१८९६, म्हणजे १२ दिवसांनंतरची तारीख आहे. मागच्या पत्राची तिथी वैशाख व. ८।९ असून प्रस्तुत पत्रावर अधिक शु. ५ आहे, म्हणजे १२ दिवसांनंतरची आहे. उघडच आहे की नुसते अधिक असे लिहिलेला हा अधिक ज्येष्ठ आहे.

२. हे महाराजांचे थोरले चिरंजीव. जत येथे नोकरी. महाराज बऱ्याच वेळा यांच्या घरी असत. पुष्कळ पत्रे त्यांना गेली आहेत व त्यांनीही खूपशी लिहिली आहेत.

३. जाण पां ज्ञानासि अग्नि मूळ । – (ज्ञानेश्वरी, ८.२१९.)

४. हा चरण ज्ञानेश्वरीत मिळाला नाही. या अर्थाचे रामदासांचे वचन आहे– विरक्तीविण भक्ती केंविं घडे । –(रामदास लघुकाव्य, ४.१०.)

५. मन गया तो जाने दो । मत जाने दे शरीर ॥ – (कबिरांचे दोहरे, पृ. १.)

६. तुकाराम गाथा, क्षेपक अभंग ७१.

७. या वचनाचा संदर्भ मिळाला नाही. हे वाक्य पत्रात वरचेवर आले आहे.

८. मनुष्य बाहेर हिंडोनी आलें । नाना प्रकारीचें ऐकिलें ॥ ...मागें होतें ऐकिलें नाना । तेंचि धरुनी बैसलें ॥ –(दासबोध, १८.१०.११,१४. श्रोता अवलक्षण निरूपणनाम समास.)

९. लोकांचे बोलीं जो लागला । तो अनुमानेंच बुडाला ॥ – (तत्रैव, १५.४.३.)

१०. पाहता कोठें वोळखी नाहीं । आश्रयेविण परदेशी ॥ ...तेणें कैसें करावें । ...नेम धरावा निकट । बाष्कळपणाची वटवट । करूच नये ॥ – (तत्रैव, १२.९.३, ४, १०.)

११. केल्यावेगळें होत नाहीं । करंट्या सावध पाही । सदैव होसी ॥ – (तत्रैव, १२.९.६.)

१२. व्याघ्र सिंह भयानक । देखोनि भयचकित लोक । परि त्यांचीं पिलीं निःशंक । तयांपुढें खेळतीं ॥ –(तत्रैव, १.६.१९.)

१३. मनाचे श्लोक, २

xxxxx

पत्र २०५ पान २०१

नवीन क्रमांक

१५ (टिपण :– या पत्रावर तिथी नाही. फक्त सन आहे. तारीखही पूर्ण नाही. सनावरून इथे आणले.)

उमदी

काशिनाथपंथ चांदवडकरांना पत्र ...१८९७

श्री

अनेक आशीर्वाद. त्रिकाळी नेमाचे नमन. विनंतीपत्र पाहून आनंद आनंद झाला. यातच जितका होईल तितका नेम करावा. बाकी वेळात अंतःकरणात... म्हणजे तेच खरेपण... समर्थ सर्व प्रकारे सांभाळ करतात बरे, काशिनाथपंत. मुख्य अंतःकरण श्रेष्ठ आहे. ते शुद्ध जालेवर सर्व आनंद आनंद होतो. करिता, 'करिसी काम.. हरिसी ध्यान'[1] व 'आठव तोच ब्रह्म । ना आठव तोच भ्रम'[2] हे समजून यातच अन्तर्यामी स्मरण ठेवून चालवाल... तोचि धन्य धन्य आहे... तूर्त येणेचे वगैरे करू नये. धावा जाला तोच समर्थांस मान्य होऊन आनंद होत आहे बरे. सर्व पत्राप्रमाणे आनंदच होईल. कळावे. लोभ करावा ही विनंती.

आपला भाऊ

नोंदी :-

१. करसे काम करो । हरिसे ध्यान धरो ॥ -(नागप्प, पृ. १२६.)

२. आठव तो परब्रह्म । नाठव तो भवभ्रम । दोन्हींचे निजवर्म । जाण बापा ॥ - (संतवचनामृत, पृ. १८२.) एकनाथांचे वचन आहे.

xxxxx

पत्र २५५ **पान २४७**

नवीन क्रमांक १६

(टिपण :- हे पत्र तारखेनुसार इथे आणले.)

उमदी फाल्गुन/चैत्र ११.३.१८९८

श्री

राजश्री दौलतराव पाटील हंगरगा यांजकडे उमदीकर देशपांडे याजकडून रामराम. विनंती. तारीख मार्च १८९८ इसवी. माहरबद्दल (गडी माणूस) हप्ता चुकून मुदतीबाहेर झाला म्हणून मुद्दाम २ आण्यांचा गडी करून पाठवला आहे. तरी रुपये व भत्ता देऊन माहर यास जरूर जरूर पाठवावे. कळावे. लोभ करावा ही विनंती.

-व्यंकटेश खंडेराव देशपांडे उमदीकर

पत्र ११ **पान २०**

नवीन क्रमांक १७

उमदी चैत्र १३.४.१८९८

श्री

रा. रा. नानासाहेब कुलकर्णी मौजे तिकोंडी स्वामींचे सेवेशी, पोष्य व्यंकटेश खंडेराव देशपांडे याचा साष्टांग नमस्कार. विनंती उपरि.

तीन चार गडी झाले, परंतु रुपये घेऊन आला नाही. करिता मुद्दाम अग्नुबा शिंदा यास पाठवले आहे, तर तुमच्या मर्जीप्रमाणे वसूल द्यावे. आमचे रुपये १४, दोन पायली दाणे याप्रमाणे तुमच्या मर्जीस येईल तसे उत्तर लिहावे. लोभ करावा ही विनंती.

तारीख १३ एप्रिल १८९८

–उमदीकर देशपांडे भाऊ

पत्र २४७ **पान २४०**

नवीन क्रमांक

१८ (टिपण :– पत्रावर ताजा कलम असे सुरवातीस आहे. म्हणजे हा दुसऱ्या पत्राचा भाग आहे. कोणत्या ? पत्र क्रमांक ११ प्रमाणे शेतीचा उल्लेख व अग्नुबाचाही उल्लेख आहे. तेव्हा ११ पत्राचा हा शेवटचा भाग असावा असा अंदाज आहे. पत्र नानासाहेब कुलकर्णी यांनाच असावे.)

उमदी चैत्र

१३.४.१८९८

श्री

ताजा कलम– अग्नुबा यांनी शेतात बी भरण घालण्यास ५ रुपयांची मागणी केली. परंतु हल्ली आम्हांस अडचण असल्यामुळे आपल्या मर्जीनुसार त्यास कोणत्या तरी रीतीने, गरिबाची व्यवस्था करून द्यावी. या वर्षी म्हणजे साल मजकूर साऱ्याची रक्कम ५ रु. आपल्याकडे राहिली आहे. त्यापैकीच ५ रुपये त्यास देण्याची तजवीज करावी. बाकी सर्व मजकूर आनंदरूप आहे. लोभ करावा ही विनंती.

नवीन
क्रमांक

१९ (टिपण :- हिशोब करून, मागच्या पत्राचा महिना जुळतो हे पाहून पुढच्या पत्राच्या तिथीशी जमवावी म्हणून तिथी ३ ऐवजी १३ घेतली आहे. दोन्ही पत्रांत वार लिहिले आहेत पण ते जमत नाहीत. तारखा व तिथी सहा दिवसांच्या अंतराने आल्या आहेत. त्यानुसार या पत्राचा वार मंगळवार पाहिजे किंवा पुढच्या पत्राचा शुक्रवार पाहिजे. आहेत तसे ठेवले आहेत.)

जत भाद्रपद व. १३
१३.९.१८९८, शनिवार

श्रीगुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक कृष्णाचा दोन्ही कर जोडून, चरणांवर मस्तक ठेवून त्रिकाळी अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना. मिती भाद्रपद व. १३, शनिवारपावेतो वडिलांचे अनुग्रहेकरून सर्व आनंदात असो. विशेष. इकडील सर्व वर्तमान आनंद आहे. काल, आज पाऊस झाला. आता पेरण्या सुरू होतील. मला खेड्यात भाग कारकुनाचे कामावर तूर्त नेमण्याबद्दल तजवीज चालली आहे. तसा हुकूम झालातर घोडा आणविण्यास मुद्दाम गडी पाठवणार आहे. वडिलांस कळावे. त्या वेळेस वडिलांकरिता धोतरही पाठवत आहे. बाकी खर्च-व्यर्चीचा सर्व आनंद आहे. वडिलांचे अनुग्रहेकरून कोणतीही कमतरता नाही. कळावे. वडिलांप्रत विशेष लिहिणे बाळकास शक्य नाही, ही विज्ञापना.

याच पत्री चिरंजीव राजश्री रामराव अण्णास आशीर्वाद. वरचे पत्रावरून सर्व कळेलच. येसप्पा, गुरनिंगप्पा, जयवंतप्पा वगैरे मंडळींस अति नम्रतेचे नमन सांगावे. नेमाप्रमाणे चालावे म्हणून वडिलांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे. येसप्पाचे कागद दिलेच असतील. हळ्ळीकरांबद्दल समक्ष वडिलांनी सांगितलेप्रमाणे पाटलांचे मार्फत

तडजोड करावी. भाजी, चिंच सवडीने येणाऱ्याबरोबर तसदी न देता संतोषाने आणतील तर पाठवीत जावे. तुम्हीही कट्टाने काळजीने नेम करीत जावे. विसरू नये. याबद्दल फार फार सांगितले आहे. हा आशीर्वाद.

	पत्र १३	**पान २२**
नवीन	जत	अश्विन शु. ४
क्रमांक	नानासाहेबांना पत्र	१९.९.१८९८, सोमवार
२०		

श्रीगुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत मिती अश्विन शु. ४ सोमवारपावेतो वडिलांचे आशीर्वादिकरून सर्व मंडळी सुखरूप असो. विशेष. वडिलांना अण्णाने परवा पत्र लिहिले ते पोचलेच असेल. इकडे पाऊस बराच होऊन पेरणी झाली आहे. धारण ३॥ पायली (बाजारभाव, एका रुपयाला ३॥ पायली ज्वारी) आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. अण्णा खेड्यातून जाऊन येऊन असतात. विष्णुपंतांचा घोडा घेतला आहे. तूर्त भागावर नेमणूक झाल्याचे परवा लिहिलेच आहे. सर्व आनंदच आहे. पगार १२ (रुपये) मिळत आहे. मीही काही उमेदवारी करीत असतो. वडील अप्पांचा तिकडे येण्याचा बेत ठरलातर घोड्यासाठी मुद्दाम पत्र लिहीत आहे. येसप्पाचे वकिलाकडे आठ रुपये व मजकडे २ रुपये आहेत. तिकडील सर्व मंडळींस वडिलांनी नमन व प्रार्थना सांगितली आहे. नागप्पा (माशाळ) आल्यावर कोर्टातील कागद व वकिलाकडील रुपये मागण्यास येसप्पा येईल. सवडीप्रमाणे करण्यास सांगावे. हळ्ळीकर जतेस आला होता. पाटलांचे मार्फत तडजोड करावी असे सांगितले आहे. अंबुरावांचे पत्र जिगजीवणीस गोपाळरावांना पोचते करावे. कळावे. वडिलांप्रत जास्त

लिहिणे शक्य नाही. ही विज्ञापना.

तीर्थरूप रामराव अण्णा यांस त्रिकाळी साष्टांग नमस्कार. सदरीवरून कळेलच. नेमनिष्ठा वगैरे करीत असावे म्हणून सांगितले आहे. अप्पा लवकरच येतील. काही काळजी करू नये असे सांगितले आहे. याजवरून कळेलच. अभिज्ञच आहांत. तेव्हाच कळणार आहे. कळावे. विशेष मजला लिहिणे शक्य नाही. ही विज्ञापना. घरी वडील अक्का मंडळींस शिरसाष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा व संतसभेस माझा शिरसाष्टांग नमस्कार सांगावा.

पत्र १४ **पान २३**

नवीन जत

क्रमांक २९.१.१८९९

२१

श्री

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री बसप्पा कटगी गोसावी यांसी, कृष्णाचा दीर्घ दंडवत. विज्ञापना. तारीख २९ जानेवारी सन १८९९ इसवीपावेतो श्रीसमर्थकृपेने सर्व आनंदरूप असो. विशेष. वडील येथेच आहेत. तुम्हांकडून परवा कार्ड आले त्यात, आता मायेत घालू नये असा मजकूर होता. याचा खुलासा समजला नाही. त्याबद्दल खुलासेवार मेलगिरीअप्पांकडून लिहून कळवावे. तिकडील मंडळींस म्हणजे अल्लप्पा वगैरे सभेला (पोथीला) येतील त्यांना व महाराज विष्णुभटजी (रामभाऊ यरगट्टीकरांचे नामधारक विष्णुभटजी निंबरगी) व शास्त्री महाराज (गणेशशास्त्री चौथाई[1]) वगैरेंस त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार नेमाबद्दल फार फार आहे असे वडिलांचे आज्ञेवरून कळविले आहे. रामप्पा टरके वगैरे मंडळींस व घरच्या आई वगैरेंना वडिलांनी शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो कळवावा. नेमाबद्दल फार प्रार्थना केली आहे तीही कळवावी. कळावे.

मेलगिरी नासी यांस दंडवत. विज्ञापना. वर लिहिल्याप्रमाणे सर्व मजकूर व सोबत असलेले पत्र पाहून ज्याचे त्यास म्हणजे बाईंस पोचवावे. तिथे नसतीलतर जिथे असतील तिथे पोचवावे. बसप्पाचे कार्डातील मजकुराचा खुलासा झाला नाही. मायेत घालू नये असे शब्द आहेत. त्यांचा तुम्ही खुलासा लिहून कळवावा. गोपाळराव दातार यांस सदरीप्रमाणे सांगावे व त्यांचे कसे आहे ते खुलासेवार लिहावे. सारांश, सर्वांस प्रार्थना सांगून उत्तर कळवावे. नंदेप्पासही[२] प्रार्थना कळवावी. धेनुबा वगैरेंना सांगावे असे नंदेप्पाला सांगावे. कळावे. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ असावा ही विनंती. याच पत्री बसलिंगप्पा, वीरभद्रप्पा, रामप्पा, सिदप्पा वगैरेंस याप्रमाणे दंडवत प्रार्थना सांगावी. स्वामी (राचय्या देवरू करजगी) यांस फार फार विज्ञापना सांगावी. नेमाबद्दलही प्रार्थना सांगावी. कळावे. आता आपल्याला तसदी दिल्याबद्दल शिरसाष्टांग नमस्कार आहे. सर्व प्रकारे माफी होऊन क्षमा करालच. तथापि वडिलांचे आज्ञेवरून सर्व लिहिले आहे. त्याची परभारे माफी होईलच. समजून आहे. कळावे. लोभ करावा ही विज्ञापना.

आपला

कृष्णा देशपांडे उमदीकर

नावलगी मंडळी येतील त्यांची भेट होईल तेव्हा प्रार्थना सांगावी. कळावे, ही विज्ञापना.

मायेत[३] घालू नये याचा अर्थ असा की जो साक्षात परमेश्वर पूर्वपक्षात (पूर्वीपासून) हरिइच्छेने मायेने युगीयुगी अवतार धारण करून हरिमायेने हरिखेळ करून आपणच राहिला आहे. आता आमचे तुमचे म्हणणे मायेत घालू नये पण मायेत घालणे कोठे राहिले ? हे नुसते सुचवले आहे. पूर्वीच्या कार्डातील मजकुराचा खुलासा करावा म्हणजे मनास संतोष होईल. कळावे, ही विज्ञापना.

मेलगिरीअप्पास हे पत्र देणे. त्याची दोन्ही पत्रे बाईंजवळ जाऊन सर्व वाचून दाखवून श्रुत करावे म्हणून विनंती. त्याचे पत्र त्यास द्यावे.

नोंदी :-

१. १९०१ मध्ये मार्गशीर्ष सप्ताह कुठे करावा हा प्रश्न पडला होता. तेव्हा गणेशशास्त्रींना दृष्टांत झाला की, निंबरगीचा भीमाशंकर इंचगेरीस गेला आहे. बऱ्याच गावांचा विचार होऊन, शास्त्रीबुवांना दृष्टांत झाला आहे, तर सप्ताह इंचगेरीस करावा असे महाराज म्हणाले व इंचगेरीसच सप्ताह झाला.

२. नंदेप्पा न्यामगौड हे महाराजांचे निष्ठावान शिष्य. इंचगेरीस मठस्थापना झाल्यापासून परमार्थासाठी फार कष्ट केले. खटपटी होते. विविध क्षेत्रांत यांचे काम चालू असे. पत्रांतून येता जाता त्यांचे नाव येते. निंबरगी महाराजांच्या वचनांची जमखंडी येथील प्रत १९१८-१९२० च्या सुमारास नंदेप्पा यांच्याकडून गुरुदेवांना मिळाली होती. बोधसुधे तयार होताना हीच प्रत आधारभूत धरली होती (बोधसुधे, १९४८, प्रस्तावना, पृ. ५२).

३. परमेश्वर मायेने अवतार घेतो. आपणही मायेत असतो. मग आणखी मायेत काय घालायचे ? दुसरा अर्थ म्हणजे परमेश्वर निर्गुण असून सगुणात अवतार घेतो हे स्पष्ट कळल्यावर माया राहतच नाही.

xxxxx

पत्र १५ पान २५

नवीन
क्रमांक

२२ (टिपण :- पौष अधिक महिना घेतलातर सर्व तिथी जमतात. १८९६ मध्ये अधिक होता (पत्र १०) तेव्हा आता तीन वर्षांनी १८९९ मध्ये अधिक येणे बरोबर वाटते.)

जत	निज पौष व. ११
नानासाहेबांना पत्र	६.२.१८९९, सोमवार

श्री

वडिलांचे सेवेशी, बाळक कृष्णाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी अति नम्रतेने चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. मिती पौष व. ११ सोमवारपावेतो वडिलांचे अनुग्रहेकरून सर्व आनंदात

असो. विशेष. मासीमबरोबर परवाचे व आजचे अशी दोन्ही पत्रे येऊन पोचली. इकडून वेदमूर्ती गुंडाचार्य यांचेबरोबर सविस्तर हकीकतीचे पत्र पाठवले होते ते पोचलेच असेल. त्याप्रमाणे सर्व आनंदात आहो. अग्नू अद्यापि आला नाही. त्याची वाट पाहत बसलो आहो. त्याचे येण्याचा मजकूर तुम्हांकडील पत्रातही होता, त्यावरून समजला. त्याप्रमाणे रामा वगैरे येतील तेव्हा त्यांचेबरोबर लुगडी पाठवीत आहे. आणखी आपल्यास धोतर वगैरे पाहिजे असल्यास लिहावे. चिरंजीव दादा[1] वडील आल्यापासून आलाच नाही. जर त्याचे मन प्रशस्त असून येण्यास कबूल असेलतर येण्यास सांगावे. आलातर झाडा वगैरेबद्दल सरकारकडे अर्ज करावयाचा आहे. त्याचे मर्जीप्रमाणे करणेस सांगावे. मासीम यास सक्षम सांगितले आहे. पाटील अगर कुलकर्णी पंचांस घेऊन तारीख १०/१२ चे आत आलेतर बरे होईल. ते कोणी येण्यास तयार असतीलतर सांगावे. बाकी मजकूर सर्व ठीकच आहे. राजमान्य राजश्री गोपाळराव महाराजांना वडिलांनी त्रिकाळ शिरसाष्टांग नमस्कार फार फार सांगितले आहेत. सारांश, अंतःकरणात जो भाव असेल त्याप्रमाणे करणे उत्तम प्रतीचे आहे. अंतःकरणात ठरेल तसे केल्यास सर्व प्रकारे यश आहे अशी प्रार्थना फार फार सांगितली आहे. दासबोधात वाक्य आहे– 'वैद्याचे प्रचीत येईना, त्याची भीड उल्लंघेना'[2] अशा अंतःकरणातील भावाने आतली मळमळ जात नाही. करिता, प्रचितीस जी गोष्ट येईल तसे करणे वाजवी आहे. सारांश, अभिज्ञाप्रत जास्त लिहिणे नकोच. सुज्ञच आहांत, असा मजकूर कळवावा. एकंदर मंडळींस माझा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार आहे. कळावे. वडिलांप्रत विशेष काही लिहिणे शक्य नाही, ही विज्ञापना.

नोंदी :–

१. दादा (खंडेराव) म्हणजे महाराजांचे सर्वांत मोठे बंधू यशवंतराव यांचा मुलगा.

२. वैद्याची प्रचीत येईना । आणि त्याची भीडही उल्लंघेना । तरी मग रोगी

वांचेना । ऐसें जाणावें ।। -(दासबोध, १४.९.२५.)

xxxxx

पत्र १६ पान २६

नवीन
क्रमांक

२३ (टिपण :- वैशाख शु. १३ ला जतेस आल्याचे पत्रात आहे. त्यानंतर ३।४ दिवसांनी हे पत्र लिहिले असावे अशा अंदाजाने वैशाख शु. १५ ही तिथी घातली आहे. मागच्या पुढच्या तिथी व तारखा जमतात.)

जत वैशाख शु. १५
२३.५.१८९९

श्री

सकलगुणसंपन्न राजमान्य देवमान्य सभामान्य राजपूजित स्वामी राचय्या देवरू यांचे चरणारविंदसेवेशी, सेवक कृष्णाजीचा दीर्घ दंडवत. अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. आपल्या पत्राचे उत्तर मुद्दाम लिहिले ते पोचलेच असेल. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. तिकडील मंडळी महाराज वीरभद्रप्पा, वीरपक्षप्पा, अल्लप्पा, रामप्पा, सिदप्पा, शिवनिंगप्पा, सिदलिंगप्पा, येसप्पा, काडप्पा व मल्लप्पा वगैरेंनाही सर्वांना अति नम्रतेचा वडिलांनी नेमाबद्दल फार फार दंडवत नमस्कार सांगितला आहे. नंदेप्पास सांगितले आहे की मुद्दाम श्रीमंत आई[1] मंडळी वगैरेंना नेमाबद्दल त्रिकाळी नमन श्रुत करावे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. बसप्पा वगैरेंसही याचप्रमाणे फार फार प्रार्थना आहे. कळावे. सुज्ञाप्रत विशेष काही लिहिणे शक्य नाही, ही विज्ञापना. याप्रमाणे मलकप्पा मास्तर, बसनिंगप्पा, कुशाबा यांनाही वडिलांनी फार फार नमन सांगितले आहे ते श्रुत व्हावे.

नंदेप्पा महाराजांस भीमा याचा नम्रतेचा नमन दंडवत नमस्कार. मी व वडील वैशाख शु. १३ ला जतेस आलो आहो. शिवलिंगव्वा

आई[२] वगैरे खुशाल आहेत. एकंदर मंडळींना नेमाबद्दल नमन सांगून स्वामींकडून जत मुक्कामी उत्तर यावे. अभिज्ञच आहांत.

नोंद :-

१. श्रीमंत आई म्हणजे जमखंडीच्या राजघराण्यातील जिऊबाई पटवर्धन असाव्या. या फार भक्तिमान असून जमखंडीच्या अनेक मंडळींना त्यांनी भक्तिमार्गाला लावले होते. महाराजांच्या शिष्यांची गणना करणारे जे पद सोमनाथपंत पंचनदीकरांनी लिहिले आहे त्यात जिऊबाईंनी मंडपाला मदत केल्याचे आहे. हा मंडप इंचगेरीचा बाबांचा मठ. असाच उल्लेख जिऊबाईंच्या कार्याबद्दल नित्यनेमावलीतील पंचसमासीमध्ये आहे (४.३७-३९).

२. महाराजांच्या आत्मानुभवी शिष्या. संसारातील दारुण दुःखांवर कडक नेमाने मात केली. नीती व भक्ती यांनी भरलेली अनेक पदे केली आहेत.

xxxxx

	पत्र १७	**पान २७**
नवीन	उमदी	आषाढ व. ११
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	२.८.१८९९, बुधवार
२४		

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. आषाढ व. ११ बुधवारपावेतो सर्व आनंदरूप असो. काल सोमवार रोजी (वर बुधवार आहे. काल म्हणजे मंगळवार पाहिजे) आलो. सर्व आनंद आहे. निवरगी व भंडारकवठेकडे भीमा जाऊन आला. सर्व खुशाल आहेत. तुम्हांस फार फार सांगणे आहे. सर्व प्रकारे आज्ञेप्रमाणे, हुशारीने असावे. कचेरीतले माणसांना विस्मरण फार. मागील पुढील कर्मांचे स्मरण न होऊन विस्मरण होते. विषयांकडे ध्यान राहून केलेल्या पुण्याचा नाश होतो. पुढे दुःखात पडतो. ते कोणत्या प्रकारे भोगावे लागते कळत नाही. स्मरणात राहून देवाने दिले त्यात आनंद मानून पुण्यमार्गाने चालावे म्हणजे कठीण प्रसंग मुळीच न पडता

प्रपंच व परमार्थ दोन्हीकडे आनंदात वेळ जातो, बरे. करिता दररोज रात्रीचे वेळी कट्टाने ५००-१०००, जितके होईल तितके स्मरण करण्याचा नेम ठेवावा. काळजीपूर्वक, संतोषाने, आनंदाने नेम करावा. म्हणजे आनंद आनंद होऊन संतोष होईल, बरे. सर्वांसही याप्रमाणे नमन कळवावे. सारांश, हुशारीने असावे. अंमलदाराची मर्जी राखून त्यांच्या आज्ञेप्रमाणे, इमानाने वागावे. बाकी तुम्हांस काय सांगणे आहे? समक्ष सांगितलेप्रमाणे हुशारीने घराकडेही नजर असावी. आपल्या जिनसांचा बंदोबस्त असावा. विस्मरण असू नये. पक्के ध्यानात असावे. भीमास आठ रोज ताप फार आला. आता दोन रोज आराम पडला आहे. आणखी चार रोजांनी कमी होऊन शक्ती येईल, तेव्हा तिकडे पाठवतो. अगर रजेकरता रिपोर्ट पाठवतो, तो मामलेदारांस समक्ष सांगून द्यावा. सारांश, श्रमाने फार ताप आला. आता बरे आहे. कळावे. घरी चंद्रक्कास[१] नेम वगैरे करण्यास वडिलांनी सांगितले आहे. हुशारीने असावे असे कळवावे. वरचेवर दोघांस स्मरण देत असावे. दोन प्रहरी नेम कट्टाने करण्यास सांगावे. रिकामे बोलणे वगैरे अगदी करू नये अशी ताकीद करावी. दुसऱ्यांबरोबर बोलत बसू नये असे सांगावे. हे पत्र वाचून कळवावे म्हणजे खात्री होईल. कळावे. उत्तर आनंद मजकुराचे यावे हा आशीर्वाद.

नोंद :-

१. चंद्रक्का या नानासाहेबांच्या कन्या व रघुनाथाचार्य आद्य यांच्या पत्नी. रघुनाथाचार्य हे निंबरगी महाराजांचे शिष्य. त्यांनी निंबरगी महाराजांची वचने लिहिली होती. ते वचनांच्या पोथ्या लिहून साधकांना देत. याचेच पुढे बाबाचार्य काव्य या निंबरगी महाराजांच्या दुसऱ्या एका शिष्याने विविध ग्रंथांतील वचने घालून संपादन केले. १९०८ साली बाबाचार्यांनी महाराजरवर वचन या नावाने संप्रदायाचा हा आद्य ग्रंथ प्रसिद्ध केला.

xxxxx

	पत्र १८	पान २८
नवीन	जत	भाद्रपद व. १४
क्रमांक	नानासाहेबांना पत्र	३०.९.१८९९, मंगळवार
२५		

श्रीगुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक कृष्णाचा दोन्ही कर जोडून, चरणांवर मस्तक ठेवून त्रिकाळी अति नमनपूर्वक शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. मिती भाद्रपद व. १४, मंगळवारपावेतो वडिलांचे अनुग्रहेकरून सर्व आनंदात असो. चिरंजीव रामरायाने लिहिलेले पत्र पोचले. मजकूर समजला. इकडे सर्व आनंद आहे. इकडून निवरगीस पत्र लिहिले आहे. त्यात भंडारकवठेकडे मुद्दाम निरोप पाठवून लौकर दिवाळीचे आत-बाहेर येतील असे कळवावे असे लिहिले आहे. त्याप्रमाणे आपल्या सवडीप्रमाणे, कोणी जाणार असतील त्यांचेबरोबरही मुद्दाम सांगून येतील असे करावे. भीमरावही कार्तिक पूर्णिमेचे आत सहकुटुंब उमदीस येणार आहे. एक दिवस समारंभ करावा. तसेच निवरगीकडे कळवले आहे. भीमा उमदीस आल्यावर येथे घरी कोणीतरी पाहिजे याकरिता चंद्रक्कास पाठविता आले नाही. सवडीप्रमाणे वडिलांनीही मुद्दाम कोणाबरोबर भंडारकवठेकडे सूचना पाठवून कसे काय ते कळवावे. येथे कोणी आले म्हणजे चंद्रक्का लवकर उमदीस येतील. इकडून मी मामांकडे दोन पत्रे पाठवली आहेत. ती पोचल्यावर विचार करून लौकरच उत्तर पाठवतील. बाकी सर्व खुशाल आनंद आनंद आहे. वडील अश्विन शु. ५ चे बेताने विजापूरकडे जाण्याचा बेत ठरला आहे. रामाकरिता एक छडी लखूबरोबर पाठवून दिली होती ती पावलीच असेल. त्या छडीस जीवण्णाकडून खाली चांगली अणस (लोखंडी अंगठी) बसविणेचे आहे. वडिलांप्रत विशेष काही लिहिणे बालकास शक्य नाही.

याच पत्री चिरंजीव रामरायास आशीर्वाद. सदरी वडिलांस लिहिले आहे त्यावरून कळेलच. वडिलांचे आज्ञेप्रमाणे वागावे. वरचेवर आनंद देत जावा, घरी अक्काचे आज्ञेप्रमाणे आनंद देत जावा. समक्ष वडिलांनी

सांगितल्याप्रमाणे निष्ठेचा नेम ठरवून करीत जावा. नेम चुकू नये हेच फार फार सांगणे आहे. याप्रमाणे वडिलांनी सांगितले आहे. वरचेवर कुणी येतील त्याजबरोबर पत्र पाठवीत जावे. रामूजवळ लखोटा दिल्यास ते पोचवतील. नोव्हेंबर १० तारखेस सबरजिस्ट्रार उटगीस येणार, तेव्हा कल्लव्वा व येसप्पा यांस सांगून रजिस्टर करून घेण्यास सांगावे. येसप्पाचे अंगात बरे झाल्याचे कळवावे व नमन सांगावे. तुमची प्रकृती किती दिवसांत स्वच्छ झाली ते कळवावे. जयवंतप्पा, शिवप्पा, गुरुनिंगप्पा व मल्लप्पा वगैरेंस वडिलांनी नमन फार फार फार सांगितले आहे. नेमाने असण्याविषयी सांगावे. मासीमकडून २। (सव्वा दोन) हाताचा दुसरा जमखाना (सतरंजी) करवावा. ६८ आणे आणखी जास्त पडले तरी देऊन पाठीस लागून लौकर करवावा. कोठे बाहेर वगैरे हिंडू नये, जाऊ नये. घरीच पुस्तक वगैरे नेम ठरवून वेळ काढत जावा, असे सांगितले आहे, असे कळवावे. कळावे, हा आशीर्वाद. घरी काशाक्कास त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार कळवावा. चंद्रक्का वगैरे सर्व खुशाल आहेत, म्हणून सांगावे. मुलाचे[1] नाव काय ठेवले ते कळवावे. हा आशीर्वाद. जमाबंदी आणखी दोन चार रोजांत होईल. नंतर सलगरकरांकडे भीमा येणारच आहे. कळावे. काय पाहिजे ते लिहावे म्हणजे पाठवता येईल. सर्वांनी नेमाने असावे हा आशीर्वाद.

नोंद :–

१. हा मुलगा म्हणजे रामरायांचा मुलगा आनंद असावा. त्याचा जन्म २२.९.१८९९ रोजी झाला, त्याच्याशी हे जुळते. हा लहानपणीच वारला. तो भजने स्पष्ट म्हणत असे, हे बाबा सांगत. त्याच्या मृत्यूच्या वेळेची एक घटना–

''महाराज इंचगेरीस होते. एक दिवस एकाएकी ते नेमातून उठून नेमाच्या खोलीच्या बाहेर आले व बाबांना म्हणाले, 'अंबुराया, पाणी तापव, स्नान करायचे आहे.' 'आत्ता या वेळेस स्नान का ?' असे बाबांनीविचारल्यावर महाराज म्हणाले, 'आनंद गेला'. त्याच वेळेस उमदीस आनंदाची प्राणज्योत

मालवली होती.'' जाता जाता महाराजांच्या जीवनातली आणखी एक अशीच घटना पाहता येईल. मलकप्पा माशाळ उमदीस होते. महाराज व अंबुराव दूर कृष्णा नदीच्या काठावरील जंबगी गावी होते. एकाएकी महाराजांनी आकाशाकडे पाहिले आणि उद्गारले, 'अंबुराया, बघ मलकप्पाने प्राण सोडला.' त्याच वेळेस उमदीस असलेल्या मलकप्पाने प्राण सोडला होता.

या दोन घटना श्री. कृ. दा. संगोराम यांच्या Pathway to God in the Vedas या पुस्तकात पृ. २७०-२७१ वर नोंदल्या आहेत. साक्षात्कारी साधू दुसऱ्याचा प्राण जाताना 'पाहतात'. प्राण पक्ष्याप्रमाणे उडून जाताना 'दिसतो'. ऋग्वेदातील १.१६३.६ या मंत्रावर भाष्य करताना संगोराम ही उदाहरणे देतात.

याच प्रकारची आणखी एक घटना सांगता येईल. गुरुदेवांच्या प्रथम पत्नी १९१८ साली मृत्युशय्येवर होत्या. लगतच्या खोलीत श्री. नानासाहेब हरिदास गुरुदेवांना गीता वाचून दाखवत होते. उत्क्रामन्तं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् । विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ॥ १५.१० (जीव आपल्या देहाचा त्याग कसा करतो, तसेच देहाचा कसा उपभोग घेतो, हे मूर्खांना कळत नाही, पण ज्यांना ज्ञानचक्षू लाभले आहेत ते सर्व पाहतात), या श्लोकापर्यंत येतात तोच गुरुदेव त्यांना म्हणाले, 'पुरे, ती गेली'. 'तुम्हांला त्या गेल्याचे कसे कळले ?' असे हरिदासांनी विचारल्यावर गुरुदेव म्हणाले, 'मला ते दिसले'.

xxxxx

	पत्र १९	**पान ३०**
नवीन	जत	अश्विन शु. १
क्रमांक		१.१०.१८९९, बुधवार
२६		

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री बसप्पा बिन मलकप्पा कटगी,

मेलगिरप्पा, नंदेप्पा न्यामगौडवरु अण्णा, गोसावी मंडळी यांसी, शरणार्थी कृष्णा उमदीकर, मुक्काम जत याचा नमन शिरसाष्टांग दंडवत नमस्कार. विज्ञापना. आपलेकडून सर्व आनंदाचे, खुशालीचे व पोचल्याचे उत्तर आले नाही. इकडील सर्व आनंद आहे. वडील येथे येऊन ५-६ दिवस झाले. दसऱ्यास विजापूरकडे जाणार आहेत. सर्वत्र मंडळी म्हणजे वेदशास्त्रसंपन्न राजश्री विष्णुभटजी महाराज, शिवराम महाराज (निंबरगी) व तुळजोपंत (देसाई) सर्वत्रांस त्रिकाळ नमन शिरसाष्टांग नमस्कार कळवावा. बाकी सर्वांसही याप्रमाणे प्रार्थना कळवावी. श्रीमंत मातोश्री आई पार्वतीबाई (गोखले), गोपाळराव व दत्तोपंत वगैरे मंडळींस शिरसाष्टांग नमस्कार सांगून अभंग वगैरे सर्व त्यांस पोचवून उत्तर पाठवावे. शास्त्री महाराजांसही त्रिकाळी नमस्कार कळवावा. अल्लप्पा, स्वामी व भास्करपंत वगैरेंसही शिरसाष्टांग नमस्कार सवडीप्रमाणे प्रविष्ट व्हावा. तसदी दिल्याबद्दल माफी असावी. अभंगांची वही दत्तोपंतांचे घरी अगर आईंना पोचवावी. आईंनाच द्यावी. मर्जीप्रमाणे पोचवून उत्तर पाठवावे. अभिज्ञांप्रत विशेष काही लिहिणे शक्य नाही, ही विज्ञापना. वर लिहिलेल्या एकंदर मंडळींस व रा. रा. रामप्पा महाराज व घरची मंडळी, वासप्पा, वीरभद्रप्पा, मलकप्पा मास्तर, काडप्पा, सिदप्पा, जयराम वगैरे मंडळींस वडिलांचे नमन व अति नम्रतेचा शिरसाष्टांग दंडवत नमस्कार आहे. विज्ञापना. नेम मात्र निष्ठेचा करीत जावा अशाबद्दल फार फार प्रार्थना सांगितली आहे, ही विज्ञापना. चिमडकडील काका[१] व नावलगी मंडळी वगैरेंना ते येतील तेव्हा नंदेप्पाने सवडीप्रमाणे दंडवत नमन कळवावे. एकंदर मंडळी काकांसह आनंदाने तिकडे जाऊन पोचल्याचे उत्तर आले नाही, तोही सर्व खुलासा लिहावा. लहान नंदेप्पा (पडसलगी ?), मडव्याळप्पा, मल्लप्पा, सिवबा, धेनबा, वगैरेंस नमन कळवावे ही विज्ञापना. मुक्ताबाईचे अभंग दोन, ज्ञानोबाचे अभंग व तुकाराम वगैरेंचे अभंग नीतीचे व अनुभवाचे आहेत. भक्तविजयाप्रमाणे नीती लिहिलेले अभंग होते, तेही वाचण्याकरिता पाठवले आहेत. ते सर्व बाईंना द्यावेत. कोणी लहान मंडळी वाचतील म्हणून वडिलांनी

दिले आहेत. ते पोचते करून उत्तर पाठवावे ही विज्ञापना.

नोंद :-

१. चिमडकडील काका म्हणजे गुरुनाथ बाळाजी औरसंग किंवा गुरप्पा काका. हे रघुनाथप्रिय साधुबुवांचे अनुगृहीत होते. रघुनाथप्रिय साधूंचे अखेरचे वास्तव्य यांच्या घरी असून त्यांनी तेथेच देह ठेवला. महाराजांना साधुबुवांच्या मार्फत नाम मिळाले होते.

xxxxx

	पत्र २०	**पान ३२**
नवीन	उमदी	मार्गशीर्ष व. ८
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	२७.१२.१८९९, बुधवार
२७		

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. तारीख २७ डिसेंबर, बुधवारपावेतो सर्व आनंद असो. विशेष. वद्य ८ सोमवारी (वार जमत नाही) निवरगीहून उमदीस आलो. पंढरपुरास जाणे झाले नाही. निवरगी मंडळी सर्व आनंद आनंद आहेत, बरे. भीमराव बाबांना दोन रुपये व कापूर देऊन आलो. आनंद झाला. अण्णा पंडित यास घेऊन आलो. आणखी आठ दहा रोजांत जतेस पाठवावे असा बेत आहे. भीमाने दररोज कानडी अभ्यास करत जावे व इंग्रजी शाळेस पाठवावे. मामलेदाराकडे जर अगत्य (जरुरी) असेलतर जमवून घ्यावे. तुमचे मर्जीप्रमाणे करावे. याप्रमाणे बेत करण्यास तुम्हांस संतोष असल्यास उत्तर लिहावे. इकडून मुलास पाठवतो. गुंडाचार्यांचे घरी तूर्त कावे (काव्य) म्हणविणे सुरू करविले आहे. लौकर उत्तर पाठवावे म्हणजे त्याप्रमाणे करणे ठीक होईल. सोन्याळ दस्त पाहिला. फार ठीक आहे. सोडीचा दस्तही लौकर करवून घ्यावा. डिकसाळचा दस्तही सोयीप्रमाणे करवून घ्यावा. सर्व मंडळींस नमन सांगावे व तुम्ही घरी फार नेमाने, निष्ठेने नेम करीत असावे हेच फार फार सांगणे आहे. सकाळी उष्ण जिन्नस (?) दोघांनी घेत जावे. समक्ष

सांगितलेप्रमाणे घ्यावा.

पत्र १९७ पान १९७

नवीन
क्रमांक

२८ (टिपण :- या पत्रात दोन वेगळी पत्रे एकत्र आली आहेत. ती वेगळी केली आहेत. पहिला भाग अण्णा पंडितांच्या संदर्भातला आहे. तो निराळा करून त्यांच्याच संदर्भातल्या ७३ क्रमांकाच्या पत्रानंतर घातला आहे. त्याचा क्रमांक १९७ अ असा केला. दुसरा भाग इथे बसतो. त्याचा क्रमांक १९७ असाच राहू दिला. २० क्रमांकाच्या पत्रात भीमरावांना इंग्रजी शाळेत पाठवावे असे आहे. प्रस्तुत पत्रात इंग्रजी अभ्यास बरा चालला आहे असे असल्याने हे पत्र भीमरावांनी २० पत्राच्या सुमारास लिहिले असावे अशा अंदाजाने इथे आणले. तिथी-तारीख-पत्रलेखक काही म्हणता काही पत्ता नाही. अण्णा पंडितांबद्दलचा पहिल्या भागातील मजकूर बराच पुढच्या काळातील आहे. तो ७३ क्रमांकाच्या पत्राशी जुळतो.)

पोस्ट होर्ती

राजमान्य राजश्री गोपाळराव मामासाहेब पाटील व चौधरी मौजे सावळसंग तालुका इंडी पोस्ट होर्ती सावळसंग येथे, अति नम्रतेचा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. आपल्या अनुग्रहेकरून सर्व मंडळी समर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. माझा इंग्रजी अभ्यास बरा चालला आहे. पहिले बुक होत आले आहे. तिकडील सर्व वडील मंडळींस शिरसाष्टांग नमस्कार. आजोबा मंडळींस फार फार नमन आहे. याचप्रमाणे समर्थ मंडळींस त्रिकाळी नमन शिरसाष्टांग नमस्कार वडील मामाने सांगितला आहे, तो श्रुत व्हावा. अंबुराव यांस व सभामंडळींस नमन दंडवत नमस्कार श्रुत व्हावा असे सांगितले आहे. मृदंग जरूर उंब्रजकडून आणवावा असे सांगावे ही विज्ञापना. जिगजीवणी

मंडळींस व सातलगाव मंडळींस नमन फार फार सांगितले आहे ते श्रुत व्हावे, अंबुरावांकडून व्हावे. देसाईस अभ्यासाबद्दल प्रार्थना करवावी अशी प्रार्थना सांगितली आहे. ही विज्ञापना.

	पत्र २१	**पान ३२**
नवीन क्रमांक २९	उमदी	माघ शु. २ १.२.१९००, गुरुवार

श्रीसद्गुरुसमर्थ गुरुलिंगजंगम

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री बसप्पा महाराज, मेलगिरप्पा, नंदेप्पा, वीरभद्रप्पा, वीरपक्षप्पा, अल्लप्पा, स्वामी वगैरे समस्त गोसावी मंडळींस शरणार्थी उमदीकर भाऊचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग दंडवत. विज्ञापना. माघ शु. २ रोज गुरुवारपावेतो समर्थकृपेने उमदी मुक्कामी आनंदरूप असो, विशेष. सर्व लहान थोर मंडळींस आठवण असल्याबद्दल व नेम कट्टाने करण्याबद्दल फार फार दंडवत विज्ञापना कृपा करून प्रविष्ट करावी. अभिज्ञच आहांत, मी कळवावे असे काही नाही. त्यात समर्थ–वाक्यावरून सुचवत आहे. 'हरीनामाचे स्मर्ण । बारा वाटा पळतील विघ्न'[1] व 'हाका मारोनी सांगे तुका । नाम घेता राहू नका'[2] व 'आठरा पुराणाचे पोटीं । नामावांचोनी नाहीं गोष्टी'[3] व 'नाम पावन पावन । त्याहून आधिक आहे कोण'[4] व आठव जो ब्रह्म ना आठव तो भ्रम, अशा प्रकारच्या युक्तीने सुचवून सर्वांस प्रार्थना प्रविष्ट करावी म्हणून लिहिले आहे. सवडीप्रमाणे तसदी न होता सर्वांस आनंदरूप स्मरण यावे, हेच मागणे आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. सारांश, नावलगी व चिमड मंडळींसही याचप्रमाणे प्रार्थना सवडीप्रमाणे करालच. तसदीबद्दल क्षमा होऊन सर्वांनी आनंद घ्यावा हेच सांगणे व मागणे आहे. कळावे. लोभ व ममता संपूर्ण होऊन दया, क्षमा, शांती असावी ही विज्ञापना.

आपला भाऊ

रामराव मरी ममदापूर याचे बुक पावले. फार आनंद झाला. तिकिट मात्र जास्त पडले. बुक ठेवून घेण्यास सांगावे. तसदीबद्दल क्षमा असावी.

नोंदी :-

१. नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळतीं विघ्नें ।। -(तुकाराम गाथा, अभंग १६२५.)

२. हाकारोनी सांगे तुका । नाम घेता राहो नका ।। -(तत्रैव, अभंग २००८.)

३. अठरा पुराणांचे पोटीं । नामाविण नाहीं गोठी ।। -(तत्रैव, अभंग १६९६.)

४. नाम पावन पावन । त्याहून पवित्र आहे कोण ।। -(तत्रैव, अभंग २१७, प्रक्षिप्त.)

xxxxx

	पत्र २२	**पान ३३**
नवीन	उमदी	माघ शु. ३
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	२.२.१९००, शुक्रवार
३०		

श्रीसद्गुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. तारीख २.२.१९००, रोज शुक्रवार, माघ शु. ३ पावेतो सर्व समर्थकृपेने आनंदरूप आहे. भीमास काल गुरुवारी रडे (दडे ?) भोसे[१] वगैरे करून चौथाई वगैरे देववून अगर स्वतःच देऊन येण्याकरिता गडी समागमे देऊन पाठविले आहे. रविवार/सोमवार जतेस येईल. डिकसाळ वसूल चार-साडेचार मण उमदी मापाने आणून घातला आहे. भीमा आलेवर त्याने काय काय तजवीज केली ती सर्व कळवावी. सोन्याळ कुळाकडे चिठ्ठी देऊन गड्यास पाठवावे. तुमचे मर्जीप्रमाणे करावे म्हणून कळविले असे. माझे अंगात नीट आहे. आणखी आठ-दहा दिवसांत स्वच्छ होईल (प्रकृती ठीक होईल.) काळजी काही करू नये. भीमास ९ रुपये दिले आहेत. किरकोळ ५ रुपये खर्च झाले, दूध, तूप, वगैरेंस. याप्रमाणे हकीकत आहे. घर कारखाना सुरू करण्यास

मदत अंतःकरणात असेल तसे जरूर करावे. भीमास समक्ष सांगितलेले आहे. चौथाई नोटिसीवर नजर असावी. होईल तसा निकाल होत जाईल, तरी फार फार उत्तम आहे. आमचा दादा डफळापुरास आला आहे काय ? आठ-दहा रोज झाले पत्ताच नाही, ते कळवावे. अण्णा पंडितवर नजर असावी. सांभाळ आनंद आनंद देत जावा. भीमाने कानडी अभ्यास रोज दोन तास ठेवावा असे सांगावे. सर्व मंडळींस नमन फार फार आहे असे सांगावे. तुम्ही नेमाने व हुशारीने असावे हेच सांगणे फार आहे. बाकी सर्व आनंद आहे. कळावे, हा आशीर्वाद.

नोंद :-

१. या पत्रात एका गावाचे नाव रडे भोसे आहे. पुढच्या पत्रात दडे भोसे आहे. नक्की नाव काय असावे कळत नाही.

xxxxx

पत्र २३ पान ३४

नवीन
क्रमांक

३१ (टिपण :- २२ व २३ या क्रमाकांची पत्रे जवळ जवळ तीच आहेत.)

उमदी माघ शु. ४
कृष्णरावांना पत्र ३.२.१९००

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. तारीख ३.२.१९०० माघ शु. ४ पावेतो समर्थकृपेने सर्व आनंदरूप असो. कालचे गुरुवारी भीमास दडे भोसे वगैरेंकडे पाठवले आहे. समागमे गडी दिला आहे. कुळाकडून चौथाई देववावी, जर न देतीलतरी खुद्द देऊन यावे म्हणून पाठविले आहे. डिकसाळचा वसूल एकंदर आला. दाणेच घातले आहेत. रविवार/ सोमवार भीमा जतेस येईल. नंतर गडी सोन्याळवरून चिट्ठी देऊन

पाठवावा. घर कारखाना सुरू करावयाचा तो तुमचे व भीमाचे मत व अंतःकरणात असेल तशी मदत करावी. त्याप्रमाणे करता येईल. ५ रुपये दूध, तूप यांत गेले. चौथाईस ९ रुपये दिले आहेत. या विषयी भीमास समक्ष खुलासा सांगितला आहे, तर तुमचे व त्याचे मर्जीप्रमाणे उत्तर कळवावे म्हणजे त्याप्रमाणे करता येईल. सारांश अंतःकरण (ममता) पाहिजे, नंतर सर्व कार्य सिद्धीस जाते, बरे. समजून मर्जीप्रमाणे उत्तर कळवावे. अण्णा पंडितवर अंतःकरण ठेवून आनंद देत जावा, बरे. कानडी अभ्यास भीमास सुरू करणेस सांगावे. बाकी सर्व आनंद आनंद आहे. प्रकृती बरीच आहे. सर्वत्र मंडळींस नमन फार फार सांगावे. तुम्ही नेमाने मात्र असावे व हुशारीने असावे हेच सांगणे फार फार आहे. आमचा दादा डफळापुराकडे आला होता काय तेही लिहावे. समक्ष भीमा आलेवर खेड्यांत काय काय केले सर्व लिहावे. कळावे. अण्णा पंडित यास नमन व आशीर्वाद. अभ्यास वगैरे चांगला करावा, बरे. हा आशीर्वाद.

महाराज अण्णासाहेबांस बालक अंबाजीचा अति नम्रतेचा नमस्कार. विनंती. काल येथे उमदीस आलो आहे. सर्व मजकूर आनंद आहे. कळावे, ही विज्ञापना.

	पत्र २४	**पान ३६**
नवीन	उमदी	माघ शु. ८
क्रमांक		८.२.१९००, बुधवार
३२		

श्रीगुरुसमर्थ

रा. रा. नारायणरावजी गोडबोले स्वामींचे चरणसेवेशी, पोष्य भाऊ उमदीचा त्रिकाल नमन शिरसाष्टांग नमस्कार. विनंती. माघ शु. ८ बुधवार, तारीख ८.२.१९०० पावेतो उमदी मुक्कामी समर्थ सद्गुरुमहाराजांचे कृपेने सर्व आनंदरूप असो. विज्ञापना. तुमचे खुलासेवार

पत्र आले. सर्व पाहून मनन झाले. असो. आता भक्तिमार्गाने पाहिले असता कळते की सगुण भक्ती केल्याने सगुणरूप धरून देवाने दासांचे नाना प्रकारे रक्षण केलेले आहे व करीतही आहे. हे भक्तविजयात आहे. 'दामाजीपंतांचे ऋण वारविले'[१] व 'पठाणाचे ऋण वारविले'[२]. अनेक भक्तांची अनेक कार्ये केली. लग्नकार्य व फलशोभन केले. अशा प्रकारे प्रपंच व 'दामाजीपंतांचे कार्य, परमार्थ, दोन्ही संकटे निर्विघ्न केली'[३], हे समजून आहांतच. तैसेच तुमचे प्रपंचात संकट निर्विघ्न होतच आहे, बरे. समर्थ भक्ताच्या काजासाठी सर्व साहाय्यभूत आहेत हे समजून आनंद मानावा. अंतःकरणात तोच आहे असे स्मरणात ठेवून आनंदात वेळ घालवावा. हेच आपले कर्तव्य आहे. त्याची करणी तो करीतच आहे. आपलेकडे हुशारी आहे व आपण सर्वांकडे लक्ष देतो असे म्हणणे खोटे आहे. आपले लक्ष म्हणजे 'अलक्ष्येकडे डोळ्यांत लक्षे असावा'[४]. यास वाक्य 'मोक्षभागी विभागी'[५] म्हणजे 'अर्धो भाव'[६]. याकडे लक्ष निरंतर असावे. म्हणजे 'अलक्षे झाला बरे'. सारांश, सुज्ञ आहांत म्हणून कळविले. कारण 'ज्ञानीपुढे ज्ञान बोलावा'[७] असे वाटते, म्हणून वाक्य आहे. वाघापुढे त्याचे पिलूस अधिक उमेद वाढते, तैसा तुम्हां सज्ञनांपुढे लिहून कळवावे अशी उमेद वारंवार देता. तुमचे योगाने आनंद वाटून काहीतरी 'बौबडी वाक्य'[८] झालेतरी अधिकच संतोष. तैसा प्रकार संतोष दिल्याने श्रुत केले. क्षमारूप होऊन आनंद आनंद मानीत जावा. 'क्षे म्हणजे अक्षे', मा म्हणजे माया असावी, रू म्हणजे निरंतर, प म्हणजे परीक्षित जावे म्हणजे निरंतर कल्याणदायक आहे. बाकी सर्व मंडळी परवाप्रमाणे व नाईक महाराज, भवानदास, महानिंगप्पा, सिवराम बारामती, माहितीप्रमाणे एकंदरांस प्रार्थना कळवावी. रामप्पा, भीमराव, लक्ष्मणराव पेरूर, कृष्णाजीपंत व रामचंद्रपंत वगैरेंस सवडीप्रमाणे फार फार नमन कळवावे. काशिनाथपंत व अप्पाराव (देसाई ?) वगैरेंस नमन सांगावे व हकीकत सवडीने लिहावी, असे तुमच्या सवडीप्रमाणे श्रुत करावे. सारांश, सर्वांनी नेम व भक्ती वाढवावी. जसा आपण भक्तिथाट वाढवतो, तसा तोही (कृपा)

वाढवतो. देहभावाने वर्तनात कृत्रिमपणा येतो. तो कळत नाही. म्हणून भक्ती असून व नाम असूनही करंटेपणा भोगावा लागतो. तो कृत्रिमपणा कोणता म्हणजे अंतःकरणात, कूटस्थात आळस, वीट व कंटाळा असतो. वर मात्र असे काही नाही असा उपचार करून (भजन–पोथी वगैरे करून) खरेपणाने वागल्यासारखे दाखवतो. अशा वर्तनाने आपणच आपला वैरी होतो. याला दाखला म्हणजे विषयात सुख घेणे व आनंद घेणे हे अंतःकरणात, कूटस्थात, आंतल्या आत असते. हा भाव लोकांस कळू देत नाही. तसेच उत्तम भावाचेही आहे. उत्तम भाव अंतःकरणात ठरून व जडून जातो. मग देवपणा, भक्तपणा याचा अर्थ कळून येतो. (उत्तम भाव असेलतर देवपणा. ज्याचा भाव अजून उत्तम झाला नाही तो अजून भक्तच आहे.) देव कोण व भक्त कोण याचा निवाडा होतो, बरे. सारांश, अभिज्ञ मंडळी आहां. मी लिहावे, कळवावे असे काही दिसून येत नाही. तत्रापि कळवल्याने अधिकच आनंद वाढतो. या एकंदरावरून संतसभेच्या योगाने काही सुचले, तेव्हा आभार मानून मनास आनंद झाला तो लिहिता पुरवत नाही. असा संतकृपेचा उत्साह व आनंद आहे बरे. बाकी मजकूर तुकाराम[१], पाठक व बाबाचार्य सर्वांस नमन कळवून पाठक यास हकीकत लिहिण्यास सांगावे. भक्ती वाढवण्यावर नजर ठेवावी, हीच प्रार्थना फार फार आहे. घरचे मंडळींस नमन सांगावे. कट्टाने असण्याबद्दल नमन सांगावे. गुरुराव व केशवराव वगैरेंसही नमन सांगावे ही विज्ञापना.

आपला

भाऊ उमदी

नोंदी :–

१. भक्तविजय, अध्याय ४०.

२. भक्तविजय, अध्याय ४०.

३. भक्तविजय, अध्याय ४०.

४. अलक्षीं राहिलें लक्ष । सिद्धान्तीं कैचा पूर्वपक्ष ।। –(दासबोध, ११.१.४३.)

५. मनाचे श्लोक, १०७

६. अर्धोन्मीलितलोचनः स्थिरमना नासाग्रदत्तेक्षणः । -(हठयोगप्रदीपिका, ४.४१.)

७. ज्ञानियापुढें ज्ञान । बोलावें वाटें ॥ -(दासबोध, ७, १.४८.)

८. जेवीं बाळक बोलें बोबड्या वचनीं । ऐकोनि जननी संतोषे ॥ -(भक्तविजय, ५.१५६.)

९. तुकाराम सुतार. दक्षतेने काम करणारे महाराजांचे शिष्य. बांधकाम म्हणजे तुकाराम, सामान आणणे म्हणजे तुकाराम असे समीकरण झाले होते. यांच्या विजापूरच्या घरी महाराज उतरत असत. यांचे वडील नरसप्पा. हेही भक्तिमान होते. मात्र महाराजांच्या नामधारकांच्या यादीत त्यांचे नाव नाही. ते निंबरगी महाराजांचे शिष्य असावेत असे वाटते.

xxxxx

पत्र २५ पान ३८

नवीन
क्रमांक

३३ (टिपण :- बिदनूरकरांनी आपल्या पत्रात काही विधाने केली असावीत. त्यांना उद्देशून हे पत्र आहे. या पत्रातील बराचसा मजकूर पुढे २६० क्रमांकाच्या पत्रात आहे. पण ते पत्र वाचताना तुटक वाटू नये म्हणून पुन्हा लिहिला आहे. ६३, २६१, २६२ यांतही यातला काही मजकूर आहे. तोही तसाच ठेवला आहे.)

जत/उमदी माघ शु. १०
९.२.१९००, शुक्रवार

श्रीगुरुसमर्थ

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री वासुदेवरावजी अण्णासाहेब बिदनूर, वडिलांचे चरणसेवेशी, बाळक कृष्णा उमदीकर याचा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार, विनंती, विज्ञापना. मिती माघ शु. १० शुक्रवारपावेतो श्रीहरिकृपेकरून उत्तम असो. वाटवे मास्तरांमार्फत आपल्याकडून दोन

वेळा पत्र लिहून निरोप आला. ते ऐकून मनास आनंद झाला, तो पत्री लिहिता येत नाही. असो. मी किती झाले तरी अज्ञान. माझ्याकडून तशी स्मरणाची (नामाची) सेवा घडत नाही. तथापि क्षमा होऊन वडीलपणाचे अधिकाराने परामर्श घेत आहांत. असेच निरंतर कृपावंत होऊन क्षेम समाचाराने सांभाळ होत असावा. मातोश्री आजीबाईंना माझा त्रिकाळ नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. बाकी मजकूर म्हणजे मी घरीच आहे. नोकरीचा उद्योग आजपर्यंत नाही. असो. वडिलांची कृपा जेव्हा होईल तेव्हा होईल. वडिलांनी आजीबाईंना व आपल्याला त्रिकाळी नमनपूर्वक शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे, तो आजीबाईंना स्मरणपूर्वक श्रुत करावा असे सांगितले आहे. आणखी आपण पूर्वी पत्र लिहिले होते की खरेपणास जय नाही. म्हणून लिहिलेले मजकुराचे उत्तर वडिलांना विचारून लिहावे अशी आज्ञा त्या पत्रात होती. त्यावरून आज उत्तर सांगितले ते खाली लिहिल्याप्रमाणे–

आता खरेपणास जय म्हणजे काय याचा भावार्थ– आता 'धर्मामध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म'[१]। या गोष्टीस खरेपणा म्हणावा. हा जो धर्म आहे तो प्रवृत्तीतील. प्रवृत्तीततरी काय, देह अनित्य आहे. या देहास कर्तव्य व श्रेष्ठपणा लागलेला आहे. त्या श्रेष्ठपणावरून अहंकार चढतो. हा अनित्य देह अनित्य श्रेष्ठपणाने मी नित्यच आहे असा भ्रम अंतःकरणात बिंबवतो. त्यामुळे त्या प्रवृत्तिमार्गातील धर्मासच स्वधर्म समजतो. यामुळे 'भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासकाः जनाः । भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥'[२] या समर्थवाक्यास दूषण देतो. पांडव श्रीकृष्ण परमात्म्याचे आज्ञेने खरेपणाने वागल्याने किती श्रेष्ठ म्हणविले गेले व त्यांचा जयजयकारच झाला. आजपर्यंत त्यांचेविषयी झालेले ग्रंथ वाचल्याने सर्वांवर उपकारच होत आहेत. तेव्हा खरेपणाचे आधारानेच असे झाले आहे. तेच प्रवृत्तिमार्गाचे भावाने मन कूटस्थातील विषयाकडे गेल्याने 'नरो वा कुंजरो वा'[३] असे झाल्याने प्रवृत्तिमार्गाने म्हणून दूषण आले.तथापि ते श्रेष्ठच म्हणविले गेले. प्रवृत्तिमार्गास खरेपणा म्हणता येत नाही. विषयलोभास्तव कूटस्थातील भाव विषयांकडे गेलेने

मोठे मोठे म्हणजे नारद, ब्रह्मा, इंद्र, चंद्र वगैरे समर्थांना दूषण आले म्हणोन (तरी ?) ते श्रेष्ठच म्हणविले गेले. देवच होऊन गेले (?). कूटस्थातील विषयाचा भाव ज्याचे त्यास समजू देत नाही. प्रवृत्तिमार्गातील अनित्यपणाचे संगतीने व संसर्गाने मनास काही वाटते व हातून तसे घडते. म्हणून खरेपणास जय नाही असे म्हणण्यास उद्युक्त होऊ नये अशी फार फार प्रार्थना वडिलांनी सांगितली आहे.

देवांनी प्रल्हादास तीन वेळा विचारले की, 'तुझ्या कूटस्थातील भाव मला दे'. असे म्हटल्यावर प्रल्हादाने उत्तर दिले की, 'मी खरेच सर्व भाव तुला अर्पण केल्याने, देवा, तू माझे विषातून, अग्नीतून असे नाना प्रकारे रक्षण केलेस. आता मजजवळ काहीच नाही. मी तुझा म्हणवितो. असे असून मला 'दे' म्हणता तर माझेजवळ काय आहे ?' पुढे देवांनी नरसिंह अवतार घेतला. त्या वेळी 'न ये ज्वाळ विशाळ सन्निध कोणी'[४] असा उग्र अवतार धारण केल्याने त्यांच्या जवळ कोणी येऊ शकले नाही. प्रल्हादास 'भक्तांमाजीं प्रल्हाद भक्त' असे देवांनी म्हटल्याबरोबर प्रल्हाद समोर येऊन उभा राहिला. तेव्हा देव म्हणाले, 'काय मागतोस माग'. 'माझ्या बापाने, हिरण्यकशिपूने, आपली निंदा केली, त्याला मुक्ती द्यावी,' असा प्रल्हादाने वर मागितला. देव हसून बोलले, 'मजजवळ काही नाही, असे म्हणत होतास, आता तुझा राक्षस बाप कूटस्थात कोणत्या ठिकाणी आहे ?' असे म्हणताच प्रल्हाद स्मृतीवर आला व चूक झाल्याबद्दल क्षमा मागून, 'निरंतर आपली सेवा घडावी' असा वर त्याने मागितला. तद्वत् कूटस्थातील भाव भ्रमाने समजून येत नाही. 'खरें तें खरेंच. खोटे ते खोटेंच खोटे. खऱ्यासीं तगेना तें बालटें'[५] असे वाक्य रामदास महाराजांचे दासबोध अध्याय २०, समास ९ यात आहे. ते एकाग्र होऊन अर्थ करून वाचले असता सर्व निरसन होते. आपल्यास तसदी दिल्याबद्दल व वेळ गेलेबद्दल क्षमा होऊन दया कराल अशी आशा बाळगून व जसे वाघाचे पिल्लू वाघापुढे खेळते तसा सलगीने तुम्हांपुढे लिहीत आहे. ते मान्यच कराल याप्रमाणे प्रार्थना फार फार सांगितली आहे. मकर संक्रमणाप्रीत्यर्थ शर्करायुक्त तीळ देऊन पाठविले

आहेत ते स्वीकार व्हावेत. तीळ या शब्दातील ती-ळ या अक्षरांचा स्वीकार व्हावा लागतो. त्यासाठी समर्थांचे वाक्य आहे, 'तिळाएवढें बांधुनि घर । आंत राहे विश्वंभर ॥ तिळाइतुकें हें बिदुलें । तेणें त्रिभुवन कोंदाटले'[६] ॥ याप्रमाणे जाणताच. अभिज्ञच आहांत. तत्रापि लिहिण्यास पूर्वी सुचवून दिले आहे ते लिहीत आहे म्हणून क्षमाच व्हावी असे सांगितले आहे ते श्रुत व्हावे. वडिलांप्रत विशेष काय लिहिणे ? ही विज्ञापना.

11.7.20

नोंदी :-

१. दासबोध ८.९.५४.

२. दासबोध १०.६.११ नंतरचा श्लोक.

३. अव्यक्तमब्रवीत् 'राजन् हतः कुंजर इत्युत'- द्रोणपर्व, अध्याय १९०, श्लोक ५५ -(महाभारत, व्यक्तिदर्शन.)

४. मनाचे श्लोक, १२१.

५. खोटें तें खोटेंचि खोटें । खऱ्यासीं तगेनात बालटें ॥ -(दासबोध, २०.९.१७.)

६. नित्यनेमावली, पृ. ४०.

xxxxx

	पत्र २६०	**पान २६५**
नवीन	जत/उमदी	माघ शु. १०
क्रमांक	बिदनूरकरांना पत्र	९.२.१९००
३४		

श्री

आता खरेपणा याचा अर्थ, धर्मामध्यें धर्म स्वरूपीं राहणें हा स्वधर्म, या गोष्टीस खरेपणा म्हणावा. ही गोष्ट प्रवृत्तीतील आहे. प्रवृत्तीत तरी काय, हा देह अनित्य. या देहास जे कर्तव्य व श्रेष्ठपणा लागलेला आहे, त्यावरून अहंकार चढून हा अनित्य देह मी नित्यच आहे असे मनात बिंबते. त्या प्रवृत्तिमार्गातील धर्मास स्वधर्म समजून भ्रमेणाहं भ्रमेण त्वं

भ्रमेणोपासकाः जनाः । भ्रमेणेश्वरभावत्वं । भ्रममूलमिदं जगत् ॥ या समर्थांचे वाक्यास दूषण येत आहे.

आता पाहा. पांडव कृष्ण परमात्म्याचे आज्ञेने खरेपणाने वागल्याने किती श्रेष्ठ म्हणविले गेले व त्यांचा जयजयकार झाला. आजपर्यंत त्यांचेविषयी झालेले ग्रंथ वाचल्याने सर्वांस उपकार होत आहे. म्हणजे खरेपणाचा आधार असे झाले. तोच प्रवृत्तिमार्गाने कूटस्थातील भाव विषयाकडे गेल्याने, नरो वा कुंजरो वा असे झाल्याने दूषण आले. तत्रापि श्रेष्ठच म्हणविले गेले. प्रवृत्तिमार्गास खरेपणा म्हणता येत नाही. विषयलोभास्तव कूटस्थातील भाव विषयाकडे गेल्याने मोठे मोठे म्हणजे नारद, ब्रह्मा, इंद्र, चंद्र वगैरे समार्थांना दूषण लागले. म्हणोन (तरी ?) ते श्रेष्ठच म्हणविले गेले. देवच होऊन गेले. कूटस्थातील भाव ज्याचा त्याला समजू देत नाही. प्रवृत्तिमार्गाचे अनित्यपणाचे संगतीने व संसर्गाने मनास जे काही वाटते, त्याप्रमाणे हातून घडून येते. म्हणून खरेपणास जय नाही असे म्हणण्यास उद्युक्त होऊ नये. प्रल्हादास तीन वेळा देवांनी विचारले की तुझ्या कूटस्थात जो भाव आहे तो मला दे. प्रल्हादाने उत्तर केले की, 'मी खरा आहे, सर्व भाव तुम्हांस अर्पण केल्याने विषातून, अग्नीतून, नाना प्रकारे देवा, तुम्ही माझे रक्षण केलेत. आता मजजवळ काही नाही. मी तुमचाच म्हणवितो. असे असून मजला 'दे' म्हणता, तर मजजवळ काय आहे' ? पुढे देवांनी नरसिंह अवतार घेतला त्या वेळी न ये ज्वाळ विशाळ सन्निध कोणी असा उग्र अवतार धारण केल्याने कोणी जवळ गेले नाही. देवांनी प्रल्हादास 'भक्तामाजी प्रल्हाद भक्त' असे म्हटल्याबरोबर प्रल्हाद समोर येऊन उभा राहिला. त्या वेळी देव म्हणाले, 'काय मागतोस माग'. तेव्हा 'माझा बाप हिरण्यकशिपू याने आपली निंदा केली, त्याला मुक्ती द्यावी', असा प्रल्हादाने वर मागितला. तेव्हा देव हसून बोलले, 'मजजवळ काही नाही म्हणत होतास, आता तुझा बाप राक्षस तुझ्या कूटस्थात कोणते ठिकाणी आहे' ? असे म्हटल्याबरोबर तो स्मृतीवर आला व चुकीची क्षमा मागून निरंतर आपली सेवा घडावी असा त्याने वर

मागितला. सारांश, कूटस्थातील भाव भ्रमाने समजून येत नाही. म्हणून खरेपणास दूषण देता येत नाही. खरें तें खरें, खोटें तें खोटेंच खोटें । खरेंसी तगेना ते बालटें ।। असे वाक्य दासबोधी अध्याय २० समास ९ यात आहे. ते एकाग्र होऊन अर्थ करून वाचले असता सर्व निरसन होत आहे.

पूर्व दिशेचा वारा सुटून आभाळ पश्चिमेकडे चढत गेले म्हणजे सूर्यास आच्छादून एक घटका अंधकार दिसतो, परंतु सूर्यास काही विघ्न आहे किंवा आच्छादले आहे असे मुळीच नसते. संगतिगुणांमुळे तसे दिसते. ज्ञानमार्गास तद्वतच जशी संगत असेल तसे प्राण्याला अज्ञानपण येऊन घटकाभर विघ्न असे दिसते. परंतु ते काही ज्ञानापुढे व निष्ठेचे स्मरणापुढे राहत नाही. निर्विघ्न होऊन जाते. परंतु कल्पांतात (कल्पनेत किंवा पूर्वी) केलेल्या गोष्टी न कळता पुढे येऊन उभ्या राहतात. आपण कल्पनेत बुडून दिशाभूल पडते व काहीच कळून येत नाही. करिता आपण गुरुपुत्र आहो आणि ज्ञानमार्गात आहो म्हणून कल्पित गोष्टी व कर्तव्य सोडून देऊन अकल्पित होऊन निष्ठेचे, कष्टाचे नामस्मरण वाढवावे म्हणजे सर्व कळून येते. याकरिता वाक्य– 'आकल्प आयुष्य व्हावें तया कुळा । माझिया सकळां हरिच्या दासां'[१] ।। असे आहे. यात मुख्य वाक्य 'अच्युतानंत गोविंद नाम उच्चारण भेषजे'[२] असा च्युत न होता अच्युत नाम जे आहे त्याचा जयजयकार आहे. ते निर्विघ्न व सुखकारक आहे, अशी प्रार्थना फार फार आहे.

आता 'समर्थाचे घरचें श्वान, त्यास सर्वही देती मान'[३] असे वाक्य व्यंकटेशस्तोत्रात आहे. हाच अर्थ जन्मवरी पूर्वापार चालत आला आहे व बिंबून गेला आहे. यापुढे दुसरा अर्थच चालेना, त्यास उपायच घडेना. याचा दुसरा अर्थ काय असेल याचा सुज्ञांनी विवेक करावा व शक्तिनुसार कळवावा अशीही प्रार्थना आहे.

आता 'देह त्यागिता कीर्ति मागे उरावी'[४] असे वाक्य. मागे कीर्ती उरावी एवढ्यावरच अर्थ चालला. दुसरा अर्थ कोणता असेल ? कीर्ती उरावी ती कोणाची कीर्ती, हा विवेक सुज्ञांनी करावा व कळवावा म्हणून

प्रार्थना. आता या देहास लोभ, काम, क्रोध, ममता, आशा, द्रव्य, घर व वतन अथवा मूळबाळ, स्त्री हे सर्व पाहिजे. मान, श्रेष्ठता, अभिमान, रागद्वेष, अहंकार हे सर्व प्रवृत्तीतील झाले. आता निवृत्तीतील लोभ, ममता, काम, क्रोध, षड्रिपू हे सर्व सोडले, आता मी झालो (निर्विकार झालो, निवृत्ती साधली), भक्तीवाचून दुसरे कर्तव्य नाही. म्हणून नेहमी श्रवण अगर भजन अगर स्मरण, निष्ठा याप्रमाणेच राहिलो आहे असे मनास शोभा व कीर्ती दिसून मनास मी असा (श्रेष्ठ) आहे असे मानतो. परंतु ते येथील येथेच राहत आहे. बरोबर कोणतेही येत नाही असे वाक्य आहे. ते कोणते समर्थ वाक्य व याचा अर्थ काय, समजत नाही. खुलासा व्हावा. आता प्रपंचात वर लिहिलेप्रमाणे झाले व परमार्थातही व्यर्थ गेले असे वरील शर्तीवरून दिसते. यावरून खरा मनुष्य कोणता असेल याबद्दल सुज्ञांस प्रार्थना.

आता सहजी एक अर्थ. लहान थोर म्हणजे विद्वान धरून लहानांसही एकदेशीचा (प्रवृत्तीचा) अर्थ कळतो. हे वहिवाटीवर, सहवासावर आहे असे कसे म्हणावे ? आईबापाविना एक लहान मुलगा आहे. अज्ञान आहे. पण वयात आलेबरोबर लाभ, तोटा, मान, अपमान, शेत-घर, मूलबाळ, नुकसान-संतोष आपोआप कळू लागतात. एका भागाचा (प्रवृत्तिधर्माचा) अर्थही कळतो. दुसरा अर्थ प्राण्यास कळत नाही, तो कळण्यास समर्थ वाक्याचा आधार- 'जितका गाव तितका देव जना कारणें'[५] । या आधाराप्रमाणे रुक्मांगद हल्ली जगात आहेत व त्यांचे आजूबाजूस जीवभावाचा अर्थ व एकदेशी अर्थाची समाधीही आहेच आहे. दुसरा शिवभावाचा अर्थ समर्थांना समजल्याने ते देवच होऊन बसले. तद्वत महीपतीस्वामींचेही आहे. ज्ञानोबा, नामदेव, रामदास होऊन गेले, त्यांचे मागे त्या ठिकाणी उत्सवही चालले आहेत. सिद्धपुरुष, जितके गाव तितके देव आहेतच, जसे माळिंगराय, अमोघसिद्ध, लक्ष्मीकंटीसिद्ध किंवा बिळेनसिद्ध. अशा सर्व ठिकाणी जे जे देव आहेत, त्या त्या ठिकाणी हल्ली जीवभावाच्या दाखल्याकरिता समाधी अगर देऊळ पाहतच आहो. असा आधार असून त्याकडे लक्ष का जात

G1.6.2.27

नाही? अर्थ का समजत नाही ? याचे अनुमान होऊन विवेकाने ज्ञान समजून खुलासा कराल अशी इकडील उमेद फार आहे.

आता कृष्ण परमात्म्याने सोळा सहस्र गोपिका केल्या किंवा द्रौपदी पतिव्रता म्हणविली गेली आणि पाच भ्रतार होते. देवाने हिरण्यकशिपूस अभयवर दिला की तुजला रात्री, दिवसा अगर कोणाकडून मरण नाही आणिं आपणच अवतार धरून वध केला. हे सर्व मनन करून दुसरा अर्थ काय असेल किंवा हाच अर्थ खरा असेलतर देवाचे वागणे द्वैतभावाचे झाले काय, याचा सुज्ञांनी विचार करून अर्थ घेतच आहां. या गोष्टी परंपरेने चालत आल्या आहेत त्यांचा निषेध करण्याबद्दल (म्हणजे खोट्या ठरवण्याबद्दल) समर्थवाक्य- नदीचे मूळ व ऋषीचे कूळ शोधू नये असा आधार आहे. सारांश, दासबोध ६ यातील समर्थवाक्य- 'शास्त्रे भांडण तोडी असा कोण । आत्मज्ञानावाचून '[६] । आणखी आधार- 'सगुण रूप नयनी मज दावा । मग तुम्ही वेदान्त गावा '[७] । सारांश, आत्मज्ञानावाचून सर्वही निर्णय होण्यास कोणतेही प्रकारे आधार नाही, मुख्य ते पाहिजे.

दत्तोपंत वगैरे मंडळींस प्रार्थना. सर्वांनी वाचून, मनन होऊन पूर्वीचे पत्राचे व आता या दोन पत्रांचे, एकूण तीन प्रकरणांचे मजकुराचे खुलासा होऊन उत्तर येईल असे करावे. समर्थ महाराज सावळसंगकर व देव मंडळी सर्वांस शिरसाष्टांग नमस्कार सांगून, हे पत्र वाचून दाखवून, नक्कल ठेवून, हे पत्र तदलबागीस मुद्दाम जरूर जरून पाठवावे म्हणजे तेथील सुज्ञ मंडळी मनन करून उत्तर लिहितील अशी प्रार्थना करावी ही विनंती.

नोंदी :-

१. नित्यनेमावली, पृ. ७०

२. अच्युतानंत गोविंद नामोच्चारेण भेषजात् । नश्यंति सकलाः रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥ - (भक्तिमार्गप्रदीप, पृ. ४५.)

३. समर्थाचिया घरींचें श्वान । त्यासी सर्वही देती मान ॥ -(व्यंकटेशस्तोत्र, १७.)

४. मनाचे श्लोक, ८.

५. तयास म्हणावें देव । वरकड लोकांचा स्वभाव । जितुके गाव तितुके देव । जनांकारणें ।। -(दासबोध, ६.२.२७.)

६. वेदशास्त्रांचें भांडण । शस्त्रें तोडी ऐसा कोण । हें निवडेना साधुविण । कदा कल्पांतीं ।। -(तत्रैव, ६.६.२७.)

७. सगुण रूप नयनीं । नयनीं आधीं दावा । मग तुम्ही वेदान्त गावा ।। -(माणिकप्रभु.)

xxxxx

	पत्र २६	**पान ४१**
नवीन	उमदी	माघ व. ३
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	१७.२.१९००
३५		

श्री

अनेक आशीर्वाद उपरि. माघ व. ३ पावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. तुमचे पत्र आले ते पाहून आनंद झाला. पगार किती ते लिहिण्यास सवड झाली नाही. ते लिहावे, बरे. अण्णा पंडिताचे पत्र पावले. आनंद झाला. कानडी शिकण्यास जात असतो की काय ते लिहावे. रयतगावकरांचे दस्त रजिस्टर करण्याचे तैसेच राहिले. ते खुद्द रजिस्टर करणाऱ्यास विचारून लिहावे की मृत्युपत्र असू नये असे त्याचे म्हणणे आहे असे तिने येऊन सांगितले. त्यास बक्षीसपत्र असावे की काय, ते लिहावे. म्हणजे पुन्हा स्टँप पेपरवर लिहून साक्ष घालून मुद्दाम तिला पाठवतो. कृष्णाने अगत्य खुद्द जाऊन रजिस्ट्रारास विचारावे व लिहावे, बरे ! बाकी सर्व आनंद आहे. प्रकृती नीट आहे. तिकडील सर्व मंडळींस नमन सांगावे. तुम्ही नेमाने हुशारीने असावे. उत्तर लिहावे. कळावे, हा आशीर्वाद. सोनलगी बदलीकरिता रायगोंडा व राम येणार आहेत. तरी होईल तैसे करावे. तुमचे मर्जीप्रमाणे करावे.

	पत्र २७	पान ४१
नवीन	उमदी	माघ व. ३
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	१७.२.१९००
३६		

श्री

रयतगावकरांचे मृत्युपत्र लिहून रजिस्ट्रारास दिले आहे. नागप्पा (माशाळ) व बाई गेल्यावेळी, तूर्त देत नाही म्हणाला. उमदीकर देशपांडे नावाने पावती देतो, घ्यावी असे म्हणाल्यावरून देतो असे म्हणाला. नंतर पुन्हा म्हणाला की बाईच आली पाहिजे. आणखी त्या बाईस काळजी लावली की हे मृत्युपत्र पुढे वारसास चालणार नाही. भाऊबंद हरकत करतील. असे सांगितल्याने बाई दुःखित झाली. त्याबद्दल रजिस्ट्रार उमदीस आला होता तेव्हा सांगितले असेल असे वाटते. असो. त्याने पावती पाठवलेस तुम्हांस देईल की नाही याचा विचार करून उत्तर यावे. पावती नंतर पाठवतो की नागप्पास पाठवतो याचा पक्का विचार करून उत्तर यावे. सवडीप्रमाणे लिहावे. मृत्युपत्र पाहण्यास पाठवले आहे. याचप्रमाणे दुसरे लिहून रजिस्ट्रारास दिले आहे. तारीख चुकलेने दुसरे लिहून दिले. ते चांगल्या माहितगारास दाखवून हे चालेल की पुढे अडचण येईल याचा विचार करावा. दुसरा विचार बंदोबस्तीचा असलेस त्याप्रमाणे करविण्यात येईल. सवडीप्रमाणे करावे. हे गावकऱ्यांचे खेळ आहेत. आत एक, बाहेर एक असे करतात. पोट भरण्याचा गुणच तसा असतो. उपायच नाही. ती बाई त्याकरिता आमचेवर विश्वास ठेवून आहे. करिता पक्का विचार करणेसाठी मागील कागद वगैरे पाहण्यास पाठवले आहेत. त्यांचे मनन होऊन सवडीप्रमाणे उत्तर लिहावे. कळावे. हे दोन्ही दस्त बंदोबस्तात ठेवावे. गहाळ वगैरे होऊ देऊ नये[1].

नोंद :-

१. महाराज व्यवहारदक्ष होते. परमार्थाच्या नावाखाली त्यांनी व्यवहाराकडे दुर्लक्ष केले नाही. इतरांनाही ते मदत करीत.

xxxxx

नवीन
क्रमांक

३७ (टिपण :– यातला बराच भाग २९, ३०, १८६ या पत्रांतून आहे. हे पत्र तुकडे जोडल्यासारखे आहे.)

उमदी चैत्र शु. ६

५.३.१९००

श्रीगुरुसमर्थ

तीर्थस्वरूप श्रीमंत मातोश्री पार्वतीबाई आई, मुक्काम जमखंडी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक रामाचा दोन्ही कर जोडून चरणी मस्तक ठेवून अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तारीख ५.३.१९०० पावेतो श्रीसमर्थसद्गुरुमहाराजकृपेने सर्व आनंदरूप असो. विज्ञापना. आपले कार्ड २ मार्चला पावले. मजकूर पाहून आनंद झाला. वडिलांनी आत्मारामपंतांचे नावे पत्र लिहिले आहे. वडील येथेच उमदी मुक्कामी आहेत. कोठे गेले नाहीत. यंदा समर्थांचा मार्गशीर्ष सप्ताह वगैरे उत्सव थाटाने आनंदात झाला. जमखंडी वगैरे मंडळी आली होती. सारांश, ज्ञानाचे सदुक्त (दोन प्रकार) जशी कामना भक्ती, तशी निष्काम भक्तीची प्रीती असावी. अपरोक्ष ज्ञानाचा निरंतर निदिध्यास लागला गेला याचा दोन प्रकारे अर्थ– आता निष्काम भक्ती म्हणजे बाप व मुलगा दोन्ही ठिकाणी निष्कामता असणे. हा किती भोग भोगवितो, सुख पावतो, वृद्धी करतो हे मुलाचे ठिकाणी नसते. त्याचे ठिकाणी बाप माझा व्रतबंध करील, लग्न करील, मला भूषणात ठेवील, विद्याभ्यास करवील अशी कामना मुळीच नसते. बापाचे आज्ञेने आनंदयुक्त होऊन वागावे हीच क्रिया ठरल्याने व तो माझा धर्म होय असे मुलाच्या ठिकाणी असते. वर लिहिलेल्या गोष्टी करून बाप मुलाला सुखात ठेवून निरंतर कल्याण इच्छितो. याचप्रमाणे भक्ताची भक्ती व नेम वाढावा, भक्तीचां थाट व्हावा अशी निष्काम भक्ती भक्ताच्या ठिकाणी असल्याने देव सर्व प्रकारे साहाय्यभूत होऊन अंतःकरणात ज्या ज्या गोष्टींचे स्मरण असते

(इच्छा असते) त्या त्या आपोआप करवितो. 'माझा भक्त माझे ठायी। भक्त गाती ठाई ठाई। तेथे मी तिष्ठतु नारदा'[1] ।....

(अपूर्ण)

नोंदी :-

१. नाहीं वैकुंठीचा ठाईं। नाहीं योगियांचा हृदयीं। माझे भक्त गाती ठाईं ठाईं। तेथें मी तिष्ठतु नारदा ।। -(दासबोध, १.८.२.)

मूळ श्लोक - नाहं वसामि वैकुंठे । योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायन्ति । तत्र तिष्ठामि नारद ।। -(उ. पद्मपुराण ९४.२३.)

xxxxx

पत्र ३०   पान ४५

नवीन
क्रमांक
३८

(टिपण :- ३०, १८६, २९ ही पत्रे हे एकाच पत्राचे भाग असावेत. ३० पत्रावर २१.३.१९०० अशी तारीख आहे. मजकूर सुरू झाल्यावर १०.३.१९०० आहे. ही ग्राह्य धरली आहे.

२९ पत्रावर २१.३.१९०० अशी तारीख आहे. म्हणून ३० पत्र आधी लिहिलेले दिसते.

२८ पत्रातला पहिला भाग व ३० मधला पहिला भाग एकच आहे. १८६ मध्ये ३० मधला पहिला बराच भाग आहे. २८ मध्येही तो आहे.)

उमदी   चैत्र शु. ११
              १०.३.१९००

श्रीगुरुसमर्थ

तीर्थस्वरूप मातोश्री पार्वतीबाई आई मुक्काम जमखंडी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक रामाचा दोन्ही कर जोडून चरणी मस्तक ठेवून अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. तारीख १० पावेतो

श्रीसमर्थसद्गुरुमहाराजकृपेने सर्व आनंदरूप असो. विशेष. आपले कार्ड पावले. पाहून आनंद झाला. आपलेकडे वडिलांनी आत्मारामपंतांचे नावे पत्र लिहिले होते ते पावले असेल. वडील उमदी मुक्कामी आहेत. सर्व खुशाल व आनंद आहे. यंदाचा मार्गशीर्ष सप्ताह थाटाने आनंदात झाला. जमखंडी वगैरे मंडळी आली होती. सारांश भक्तिमार्गाने, नेमाने, निष्ठेने चालले असल्याने मनास आनंद वाटून बोललेने, अगर मागील समर्थांचे दाखले ऐकल्याने गोड वाटते. उत्साह व प्रेम अधिक वाटते. भक्तिमार्गाला दोन प्रकारचा अर्थ आहे. अभ्यास (नेम) कमी झाल्याने अनुभवाचा अर्थ कळत नाही. प्रवृत्तिमार्गाचा एकदेशी मार्गाचा अर्थ कळतो. त्याचाच अभ्यास जडून गेल्याने तोच खरा वाटतो. मात्र हा निवृत्तिमार्गाचा अर्थ ठरत नाही. का म्हणालतर अभ्यास कमी पडल्याने अंतःकरणात चैतन्य, प्रेम अगर उत्साह राहत नाही, असो. व्यवसायाचे व विषयाचे योगाने त्यातच चैतन्य, ममता व आनंद वाटतो. प्रचितीस आलेले सुख भोगलेने त्याचेच प्रेम वाटून तेच खरे वाटते. उलट निवृत्तिमार्गाचा अभ्यास जडून गेल्यावर वाटणारे प्रेम व आनंद याबद्दल काही सांगता व लिहिता येत नाही. मुख्य अंतःकरणापासून अभ्यास व्हावा. त्या योगाने प्रेम वाटते. दिवसेंदिवस भक्ती चढते व वाढते. भक्तीस मूळ विरक्ती व ज्ञानास मूळ अग्नी असे झाले म्हणजे कळून येते. कूटस्थापासून निष्ठेने, प्रेमाने स्मरण वाढवावे लागते म्हणजे आपोआप कळून येते. आता निष्काम भक्तीची प्रीती असावी. अपरोक्ष ज्ञानाचा निरंतर निजध्यास (निदिध्यास) लागला गेला याचा अर्थ दोन प्रकारचा आहे, असे समजण्यास सूचना. मुलाचे ठिकाणी बाप व्रतबंध करील व विद्या करवील, लग्न करील व मला सुखात ठेवील अशी काही कामना नसते. फक्त वडिलांचे आज्ञेने वागावे हा माझा धर्म होय असा लहानपणी अंतःकरणात निजध्यास लागला गेला. तोच धर्म समजलेने उत्तम कुळीचा बेचाळीस कुळे उद्धरणारा चांगला मुलगा म्हणविला गेला. त्यायोगे बापास आनंद वाटून जे जे वेळी जे जे कर्तव्य आहे ते ते वेळी आपणच करून आनंदात ठेवून निरंतर कल्याण चिंतितो व भूषणाने ठेवतो.

त्याची कीर्ती वाढवतो. का म्हणालतर मुलाचे ठिकाणी निष्कामता असलेने सर्व कामना बाप पुरवून देतो, निरंतर वृद्धी करतो. हाच मुलाचा धर्म होय. असा धर्म बाळगलेने सहजी कल्याण झाले. तद्वत् निष्कामाची भक्ती होऊन भक्तिमार्ग वाढवावा. भक्तीचे ठिकाणी जी जी इच्छा असते, ती ती पुरवून देण्यास देव समर्थ आहे. आता अपरोक्ष ज्ञान म्हणजे दोन प्रकारे अर्थ आहे. तो आपोआप कळून यावा. अगर ज्ञानाचे योगाने, तूक झाल्याने (बरोबर अर्थ कळल्याने) समजू लागतो, असो.

याप्रमाणे ज्ञानमार्ग समजूनच आहांत. सर्व मंडळी सुज्ञ असून मी बालकाने कळवावे असे काही नाही. तत्रापि अभिज्ञांप्रति वडिलांचे आज्ञेवरून व त्यांचे सांगणेवरून हे लिहिणे कर्तव्य ठरते. मी यात सहजासहजी निर्दोष ठरतो. तत्रापि कृपा करून अभिज्ञांनी वेड्यावाकड्या उत्तरास क्षमा करावी. वाघाची पिल्ले वाघापुढे उड्या मारतात तसा मी तुम्हां संतसभेपुढे सत्तेने लिहितो. तुमचे अंतःकरणात राहीलच.

पत्र १८६ पान १८३

नवीन क्रमांक

३९ (टिपण :- पहिला बराच भाग ३० प्रमाणे असल्याने, तिथी, तारीख, लिहिण्याचे गाव तेच ठेवले आहे.)

उमदी चैत्र शु. ११
१०.३.१९००

श्री

तीर्थस्वरूप मातोश्री पार्वतीबाई आई मुक्काम जमखंडी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक रामाचा दोन्ही कर जोडून चरणी मस्तक ठेवून अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. ...तारीख पावेतो श्रीसमर्थसद्गुरुमहाराजकृपेने सर्व आनंदरूप असो. विज्ञापना. आपले कार्ड २ मार्चला पोचले. मजकूर पाहून आनंद झाला. आपलेकडे

आत्मारामपंतांचे नावे वडिलांनी पत्र पाठविले आहे. वडील उमदी मुक्कामी आहेत. यंदा समर्थांचा (मार्गशीर्ष) सप्ताह थाटाने आनंदात झाला. जमखंडी मंडळी आली होती. सारांश भक्तिमार्ग निष्ठेने चालला असता मनास आनंद वाटून बोललेने व मागील समर्थांचा दाखला ऐकलेने गोड वाटते. उत्साह व प्रेम अधिक वाटते. भक्तिमार्गास दोन प्रकारचा अर्थ आहे. अभ्यास (नेम) कमी झाल्याने अनुभवाचा अर्थ कळत नाही. प्रवृत्तिमार्गात मन जडून जाते व तोच अर्थ खरा वाटतो. हा निवृत्तिमार्गाचा अर्थ ठरत नाही. अभ्यास कमी पडल्याने अंतःकरणात चैतन्य, प्रेम व उत्साह राहत नाही. विषयाच्या अभ्यासाने त्यातच चैतन्य, प्रेम व उत्साह राहतो. त्यातले सुख भोगल्याने तोच मार्ग खरा वाटतो. असो. निवृत्तिमार्गाचे सुख व प्रेम जडून गेल्यावर त्यातल्या प्रेमाबद्दल व आनंदाबद्दल काही लिहिता येत नाही. सारांश मुख्य अंतःकरणात मनापासून अभ्यास व्हावा. त्यायोगे प्रेम वाटून दिवसेंदिवस भक्ती वाढते. भक्तीस मूळ विरक्ती व ज्ञानास मूळ अग्नी असे होते व सर्व कळून येते. हे सर्व अभ्यासावर आहे. मुख्य कूटस्थापासून निष्ठेने अभ्यास चढवावा लागतो म्हणजे सर्व कळून येते. मग सांगण्याचा प्रसंग पडत नाही. असो. सर्व ठिकाणी प्रवृत्ती व निवृत्ती असा दोन प्रकारचा अर्थ आहे. द्वैतावाचून अद्वैत कळत नाही. प्रवृत्तिवरून निवृत्ती हळूहळू कळू लागते. निंदेवाचून वंद्य होत नाही. नाना प्रकारे पाहिले असता असे दोन प्रकारचे अर्थ आहेत असे अंतःकरणात ठसले पाहिजे. निवृत्तिमार्गावर प्रेम ठेवून आनंद मानून घेण्यास मुख्य साधन अभ्यास. याप्रमाणे पूर्वीपासून संत सांगतात. त्या भक्तिमार्गाच्या गोष्टी आहेत असे म्हणावे. 'आज्ञा[१] करिता रुक्मिणीरमण । त्याचें कवित्व का निंदिती जन ।। तरी भाविकापाठीं पुरातन । विकल्पी असती बहुसाल ।।८२।। मागें त्रेतायुगीं वाल्मीकीन । भविष्य केलें रामायण ।। तेव्हाही होते अभक्त जन । ते अप्रमाण मानिती ।।८३।। मग अवतार घेउनि जानकीपती। लीला दाविली तैशाच रीती ।। ते अनुभवासी येता प्रचीती । यथार्थ मानिती सकळिक ।।८४।। द्वापारीं बोलिले कवि व्यास । परि कौरवांसी न वाटे विश्वास ।। मग

घडोनि आलिया अनायास । धृतराष्ट्र संजयास नमस्कारी ॥८५॥ एवं भावार्थियामागें विकल्पी नर । लागले असती अपरंपार ॥ म्हणोनि तुकयाचे अभंग साचार । निंदिती पामर निजमुखें ॥८६॥ सूर्याचा प्रकाश देखोनि दृष्टी । डुडुळ उगाच जल्पती पोटीं ॥ की पूर्वेसी चंद्र येतां निकटीं । तस्करासी भेटी नावडे ॥८७॥ दातयाची ऐकोन कीर्ती । कृपण उगेंचि त्या धिक्कारिती ॥ कीं दिव्य औषधी चमकतां रातीं । रोग तळमळती चित्तांत ॥८८॥ पंडिताची देखोनि वक्तृत्वता । अजापाळ म्हणती हे बडबड वृथा ॥ की गंधर्व सुस्वर गायन करितां । तेथें गर्दभ भुंकता न राहती ॥८९॥ बकुळीचा सुगंध येतां पाहे । तो पुंगळवेलीस मानेल काये ॥ सुंदर कपिला असली गाय । तरी यवन काय पूजिती ॥९०॥ ब्राह्मण प्रतिमेची पूजा करिती । आणि अविंध तेथें फोडू पाहती ॥ तेवीं भाविक तुकयाचे कीर्तन ऐकती । विकल्पी निंदिती निजमुखें ॥९१॥ परि दोन्ही मानूनि ते समान । करीतसे तो श्रीहरि-भजन ॥ कोणी हरिदास करितां कीर्तन । तरी सादर श्रवणीं ऐकावें ॥९२॥ दिवसेंदिवस अधिकचि प्रीती । या नावें चढती वाढती भक्ती ॥ निद्रा किंचित न लागे रातीं । करितां एकांतीं हरिभजन' ॥९३॥

नोंद :-

१. भक्तविजय ४८.८२-९३. पुस्तकात हे मोठे अवतरण असून ते बरेच अशुद्ध आहे. पण ते सर्व तसेच मजकुरात लिहून नोंद करताना शुद्ध करून आणखी एकदा लिहायचे हा प्रपंच मात्र या ठिकाणी केला नाही. शुद्ध स्वरूपातच लिहिले आहे.

xxxxx

	पत्र २९	**पान ४३**
नवीन	उमदी	चैत्र व. ६
क्रमांक		२१.३.१९००
४०		

श्रीगुरूसमर्थ

तीर्थस्वरूप मातोश्री पार्वतीबाई आई गोखले मुक्काम जमखंडी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक रामाचा दोन्ही कर जोडून चरणी मस्तक ठेवून अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. तारीख २१.३.१९०० मार्च पावेतो श्रीसमर्थसद्गुरुमहाराजकृपेने सर्व आनंदरूप असो. विशेष. वडिलांकडून तारीख ६ मार्चचे पत्र तारीख १८ मार्चास पोचले. मजकूर पाहून आनंद झाला. वडिलांकडे आत्मारामांमार्फत, नीतिमार्गाचे, मागील समर्थांचा दाखला वगैरे दिल्याचे एक पत्र १० मार्चच्या सुमारास गेले आहे[1]. पूर्वीचे तुमचे कार्ड पावलेच आहे. दिवसगत पत्रास का लागतात हे कळत नाही. पंधरा रोजांनी पत्रे पावतात. आता पत्रावर असे लिहावे की, रामचंद्र व्यंकटेश देशपांडे, उमदी, यास चडचण पोस्टातून इंडी तालुका पोस्ट चडचण, खाली उमदी येथे दीजे. म्हणजे सहा आठ रोजांनी पावतील असे वाटते. शिक्क्यावरून जतेस जाऊन नंतर इंडीकडून उमदीस येत असावीत आणि म्हणून दिवस फार लागतात असे वाटते. असो. आता तिकिट न लावता पत्रे किती दिवसांत पोचतात तेही उत्तरात लिहावे. समयास तिकिट नसल्यामुळे तसेच लिहिले आहे. पूर्वीची दोन्ही पत्रे व हे पत्र या सर्वांचे उत्तर तारीख लिहून येईल असे सवडीप्रमाणे करावे. वडिलांचे गळ्यास म्हणजे उजवे कानाचे सुमारास फोड निघाला होता. तो नीट होऊन बरेच दिवस झाले. उगीच एकाचे एक न पाहता काहीतरी बकवा उठवतात. तुम्हांपर्यंत बातमी आली असेल. त्या संधीसच आत्मारामपंतांचे नावे खुद्द त्यांनीच पत्र लिहिले आहे. फक्त एक रोज फुटेस्तोवर दुःख झाले. त्याखेरीज शरीरास इजा वगैरे कोणत्याही प्रकारे ताप बिलकूल नाही. आनंदात उमदी मुक्कामीच आहेत. वडिलांस कळावे. गोपाळराव यांस वडिलांनी प्रार्थना सांगितली आहे. हरिपंत (कानेटकर ?), भाऊराव, मोरोपंत (गोखले ?), दत्तोपंत, पांडुमामा, गोविंदराव व बहिरू, गोविंदा वगैरे मंडळींस व आई मंडळी वगैरे एकंदरांस, ताईबाई, लक्ष्मीबाई वगैरे मंडळींस नेमाने, कट्टाने, उत्साहाने व निष्ठेने नेम चालवणेबद्दल विनंती व प्रार्थना श्रुत करणेबद्दल

फार फार सांगितले आहे. महाराज विष्णुपंत, शिवरामभटजी, वासुदेवराव, बसप्पा, मेलगिरीअप्पा, नंदेप्पा वगैरेंसही याप्रमाणे श्रुत करावे. कळावे. आता भक्तिमार्गातील मागील समर्थांचा दाखला– तुकाराम महाराजांचे कीर्तनात...

(अपूर्ण)

नोंद :-

१. हे पत्र ३० किंवा १८६ असू शकते.

xxxxx

	पत्र ३१	**पान ४७**
नवीन	जत	वैशाख शु. १
क्रमांक	नानासाहेबांना पत्र	३०.४.१९००, सोमवार
४१		

श्रीगुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक भाऊचा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. वैशाख शु. १, सोमवारपावेतो वडिलांचे चरणकृपेने आनंदरूप असो. विशेष.

परवा गोविंदप्पासमागमे पत्र व जिन्नस पाठविले ते पोचलेच असतील. बाकी इकडील सर्व मजकूर आनंद आहे. आता आपल्यास, येसप्पास अगर जयवंतप्पास सवड असलेस व आनंदाने संतोषाने आणतीलतर बैलाकरिता पेंड, वैरण, तेथून खरेदी करून, आठ बारा आणे देऊन युक्तीने, संतोषाने, आनंदाने, करतीलतर सवडीप्रमाणे पाठवावे. चांगला विश्वासुक गडी व एक महार देऊन गाडीवर आठ पायली दाणे, दोन पायली गहू, दोन–तीन पायली तांदूळ, थोडा कांदा व लाकडे देऊन बैलाची पोटगी ठरवून संतोषाने पाठवालतर फार फार सवड होऊन प्रपंचास साहाय्य होईल. महागाईत लाकडे सुद्धा महाग होऊन गेली. करिता आपणांस तसदी दिली आहे. तरी क्षमा होऊन संतोष द्यावा

हेच मागणे आहे. प्रपंचासाठी जीवभावाने लिहिणे पडले याची क्षमा करावी. कोणाला अडचण होऊ नये. भीड वाटून करीत असतीलतर निश्चितपणे नको. आनंदाने व भाड्याने कोणी येतीलतर त्याच्याबरोबर सवडीने पाठवावे. येसप्पास हे पत्र वाचून दाखवावे. ते व तुम्ही मिळून मर्जीप्रमाणे, दोघांचे मतास येईल तैसे करावे. कोणी जातील–येतील त्यांच्याबरोबर पाठवण्यास पाटील यांना सूचना कळवावी. मर्जी असेलतर कळवावे. दोघांचे मर्जीप्रमाणे करावे. उगीच सर्व सूचना कळविल्या आहेत. तुम्हांस वाटेल तैसे करावे. बाकी मजकूर सर्व ठीकच आहे. एक पंचांग पाठवले आहे. येसप्पास कळावे. पाटील यांना शरण शरणार्थी असे कळवावे. सर्वांनी नेमाने पोथी वगैरे थाटाने चालवावी. सर्वांस हीच फार फार प्रार्थना आहे. मल्लप्पा, शिवप्पा व नागप्पास सांगावे. नेम सोडू नये, चुकू नये, बरे. रामरावासही याप्रमाणे सांगणे आहे. अवकाळी सोनलगीस जाऊ नये. गोविंदप्पास विचारून त्याचेबरोबर जात जावे. रजा मंजूर झाली आहे. हुशारीने सांभाळून, भक्ती राखून असावे, बरे. कळावे, हा आशीर्वाद व विज्ञापना. गुरुनिंगप्पास प्रार्थना कळवावी. सवडीप्रमाणे पुस्तकास येत जावे असे कळवावे. ऐकल्याने मन स्थिर असते. ते काही वाया जात नाही. करिता वरचेवर 'वाचलेच वाचावा, ऐकलेच ऐकावा'[१], याप्रमाणे नेम शरीरभावास असावाच असावा. समर्थ निंबरगी महाराज सांगत होते की हेच साधकास स्मरण आहे. करिता नेम ठेवून ऐकत जावा, सोडू नयेच असे वाक्य आहे. समजूनच आहांत. मी उगीच सुचवले आहे. कळावे. आनंदाने शिवप्पास संतोष द्यावा. सुज्ञेच आहांत. कळावे.

नोंद :–

१. अरे हें पाहिलेंचि पाहावें । विवरलेंचि मागुतें विवरावें । वाचिलेंचि वाचावें । पुनः पुन्हा ।। –(दासबोध ११.८.९.)

23621

xxxxx

पत्र ३२ पान ४८

नवीन क्रमांक ४२ — उमदी — वैशाख शु. १३ १२.५.१९००, शनिवार

सावळगी येथे मातोश्री राधाबाई आई हरिदासणी जतकर यांस जयाबाईचे घरी.

साष्टांग नमस्कार. विनंती. तारीख १२ मेपावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. इकडील सर्व खुशाल आहे. वडील आले आहेत. आपलेकडे एक पत्र लिहिले होते ते पावलेच असेल. आपले येण्याचा खुलासा व्हावा. फार दिवस झाले. करिता पत्र लिहीत आहे. बाकी सर्व ठीकच आहे. कळावे, ही विनंती.

आपला भीमा उमदी

पत्र ३४ पान ५०

नवीन क्रमांक ४३

(टिपण :- ३४, ३५, ३३ या पत्रांवर.

३२, ३४, ३५ या तीन्ही पत्रांवर १२.५.१९०० अशी तारीख आहे. ३२ व ३५ वर वैशाख शु. १३ अशी तिथी आहे. ३३ पत्रावर वैशाख शु. १४ ही तिथी आहे. त्यावर तारीख नाही, पण ती सरळच १३.५.१९०० अशी येते. म्हणून तारखा-तिथीनुरूप पत्रांचा क्रम ३४-३५-३३ असा येतो.)

जत — वैशाख शु. १३ १२.५.१९००

श्रीगुरुसमर्थ

श्रीमंत महाराज राजमान्य राजश्री लक्ष्मणरावजी दादासाहेब गोळवलकर यांचे चरणारविंदसेवेशी, सेवक कृष्णाजी व्यंकटेश देशपांडे

उमदीकर, मुक्काम जत याचा त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तारीख १२.५.१९०० मेपावेतो श्रीसद्गुरुमहाराज, क्षेत्र निंबरगी, यांचे कृपेने आनंदरूप असो. विशेष. आपल्यांकडून मागे एक दोन पत्रे आली. त्यावर अलीकडे आनंदाचा खुलासा मजकूर येऊन आनंद झाला नाही. करिता पत्राने कळविले आहे. वडिलांचे आज्ञेवरून श्रुत केले. वडील जत येथेच आले आहेत. आपली स्वारी बनहट्टीहून चिमडास गेल्याचे त्यांस कळले. पूर्वी समक्ष सांगितलेप्रमाणे उत्तर आले नाही, म्हणून सवडीने सहजी स्मरणाने उत्तर लिहावे. सारांश, अंतःकरणात मी एक सावकार झालो असे ठरल्याने त्या धर्माचे मर्यादिने वागतो. त्यायोगे त्यास तीच योग्यता असते. तद्वत् 'प्रज्ञांपैकी मी आहे' (नामधारक आहे, गुरुपुत्र आहे) असे जाणून असले म्हणजे दोन्ही माया एकच होऊन आनंदात वेळ जाऊन चांगला योग, प्रसंग घडतो. समर्थांचे वाक्य, आठव तो परब्रह्म । नाठव तो भवभ्रम ।। असे आहे. त्या आधारे स्मरण निरंतर असले म्हणजे आनंदच असतो. सारांश, अभिज्ञ आहांत. लिहावे असे काही नाही. आज्ञा असल्याने सहज लिहिण्यास मन उद्युक्त होऊन समर्थांचे चरणी श्रुत केले आहे. तरी सर्व हकीकतीचा खुलासा व्हावा. कळावे. कृपा-लोभ निरंतर असावे ही विज्ञापना.

आपला
कृष्णा उमदी

	पत्र ३५	**पान ५१**
नवीन	जत	वैशाख शु. १३
क्रमांक		१२.५.१९००, शनिवार
४४		

पत्ता-पंढरपूर येथे पंढरिनाथ आराध्ये अगर नरहरिभट टोणपे यांचे घरी अप्पाराव महाराज उमदीकर[१] यांस दीजे.

शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. इकडील सर्व आनंद आहे. वडील येथेच आहेत. यंदा पंढरीस यावे असा बेत ठरला होता, ते झाले नाही. असो. तिकडील मंडळींस नमस्कार. नेमाबद्दल त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार फार फार आहे असे कळविले आहे. ते सर्वांस श्रुत व्हावे व सवडीप्रमाणे खुलासेवार उत्तर यावे. पत्ता– जत येथे लायब्ररीजवळ उमदी देशपांडे, अशा पत्त्यावर लिहावे म्हणजे आनंद होईल. कळावे, लोभ करावा ही विज्ञापना.

आपला

कृष्णा उमदी

नोंद :–

१. महाराज पंढरपूरला जाणार अशा कल्पनेने मायना लिहिलेला दिसतो.

xxxxx

	पत्र ३३	**पान ४९**
नवीन	जत	वैशाख शु. १४
क्रमांक	नानासाहेबांना पत्र	१३.५.१९००, रविवार
४५		

श्रीगुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक भाऊचा चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. मिती वैशाख शु. १४, रविवारपावेतो वडिलांचे चरणानुग्रहेकरून समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. आपले पत्र पावले. तंबाखू व डबी पावली. मळ्याबद्दल वडिलांचे मर्जीप्रमाणे करण्यास रामाबरोबर सांगून पाठवले आहेच. यात दूरदृष्टी, पल्ला वगैरे लाभतोटयाची आपल्या समजुतीपेक्षा माझ्याकडे जास्त समजूत आहे असे नाही. तत्रापि आज्ञेवरून लिहितो. आपुभाईचे मुलास वर्षाचे मुदतीचे मान पाहून, जेवून, अगर तुमचे, येसप्पाचे व आपुभाईचे संतोषाने जसे मर्जीस येईल तसे ठरवून, दुसरे त्याचे बैलावर त्यास ठेवून घ्यावे. जर

त्याने पोटास मागितलेतर तुमचे मताप्रमाणे त्याचे भाजीपाल्यावर जाईल असे आठ दहा रुपयांपर्यंत द्यावेच लागतात. भागच नाही. ते पाहून बेताने करून घ्यावे. सारांश, सोडलेने व दुसरे कोणी मिळत नसलेने नुकसानच आहे हे खरे आहे. जर आपुभाई नको म्हणाले तर मग माळ्याला [illegible]= (दोन आणे) मापटे (अर्धा शेर) देऊन ठेवून घ्यावे. सारांश तुमच्या मर्जीप्रमाणे करावे. परवा रामाने सांगितले की मळ्याचे लावणीस यल्लप्पा कोळी वगैरे मागतात व बैलास तीस रुपयांपर्यंत येतात असे वडील म्हणाले म्हणून सांगितले. मग मी सांगितले की फार ठीक आहे. तसेच करावे. आता तुमचे पत्रात कोणी करत नाही व मागत नाही म्हणून आहे. तरी दोन्ही इसमांकडून तुमचे मर्जीस येईल तसे करून घ्यावे. अडचणीपुरते कोठे तरी काढून घ्यावेच लागते. भागच नाही. यात दुसरे कोणी लावणीस मिळाले नाहीतर याप्रमाणे करावे, मिळेल तसे करावे. सारांश, मळा पडू देऊ नये, असे करावे. वडिलांप्रत विशेष लिहिणे शक्य नाही, ही विज्ञापना. बाकी घरगुतीचा मजकूर रामाला सांगितला आहे त्याप्रमाणे मुहूर्त पाहून मर्जीस येईल तेव्हा करावे. गाडी मात्र परवा लिहिलेप्रमाणे लवकर आठ-दहा रोजांत पाठवावी. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. कळावे, ही विज्ञापना.

पत्र २४२ पान २३५

नवीन क्रमांक

४६ (टिपण :- तिथीप्रमाणे हे पत्र इथे आणले. तारखा जमवल्या, वार मात्र जमत नाही. कुठेतरी चूक असते.)

जत — वैशाख व. ५

१९.५.१९००, बुधवार

श्री

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक भीमाचा दोन्ही कर जोडून

त्रिकाली चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत मिती वैशाख व. ५ रोज बुधवारपावेतो वडिलांचे आशीर्वादिकरून आनंदरूप असो. विशेष. चन्नबसूबरोबर पाठवलेले पत्र येऊन पोचले. लिहिलेला मजकूर समजला. तीर्थरूप वडील अप्पा हे शनिवारी वैशाख व. १ रोजी बोलावणे आलेप्रमाणे मलकंदेवरहट्टीस गेले. तीर्थस्वरूप रामराव अण्णा व चंद्रक्का सोमवारी येतात म्हणून पत्रात लिहिले परंतु का आले नाहीत समजत नाही. निवडुंग जाळण्याचे काम अद्याप झाले आहे की नाही ? आमच्या मागून निवडुंगाचा मक्ता घेणारे लोक निवडुंग जाळून सर्व पैसे घेऊन गेले. अद्यापि आमचे जाळण्याचे काम झाले नाही. बरे असो. आता लौकर सर्व जाळण्याचे काम पुरे करून बिल घेऊन यावे. नवीन दिलेले मक्ते कारभारीसाहेबांनी बंद केले आहेत. सबब तुम्हांस सूचना देतो की फायदा असल्यास काम सुरू करावे. नसलेस काम सुरू करू नये. फक्त विहिरीचे काम करावे. डिकसाळ येथील पाटील व मुसलमान, तेथील राहणारे, मक्ता घेण्यास तयार आहेत असे मांढरे मिस्त्री याने सांगितले आहे. तरी तुमचे मर्जीप्रमाणे करावे. कारभारीसाहेब तीन महिन्यांचे रजेवर जाणार आहेत. रजेबद्दल रिपोर्ट गेला आहे. बाकी मजकूर सर्व यथाप्रकार आहे. माझा जरीचा रुमाल, धोतर वगैरेंचे गाठोडे कोणा येणाराबरोबर पाठवावे अगर येताना घेऊन यावे. वडिलांप्रत विशेष काही लिहिणे बालकास शक्य नाही. विज्ञापना.

ताजा कलम– येसप्पा, गुरुनिंगप्पा अण्णा, मलकप्पा पाटील यांस अप्पांनी नमस्कार लिहिण्यास आज्ञा केल्यावरून लिहिले आहे. माझाही अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार आहे. कळावे.

	पत्र ३६	**पान ५१**
नवीन	जत	ज्येष्ठ शु. १४
क्रमांक	बसप्पा कटगी व नंदेप्पा	१३.६.१९००
४७	यांना पत्र	

श्रीगुरुसमर्थ

त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार व दंडवत. विज्ञापना. आपण येथून गेल्यावर सर्व आनंद आहे. वडील येथेच आहेत. विजापूरला ज्या दिवशी सप्ताह, त्याच दिवशी त्यांचे घरी लग्न आहे हे समजून तिकडे जाणे झाले नाही. फार करून उमदीकडे जातील. आपणांस कळावे. तिकडील सर्व मंडळींस त्रिकाळी साष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा. दातार व आईबाईसाहेब यांस फार फार नमन नमस्कार प्रविष्ट करावा असे वडिलांनी सांगितले आहे. कळावे, लोभ करावा ही विनंती. मेलगिरी–अप्पास नमन आहे. उत्तर यावे.

–कृष्णा देशपांडे उमदीकर

पत्र १९४ पान १९४

नवीन क्रमांक

४८ (टिपण :– या पत्रावर ना तिथी ना तारीख. याच्या आधीच्या ३६ या जतहून लिहिलेल्या पत्रात उमदीस जाणार असल्याचे आहे. याही पत्रात तसेच आहे. दोन्ही पत्रे जमखंडीला गेली आहेत. दोन्हीकडे नंदेप्पाचा उल्लेख आहे. मागच्या पत्रांच्या तिथीशी मजकूर जुळतो. मागच्या पत्राची तिथी ज्येष्ठ शु. १४ आहे आणि या पत्रात आषाढात इंचगेरीस जाणार असल्याचे आहे. म्हणजे हे पत्र ज्येष्ठातील किंवा आषाढाच्या सुरवातीचे असू शकते. एवढ्या धाग्यावरून इथे आणले.)

जत ज्येष्ठ/आषाढ

श्री

नंदेप्पा महाराज यांस प्रार्थना. श्रीमंत आईबाई मंडळींस त्रिकाळी नमन शिरसाष्टांग नमस्कार श्रुत करावा. हरिपंत कानेटकर यांसही शिरसाष्टांग नमस्कार. रामराव महाराज यांसही नमन. घरी मंडळींस शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. बसप्पा वगैरे सभामंडळींस फार फार प्रार्थना आहे ती श्रुत करावी. येथे येऊन ११–१२ दिवस झाले. भीमा

वगैरे अजून उमदीहून आला नाही. अंबुराव, मदप्पा, गंगाबाई[1] मिळून आलो. ते चार रोजांत गेले. मी एकटाच आहे. आनंदात वेळ जात आहे. आषाढ शु. १० ला इंचगेरीस मुक्कामास असतो. महाराज विष्णुपंत व हरिपंत दादांकडून उत्तर येईल असे करवावे ही विज्ञापना. गुरप्पा काकांस शिरसाष्टांग नमस्कार. देसाई मंडळींस नमन फार फार आहे.

आपला भाऊ

चिमड मंडळी व नावलगी मंडळी, भास्करपंत यांस नमस्कार प्रार्थना सांगावी. सर्वांस शिरसाष्टांग नमस्कार. दंडवत विनंती.

नोंद :-

१. गंगाबाई तदलबागीकर या भाऊराव सावळसंग यांच्या कन्या. त्या काव्ये करीत. संप्रदायात त्यांची पदे रूढ आहेत. सोमनाथपंत पंचनदीकरांनी महाराजांच्या शिष्यांवर लिहिलेल्या पदात त्यांचे नाव आहे. पंचसमासी ४.२७-२८ इथेही आहे. गंगाबाई तिकोटे येथे असत.

XXXXX

	पत्र ३७	**पान ५२**
नवीन	उमदी	अश्विन शु. ३
क्रमांक		२६.९.१९००, बुधवार
४९		

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री बसप्पा बिन गिरमल्लप्पा[1] (मलकप्पा) कटगी, मुक्काम जमखंडी, गोसावी, यांसी अखंडित लक्ष्मीअलंकृत, शरणार्थी रामचंद्र व्यंकटेश ऊर्फ रामा देशपांडे उमदीकर याचा कृतानेक दंडवत. विज्ञापना. अश्विन शु. ३ रोज बुधवारपावेतो श्रीसमर्थसद्गुरु गुरुलिंगजंगम यांचे कृपेकरून सर्व वर्तमान उत्तम असो. विज्ञापना. आपले पत्र व कार्ड सर्व पोचले. रुपयेही रवाना केले ते चार दिवसांत येऊन पोचले. इकडे पाऊस पंधरा दिवस आजमितीपावेतो

दररोज आहेच. सारांश, उत्तम प्रतीचा पाऊस झाला. पेरणी सुरू आहे. धारणही स्वस्त होत चालली आहे. इकडील सर्व मंडळी आनंदरूप आहेत. तिकडील सर्व मंडळींस शिरसाष्टांग नमस्कार व दंडवत फार फार आहे असे सर्वांस कळवावे. तसदी दिलेबद्दल माफी असावी. वडिलांनीही याचप्रमाणे प्रार्थना सांगितली आहे ती कळवावी. सर्वांस अगत्य नेमाबद्दल व कट्टाने वागण्याबद्दल फार फार विनंती आहे. चिमड व नावलगी मंडळींसही नेमाबद्दल प्रार्थना स्मरणपूर्वक कळवावी. यंदा तिकडे येण्यास सवड न होईल असे वडिलांचे म्हणणे झाले. इतके दिवस जतेकडेसुद्धा गेले नाहीत. कारण दिवसमान व कालदेश पाहून चालावे. कोणावर जड होऊ नये अशा बेताने जतेकडे गेले नाहीत. यावरून वर लिहिलेप्रमाणे तिकडे येण्याचे न करतील म्हणून कळवले. दसरा झालेवर दोन रोजांत विजापूर येथे उपली बुरुजानजीक नरसप्पा सुतार यांचे घरी जाणेचे ठरविले आहे. त्या बेतावर व पत्त्यावर उत्तर विजापुरास पाठवावे. तुम्ही मात्र घरी बसनिंगप्पा अण्णा यांचे आज्ञेप्रमाणे वागावे. त्यांची मर्यादा व आज्ञा चुकवू नये. याप्रमाणे वागले असता वडिलांचे आज्ञेप्रमाणे वागल्यासारखे आहे. याने गुरूंच्या आज्ञेप्रमाणे वागलेसारखे फळ मिळते. लाभ होतो व जयजयकार होतो. म्हणून नेमाने व कट्टाने नेम करणेचे ठरलेले वेळेस नेम कट्टाने करून आपले प्रपंचाची वेळ असेल तेव्हा काळजीने व्यवसाय करीत जावा अशी तुम्हांला वडिलांनी फार फार विनंती सांगितली आहे. चुकू नये. दोन्ही सांभाळून दिवस आनंदात घालवीत जावे अशी प्रार्थना फार फार आहे. याचप्रमाणे सर्व मंडळींस नेमाबद्दल त्रिकाळी साष्टांग नमस्कार व दंडवत सांगावा, असे सांगितले आहे ते प्रविष्ट करावे.

नोंद :-

१. बसप्पा कटगी यांच्या वडिलांचे नाव गिरमल्लप्पा नसून मलकप्पा असे होते.

xxxxx

पत्र ३८ पान ५३

नवीन क्रमांक ५० जत

...१९००

श्रीगुरुसमर्थ

राजमान्य राजश्री भास्करपंत[1] दादासाहेब अण्णा चिमडकर, मुक्काम जमखंडी, स्वामीजींचे चरणसेवेशी, सेवक कृष्णा उमदीकर देशपांडे, मुक्काम जत याचा मस्तक चरणी ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विनंती विज्ञापना. ऐसाजे. तुमची दोन पत्रे आली ती पाहून आनंद झाला. पूर्वीचे पत्रात जयजयकार गर्जना केलेचे लिहिले आहे. दुसऱ्या पत्रातील मजकूर म्हणजे समर्थांचे (निंबरगी महाराजांचे) उत्सवाचे वेळी काही वेळ कीर्तनाचा थाट व्हावा असे मन उद्युक्त असल्याचे दर्शविले आहे. परंतु पत्र लिहिताना मन उद्युक्त होऊन जो आनंद वाटतो तो आनंद निरंतर राहतच नाही. तो आनंद झाला पाहिजे (टिकला पाहिजे.) जेव्हा कबीरदास महाराजांस विचारले (सांगितले) की देवपणा ज्याकडे आहे तो थोरपणा जाणावा. असे म्हटलेवर कबीर उत्तरले की गुरू थोर, नंतर देव. नंतर देव, कबीर, रामानंदस्वामी या संतसभेचे मिळून ठरलेले मत म्हणजे गुरू थोर. अंतःकरणातील आनंदाने तत्काळ सर्वांनी राजाधिराज सद्गुरुमहाराज अशी जयजयकार गर्जना केली. त्या प्रसंगानुसार गर्जना झाली तो आनंद निरंतर टिकला पाहिजे. तसे होऊन घडी एक आनंदात वेळ जावा. त्याचप्रमाणे आहांत. लिहावे असे काही नाही. अभिज्ञच आहांत. उत्सवाचे वेळी कीर्तन होण्यासाठी साधनाने ज्ञानमार्ग समजून आला पाहिजे. मग काय ते कळून येते. सगुण, निर्गुण किंवा अद्वैत हे प्रकार प्रसंगानुसार अंतःकरणात ठसले पाहिजेत. कीर्तनभक्तीस भाव पाहिजे. भावावरून सभारंजन होते. असो. तथापि 'की' म्हणजे काय, 'र' म्हणजे काय, 'तन' म्हणजे काय हे समजू लागले म्हणजे सर्व आपोआप कळून येते. असो. या अर्थाचे सद्युक्त (योग्य अर्थ) पाहून, जे जे अक्षराचा जो जो अर्थ तो समजून

घेऊन त्याचे मनन झाले पाहिजे म्हणजे उलगडा होतो[२]. याकरिता यात एक आधार ठेवला आहे[३]. यावरून साधक भावास तेव्हाच कळून येतो (भाव कळतो). करिता कळवले आहे. हे सर्व साधक जनांस समजवावे. इतरांस दाखवून उपयोग नाही. दोन अर्थ समजले म्हणजे झाले. एकदेशी मात्र समजणार नाही. भक्तीचे ठिकाणी मन जडून कीर्तन व्हावे, भक्तिथाट व्हावा अशी मनात उद्युक्तता झाली यावरून फार फार आनंद व संतोष झाला. तुमच्या दोन्ही पत्रांचे हे आज्ञेने केलेले उत्तर आहे. यात मी बालक शक्तिहीन, मंदबुद्धी असून जसा वदवावा तसा वदवितो (वदतो). मी निर्दोषच आहे.

नोंदी :-

१. नित्यनेमावलीतील एकादशीचे करुणाष्टक करणारे 'भास्कर' हेच आहेत का ?

२. कीर्तन म्हणजे तन किंवा शरीर किर किर करते असा अर्थ केलेला ऐकला आहे.

३. घडी एक जाती आनंदाची गोविंदाची हे आधाराचे अवतरण असावे. या पत्रात ते घडी एक आनंदात वेळ जावा एवढेच आहे.

xxxxx

	पत्र ४१	**पान ५७**
नवीन	जत	माघ शु. १०
क्रमांक		१४.२.१९०१
५१		

श्री

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री बसप्पा अण्णा कटगी, नंदेप्पा न्यामगौडनवरू, मेलगिरीअप्पा नासी, मलकप्पा अण्णा नासी व अल्लप्पा वगैरे, मुक्काम जमखंडी, स्वामी गोसावी यांसी, आपला सेवक कृष्णा उमदी याजकडून दीर्घ दंडवत. अनुक्रमे शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना.

मिती माघ शु. १० पावेतो श्रीसमर्थकृपेकरून आनंदरूप असो. विज्ञापना. तिकडून श्रीगुरुस्वामीकडून पत्र आले ते पावले. मजकूर समजला. सर्व प्रकारे कोणत्याही मार्गाने आनंद आनंद होत आहे, अशा विषयी स्वामीस कळवून प्रार्थना करावी व उत्तर लिहावे. वीरभद्रप्पा अण्णा यांसही फार फार प्रार्थना सांगावी. राजमान्य राजश्री रामराव अण्णा टरके, वासप्पा अण्णा व विष्णुभटची महाराज यांस प्रार्थना सांगावी. श्रीमंत मंडळी व देसाई मंडळी, आपली मंडळी व शास्त्री महाराज या एकंदरांस वडिलांनी त्रिकाळ शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे अशी प्रार्थना सांगावी. कोणत्याही प्रकारे मनात आनंदरूप असावे अशी आठवण असावी अशा विषयी वाक्य वडिलांनी सांगितले आहे ते खाली लिहितो. ते सर्वांस श्रुत व्हावे. भास्करपंत, चिमड मंडळी व नावलगी मंडळी वगैरेंस सवडीप्रमाणे हे वाक्य समजून देऊन आनंदरूप असावे अशा विषयी प्रार्थना फार फार आहे. कोणत्याही प्रकारे कल्पना नसावी असा वाक्य आधार ठेवला आहे. दातार मंडळी, आईसाहेब वगैरेंस याप्रमाणे कळवावे अशी नंदेप्पास विनंती. समर्थ महाराजांचे (निंबरगी महाराज) समाधीवरील दगड गावच्या लोकांचे मताने गुरवाकडून काढविले आहेत. काही गैरमाहितीची मंडळी आली असताना त्यांना भक्तीत कमतरता दाखविलेने पाषांड मन जाहले म्हणून तसे झाले. यात समर्थांचे महत्त्वास काही कमीपणा येत नाही. अधिकच वाढत आहे. यात क्षमारूप धैर्य असावे हीच मुख्य गोष्ट आहे. भक्तिमार्गास पथ्य आहे म्हणून याप्रमाणे निश्चय करावा. पाहा– तुकाराम महाराजांना हास्य करून, थट्टा करून कुटिल लोकांनी त्यांचे अभंगांच्या सर्व वह्या बुडविल्या. तथापि त्यांनी मनात क्षमारूप धरून स्मरण केल्याने १३ रोजांत कोरड्या वह्या निघाल्या. भक्तविजयात हे आहेच आहे[1]. वैन्यास मित्राप्रमाणे मनात क्षमारूप धरून स्मरण केल्याने सर्व कार्यसिद्धी होते असे वाक्य आहे. जयदेव स्वामीस नाना प्रकारे पीडिले[2], तत्रापि क्षमारूप झालेच. हे सर्व जाणून आहांच. तत्रापि कळविले आहे. आपणांस कळावे. कळावे, कृपा लोभ निरंतर असू द्यावा ही विज्ञापना.

आता प्रवृत्ती अथवा निवृत्तीचे ठिकाणी 'मी माझे आठवण विसरले ज्याचे अंतःकरण'[३], मी प्रपंचात अमुक व परमार्थात अमुक आहो ही आठवण प्रपंचातली आहे. परंतु आठवण शिव शिव म्हणण्याची आहे असे अंतःकरणात ठसून गेले असता 'विसरले ज्याचे अंतःकरण' म्हणजे मी जीव प्रवृत्ती नव्हे व निवृत्ती नव्हे, फक्त स्मरण खरे आहे असे अंतःकरणात ठरून गेले म्हणजे तोचि संन्यासी म्हणजे षडन्यासी जाणावा[४]. दोन्ही मार्ग त्याचेच ठरून गेल्याने अंतःकरणाचे ठिकाणी समाधान व सुख प्राप्त होते. जीव येताना स्मरण घेऊन आलेला आहे. जाताना स्मरण करून जात आहे. दरम्यान विषयांचे लोभाने स्मरण विसरला गेला. फक्त मी जीव असे स्मरण राहिले. त्या योगाने भ्रमरूप होऊन प्रवृत्ती व निवृत्ती यांत मी जीव असे समजून दोन्ही मार्गांनी चालत आहे. भ्रमला म्हणून त्या जीवपणास शिवपणा अगर कोणत्याही विषयाची वृत्ती एकरूप (स्थिर) राहत नाही. अहंकार चढून भ्रमाने एकदेशी होतो. त्याकरिता जीवाला शिवपणा ठरेपर्यंत निष्ठेने, कष्टाने अभ्यास व्हावा. त्यायोगे दोन्ही मार्गांत मी नव्हे, तो आहे असा एकरूप होऊन आनंदाने दोन्ही ठिकाणी सर्व भोग भोगतो, सुख घेतो. तो (शिव) म्हणून ठरल्याने आनंद होतो म्हणजे तो चौथा ज्ञानी म्हणविला गेला. जीवपणाने तिजा ज्ञानी म्हणवीत गेल्याने चौथा ज्ञानी झालेशिवाय समाधान होत नाही. हे समजण्यास अभिज्ञच आहांत.

पूर्वी येताना पुण्याचे योगाने व तपाचे योगाने नरदेह प्राप्त झाला, त्याची योग्यता आली. आता या नरदेहात पूर्वीचे स्मरणाची आठवण ठेवून प्रपंचात व परमार्थात वागले असता दोन्हीत अकर्ता होऊन तो देवरूप होऊन जातो. पूर्वीचे पुण्य व सुकृत अशी या देहात आठवण असल्याने देव पदवी प्राप्त होते. कानडीत म्हणतात की अष्टके इष्टु इष्टके यष्टु[५]। म्हणजे पूर्व पुण्य व सुकृताने सुख मिळाले, त्या पदवीस हे सुख, तर या पदवीत देवपणा असे समजले पाहिजे.

आता समर्थांचे वाक्य 'जनीं संग सोडून सुखी राहावे'[६] व 'लोकांचे बोली लागला तो सर्वश्य बुडाला', तसेच 'श्रेष्ठ कार्य करी तो श्रेष्ठ

कनिष्ठ कार्य करी तो कनिष्ठ'[७], 'नेम धरावा निकट । बाष्कळपणाचे वटवट करूच नये', 'तरी तू सदैव होसी' असे वाक्याधार आहेत. त्या वाक्याधारे व 'देह त्यागिता कीर्ती मागें उरावी' असे वाक्य आहे. तद्वत् देह असेतोपर्यंत देहास निंदा स्तुती लागलेलीच आहे. हे सर्व जाणून आहांच. याप्रमाणे क्षेम मजकुरी काही समर्थांमागे निंदा स्तुती करीत आहेत. शेवटी खऱ्यापुढे खोटे काही तगत नाही. असो. याप्रमाणे पूर्वापार चालतच आले आहे.

'नामरूप जडलें चित्तीं । त्याची घडावी संगती'[८] असा वाक्याधार आहे. त्याप्रमाणे आपण अभिज्ञच असून ज्ञेय समजून सुज्ञपणाने वागत आहां म्हणून पत्रद्वारे परामर्श होत आहे. त्या योगाने मनास आनंद, उत्साह वाढत जात आहे. म्हणून वडिलांनी आपल्यास व सर्वांस प्रार्थना व त्रिकाळी नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो सर्वांस श्रुत व्हावा, ही विज्ञापना.

नोंदी :-

१. भक्तविजय, ५२.२५६-३०१; तसेच- ज्याचे अभंग निषेधुनि समस्त । द्विजांनी बुडविले उदकांत । परि तेरा दिवस पंढरिनाथ । कोरडेचि ग्रंथ राखिले ॥ - (भक्तलीलामृत १.१९.)

२. भक्तविजय, अध्याय १ व २.

३. मी माझें ऐसी आठवण । विसरलें जयाचें अंतःकरण ॥ -(ज्ञानेश्वरी ५.२०.)

४. पार्था तो संन्यासी जाण । निरंतर ॥ -(ज्ञानेश्वरी ५.२०.)

५. तेवढ्याने इतके मिळते तर एवढ्याने किती मिळेल ? (म्हणजे अधिक मिळेल.)

६. मनाचे श्लोक, १५२, १५३ व १८९

७. श्रेष्ठ कार्यें करी श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ ॥ -(दासबोध १५.१.११).

८. नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ॥ -(तुकाराम गाथा, अभंग ३५२.)

xxxxx

नवीन
क्रमांक

५२ (टिपण :- निंबरगी महाराजांच्या समाधीवरील दगड काढले होते हे ४१ पत्रात आले. प्रस्तुत पत्रात आहे की बाबासाहेब समर्थांच्या खटपटीस सोलापूरला गेले आहेत व सोलापूरहून पोलिस अधिकारी येणार आहेत. ते समाधीच्या संदर्भातच असावे म्हणून बरेच पुढे छापलेले हे पत्र इथे आणले आहे.)

९४.६.२१
बुधवा

उमदी माघ
...२.१९०१

श्री

तीर्थस्वरूप महाराज राजमान्य राजश्री अंबुराव महाराज वडिलांचे सेवेशी, सेवक रामा उमदीकर याचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. आपले पत्र व जिन्नस पावले. आपण आपले मर्जीने मनास सुखकारक आनंद देण्यास समर्थ आहांत. मला बालकाला लिहिणे शक्य नाही. अभिज्ञच आहां. समर्थकृपेने इकडील सर्व आनंदरूप आहे. अण्णा जतेस गेला आहे. वडील गावीच आहेत. आपण कृपा करून गुरुवारी यावे. समक्ष खुलाशाने आनंद होईल. बाबासाहेब (काव्य असावे) हे सोलापुरास जाऊन विजापुरास... गेले. समर्थांचे खटपटीकरिता गेले होते[१]. बरेच समाधानाचे लिहिले आहे. उद्याचे शनिवारी सोलापूर पोलिस अधिकारी निंबरगीस येणार आहेत. बाबासाहेबही येणार आहेत. बाकी सर्व मजकूर आनंद आहे. इकडील मंडळींनी आपल्याला त्रिकाळी नमन दंडवत नमस्कार सांगितला आहे. तिकडील मंडळींस नेमाबद्दल, निश्चयाबद्दल, त्रिकाळी नेमाबद्दल वडिलांनी त्रिकाळी नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सर्वांस फार फार सांगितला आहे, तो श्रुत व्हावा. तसदीबद्दल माफी असावी. कळावे. कृपा-लोभ निरंतर वृद्धीस लागावा ही विज्ञापना.

नोंद :-

१. निंबरगी महाराजांच्या समाधीवरील दगड काढल्याने पुढील सप्ताह कुठे

करायचे हा महाराजांपुढे मोठाच प्रश्न उभा राहिला. काही अनुकूल निकाल लागलातर निंबरगीस सप्ताह होऊ शकला असता.

xxxxx

	पत्र ४२	पान ६०
नवीन	उमदी	माघ व. ८
क्रमांक	बसप्पा कटगी यांना पत्र	२७.२.१९०१
५३		

श्री

अति नम्रतेने दंडवत. विज्ञापना. शिरसाष्टांग नमस्कार. श्री. स्वामी राचय्या महाराजांस त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. तीनही पत्रे पावली. उत्तर लिहिले आहे. त्याप्रमाणे कोणत्या प्रकारेही समर्थ सद्गुरू आनंदात ठेवीत आहेत, त्याबद्दल काळजी करू नये. प्रकृतिमानाने बेताने वागल्यास तेही उत्तमच आहे अशी प्रार्थना सांगून निष्ठेने, नेमाने असण्याबद्दल वडिलांनी फार फार सांगितले आहे ते प्रविष्ट करावे. विष्णुपंत मंडळी, टरके मंडळी, देसाई मंडळी वगैरेंना प्रार्थना फार फार सांगितली आहे असे सांगावे. एकंदर संतसभा मंडळींस नेमाबद्दल त्रिकाळी नम्रतेचा दंडवत नमस्कार सांगितला आहे तो प्रविष्ट करावा. सर्व हकीकतीचे वर लिहिलेल्या मजकुराचे उत्तर यावे. कळावे. लोभ पूर्ण असो द्यावा ही विज्ञापना. आपली दोन्हीही पत्रे आजच पावली.

– कृष्णा उमदी

	पत्र ४०	पान ५७
नवीन	उमदी	कार्तिक शु. ९
क्रमांक		२०.११.१९०१, बुधवार
५४		

श्री

महाराज राजश्री भीमण्णा[१] यांसी शरणार्थी विनंती प्रार्थना. थोरली

तपेली, चांदणी व चऱ्हाट वगैरे गड्याबरोबर द्यावे.

कार्तिक शु. ९, बुधवार आपला

भाऊ उमदीकर

नोंद :-

१. हे निंबरगी महाराजांचे पुत्र. बाबांनी सामान मागविले तसेच महाराजांनी मागवले. हा इंचगेरीस होणारा पहिला मार्गशीर्ष सप्ताह.

xxxxx

पत्र ४३ पान ६१

नवीन
क्रमांक

५५ (टिपण :- इंचगेरी व उमदी दोन्हीकडून भीमण्णांना सामान पाठवण्याची विनंती आहे. या पत्रावर तिथी-तारीख दोन्ही नाहीत. मात्र श्री. बाबासाहेब संगोराम यांनी पंचांगांच्या अभ्यासावरून सत्संग या नियतकालिकाच्या जून १९८५ च्या अंकात एक लेख लिहिला होता, त्यात पृ. ७ वर प्रस्तुत पत्र १९०१ च्या मार्गशीर्ष सप्ताहाच्या तयारीचे आहे हे दाखवले आहे. इंचगेरीस होणारा हा पहिला मार्गशीर्ष सप्ताह. महाराजांनी व बाबांनी भीमण्णांकडून सामान मागविले आहे. महाराजांचे पत्र कार्तिक शु. ९, बुधवारचे आहे. बाबांचे पत्र त्याच दिवसाचे किंवा एखादा दिवस मागे-पुढे असावे. सध्या ४३ ची तारीख ४० प्रमाणे धरली आहे. त्यावर सन १९०० आहे, तो १९०१ पाहिजे. सप्ताह मार्गशीर्ष शु. ८ ला सुरू होणार असे लिहिले आहे. ही तारीख बाबासाहेबांच्या दुसऱ्या एका टिपणावरून १९.१२.१९०१ आहे. सोनेरी पाने, पृ. ६५ वर ही नोंद आहे. सप्ताहाची तारीख, तिथी आणि ४० व ४३ पत्रांच्या तारखा, तिथी सर्व जमतात.)

इंचगेरी कार्तिक शु. ९

२०.११.१९०१, बुधवार

श्रीसद्गुरुसमर्थ

तीर्थस्वरूप कृपासागर महाराज राजमान्य राजश्री भीमण्णा अण्णा मुक्काम निंबरगी वडिलांचे सेवेशी, बाळक अंबाजी कुलकर्णी, मुक्काम इंचगेरी याचा त्रिकाळी दीर्घ दंडवत, अति नम्रतेची विनंती, विज्ञापना. सप्ताह मार्गशीर्ष शु. ८, रोज गुरुवार रोजी प्रारंभ करण्याचे नेमस्त केले आहे. आपले कृपेकरून सर्व मजकूर आनंदरूप असो. आपण कृपा करून प्रारंभीच्या दिवशी आले पाहिजे किंवा गुरुपादप्पा अगर सुबरायास कोणासतरी पाठविले पाहिजे. राहू नये. हे काम आपलेच आहे. इकडून रा. रा. मदप्पा बिन ...यास पाठवले आहे. त्याजबरोबर श्रीसद्गुरुमहाराज समर्थ यांचे पादुका पाठवाव्या. शिवाय खाली लिहिलेले सामान गाडीवर घालून पाठवावे. ती तजवीज करावी. थोरली तपेली दोन, निशाणीच्या फरारीसहित (कापडासहित) चांदणी एक, तिला बांधण्याचे चऱ्हाट वगैरे. पाल एक व झाड कांबळी (जाड कांबळे) दोन. येणेप्रमाणे सामान पाठवण्याची तजवीज व्हावी. वर लिहिलेप्रमाणे गुरुवारी १/२ तास दिवसाचे आत कोणीतरी आले पाहिजे. कळावे. वडिलांप्रती विशेष लिहिणे नको, ही विज्ञापना.

	पत्र ४४	**पान ६२**
नवीन	जत	पौष
क्रमांक	बसप्पा कटगी यांना पत्र	१८.१.१९०२
५६		

श्री

दीर्घ दंडवत. विनंती. विज्ञापना. मी काल रोजी उमदीहून आलो. तिकडील सर्व वर्तमान खुशाल आहे. उमदीस एक ब्रह्मचारी ब्राह्मण आला होता. दासबोध बुक एका दिवसात वाचून आणून देतो म्हणून तो घेऊन गेला. परंतु न देता विजापुरास तसाच गेला. तेव्हा विजापुरास गडी पाठवून तपास केला. परंतु तेथे तो नाही. तुमच्या गावी असलेस

तपास होऊन त्याजपासून बुक घेऊन पाठवावे. तो ब्रह्मचारी सुरळीत देणार नाही तर त्यास मर्दनम (मर्दनच ?) केले पाहिजे. तो अंगाने सडपातळ, डोकीस टोपी, गोरागुमटा आहे. बुक चोरून नेलेप्रमाणे झाले आहे. त्याचा तपास व्हावा. भास्करप्पा, शिवरामभटजी, कल्लप्पा, रामराव, नंदेप्पा, काडप्पा, वीरभद्रप्पा, मेलप्पा, वीरपक्षप्पा वगैरे संत साधूमंडळींस माझा लीन नमस्कार. कळावे.

– भीमाजी व्यंकटेश उमदीकर

	पत्र ४५	**पान ६३**
नवीन	इंचगेरी	भाद्रपद शु. ५
क्रमांक	अंताजीपंत रिसबूड	७.९.१९०२, रविवार
५७	यांस पत्र	

श्रीसद्गुरुसमर्थ

देव निर्गुण असा भाव ज्या ठिकाणी उत्पन्न झाला, त्या ठिकाणी जीवभावाचा गुण मुळीच राहिला नाही व भक्तपणाही राहिला नाही. तो निराकार निर्गुण होऊन जैसा तैसा म्हणविला गेला. माझा मुलगा अगर माझा बाप हा भाव असतो. पुढे दोन्ही गोष्टींचा भाव निरसन होऊन अंतःकरणात ठरल्यावर जैसा तैसा म्हणजे त्या ठिकाणी बापपण राहत नाही किंवा मूलपणा राहत नाही. म्हणजे जैसा तैसा (निर्गुण–निराकार) निरंतर राहत आहे. म्हणून जीवपणा निर्दोष होऊन गेला. त्याचेच नाव भक्तपणा म्हणविला गेला[1]. याचेच नाव मुक्त झाला 'सायज्येतला अंकिला'[2] आता 'मी पापी, मी चांडाळ, मी दुरात्मा'[3] असा भाव ज्या ठिकाणी निष्पन्न होऊन, देवा मी बाळ व तारुण्य अवस्थेत अज्ञानपणाने वागलो अशी आठवण होऊन पश्चाताप घडला, त्या ठिकाणी पश्चात्तापेन शुद्धता अशा वाक्याधारे शुद्धता घडली. सारांश, ज्याचे अंतःकरण शुद्ध । तयासी करणे न लगे बोध ॥ अशा वाक्याधारे समजतच आहां. अभिज्ञ मंडळींस सुचवावे असे मुळीच नको आहे.

सुज्ञच आहां. आता समर्थवाक्य 'आठव तो ब्रह्म । नाठव तो भव भ्रम' आणखी समर्थवाक्य 'ज्ञानास मूळ अग्नी व भक्तीस मूळ विरक्ती' या दोन्ही गोष्टी कूटस्थातील अंतःकरणात जडल्या आणि निरंतर ज्ञानचक्षूने कूटस्थापुढे राहिल्या म्हणजेच तो विदेही झाला व अकर्तव्य झाला. हा भाव होण्यास निरंतर कंठी गुरुवाक्य जडून निरंतर समदृष्टी झाली पाहिजे. नाम जडून गेले पाहिजे. समर्थवाक्य 'बुद्धीचा पालट नासेल कुमती । होईल सद्भक्ती येणे पंथे'[४] असे जाणतच आहां. आणखी समर्थवाक्य – 'यकवीस हज़ार साहाशे २१६००' नारायणाने क्लप्त (श्वासांची योजना) निर्माण केली आहे'[५]. त्या ठिकाणी 'सगुण हें ब्रह्म विठलेंच बोले । ऐक्य पावविले तुकाराम'[६] अशा वाक्याधारे जाणतच आहां. आता तु–का–ने स्मरण चालले असता, त्याचेच नाव तुकाराम म्हणजे प्रवृत्तिमार्गाने स्वर्गलोक, मृत्युलोक, पाताळलोक असा अर्थ. आता तीन्ही विषयांत (कामिनी, कांचन, भूमी) सापडून जन्माची हानी करून घेतात, तेव्हा, त्या लोकी तु–का–ने (म्हणजे मोजूनमापून, कमी पडू न देता) राम म्हटले असता नवल झालें तीन्ही लोकीं. हाही अर्थ प्रज्ञावंत मंडळींस संद्युक्तावर (संशयातीत) होईलच. याचे नाव 'तुका उतरला तुकीं । नवल जाहलें तीन्ही लोकीं'. असे समर्थवाक्य जाणतच आहां. महाराज समर्थ मंडळी, श्रीमंत अंताजीपंत दादासाहेब रिसबूड यांचे चरणांवर मस्तक ठेवून दासानुदास अंबाजी कुलकर्णी याचा शिरसाष्टांग अति नम्रतेचा नमस्कार. आपलेकडून, ''देव निर्गुण तूं निराकार ऐक्य होसी । तारक रे दीन जनासी । येक विनंती माझी परियेसी । हो सादर या वचनासी । मी जन्मुनिया वाया चालले कैसी । हे करुणा येऊ दे तुजसी । तू दीनानाथ दीनबंधू । तारक रे हा भवसिंधू। हरिनाम मुखीं ग्रास । त्वरित मज देई ''[७] ॥ अशा शर्तीवरून लिहिण्यास समर्थांनी सुचविले त्यायोगेकरून बुद्धी लिहिण्यास निष्पन्न झाली. म्हणून आभार मानून घेतला. कारण शर्तीवरून स्मरण झाले म्हणून आभार मानले. हे सर्व लिहिण्यास समर्थ आज्ञा झाली म्हणून लिहिले आहे. तर स्वस्थ मनन होऊन, वाचणे होऊन, अर्थ मनन होऊन याचे उत्तर

येईल अशी इकडील उमेद फार फार आहे. श्रीमंत महाराज दादासाहेब आपटे, चिंतोपंत दादा आपटे, वासुदेवरावजी दादासाहेब साळवेकर, आपले अंतःकरणातील प्रज्ञा मंडळी व नंदेप्पा या एकंदरांस आपले मर्जीस येईलतर हे पत्र दाखवावे. मर्जी नसेलतर नको. आपले सवडीप्रमाणे करावे, अशी आज्ञा झाली आहे. एकंदर मंडळींस वडिलांनी निष्ठेने व कट्टाने वागणेविषयी त्रिकाळी फार फार अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे, तो श्रुत व्हावा. महाराज गोपाळरावजी दातार येथपर्यंत येऊन श्रीसमर्थ महाराजांस भेटून आनंदाने गेले. सर्वांस आनंद झाला. का म्हणालतर महाराजांनी आपटे व नंदेप्पा वगैरे मंडळींना सांगितले होते की गोपाळराव पाच दिवसांत हुशार होत आहेत (बरे होत आहेत) व तुमचे पुढे जात आहेत. तुम्ही सर्व मंडळी जा. तिकोटे मुक्कामी गाठ पडेल असे आपटे व नंदेप्पास वगैरे सांगितले होते. त्याप्रमाणे तिकोटी मुक्कामी गाठ पडली असे दातारांनी सांगितले, त्यावरून फारच आनंद झाला. याप्रमाणे सर्वांस कळवून एकंदर मंडळी आनंद असल्याचे व पोचल्याचे उत्तर कळवावे. महाराज विष्णुभटजी व त्यांचे मंडळींस वडिलांनी त्रिकाळी नेमाबद्दल अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार फार फार सांगितला आहे तो श्रुत करावा. हे पत्र तिकीट नसल्याने नॉट पेड पाठवले आहे. क्षमा असावी व घरी मंडळींस फार फार प्रार्थना वडिलांनी फार फार सांगितली आहे ती श्रुत करावी. नेमाने असणेबद्दल प्रार्थना सांगितली आहे व त्यांचे अंतःकरणातील मंडळींसही प्रार्थना सांगणेविषयी सांगितले आहे. ही विज्ञापना.

नोंदी :-

१. निर्गुण झाल्यावर जीवपणा भक्तपणा राहत नाही असे वर आहे. इथे शिवपण जडून गेल्यावर भक्तपणा म्हणविला जातो असे आहे. ही अद्वैतभक्ती आहे. इथे दुजाभाव नाही. देवात मिसळून देवाचा भक्त होणे.

२. जो सद्गुरुवचनें निवाला । तो सायुज्यतेचा आंखिला ॥ -(दासबोध, ५.३.३९.)

३. म्हणे मी पतित चांडाळ । म्हणे मी दुराचारी खळ । –(तत्रैव, ५.८.२८.)

४. नित्यनेमावली, पृ. ६४

५. येकवीस साहस्त्र साहाशे जपा । नेमून गेली ते अजपा ॥ –(दासबोध, १७.५.१.)

६. सगुण हे ब्रह्म विठ्ठलचि बोले । ऐक पां वहिलें । तुकारामा ॥ –(नित्यनेमावली, पृ. ६७.)

७. पहिल्या चरणातील 'ऐक्य' शब्दाच्या जागी 'एक' असा शब्द पाहिजे. बाकी अवतरण बरोबर आहे. संदर्भ मात्र मिळाला नाही.

XXXXX

पत्र ४६ पान ६५

नवीन
क्रमांक

५८ (टिपण :– तारीख ऑक्टोबरमधली आहे म्हणून महिना अंदाजे अश्विन घातला आहे. पत्रावर सन नाही. मजकुरावरून जागा ठरवता येत नाही म्हणून जागा बदलली नाही. मूळ पुस्तकात जिथे आहे तिथे ठेवले म्हणून सन १९०२ घातला आहे.)

उमदी	अश्विन
कृष्णरावांना पत्र	३.१०.१९०२, शुक्रवार

श्रीगुरुसमर्थ

दाल साडेबारा अगर तेरा हात पाहिजे, बरे. विजापुरास दीड पैसा हात मिळाले होते. (दाल म्हणजे नवार). तिथे मिळेल तसे घेऊन पाठवावे. महिन्याची जन्मपत्रिका (कुणाची ?) व सलगर वगैरे गावांची (वसुली) पाठवली नाही. मामलेदार कारकुनास तसे सांगून ठेवावे. आणखी ६–७ तारखेस रवाना करवितात. त्याची क्षमा करण्यास सांगावे. बाकी मजकूर ठीकच आहे. तुम्हांकडील पक्का मजकूर कळवावा म्हणजे आनंद होईल. नेमाने हुशारीने मात्र असावे हे फार फार सांगणे आहे. बाकी काळजी नाही. पथ्याने असावे. दोन रोज झाले भीमास ताप

कमी आहे. चार सहा रोजांत भीमास तिकडे पाठवीत आहे. पीतांबर पाठविला नाही. सरी वगैरे देऊ नये. वर ठेवू नये. सौ. कमळाबाईस दोन-तीन महिने खरे झाले असतीलतर खाणेपिणेविषयी परामर्श करीत जावा. विठ्ठल यास नेमणूक झाली का ते कळवावे. शिवण्यास तिकिटे तीन पैशांचीच पाठवावी.

पत्र ४७ पान ६६

नवीन
क्रमांक
५९ (टिपण :- १९०१ प्रमाणेच १९०२ सालीही मार्गशीर्ष सप्ताह इंचगेरीस अण्णप्पा कुलकर्णी यांच्या घरी झाला. पत्रावर महिना १० म्हणजे ऑक्टोबर घातला आहे. पण पूर्वी उल्लेखिलेल्या सत्संग नियतकालिकाच्या जून १९८५ च्या अंकात पृ. ८ वर बाबासाहेब संगोरामांनी दाखवले आहे की पत्रात कार्तिक शु. ६ शके १८२४ अशी तिथी असल्याने ही तारीख ६.११.१९०२ येते, ६.१०.१९०२ नाही. तशी इथे बदलली आहे.)

जमखंडी कार्तिक शु. ६ शके १८२४
६.११.१९०२, शनिवार

श्रीगुरुलिंगजंगममहाराज

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री शिवलिंगव्वा अक्का, मुक्काम जत, वडिलांचे चरणशेवेशी, बालक राचय्या वीरप्पा करजगी, मुक्काम जमखंडी, याचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. तागायत मिती कार्तिक शु. ६, शनिवार शके १८२४, शुभकृन्नाम संवत्सरपावेतो श्रीसमर्थांचे चरणआशीर्वादिकरून सुखरूप असो. विशेष. हल्ली माझी प्रकृती आपले आशीर्वादकरून उत्तम आहे. कोणत्याही गोष्टीची न्यूनता नाही. श्रीसमर्थांची स्वारी जमखंडीस येऊन आजीस पंधरा-वीस दिवस झाले. अजून दोन दिवस मुक्काम असून कार्तिक व. १३ / १४ संधीस विजापुरास

असतात.येथील व विजापुराकडील वगैरे मंडळींचे मत यंदा सप्ताह इंचगेरीस करण्याचे असलेमुळे व इंचगेरीस करणेचा बेत झालेवरून[१] तीर्थरूप राजमान्य राजश्री अंबुराव महाराज अण्णा यांची स्वारी येथून इंचगेरीस रवाना झाली. आज पाच रोज झाले. बाकी मजकूर म्हणजे श्रीसमर्थांची स्वारी येथे आलेपासून आजपर्यंत अति आनंदाने दिवस जात आहेत, ते पत्री लिहिता येत नाही. कळावे. आई बसव्वा वगैरे मंडळींस सर्वांस अति नम्रतेचा नेमाबद्दल शिरसाष्टांग दंडवत, विज्ञापनाची प्रार्थना समार्थांनी फार फार सांगितली आहे. कळावे. नंदेप्पा न्यामगौड व मेलगिरीअप्पा नासी यांचा एकंदमंडळींस शिरसाष्टांग नमस्कार. कळावे. बहुत काय लिहिणे ? सेवेशी श्रुत होय ही विज्ञापना.

नोंद :-

१. इंचगेरीस झालेला हा दुसरा मार्गशीर्ष सप्ताह. मठस्थापना अजून झाली नव्हती. १९०३ या पुढील वर्षापासून मठात सर्व सप्ताह नियमित सुरू झाले.

xxxxx

पत्र ४८ पान ६७

नवीन
क्रमांक

६० (टिपण :- पत्रावर तारीख २७ असून मजकुरात २९ आहे. पुढच्या दोन-तीन पत्रांवरील तारीख-तिथी-वार यांचा हिशोब करून २७ तारीख ग्राह्य धरली आहे. अर्थात २९ धरली तरीही सर्व काही साधारणपणे जमते.)

तिकोटे	कार्तिक व. १२
नानासाहेबांना पत्र	२७.११.१९०२

श्रीगुरुसमर्थ

शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता. २७.११.१९०२ पावेतो आनंद आहे. शनिवारी विजापुरास जाणार. पुढे गुरुवारी इंचगेरीस जाणार. सर्व आनंद आनंद आहे. याप्रमाणे एकंदर संतसभा मंडळींस प्रार्थना आहे. आभारित (सुज्ञ) मंडळींस कळवावे असे नाही (वेगळे आभार मानणे नको.) जतेसही याप्रमाणे लिहून पाठवले आहे. कळावे, ही विज्ञापना.

आपला बालक

भाऊ

पत्र ४९ पान ६७

नवीन क्रमांक

६१ (टिपण :- या पत्रावर तारीख नाही. फक्त महिना व सन आहे. मागील १/२ पत्रांच्या तारखा व तिथींचा हिशोब करून सप्ताह सोमवार ८.१२.१९०२ सुरू होणार हे कळते. रविवारीच गुरुपादप्पा व नागप्पा यांना बोलावले आहे. म्हणजे सप्ताहाच्या आदल्या दिवशी. हे बरोबर जमते. या पत्राची तारीख ठरवली पाहिजे. पत्रावर डिसेंबर असल्याने डिसेंबर १ च्या आत तारीख धरता येत नाही. सामान ८-१० दिवस आधी आले पाहिजे. सप्ताह ८ तारखेस सुरू होणार म्हणजे निदान १ तारखेपर्यंत सामान आले पाहिजे. म्हणून १ तारीख धरली. १ डिसेंबरला तिथी मार्गशीर्ष शु. १ व सोमवार येतो.)

विजापूर मार्गशीष शु. १

१.१२.१९०२, सोमवार

श्रीगुरुसमर्थ

अण्णा यांस प्रार्थना. गुरुपादप्पा व नागप्पा[१] यांस रविवारीच पाठवावे. बाकी सामान मदप्पास सांगितलेप्रमाणे द्यावे. ते म्हणजे मुख्य देव व त्यांचे सामान. दोन चवऱ्या व वेत, पादुका व चौकी याप्रमाणे व

छताई सामान, जाडी, गुडार, तपेली वगैरे द्यावे हीच प्रार्थना आपणांस कळावी. मृदंग असल्यास तोही पाठवावा.

आपला

भाऊ

नोंद :-

१. नागप्पा हे निंबरगी महाराजांचे नातू. ते बुद्धिवान असून गायन-वादन-कुशल होते. संप्रदायाची त्यांना खूप माहिती होती व ते सर्व अचूकपणे सांगत.

xxxxx

पत्र ५० **पान ६८**

नवीन

क्रमांक

६२ (टिपण :- ४९ ते ५२ या पत्रांच्या तारखा-तिथी जमत नाहीत. खूप प्रयत्न करूनही जमेना. मग छापलेल्या तारखांनुसार पत्रे लावली.)

जमखंडी — कार्तिक व. १३

करबसप्पा आवटी यांना पत्र — १०.१२.१९०३, शुक्रवार

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग दंडवत नमस्कार. कार्तिक व. १३ रोज शुक्रवार, जमखंडी मुक्कामी श्रीसमर्थसद्गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. इकडील भक्तीचा थाट व आनंद लिहिता पुरवत नाही, असा चालला आहे. समर्थांचे कृपेची गोष्ट काय लिहावी ? असो. इकडील हालहवाल वगैरे सर्व आनंद आनंद आहे. आम्ही मार्गशीर्ष शु. ५/६ स इंचगेरीस येत आहोत. एकंदरीत मंडळींस नेमाबद्दल महाराजांनी प्रार्थना सांगितली आहे, ती सर्वांस श्रुत करावी. तुम्ही, संगप्पा, गुरुबाळप्पा वगैरे नेहमीप्रमाणे आगाऊ येतच आहां. त्याबद्दल लिहिणे अगर सांगणे नकोच आहे. सुज्ञच आहां. कळावे. लोभ असावा ही विनंती.

-नंदेप्पा न्यामगौड

पत्र ५१ पान ६८

नवीन क्रमांक ६३

जत

माघ व. ५

६.२.१९०४, शनिवार

श्रीगुरुसमर्थ

तीर्थरूप कृपासागर राजमान्य राजश्री वासुदेवराव अण्णासाहेब बिदनूर, मुक्काम बुधगाव, वडिलांचे सेवेशी, बालक कृष्णा उमदीकर याचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. माघ व. ५, शनिवारपावेतो इकडील सर्व वर्तमान आनंद असो. विज्ञापना. आपलेकडून संक्रमणाप्रीत्यर्थ तीळ – शर्करासह – पत्र आले, ते पाहून आनंद झाला. असेच वारंवार पत्राद्वारे आपलेकडील खुशालीचा खुलासा लिहून येत गेल्यास मनास आनंद होतो. सावळसंगाकडील गोपाळराव वगैरे मंडळी सर्व खुशाल आहेत. तिकडील व उमदीकडील हवा बरी आहे. वडीलही येथेच आहेत. त्यांनाही पत्र पाहून, वाचून आनंद झाला. इकडून शर्करायुक्त तीळ पाठवले आहेत त्यांचा स्वीकार व्हावा. आता पूर्वीचे पत्रात आलेल्या विषयाचा खुलासा व्हावा, अशा मजकुराबद्दल वडिलांचे म्हणणे असे आहे की ज्या ठिकाणी भक्ती, त्या ठिकाणी तिचे मागे निंदा, ही परंपरा चालत आलेलीच आहे. याबद्दल समर्थवाक्य– 'जे कूपामध्यें बेडूक राहत । ते काय जाणिती पयोब्धीची मात । तेवीं गुरुभक्तीची खूण निश्चित । माया लोभियांसी कळेना'[1] ॥ तसेच 'आज्ञा करितां रुक्मिणीरमण । त्याचें कवित्व का निंदिती जन ॥ तरी भाविकांपाठी पुरातन । विकल्पी असती बहुसाल ॥ पंडिताची देखोनि वक्तृत्वता । अजापाळ म्हणती हे बडबड वृथा ॥ कीं गंधर्व सुस्वर गायन करितां । तेथें गर्दभ भुंकता न राहती ॥ बकुळीचा सुगंध येता पाहे । तो पंगुळवेलीस मानेल काये ॥ सुंदर कपिला असली गाय । तरी यवन काय पूजिती'[2] ॥ असे समर्थांचे वाक्य आहे. त्या वाक्याधारे निंदा–स्तुती दोन्ही तत्समान मानून घ्यावी लागते अशा विषयी वाक्य– निंदकाचे घर असावे शेजारीं । असे तुकाराम महाराजांचे वाक्य आहे.

या एकंदरांवरून पाहिले असता मनाच्या दोन्हीकडील ओढी तुटून जातात. का म्हणालतर ज्याचे त्याचे कृत्यावर ते ते हुद्देदार समर्थांनी नेमूनच ठेविले आहेत. तात्पर्यार्थ, ज्याचे कृत्य जसे, तसे त्याला शासन होते. त्यात आपली ओढ तिकडे घेणे, करणे नकोच आहे. म्हणून समाधान ठेवून त्याचा विचार न करता तसेच राहिले. आताही हाच अर्थ मनास आणून आनंदरूपी समाचार घेत जावा. आपलाच आहे म्हणून क्षमा करून आनंदाने विस्तारपूर्वक उत्तर येईल अशी आशा बाळगून अति नम्रतेचा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार वडिलांनी फार फार सांगितला आहे. आजीबाईंसही नमस्कार प्रविष्ट करावा. कळावे. बहुत काही लिहिणे शक्य नाही. ही विज्ञापना.

नोंदी :-

१. भक्तविजय, ५२.११८.

२. भक्तविजय, ४८.८२, ८९, ९०.

xxxxx

पत्र ५२ **पान ७०**

नवीन
क्रमांक

६४ (टिपण :- पत्रलेखक नवशिका असावा. 'भाऊसाहेब महाराज उमदीकर' असे महाराज स्वतःबद्दल म्हणणार नाहीत. महाराजांनी सांगितलेला मजकूर उतरवणाऱ्या लेखकाचे हे काम आहे.)

जमखंडी वैशाख शु. ११, शके १८२६
कृष्णरावांना पत्र ७.४.१९०४

श्री

मिती वैशाख शु. ११, १८२६, जमखंडीहून भाऊराव महाराज उमदीकर यांचे आशीर्वाद उपरि. आम्ही येथे आनंदरूप असून जयाबाई खुशाल आहे. शेत घरी करण्यास सांगितले. दुसरे यास देऊ नये.

आपणही आठ-दहा रोजांत येतो असे सांगितले आहे. राधाबाईस सावळगीस आणण्यास आबा येणार आहे. मग जयाबाई आबा...कडे जाणार. कळावे. बाकी सर्व आनंद आहे. हा आशीर्वाद.

नवीन क्रमांक ६५	पत्र ५३	पान ७०
	चिमड	ज्येष्ठ शु. ११
		७.५.१९०४

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री श्रीअंबुराव महाराज, मुक्काम इंचगेरी स्वामी गोसावी यांसी, शरणार्थी नंदेप्पा न्यामगौड जमखंडीकर याचा कृतानेक दंडवत. विज्ञापना. इकडे वर्तमान आनंद आनंद आहे. सर्व मंडळी खुशाल आहेत. हवा वगैरे बिलकूल नाही. सर्व आनंद आहे. आज सुमारे १५ दिवस होत आले. संतसमागमात आनंदात वेळ जात आहे. श्रीसमर्थ उमदीकर येथेच आहेत. लौकरच तुमचेकडे येणार आहेत. तेथील समर्थांचे कारखान्याबद्दल जतेहून तुम्हांस पत्र लिहिलेच आहे. त्याप्रमाणे करीतच आहां. तथापि या पत्रातून सूचना केलेप्रमाणे आहे, आज्ञेवरून आहे. त्याप्रमाणे लौकर व्यवस्था करावी. आता पादुका स्थापन केलेला जो कट्टा आहे तो पुन्हा टाकीचे दगडाने बांधणेचे आहे. त्यासाठी चांगले दगड आणून, टाकीने नीट करवून तयारी करावी. यासाठी १२ रुपये मनीऑर्डर करून पाठवले आहेत. चार दिवसांत येऊन पोचतील. कट्टा, चौक चांगला टाकीचा, शोभायमान व्हावा. इकडून महादेव व नंदी घेऊन येत आहे. साधारण मध्यम प्रतीचा करवीत आहे. तयार झाल्यावर घेऊन येतो. त्या कट्ट्यावर दोन्ही बसविणे आहे. मूर्तीही त्यावर बसविणे आहे. करिता कट्टा चांगला व्हावा म्हणून आगाऊ रुपये पाठविले आहेत. तर दगड वगैरे आणवून टाकीने फोडून तयार ठेवावे. इतक्यात बेत सांगणेस अगर विजापुराहून

गवंडी घेऊन समर्थ येतील. तेव्हा समक्ष सर्व विदित होईल. चुना वगैरे आणून ठेवावा. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. तुम्हांकडील सर्व मंडळींस दंडवत नमस्कार सांगावा. कळावे, ही विज्ञापना.

(पुस्तकातली तळटीप) – श्रीमहाराजांनी इंचगेरीस मठस्थापना करून तेथे श्रीगुरुलिंगजंगम महाराजांचे देऊळ बांधले. तेथील हल्ली शिवलिंग बसविलेला कट्टा साधारण टाकीचा होता. त्या ठिकाणी हल्लीचा बारीक टाकीचा बांधण्याचा हा उल्लेख आहे. त्यावर शिवलिंगाची स्थापना होण्यापूर्वी निंबरगीहून श्रीगुरुलिंगजंगम महाराजांच्या पादुका आणवून त्यांची स्थापना कट्ट्यावर करून सप्ताह सुरू करीत.

पत्र १९९ पान १९८

नवीन
क्रमांक

६६ (टिपण :– या पत्रावर तारीख–तिथी यांचा पत्ता नाही. मजकुरात दगड आणणे, चुना तयार ठेवणे असे सांगितले असून 'नंदेप्पांना सांगितले आहे' असेही आहे. ५३ पत्राचाच विषय चालू आहे. शिवाय जवळ बसून कार्य करून घेण्याची सूचना आहे. इमारत बांधताना जवळ बसण्याची जरुरी नसते. तेव्हा हे काम देवाच्या कट्ट्याचेच असावे, यासाठी इथे आणले. सनही तोच असणार. दोन्ही पत्रे अंबुरावांनाच आहेत.)

उमदी

...१९०४

श्रीसमर्थ प्रसन्न

अंबुराव महाराज यांस प्रार्थना. पुंडलिकाने ५० रुपयांचे काम २५ रुपयांत केलेले अण्णप्पास[1] माहीत आहे. त्याप्रमाणे काळजीने जवळ बसून कार्य करून घ्यावे असे सांगावे. सारांश, लाभ–तोट्याकडे लक्ष ठेवण्याचा बोजा तुमचेवर आहे हे पक्के समजावे. बसप्पासही सांगितले

आहे. दगड लौकर आणवून घ्यावे. गवंड्यास पत्र लिहिले आहे. तोही लौकर येईल. तयारी ठेवावी ही प्रार्थना. नंदेप्पास चुन्याबद्दल समक्ष सांगितले आहे. त्याप्रमाणे चुना टबीत करावा (चुन्याच्या घाणीत मळावा). कळावे. नेमाबद्दल अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. कळावे. मजुरीस जितके रुपये लागतील तितके द्यावे.

नोंद :-

१. अण्णप्पा कुलकर्णी म्हणजे अंबुरावांच्या बहिणीचे चिरंजीव. पुष्कळ तऱ्हेच्या कामांच्या संदर्भात यांचा उल्लेख असतो. यांची मुख्य ओळख म्हणजे इंचगेरी मठासाठी यांनी आपल्या मालकीची जागा दिली होती.

XXXXX

पत्र १७७ पान १७३

नवीन
क्रमांक

६७ (टिपण :- याही पत्रात कट्टा बांधणे, देव बसविणे याबद्दल सूचना आहेत. शिवाय विठोबा व व्यंकप्पा या विजापूरच्या गवंड्यांना महाराजांचा निरोप पोचविण्यास कळविले आहे. पत्रावर तारीख तिथी नाही. पण ५३, १९९ व १७७ ही विखुरलेली पत्रे एकाच विषयावरची आहेत म्हणून जवळ आणली. सन तोच असणार. पत्र अंबुरावांनाच आहे. नंदेप्पालाही आहे. हे दोघे हे काम करत होते.)

उमदी/जत

...१९०४

श्रीसमर्थ प्रसन्न

कृपासागर राजमान्य राजश्री अंबुराव महाराज बाबासाहेब व नंदेप्पा महाराज यांस नम्रतेचा नमस्कार. गिरगाव शेतातील बाजरीचा कडबा, एक गाडी जोंधळ्याचा कडबा ६-७ कट्ट आहे. चुना भाजणाऱ्या

गिरगावकरांनी तो दहा रुपयांस मागितला. अप्पांनी दिला नाही. आता जतेस २-२॥ रुपये कट्ट भाव आहे. करिता तुम्ही दोघे मिळून तुमचे मर्जीप्रमाणे विकावा. अनमान करू नये. नंदेप्पा महाराज यांची देऊळ बांधण्याची कीर्ती चिमडपर्यंत बरीच झाली आहे. त्याप्रमाणे चांगले बांधण्याची काळजी घ्यावी. दोन लुगडी येऊन पोचल्याचे कळवावे. उत्तर लिहावे, ही विज्ञापना. सकलगुणसंपन्न राजश्री व्यंकप्पा व विठोबा यांस वडील अप्पांनी प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. साधारण टाकीचे काम ठेवावे. म्हणजे लई दुधाची, आखुड शिंगाची, थोडक्या किंमतीची गाय असावी तसे भूषण ठेवावे असे सांगावे. तुमचे चौघांचे नजरेस येईल तसा कट्टा बांधण्याची व देव बसविण्याची व्यवस्था तुमचे मर्जीप्रमाणे करावी. वटहुकुम दिला आहे.

केळीच्या झाडाला चार दिवसांनी पाणी देत जावे अशी अण्णप्पास प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी.

– रामभाऊ[१] फडणीस

नोंद :-

१. रामभाऊ सात्त्विक वृत्तीचे असून त्यांची गुरुसेवा वाखाणण्याजोगी होती. ते महाराजांबरोबर नेहमी फिरतीवर असत. कित्येक पत्रे त्यांच्या हातची आहेत. दासबोधावर प्रवचन करीत.

xxxxx

	पत्र २४६	**पान २३८**
नवीन	जत	आषाढ/श्रावण
क्रमांक		४.७.१९०४, शनिवार
६८		

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री शिवलिंगप्पा अण्णा चिक्कोण[१] व नंदेप्पा अण्णा न्यामगौड, मुक्काम जमखंडी, स्वामी गोसावी यांसी,

श्री. कृष्णाजी व्यंकटेश देशपांडे उमदीकर याचा कृतानेक दंडवत शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. अप्पा काल शुक्रवारी येथे आले. तुमचे उमदीकडे पाठवलेले पत्र भीमरावाने जतेस पाठवले. ते पत्र व वडीलही कालच आले. ते पाहून त्याचे उत्तर लिहिणेस सांगितलेवरून लिहीत आहे. तागाईत तारीख ४ माहे जुलै, शनिवार- पावेतो श्रीहरिकृपेकरून इकडील सर्व वर्तमान उत्तम असो. विज्ञापना. बाधा[२] जर असेलतर त्यास न पाहता सांगणे व लिहिणे यासाठी उत्तम प्रकारचा विश्वास पाहिजे. जर तुमचा विश्वास असेलतर त्यास करणेस सांगावे. त्याप्रमाणे खरेपणाने वागावे लागते (नीतिमार्गाने सांगितल्याप्रमाणे करावे लागते.) सकाळी उठलेबरोबर एक वडी कापूर लावून कापूर असेतोपर्यंत आपले आपण जे आठव (नाम) असेल ते ध्यान करावे. नंतर डोळे उघडून बोलावे. तोपर्यंत कोणाबरोबर बोलू नये. दोन प्रहरी एक वडी लावून ध्यान करावे. संध्याकाळी निजताना एक वडी लावून ध्यान करावे. असे तीन वेळा न बोलता करावे. पक्क्या खात्रीने सांगून करवावे. दररोज सकाळ-संध्याकाळ दोन्ही वेळा पाच रुपये भार गूळ, मूग भाजून डाळीचे पीठ व पाच रुपये भार तूप असे सकाळी तोंड धुवून घ्यावे. नंतर संध्याकाळी निजताना घ्यावे. याप्रमाणे एकवीस रोज वर दिलेले शर्तीप्रमाणे न चुकता करणेस सांगावे. अकरा रोजांत याप्रमाणे केलेचे आवभाव (प्रचिती) उत्तराने इंचगेरीस कळवावे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे.

महाराज नंदेप्पास प्रार्थना वडिलांनी फार फार सांगितली आहे. महाराज आपटे मंडळी, मातोश्री पटवर्धन आईसाहेब, निंबरगी मंडळी, एकंदरांस मुद्दाम नेमाबद्दल त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार आहे तो श्रुत करावा. तुम्हांस, शिवलिंगप्पा, शिवप्पा मुरगोड, नंदराया, मेलगिरीअप्पा, वीरभद्रप्पा अण्णा, मलकप्पा अण्णा मास्तर व स्वामी वगैरेंस नेमाबद्दल अति नम्रतेची प्रार्थना व शिरसाष्टांग नमस्कार फार फार आहे. सहजी गाठ पडेल तेव्हा नावलगी, चिमड व महालिंगपूर मंडळींसही कळवीतच आहां. त्याबद्दल भक्तीसाठी ऋण घेतलेच आहे. सांगणे, लिहिणे नकोच

आहे. सुज्ञच आहां. तसदीबद्दल क्षमा सांगितली आहे, ती करालच. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. सिदप्पाची प्रकृती कशी आहे ते लिहिले नाही. ते कळवावे. रामण्णा बागेवाडी यांसही अति नम्रतेचा नमनपूर्वक नमस्कार श्रुत करावा. वडील आणखी आठ दहा दिवस येथे मुक्काम करतील असा बेत आहे. या पत्राचे उत्तर हकीकतीसह जतेस पाठविले तर फार उत्तम होईल. बाकी सर्व आनंद आहे. कळावे. बहुत काय लिहिणे ? कृपा लोभ निरंतर असू द्यावा ही विनंती.

नंदेप्पास कळवावे की गंगप्पा हळ्ळूर अप्पांबरोबर येथे आला आहे. प्रकृती बरीच आराम झालेली आहे. आणखी आठ रोजांनी तिकडे येणार आहेत. तुम्हांस कळावे.

नोंदी :-

१. यांनी नित्यनेमावलीची तिसरी आवृत्ती १९२४ साली जमखंडीहून प्रसिद्ध केली.

२. 'बाधा' म्हणजे 'बाहेरची' बाधा म्हणजे भुताटकी, चेटूक, करणी अशा प्रकारची काही होती का ? ती शिवलिंगप्पा चिक्कोण यांच्या माहितीच्या कुणाला तरी झाली होती. पूर्ण विश्वास असेलतर उपाय करावा असे महाराज सांगतात कारण त्यांनी रोगी पाहिलेला नव्हता. शिवलिंगप्पांच्या मध्यस्थीने उपाय सांगितला होता. असो. याही बाबतीत देवाचे ध्यान हाच उपाय सांगितला आहे, हे लक्षात घेण्याजोगे आहे. सर्व रोगांवर नाम हेच औषध, त्यामागे महाराजांची शक्ती होती हे निर्विवाद. महाराजांच्या या शक्तीबद्दल अक्कूबाई बेळगावकर एका पदात म्हणतात– 'भूत पिशाच बाधा घालवुनि'...। हे पद महाराजांवर आहे. प्रपंच–परमार्थ दोन्ही बाजूंनी महाराजांचा शिष्यांना आधार असे. हे पद 'वाङ्मयी मूर्ती' या पुस्तकात पृ. ९९ वर आहे. एका अज्ञात कवीने, 'महाराजांनी बाधा सोडवली' (बाधि बिडिसिद) असे म्हटले आहे (तत्रैव, पृ. १०५) – इथेही नुसता दुःख शब्द नसून बाधा शब्द आहे.

xxxxx

	पत्र ५४	**पान ७२**
नवीन क्रमांक ६९	चिमड	कार्तिक व. ६ २८.११.१९०४, सोमवार

श्रीसद्गुरुसमर्थ

महाराज सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री अंबुराव बाबा स्वामी गोसावी यांसी, आज्ञांकित नंदेप्पा याजकडून कृतानेक अति नम्रतेचा दंडवत शिरसाष्टांग नमस्कार. कार्तिक व. ६, सोमवार चिमड मुक्कामी श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. तुमचे पत्र पोचले. मजकूर समजून आनंद झाला. सप्ताहाला जे कर्तव्य आहे तेवढ्यापुरती सर्व तयारी असावी, अशा विषयी वडिलांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत व्हावी. सर्व खोली खाली सारवावी म्हणजे आलेल्या लोकांस बरे वाटेल. पोथीचे ठिकाणी सारवीतच आहां. लाकडे वगैरेंची अंतःकरणात आठवण असतच आहे. ते लिहिणे नको. एकंदर सारविणेचे तूर्त नको. आलेवर पाहू. धोंडप्पा अण्णांनी वचन महाराजांस दिले आहे. वचनाप्रमाणे अंतःकरणापासून इमानाने वागत असल्यास दर रुपयास एक आणा नफा याप्रमाणे माल आणण्यास कबूल करत असेलतर त्याला खाली लिहिल्याप्रमाणे सामान आणण्यास सांगावे. जर तुमचे मनास बरोबर दिसेलतर सांगावे. नको वाटल्यास तुम्हीच तुकाराम, विठोबा यांपैकी कुणालातरी पत्र लिहून सामान आणवावे. सारांश, आम्ही येईपर्यंत तुमचे मर्जीने सर्व तयारी करवून ठेवावी. रोख रुपये पाहिजे असतीलतर ५० रुपये नागप्पा निंबरगी यांजकडून आणवावे. हे पत्र त्यांस दाखवावे म्हणजे रुपये देतील. धोंडप्पा कबूल करीलतर आम्ही आलेबरोबर रुपये देतो. तुमचे मर्जीप्रमाणे करणेस वडिलांनी सांगितले आहे. अण्णप्पा महाराज यांना याजप्रमाणे मदत करण्यास सांगितले आहे असे त्यांस सांगावे. आमचे येणे मार्गशीर्ष २/३ या बेतावर होईल. इतक्यात तयारी ठेवण्यास समर्थांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे. सुज्ञच आहांत. आम्ही कळवावे असे

काही नाही. सर्व प्रकारे माहितगार आहांत. आम्ही येईपर्यंत सर्व तयारी करीत आहांच. या विषयी पक्की खात्रीच आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. यंदा सर्व मंडळींनी तुमच्या भेटीचे लाभाकरिता चातक पक्ष्याप्रमाणे वाट पाहिली. अशा विषयी सर्वांनी महादेव भटजींस सांगितले होते. परंतु महाराज जतेस असलेने परभारे इकडे आले. तुम्हांस पत्र लिहिले. पत्र लिहिणे कोणत्याही भावाने झालेतरी आपण श्रेष्ठच आहांत व सर्वांमध्ये वरिष्ठ आहांत. असो. जेव्हा प्रसंग घडेल तेव्हा सर्वांस भेटीचा लाभ होईल असे सर्वांनी म्हटले आहे. सर्वांनी नमस्कार सांगितला आहे. कृपा–लोभ असावा, ही विज्ञापना.

तांदूळ दीड मण, १॥; गहू दीड मण १॥; हरभरा डाळ आठ पायल्या; तुरीची डाळ चार पायल्या ।; घासलेट तेलाचा एक डबा; करडीचे तेल एक डबा; नारळ पन्नास ५०; मीठ दोन रुपयांचे; गूळ आठ मण किंवा बारा मण, याप्रमाणे जिन्नस आणवावे. अगर धोंडप्पा वचनाप्रमाणे वागतीलतर त्यांस सांगावे. तुमचे मर्जीप्रमाणे करावे. सारांश, तयारी असावी, असे सांगणे फार फार आहे.

पत्र १९८ पान १९७

नवीन क्रमांक ७०

(टिपण :– या पत्रावर तारीख–तिथी नाही. कुणाला कुणी लिहिले काहीच नाही. आशीर्वाद असल्याने व मजकुरावरून भीमरावांना उमदीस लिहिले असावे असा अंदाज आहे. सप्ताहासाठी पादुका मागवल्या आहेत व वाजंत्रीवाल्यांना निरोप आहे म्हणून सप्ताहाच्या तयारीच्या ५४ पत्रानंतर घातले.)

जत

पत्र भीमरावांना असावे

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. जतेस काल रोजी आलो. सर्व खुशाल आनंद

आनंद. शनिवारी कोळगिरीहून रविवारी संखकडून इंचगेरीस जात आहे. कृष्णाचे अंगात बरे आहे. खुशाल आहे. वडिलांस (नानासाहेबांस) सांगावे व त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. ...ही घेतले आहे. अण्णाजवळ ठेवतो अगर इंचगेरीहून पाठवतो. वाजंत्रीवाल्यांना सवड असल्यास पाठवावे. पादुका घेऊन येतच आहां. रुपयेही चिमडहून पाठविले ते मजजवळ आहेत. सर्व आनंद आनंद आहे. मास्तरसाहेब (गाडगीळ), अण्णप्पा वगैरेंस नमस्कार सांगावा, ही विज्ञापना.

	पत्र ५५	**पान ७४**
नवीन	उमदी	माघ शु. ६
क्रमांक		१०.२.१९०५
७१		

श्रीगुरुसमर्थ

महाराज मंडळी राजमान्य राजश्री नारायणराव गोडबोले, रामरावजी अण्णासाहेब वैद्य, रावसाहेब दादासाहेब सुतार, विष्णुपंत दादासाहेब, रावसाहेब कानडे, रामरावजी रावसाहेब येळमेल, दत्तोपंत, नरसप्पा, भवानसिंग, विठ्ठलसिंग वगैरे, नामदेव मंडळी, सर्व स्वामींचे चरणारविंदसेवेशी, सेवक भीमा उमदी याचा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार, विनंती, विज्ञापना. माघ शु. ६ पावेतो श्रीसद्गुरुसमर्थकृपेने सर्व आनंदरूप असो. विज्ञापना. तुम्हांकडून अलीकडे पत्र वगैरे येऊन, इकडील परामर्श घेऊन आनंद देणे व्यवसायामुळे आठवण नसलेने होत नाही. बाकी व्यवसायाची कसे झालेतरी आठवण राहतेच. त्याला इलाजच नाही. आता दोन्ही बाजूंची आठवण राहण्यासाठी दररोज निश्चयाने, निष्ठेने स्मरणपूर्वक असावे लागते, म्हणजे दोन्ही बाजूंची कर्तव्ये मनात व आठवणीत राहतात. असो. तिकडून सौ. मातोश्री आईबाई[1] यांनी मकरसंक्रमणाचे तीळ प्रवृत्तिमार्गाप्रमाणे रवाना केले ते पोचले. आनंद झाला. या मार्गाने तरी आठवण काढून दोन्ही मार्गांस

भूषण दिल्याचे श्रेय होऊन काही अंशी तरी आठवण झाल्याने समर्थांस मान्यच आहे. का तर दोन्ही बाजूंचे मार्ग समर्थकृपेचेच आहेत. त्यावाचून काहीही हलत नाही. असे असता एकदेशी होऊन आपआपल्या व्यवसायाचे आठवणीत व बंदोबस्तात गम्य होऊन एकदेशी मार्गाने वागणूक होत आहे. असो. यास एक उपाय आहे. समर्थांचा नेम निष्ठेने दररोज चालवला म्हणजे दोन्ही मार्गांची आठवण असते. असो. आता पाहा. हाच माझा धर्म होय, असे प्रवृत्तिमार्गाने समजून प्राणिमात्र वागत गेल्यास त्याच धर्माचा ठेवा ठेवा होऊन गोळा झाल्यास त्याला काळ (कालपुरुष) त्या व्यक्तीचा धर्म (स्वभाव) असे समजतो. त्याच्या धर्माचा व कर्माचा नाश करणे (निवाडा करून योग्य अयोग्य ठरविणे) हा माझा धर्म आहे असे कालपुरुष समजतो व जपतो (काळाकडे सर्वांचे चरित्र जपलेले असते. काही नाहीसे होत नाही.) त्यायोगे धर्मकर्मात सापडून भोग भोगावा लागतो. यासाठी समर्थवाक्य, धर्मामध्ये धर्म स्वस्वरूपीं राहणें हा स्वधर्म, असे असून त्या वाक्याकडे लक्ष जातच नाही. का म्हणालतर परंपरेने चालत आलेल्या व जडून गेलेल्या गोष्टीच अंतःकरणात ठरून गेल्याने त्या धर्मासच धर्म – स्वधर्म म्हणतो. स्वस्वरूपी राहणे हा ज्ञानमार्गाचा स्वधर्म असतो. त्याची वहिवाट व नेम अंतःकरणात न ठरल्याने असा प्रसंग येतो. असो.

सर्वांस वडिलांनी प्रार्थना फार फार सांगितले आहे. नेमाने, कट्टाने, निश्चयाने असणेबद्दल एकंदरांस त्रिकाळी चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे. तो सर्वांस श्रुत करावा. आता पाहा, 'वेळोवेळा शरण जावे'[२] अशा आधारे पूर्णिमेस समर्थांचे ठिकाणी (इंचगेरीस) येऊन सेवा करावी असा काही मंडळींनी निश्चय करून वर्ष होऊन गेलेतरी प्राण्यास (तुम्हांस ?) सवडच होत नाही. असे होण्यास मूळ नेमच करत नाहीत म्हणून असे विस्मरण होत जाते. असो. अभिज्ञ मंडळींस लिहावे, कळवावे, असे नकोच आहे. त्यामुळे तैसाच वेळ जातच आहे. असो. आता समर्थ मंडळींकरिता समर्थ वाक्याप्रमाणे, तिळाऐवढें बांधुनि घर । आंत राहे विश्वंभर । तिळाइतुकें हें बिंदुले ।

तेणें त्रिभुवन कोंदाटलें । हरिहरांच्या मूर्ती । बिंदुल्यांत येती जाती ॥ असे आहे. त्या आधारे मंडळींकरिता शर्करायुक्त तिळांची थैली म्हणजे मकरसंक्रमणाचे शर्करायुक्त हिरवे, पिवळे, तांबडे व धगधगीत पांढरे तीळ पाठवले आहेत, त्यांचा महाराज मंडळींकडून स्वीकार व्हावा. तुकारामांना हिरव्या रंगाचे, वैद्यांना पिवळ्या रंगाचे, नारायणराव, आलमेल व विष्णुपंत यांस तांबड्या रंगाचे आणि दत्तोपंत[३], नरसप्पा व नारायणरावांच्या मातोश्री यांना पांढऱ्या रंगाचे तीळ पाठवले आहेत. त्यांचा स्वीकार व्हावा. वर लिहिलेल्या कलमाचा अर्थ करून निरनिराळे उत्तर येईल अशी इकडील उमेद फार आहे. समर्थांचे ठिकाणी बराच उत्सव होत आहे व चालत आहे. पौर्णिमेस मंडळी येतात त्यायोगे आनंद होत आहे. आनंद देणाऱ्या मंडळींचा किंकर हेही आनंद मानून राहतात. चैत्र शु. १३ चा (निंबरगी महाराजांची पुण्यतिथी) उत्सव थाटाने होत आहे व करीत आहोतच. कळावे. कृपा–लोभ पूर्ण असो द्यावा. ही विज्ञापना. पुन्हा पौर्णिमेस तुमचे मुद्दाम आलेले पत्र पावले. ते पाहून वडिलांस फारच आनंद झाला. याप्रमाणे आठवण ठेवून सर्वांनी निरंतर सेवा घडवून घ्यावी अशाबद्दल वडिलांनी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे. महाराज बाबासाहेबांनी मुद्दाम येऊन वर्तमान सांगितले त्याचाही आनंद झाला. सारांश, सर्व प्रकारे सर्वांचे समर्थांकडे लक्ष असावे अशी प्रार्थना फार फार आहे. समर्थवाक्य, 'उपगतास गर्भश्रीमंत । बापनो आम्हास का बाउणे । बंधुवर्ग समस्त साधुसंत'[४] या वाक्याप्रमाणे तिकडून लिहून आले म्हणजे फार आनंद झाला. उत्तर सदरहूप्रमाणे वर लिहिले, रंगाप्रमाणे निवृत्तिमार्गाने उत्तर लिहाल अशी इकडील आशा फार फार आहे. कळावे. ही विज्ञापना.

नोंदी :–

१. बयाक्का गोडबोले. यांच्या तीन पिढ्या संप्रदायात आहेत. एक पिढी महाराजांची, दुसरी बाबांची व तिसरी गुरुदेवांची नामधारक असण्याचा प्रकार बऱ्याच कुटुंबांत दिसतो. इथे तसेच आहे. बयाक्का व त्यांचे यजमान

दत्तोपंत, मुलगा नारायणराव व सून लक्ष्मीबाई ही मंडळी महाराजांची नामधारक; नातू गोविंदराव बाबांचे शिष्य व नातसून या गुरुदेवांच्या नामधारक.

२. तोचि ज्ञानी खरा तारी दुजियांसी। वेळोवेळां त्यासी शरण जावें ॥ –(नित्यनेमावली, पृ. ९८.)

३. दत्तोपंत म्हणजे दत्तोपंत गोडबोले. वर एक आकड्याच्या नोंदीत असलेल्या बयाबाई म्हणजे यांच्या पत्नी होत. या दोघांनाही महाराजांनी पांढऱ्या रंगाचे तीळ पाठवले आहेत. ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीप्रमाणे महाराज तिळांचा रंग ठरवीत. इथे व पत्राच्या सुरवातीस बयाक्कांचा उल्लेख नारायणरावांच्या मातोश्री असा आला आहे. बयाक्कांनी महाराजांना तीळ धाडले होते.

४. माता पिता श्रीदेवी भगवंत । बंधुवर्ग समस्त साधुसंत । उपजताचि गर्भश्रीमंत। पूर्ण आम्हीच सभाग्यवंत । रे बापांनो आम्हांसी काय बा उणें ॥ –(नागप्प, पृ. १०३–१०४.)

xxxxx

पत्र २५७ पान २४९

नवीन
क्रमांक

७२ (टिपण :– ज्ञानमार्गाची पत्रे असा वेगळा विभाग आता ठेवलेला नाही. तारीख व तिथीप्रमाणे हे पत्र इथे येते. पत्राच्या सुरवातीस १२.२.१९०५ ही तारीख आहे पण अखेरीस जानेवारी १९०६ असे आहे. काही भाग आधी लिहून ठेवला असावा. पत्र नंतर पाठवले आहे. असे आणखीही काही पत्रांत झालेले आहे.)

उमदी माघ शु. ७
१२.२.१९०५

श्रीगुरुसमर्थ

कृपासागर सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री नरहररावसाहेब[१]

वकील, शहर विजापूर, स्वामींचे सेवेशी, आज्ञाधारक भीमा उमदी याचा अति नम्रतेचा त्रिकाळ शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. माघ शु. ७, तारीख १२.२.१९०५ इसवीपावेतो समर्थसद्गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. आपलेकडून अंबुराव महाराज इंचगेरी यांचे पत्र आले ते वडिलांचे आज्ञेवरून वाचून पाहिले. तेव्हा तुमचे आज्ञाधारक केशव यांस अति आनंद होऊन त्यांचा उत्साह पत्री लिहिण्यास पुरवत नाही असे झाले. अशीच निरंतर कृपादृष्टी होऊन मनाला परस्पर आनंद होत चालल्याने 'कृष्णा हालकारे । कृष्णा डोलकारे'[२] । याप्रमाणे काही अंश समर्थांस झाले. आता प्रवृत्तिमार्गाप्रमाणे शर्करायुक्त म्हणजे मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त, समर्थवाक्य तिळाएवढें बांधुनि घर । आंत राहे विश्वंभर या समर्थवाक्याचे आधारे पाठविले आहेत. हिरव्या, पिवळ्या, तांबड्या व धगधगीत पांढऱ्या तिळांचा जो जो वर्ण युक्त (योग्य) आहे, त्याप्रमाणे स्वीकार व्हावा. त्या त्या अर्थाचा उलगडा होऊन उत्तर येईल अशी उमेद इकडील फार आहे. अभिज्ञांप्रती सुचवावे असे मुळीच काही दिसून येत नाही. तत्रापि काही अंशी युक्त गोष्ट लिहावी लागते. सारांश ज्ञानमार्गात मूळ अग्नी व भक्तीस मूळ विरक्ती एतद्विषयी सुचवावे असे काही नाही. आता ज्ञानाची प्रचिती येण्यास अंतःकरणात अग्नी (तळमळ) होऊन क्षण न लागता तत्काळ खात्री होऊन जाते. पण व्यवसायात भूतदया व शरीररक्षण यांकडे कूटस्थात अंतःकरणापासून लक्ष असते ते प्राण्यास कळत नाही. त्यामुळे प्रचितीस अवधी लागतो. ज्याचे त्यास कळून येत नाही. असा शरीरभाव असतो. असो. जन्मादारभ्य परंपरेचे वहिवाटीप्रमाणे पडून गेलेने प्राण्यास अशी दशा येते. आत्मारामाकडे, 'भूतदया देव (ठेवा) मग काय उणें'[३] असे ठरत नाही. म्हणून काही अंशी नाम आहे किंवा नाही, दृष्टी आहे किंवा नाही, निरंतर पुढे प्रचिती आहे किंवा नाही अशी आठवण करावी. 'म्हणुनि गुरुसी भजावे । रूप ध्यानासी आणावे । देव गुरुपासी आहे । वारंवार सांगू काये'[४] ॥ असे समर्थवाक्य आहे. आता आणखी समर्थवाक्य नामरूपीं जडलें चित्त । त्याची घडावी संगती । (त्याचा दास मी

अंकित) अशा वाक्याधारे वागावे लागते. आता सहजी उगीच कल्पनेतील कल्परूपी (कल्पनारूपी) अज्ञानमते लिहितो. त्यास कोश, व्याकरण मुळीच येत नाही अशा मतिहीन किंकरास लिहिण्याचा मान दिला व उत्तर स्मरणपूर्वक आले. त्याप्रमाणे मतिमंदाचा काहीतरी कल्पित मजकूर आहे. सा (सहा)– गुणांची योग्यता जीवभावाने आहे (जीवाला सहा गुण चिकटलेले आहेत.) समर्थवाक्य– 'काम नसावा परस्त्रियेचा । क्रोध नसावा सत्पुरुषाचा । लोभ नसावा शरीराचा । मोह पुत्राचा बाधक।। मद नसावा सुऱ्हद (सुहृद) जाती । मछर (मत्सर) नसावा सर्वांभूती । तुझे वर्तणुकीची शक्ती । सांग ऐसी आहे की ।। काम असावा ईश्वर–भजनीं । क्रोध असावा इंद्रियदमनीं । तीर्थप्रसाद शेष ग्रहणीं । लोभ अपार असावा।। मोह असावा सज्ञनासी । मद असावा दुर्जनासी । मत्सर सदा संसारासी । असावा तो असे कीं'[५] ।। वर आहे तेच थोडा बदल करून पुढे लिहिले आहे 'काम असावा भक्तीविषयीं । क्रोध असावा शरीरभावाकडे । मद असावा वस्तूकडे । मत्सर असावा मायाकडे'[६] ।। असे सा (सहा) गुण डोळ्यांपुढेच असतात. तेच, बुद्धीचा पालट नासेल कुमती । होईल सद्‌भक्ती येणें पंथें ।। असा वाक्याधार समर्थांचा आहे. आणखी आधार मोक्षभागीं विभागीं । मोह जो त्यात विभागीं म्हणजे अर्धोभावितलोचन असे वाक्य आहे. तद्वत (दृष्टी) ठेवावी. म्हणजे निरंतर. 'तर' म्हणजे प्रवृत्तिमार्गात अकर्तव्य झाले, म्हणजे झाले. त्याचे नाव 'सहज समाधी । तुका म्हणे उपाधी गेली त्याची'[७] याप्रमाणे कृपासागर (संत) सकल गुणांत असलेतरी निर्गुण होऊन गेले. त्याचे नाव संपन्न. असो. ज्ञानमार्गाने अखंडित लक्ष्मी देणाऱ्या स्मरणाकडे लक्ष असावे, अशी सूचना. चिरंजीव म्हणजे चिरकाल जीवभाव जो आहे तो शिवभाव होऊन गेला म्हणजे झाले. 'बिंदु तीर्थरूप'[८] झाले म्हणजे झाले. याप्रमाणे होण्यास नाम दृष्टीखालून गेले म्हणजे दृष्टीत दृष्टी जडून गेली म्हणजे झाले[९].मग, तुका उतरला तुकीं । नवल झालें तीन्हीं लोकीं ।। असे झाले म्हणजे झाले. हा एकंदर मजकूर शुद्ध लिहिता येत नाही तरी क्षमा असावी. सवड होईल तेव्हा एकाग्र होऊन वाचून उत्तर लिहाल

अशी इकडील आशा फार आहे. कळावे.

नोंदी :-

१. नरहरराव कलमडी विजापूरला वकील होते. अत्यंत जिज्ञासू असून ज्ञानमार्गाची पत्रे त्यांना गेली आहेत. ते इंचगेरीस येऊन राहत असत.

२. कृष्णा हाल कां रे । कृष्णा डोल कां रे ॥ घडिये घडिये गुज बोल कां रे ॥ -(संतवचनामृत पृ. ५७)

३. भूतदया ठेवा मग काय उणें । -(नित्यनेमावली, पृ. ६२)

४. नित्यनेमावली पृ. ६७.

५. मुक्तेश्वर, सभापर्व, अध्याय ३, श्लोक १५-१८.

६. मुक्तेश्वरांच्या शैलीप्रमाणे महाराजांनी हा श्लोक रचला असावा.

७. नित्यनेमावली, पृ. ६२

८. रसानुभवात प्राप्त होणारे बिंदू हे बिंदुतीर्थ असा अर्थ केलेला ऐकला आहे.

९. दृष्टीत दृष्टी जडून जाण्याचा श्रीगुरुदेवांचा एक अनुभव होता असे कळते. भवतारक कवीचे दृष्टियोळगे दृष्टि निंतितु या पदात हा अनुभव वर्णिला असून हे पद गुरुदेवांना फार आवडे. विशेषतः त्या पदातील 'पर्वताग्र भूमियन्नु निर्विकार तोरितल्ला' (पर्वतशिखरापासून भूमीपर्यंत सर्व निर्विकार होते) हा अनुभव त्यांना होता. हे पद कन्नड परमार्थसोपान, पृ. २७० वर आहे.

xxxxx

पत्र ५६ पान ७७

नवीन
क्रमांक

७३ (टिपण :- ५५ व ५६ पत्रांत बरीच पुनरावृत्ती आहे. पत्राअखेर माघ व. ४ गुरुवार रवाना असे आहे. हे पत्र माघ शु. १२ ला लिहिलेले आहे. जवळजवळ एका आठवड्याने पाठवले.)

इंचगेरी माघ शु. १२
१६.२.१९०५

श्रीगुरुसमर्थ

महाराज वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री विष्णुपंत निंबरगीकर,

मुक्काम जमखंडी वगैरे मंडळी, ब्राह्मण व गृहस्थ सर्वांस, स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञाधारक सेवक अंबाजी इंचगेरी, याचा कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. माघ शु. १२ पावेतो समर्थ सद्गुरुकृपेने व आपले अनुग्रहेकरून सर्व मंडळी आनंदरूप असो. विज्ञापना. तुम्हांकडील कृपादृष्टी होऊन लोभाची वृद्धी वेळोवेळा व्हावयाची, ती व्यवसायात सवड न झाल्याने, इकडील आठवण अंतःकरणात होऊन उत्साह होण्यास अवधी होत चालल्याने इकडे फारच आश्चर्य होत आहे. व्यवसायाचे गोष्टीस, मन कैसे झालेतरी, आठवणीने स्मरणपूर्वक निश्चयाने वागावे लागते यास भागच नाही. भक्तीकडे कैसे झालेतरी चालते कारण समर्थकृपेने दोन्ही प्रकारचे मार्ग त्याचेच आहेत म्हणून चालत आहे. असो. अभिज्ञांस फार लिहावे असे नकोच आहे. पूर्वापार सर्व प्रकार समजूनच आहांत. असो. न होण्यास कारण नेमनिष्ठा दररोज कट्टाने, निश्चयाने होत नाही. 'मागील उजळणी पुढे पाठ'[1], जास्त जास्त वेळ प्राण्यास सापडत नसल्याने अशी दशा होत चालते, तसे काही सुज्ञांकडून होत नाही, योग्य कारणावाचून वेळ घालवणार नाहीत असे समजूनच आहो. इकडे इंचगेरीस समर्थ यांचे स्थापना-ठिकाणी पौर्णिमेस बरीच मंडळी येतात. भक्तीचा थाट होत आहे. श्रावण, मार्गशीर्ष व चैत्र शु. १२/१३ हे उत्सव थाटाने झाले व होत आहेत. सर्वांनी भक्ती वाढविणेकडे लक्ष व अंतःकरण दिलेने भक्ती वाढत चालली आहे. काही मंडळी नेमाने दर पौर्णिमेस येतात त्यायोगेकरून भक्तमंडळींचे सेवकास (स्वतः बाबांना, कारण तेच सर्वांची सेवा इंचगेरीस करत होते !) बराच उत्साह येत आहे व वेळ चांगला जात आहे. या व्यवसायात काही वेळ नेमून ठरून गेल्याने त्या मंडळींची समर्थांचे ठिकाणी सेवा घडून येते. वेळोवेळा त्यासी शरण जावे या वाक्याप्रमाणे सेवा होते. प्राण्यास काहीतरी अटक असल्याने (अमुक एक वेळ नेम झाल्याशिवाय जेवणार नाही, अशा तऱ्हेचा नेम म्हणजे अटक. साधकाने स्वतःला काहीही अट घालावी), आठवण राहते, नाहीतर मदांध होऊन जातो. म्हणून नेम-निष्ठा असे कट्टाने वागावे लागते. मोक्षमार्गी विभागीं अशा वाक्याधारे चालले म्हणजे कळून येते.

आता समर्थ मंडळींकरिता समर्थ वाक्याधारे तिळाएवढें बांधुनि घर । आंत राहे विश्वंभर । तिळाइतुकें हें बिंदुलें । तेणें त्रिभुवन कोंदाटलें । हरिहरांच्या मूर्ती । बिंदुल्यांत येती जाती । मकरसंक्रमणाचे हिरव्या रंगाचे, पिवळ्या रंगाचे, तांबड्या रंगाचे व धगधगीत पांढऱ्या रंगाचे तीळ शर्करायुक्त, थैलीमध्ये पाठवले आहेत, त्यांचा स्वीकार व्हावा. ज्याचे त्याचे योग्यतेप्रमाणे त्या त्या रंगाचा स्वीकार व्हावा. वर लिहिलेले कलमांचा अर्थ होऊन युक्त उत्तर येईल अशी इकडील उमेद फार फार आहे. समर्थांचे वर लिहिलेल्या मोक्षभागीं विभागीं या वाक्याप्रमाणे वाक्य– 'समर्थाचे या सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे'[२] ।। या वाक्याधारे व अर्धोभावित लोचन स्थिर मनो नासाग्र धत्ते रगाः ।। या वर लिहिलेले वाक्याधाराप्रमाणे आहांत. 'सुई सुहागी सुमनुष्य पाही । मध्यस्थ पडिले ज्या ठाई । तेथें द्वैत न दिसें कांहीं । एके ठायीं करिती की'[३] ।।

आपलेकडील वर्तमान दातार याचे पत्रावरून समजले. असे प्रसंग प्राण्यास घडून येतात. यास उपाय एक. प्रवृत्तिमार्गाने देवाची भक्ती करणे आहेच. तद्वत् इकडील सांगणे असे आहे की या व्यवसायात प्रवृत्तिमार्गाचे धर्माप्रमाणे वागावे लागते, ते अखेरचे नव्हे. करिता निवृत्तिमार्गाने हरिमाया होऊन (मायेचा अर्थ समजून व तिच्यातून बाहेर पडून) ज्या ठिकाणी राहण्याचा प्रसंग आला आहे, त्या ठिकाणी वर लिहिलेली देवाची भक्ती व अहोरात्र पुरश्चरण होऊन, नेम नेम नेम करून स्मरणाची संख्या वाढवून पुण्याचा ठेवा ठेवा करून वेळ काढावा, म्हणजे सर्व निर्विघ्न होऊन, मनास आनंद होऊन, पुन्हा असा प्रसंग प्राण्यावर कधी येणार नाही असे करून समर्थ आपले भक्तास आनंदात ठेवतात. यासाठी समर्थवाक्य– 'नाम कायउदु, नामध बलऊ ओंनाम कायउदू'[४] असे महाराजांचे (निंबरगी महाराजांचे) पद आहे. हे सर्व जाणूनच आहांत. याप्रमाणे मुख्यांनी प्रार्थना करून आपले चरणी मस्तक ठेवून अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो श्रुत व्हावा. नंदेप्पा, वीरभद्रप्पा यांसही सवड सापडेल तेव्हा काळजीने

पत्र दाखवून त्यांसही उत्तर लिहिण्यास सांगावे. ही गोष्ट महादेवाने (महादेव भटजी निंबरगी ?) करावी अशी फार फार प्रार्थना सांगितली आहे. त्या मंडळींनी समर्थांची स्थापना करून उत्सव, परंपरा चालणेजोगा थाट केला, त्या उपकारातून उत्तीर्ण होणे समर्थावाचून आम्हा पामर जन्म घेणाऱ्यांस काय घडणार आहे ? म्हणून वडील अप्पांनी लिहिणेस सांगितलेवरून लिहिले. चैत्र शु. ९ स समर्थांचे ठिकाणी इंचगेरीस सुरू करून १३/१५ पर्यंत उत्सव व्हावा असे वडिलांचे मत आहे. (ही निंबरगी महाराजांची पुण्यतिथी). बाकी मजकूर सर्व आनंद आहे. कळावे. सुज्ञांप्रत विशेष काय लिहिणे ? ही विनंती.

मिती माघ व. ४ गुरुवार रवाना.

आपला किंकर अंबुराव

सवडीप्रमाणे उत्तर लिहून येईल अशी आशा आहे. खुलासेवार सर्व लिहावे व त्या मंडळींसही उत्तर लिहिणेस गाठ पडेल तेव्हा एकंदरांस... सांगावे.

नोंदी :-

१. मागील उजळणी पुढें पाठ । -(दासबोध, १२.९.१०.)

२. समर्थाचियां सेवकां वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे । -(मनाचे श्लोक, ३०.)

३. सुई सुहागी सुमनुष्य पाही । मध्यस्थ पडिली जिये ठायीं । तेथें द्वैत न दिसें कांहीं । एके ठायीं करिती की ॥ -(भक्तविजय, २८.५९.)

४. ॐ नाम कायुवदु नामद बलवु ॥ -(निंबरगी महाराजांचे पद.)

xxxxx

पत्र ५७ **पान ८०**

नवीन
क्रमांक
७४ (टिपण :- या पत्रात शेतीबद्दलच्या कायद्याचे फार शब्द आहेत.

त्यांचा अर्थ कळत नाही.)

उमदी माघ व. १२
३.३.१९०५

श्री

कौलनामा (करार) पिरू बिन भीमण्णा खांडेकर राहणार कात्राळवाडी सूरसन (सन) १३१४ फसली. मौजे कात्राळ येथील आमचे देशपांडेपणाचे इनाम नंबर एकर गुंठे आकार रु. १० चे जतुल्ला (कर) मागे आठ वर्षे १५ रुपये प्रमाणे ठरवून दिले होते. त्याचा आकार दरसाल दहा रुपये दहा आणे हप्ता परभारे दिला, ते एकूण ८५ झाले. बांधास २६ घातले ते अण्णप्पाचे व कृष्णरावांचे निरोपाने दिले आहे. १० रुपये भीमराव यास दिले. तपशील– सारा ८५, बांध २६, रोख १०, एकूण एकशे एकवीस १२१ झाले. आता पुढे पेस्तर (पुढील) व १३१५ ते १३१६ दोन साल १५ रुपयांस चालून देऊ. त्याप्रमाणे बालगावकर यांचे निम्मे हिश्शाची त्यांची कबुली यावर सही करवून घेऊ. दोन साल झाल्यानंतर दोघांचे संमतीप्रमाणे रजिस्टर ठरवून घेऊन कबुलायत घेऊ. सदर दोन सालांचा हप्ता निम्मा निम्मा परस्पर ज्याचे त्यास देऊन पावती घेणे. एकाचे एकास देऊ नये. दिलेतरी ते तुमचे तुम्ही सोसले पाहिजे. याबद्दल तक्रार ऐकणार नाही. हे लिहून दिले. तारीख ३ मार्च १९०५ इ. दस्तुर खुद्द.

सही– व्यंकटेश खंडेराव देशपांडे

पत्र ५८ **पान ८०**

नवीन क्रमांक ७५ उमदी फाल्गुन शु. ९
१५.३.१९०५

श्री

राजमान्य राजश्री श्री. रामचंद्रपंत होर्तीकर मुक्काम सिंदगी स्वामींचे

सेवेशी, पोष्य कृष्णाजी व्यंकटेश देशपांडे, मौजे उमदी, कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती. फाल्गुन शु. ९ पावेतो समर्थ कृपेने सर्व आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र आले. मजकूर समजून वडिलांस फारच आनंद झाला. ऐशी स्मरणपूर्वक आठवण होईल तेव्हा समाचार कळवीत असावे. ज्ञानमार्गाचे पत्राची नक्कल तुम्हांकडे पाठवली आहे. ती पाहून, मनन करून, जितके अर्थ होतील तितकी उत्तरे लिहिणेस उद्युक्तता व्हावी अशी इकडील उमेद फार आहे. हणमंतराव वगैरे घरचे मंडळींस वडिलांनी नेमाबद्दल फार फार प्रार्थना सांगितली आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. आता मनाची ओढी जात नाही असे पत्रात दर्शविले, त्याबद्दल वडिलांनी असे सांगितले आहे की, 'आकाशाची करवेल चौघडी । मेरूची बांधवेल पुडी । परि मनाची ओढी । तोडवेना[1] ॥ असे समर्थवाक्य आहे. तद्वत आपणही याचा विचार लिहिला, त्याबद्दल समर्थवाक्य– मत जाय तो जाईंगा । शरीर मत नहि जाना । शरीरभाव मनाचे भावाकडे देऊ नये, एवढेच समर्थांचे सांगणे आहे. आता रामदास स्वामी प्रपंचात नसून त्यांनी मनाच्या ओढीबद्दल २१० श्लोक केले आहेत. समर्थांची मनाचे ओढीने किती फजिती केली आहे. तत्रापि त्यांनी मनाची ओढी तोडून शरीरभाव मनाचे ओढीकडे न देता, गुरुभक्तीस विटाळ न करिता वागलेने किती धन्य धन्य म्हणविले गेले व या जगात कीर्ती होऊन आजवर त्यांची कीर्ती व उपकार या जगाने आभार मानून घेतले. त्यांचे शर्तीप्रमाणे विश्वासाने वागले असता प्रपंचात व परमार्थात दोन्ही ठिकाणी आनंद आनंद मानून घेत आहेत. तद्वत् आपणही मनाचे ओढीबद्दल लिहिले, त्याबद्दल आपणांस मजकूर विदित केला आहे. आपण सुज्ञच आहां. विश्वासुक आहां, म्हणून प्रार्थना वडिलांनी फार फार सांगितली आहे की, होईल तितके निष्ठेने चालावे असे सांगितले आहे, ते श्रुत व्हावे. समर्थवाक्य, 'ज्यांनी विठ्ठलमात्रा घ्यावी त्यांनी पथ्य सांभाळून असावे[2]'. तद्वत् आपण आहांच आहां असे लिहावे हे काही मुळीच दिसून येत नाही. सुज्ञच आहां. आता ज्ञानमार्गाचे सर्वांस लिहिलेले पत्राची नक्कल व हे पत्र दोन्ही शिवून मात्र घातले आहे.

तिकिट लावले नाही. नॉट पेड करून पाठवले आहे. तेथे आपणच चार पैसे देऊन घ्यावे. याबद्दल क्षमा असावी. अर्धा आणेचे तिकिट लावले असता दुबार पडेल म्हणून लावले नाही. हे सर्व वाचलेबद्दल व किती रोजांत पोचलेबद्दल व समजलेबद्दल खुलासेवार उत्तर जरूर जरूर पाठवावे. कळावे. लोभ करावा ही विनंती.

नोंदी :-

१. संदर्भ मिळाला नाही.

२. संदर्भ मिळाला नाही.

xxxxx

पत्र २११ पान २०८

नवीन
क्रमांक

७६ (टिपण :- या पत्रावर तिथी-तारीख काहीच नाही. मजकूर ५८ पत्राचा ताजा कलम असल्यासारखा आहे. विषय पाहून इथे आणले.)

मन मी भक्ती करत आहे असे दाखवते. पण भक्ती विषयांवर असते. ती ज्याचे त्यास कळून येत नाही. लाभ झाला म्हणजे भक्तीस श्रेष्ठ मानून घेऊन भक्तीकडे ओढी आहे असा देखावा दाखवून आपण विषयांचे वाटेने चालते. त्या वाटेने कोणाला लाभ व सुख मिळाले हे माहीतच आहे. मनाचे ओढीने प्राणी विषयासक्त होतो. आत मन लाभ-तोटा यांचे मागे असलेने दोन्ही ठिकाणी विषयांत आसक्त असतो. मुळी मनच हातांत आले नाही तर सद्गुरू काय करतील ? 'आधी मन मुंडा बा मन मुंडा । मग तुम्ही परब्रह्म धुंडा'[१] असे वाक्य समजूनच आहां. ज्याचे त्यास कळत नाही. त्या योगाने भक्तीचे ठिकाणी खबरच नसते. बेखबर होतो. विषयाची ओढी अशी आहे. 'विशयदास म्हणविला गेला। भक्तराज केवि होई'[२]॥

27.6.21
24.1.23
(अं)
DC.

नोंदी :-

१. पदसंग्रह । – (माणिकप्रभू.)

२. तैसा विषयदास मानावा । भक्तराज केवीं ॥ –(दासबोध, ५.३.६८)

xxxxx

नवीन क्रमांक ७७	**पत्र २५८** उमदी	**पान २५१** चैत्र व. ३० ४.५.१९०५

श्रीगुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य राजश्री नरहरराव रावसाहेब वकील, शहर विजापूर, स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञाधारक भीमाजी व्यंकटेश देशपांडे याचा कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. विनंती. चैत्र व. ३० तारीख ४ माहे मे सन १९०५ इसवीपावेतो श्रीसमर्थसद्गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. आपले पत्र येऊन बरेच दिवस झाले. त्याचे उत्तर लिहिण्यास सुस्ती झाली. तथापि आपलेकडून उलट स्मरणाने काहीतरी आज्ञापत्र येईल व त्यायोगेकरून पुन्हा आणखी काहीतरी ज्ञानमार्गाचा मजकूर सुचवून परस्पर मनात आनंदाची वृद्धी होत चालेल अशी युक्ती योजणारच (असे वाटले होते की आपणच काही विषय सुचवाल). परंतु व्यवसायात स्मरण राहिले नाही, आठवण होत नाही. असो. पूर्वीचे आपले पत्रात, तिळाएवढें बांधुनि घर । आंत राहे विश्वंभर। याबद्दल असे दर्शविले आहे की विश्वीं विश्वंभर या वाक्यावरून पाहता स्थावर जंगमात्मक सकळ विश्वामध्ये परमात्मा व्यापक रूपाने भरला असूनही त्याने आपले निराळे घर बांधून कधी, कसा व कोठे राहिला, म्हणून.

(१) आता सहज उगाच याबद्दल अनमान (संशय)– जर जगभरित सर्वांठायी ओतप्रोत भरून आहे असे वाक्य आहे, तर नाहं वसामि वैकुंठे । योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायन्ति । तत्र तिष्ठामि नारद ॥ हे

वाक्य आणि वर लिहिलेले जगभरित असून रिता ठाव नाही असा निष्कर्ष या शर्तीला मेळ कसा घ्यावा ? एके ठिकाणी मजवाचून रिता ठाव नाही म्हणतात, पुन्हा नाही वैकुंठाचे ठायी, नाही योगियाचे हृदयी, माझे भक्त गाती जे ठायी, तेथे मी तिष्ठतो नारदा, या शब्दांवरून संद्युक्त (संशय) पडत आहे. याबद्दल चांगला अभिज्ञांनी विचार करावा.

(२) समर्थवाक्य, मनुष्याकडून, श्वापदाकडून, रात्री अगर दिवसा तुजला मरणच नाही असे हिरण्यकशिपूस वरदान दिले; पुन्हा देवाने नरसिंह अवतार घेऊन हिरण्यकशिपूचा वध केला, हीही गोष्ट देवाचे विरोधात आली की दोन गोष्टी कधीही होऊ नयेत असा सिद्धांत असताना नदीचे मूळ व ऋषीचे कूळ कोणी काढीत जावे ? असो. सर्व जगात भरून असून रिता ठाव त्यावाचून नाही असे म्हणून पुन्हा मी वैकुंठाचे ठायी नाही योगियांचे हृदयी नाही असे वाक्य आहे.

(३) आता सहजी अनुमान केले असता भक्तविजयात भानुदासाचे[1] गबाळ्यात सान होऊन कसा राहिला ? अशी वाक्ये असलेले आपण ऐकलेच असेल. गवळ्याचे[2] डेऱ्यात कसा लपला होता ? हे वाक्य भक्तविजयात आहे. आता या एकंदरांवरून पूर्वी लिहिलेली शर्त तिळाएवढें बांधुनि घर । आंत राहे विश्वंभर । व ही वाक्ये यांत विरोध येण्यास व अनमान पडण्यास काय आशंका आहे ? शिवाय सावता माळी[3] याचे पोटात शिरून राहिला असेही वाक्य आहे. हे एकंदर आपण जाणत आहांच.

(४) आता ज्ञानास व आत्मज्ञानास एकच म्हणणे हेही संशययुक्त आहे. आत्मज्ञान जे आहे ते निःसंशय निर्भय असून तिथे कोणत्याही प्रकारचे संद्युक्त (संशय) राहत नाही. फक्त ज्ञानमार्गात (नुसत्या ज्ञानमार्गात किंवा शब्दज्ञानात) संशय पडून राहतो. संशयात्मक होतो. त्यास ज्ञान म्हणणे उक्त होईल काय ? असे अनुमान केले असता काही अंश मनास संद्युक्तता पडत आहे.

(५) आता रेडा बोले या शब्दांचे निरसन करण्यास पुरावा गुरुचरित्रात[4] अध्याय २६/२७ या ठिकाणी गुरूंकडे (नरसिंह सरस्वती) अन्य यातीचे मनुष्याकडून वेद म्हणवून गर्विष्ठ ब्राह्मणांचा गर्व परिहार केला असे

आहे. या शर्तीवरून रेड्याचे मुखाने वेद म्हणविला अशा शर्तीला संद्युक्त होत आहे की नाही याचा विचार करावा.

(६) सान रूप होण्याला आणखी गीतेत अकराव्या अध्यायात विश्वरूप दाखवलेनंतर सान रूप दाखवले असे आहे. सान सान रूप होई अशी अर्जुनाने परमात्म्यास विनंती केली. यावरून जगभरित स्थावर जंगमात्मक जागांत भरून राहिला यांत अनमान (संशय) येतो. विश्वरूप लहान व थोर कसे झाले व भय-भीती अर्जुनास कशी झाली हे अनुमान केले असता संद्युक्तता होत आहे.

(७) आता तिळाएवढें बांधुनि घर याचा अर्थ. 'ती' म्हणजे हरिमाया होऊन ज्ञानदृष्टीतून 'धुनि' म्हणजे निर्दोष होऊन गेले. या दृष्टीस विश्वाचे ठिकाणी भरून 'आंबर' म्हणजे समाधान (?) व 'नभासारिखे रूप या राघवाचे । मनीं चिंतिता मूळ तुटे भवाचे'[५]॥ असे होत आहे. नंतर हरिभक्ती करो वा हरभक्ती करो, त्या ठिकाणी मूर्तिमंत दर्शन, स्पर्शन, संभाषण या योग्यतेस पोचला असा सिद्धांत झाला. अशा विचाराने ज्ञानमार्गाच्या गोष्टी समजून घ्याव्या लागतात, अर्थ करावा लागतो.

(८) आता 'ज्ञानोबाने रेडा बोले भिंत चाले महिमा ज्ञानदेवाची' असे आहे. रेडा म्हणजे 'रेडका मदन तो केवळ पंचानन'[६] असा अष्टांग भावांनी नीच कुळातील प्राण्याकडून वेद अक्षरे बोलविली. भिंती याचा अर्थ हरिमायेने नाना प्रकारे परद्रव्य, परस्त्री व जमीन या तीन्हीमध्ये मातीचे शरीर पडून त्यांतच जन्मादारभ्य मरमरून जातात. त्यामुळे हरिमायेला भिऊन गुरुकृपेने भक्ती चालविलीतर महिमा म्हणजे मही, म्हणजे पृथ्वीचे नाव, या ठिकाणी हरिमायेचे योगाचे महिमा वाढविला गेला (?) असा उगीच कल्पनेतील असा कल्पित मजकूर सलगीने लिहीत आहे ते मान्य करालच. परंतु कूटस्थातील भाव ज्ञानदृष्टीस पोचल्यावाचून ह्या भावाची मनाची खात्री होईल की नाही असा संशय आहे.

(९) आता 'चौदासे' म्हणजे, 'चौ' या शब्दाचा अर्थ नामामृत घेतले. 'दा' म्हणजे दहा इंद्रियांचे ठिकाणी आपोआप तत्त्वांत समाधान होऊन धादांत होऊन गेले, म्हणून चौदासे असे चांगोबाचे गोष्टीत आहे. आता वाघावर

बसला म्हणजे कानडीत म्हण आहे, समर्थवाक्य आहे, ‘ये इदा हुली पंथा मनसु साधा माडिदने’[७] म्हणजे साहा गुण, काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, अहंकार वगैरे. दहा इंद्रिये त्याचे नाव साधा. वाघ म्हणजे मन जे आहे तो वाघ आहे असे कवि लोकांनी लिहिले आहे. त्या आधारे उगीच कल्पित कळवितो.

(१०) आता सहजी कबीरदासांचे वाक्य, ‘चेरका तेरी रंग फिरंगे, तरी गुं गुं गुं बोले’[८] याचा अर्थ– चेरका म्हणजे चार का म्हणजे चार वर्णात आपापले वर्णांची श्रेष्ठता धरून, आत्मज्ञानाचे ठिकाणी शरण जाण्यास अभिमान धरून (अभिमानाने आत्मज्ञानाला शरण जात नाहीत. वर्णाचा अभिमान धरतात), वर्णाच्या अभिमानात राहतात. रंग फिरंगी म्हणजे मस्तकात वर्णाचा रंग (अभिमान) शिरून अहंकार चढला आहे. त्या अहंकारास फिरून (फिरवून, बाजूला करून) शरण जा. (बिरंगी असा मुळातला शब्द आहे, तो फिरंगी असा लिहिला आहे व त्याचा अर्थ फिरवून असा केला आहे.) गुह्य गुह्य गुह्य म्हणजे आईचे पोटात ९ मास गर्भात जी गुह्य भक्ती होते तिचेवर सद्गुरू कृपा करतील असा अर्थ संद्युक्तावर आहे. अर्थ केला असता होत आहे. हेही कल्पातील (कल्पनेतील) आहे. हा अर्थ आपण मान्य करालच.

(११) आता प्रल्हाद भक्तामाजी प्रल्हाद भक्त श्रेष्ठ म्हणविला गेला. त्या प्रल्हादास देव तीन वेळा म्हणाले की, अरे प्रल्हादा, कूटस्थातील भाव मला दे. असे म्हटल्याबरोबर त्या प्रल्हादाने उत्तर दिले की महाराज मी आपला आहे. सर्व भाव देवा तुला मी अर्पण केला आहे. मजजवळ दुसरा भाव नाही, आणि मला भाव कूटस्थातील दे म्हणता. जर मजजवळ काही असते तर आपण विषातून, अग्नीतून व नाना प्रकारचे विघ्नांतून कसे पार पाडले असते ? असे म्हणालेबरोबर न ये ज्वाळ विशाळ सन्निध कोणी । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी । असे उग्र स्वरूप घेतले. तेव्हा तेहतीस कोटी देवादिक सन्निध येण्यास भीत होते. पुष्पवृष्टी केली, दुंदुभी वाजविली परंतु सन्निध कोणी गेला नाही. तेव्हा देव प्रल्हादास, भक्तांमाजी प्रल्हाद भक्त असे म्हटल्याबरोबर येऊन समोर उभा राहिला.

नंतर देवाने, काय मागतोस माग, असे वरदान दिले. असे म्हणालेबरोबर, माझा बाप राक्षस हिरण्यकशिपू यास मुक्ती दे, असे बोललेवर देव हसून बोलले, आता तुझे कूटस्थात हिरण्यकशिपू राक्षस असा भाव कसा होता ? असे म्हणालेबरोबर निरंतर देवाचे चरण मागून घेतले. याप्रमाणे समर्थांची वाक्ये आहेत. या सर्व वाक्यांकडे मन देण्यास, अगर सर्व वाक्ये निरसन करून घेण्यास याचा खरा अर्थ मनात उतरण्यास आत्मज्ञान पाहिजे. त्यावाचून मनास संद्युक्त पडून दोन अर्थांकडे मन जाते. दोन अर्थ होत आहेत. त्यायोगेकरून मनास संद्युक्त पडत आहे. त्याकरिता आत्मज्ञान साधले पाहिजे म्हणजे सर्व निरसन होत आहे.

(१२) आता तुकारामांचा अभंग 'च्यार कोटी येक लक्ष । चौतीस सहस्र स्पष्ट सांगितले हे तुका'[९]। याचा अर्थ- चारी अवस्थांत चारी प्रहरांत एक लक्ष म्हणजे गुरुवाक्याकडे लक्ष. पुढे चौ म्हणजे नामामृत व ती म्हणजे हरिमाया, सहस्र म्हणजे गुरुतत्त्व स्पष्ट सांगितले. 'हे तुका, हे तुका' याचा अर्थ अनुमान केले असता होत आहे. परंतु हा अभ्यासच नाही. फक्त चार कोटी अभंग कैसे प्राण्यास सापडावे, कधी वाचावे, मुक्ती कधी व्हावी असे वाटते. यास उपाय एक. आत्मज्ञानावाचून दुसरा उपाय नाही. हा एकंदर मजकूर मनन होऊन सवडीप्रमाणे उत्तर येईल असे करावे.

(१३) तुका उतरला तुकीं । नवल आलें तीन्हीं लोकीं । म्हणजे स्वर्ग, मृत्यू पाताळी नवल झाले, असे होत आहे. तसाच अनुभव तीन्ही म्हणजे द्रव्य, दारा, भूमी या तीन्हींत सापडून मरमरून जातात त्या लोकांत नवल झाले, आश्चर्य मानले असा अर्थ घ्यावा.

(१४) तुकाराम महाराजांचे अभंगांचे गाथेत असे म्हणणे आहे- 'जन्म नाहीं, मरण नाहीं, पुन्हा आईचे गर्भात येणार नाहीं'.[१०] आणखी समर्थवाक्य, 'प्राण्यास येणें नाहीं जाणें नाहीं, जन्म नाहीं, मृत्यू नाहीं । परमात्मा तो तूं जाण'[११]॥ तुकारामांचे वाक्य, 'पाहा पाहा डोळेभरीं मूर्ती सावळी गोजिरी'[१२]॥ अशा शर्तीवरून 'नर करणी करी तो नारायण हो गया'[१३]।

असा आधार सोडून पुन्हा तुकारामांनी तुका म्हणे गर्भवासीं, सुखें घालावें आम्हांसी'[१४] असे मागणे मागतात. या ठिकाणी काही अंश संदेह पडून मनाची पक्की खात्री होत नाही. या ठिकाणी गर्भवास याचा दुसरा अर्थ असावा अगर व्हावा असे अनुमान होत आहे. कारण वरील कवित्व लोकांचे (वर दिल्याप्रमाणे रामदास-तुकाराम यांचे) शर्तीस बाध येते. यावरून संशय येऊन आपणांस कळविले आहे. तर हाच अर्थ खरा आहे किंवा दुसरा अर्थ असेल याचे उत्तर येईल म्हणून इकडील उमेद फार आहे.

(१५) आता, 'वाल्मीकीनें जेथें तप केलें तें वन पावन जाहलें । शुष्क काष्ठीं अंकुर फुटले तपोबळें जयाचे'[१५]. प्रवृत्तिमार्गात अर्थ शुष्क काष्ठास अंकुर फुटले असा आहे. आता निवृत्तिमार्गात शुष्क म्हणजे केवळ अन्य (दुसऱ्या किंवा परमार्थाच्या) भावाने वागणारे. अशा प्राण्यावर सद्गुरूने कृपा केलेबरोबर ज्ञानअंकुर फुटून कामहटी गेले (सत्कर्म तडीस गेले) म्हणून धन्य धन्य म्हणविला गेला, असा अर्थ घेतलेस ज्ञानमार्गास योग्य होत आहे. परंतु शब्दज्ञानाने कोश, व्याकरण यांचा अभ्यास होऊन जडून गेल्याने कूटस्थातील, अंतःकरणातील निःशब्दाचे शब्द, 'आ' म्हणजे असमाधान, 'शु' म्हणजे शुष्क मनुष्य, अकर्तेचा, असा शब्दाचा भाव आहे (या वाक्याचा अर्थ कळत नाही.) सद्गुरुकृपेवाचून हा भाव निष्पन्न होत नाही. सद्गुरुकृपेचा, अपरोक्ष ज्ञानाचा अंकुर जो आहे, त्याचा अर्थ निष्कामातील आहे. कामिक भक्ती व ज्ञान जे आहे, ते गुरुकृपेचे, प्रवृत्तिमार्गातील सुकृतातील पुण्य आहे (स्वतः साधनाने मिळवलेले नाही, गुरुकृपेने आयते पदरात पडलेले आहे) त्याने इंद्रपदवी साधली अगर शिवरूप होऊन गेले, तरी 'ते पुण्य सरताच धकलून देती । देवपदवी जो जैसा तैसा'[१६] ।। (इथे गुरू म्हणजे व्यवहारातील गुरू आणि सद्गुरू म्हणजे आध्यात्मिक गुरू असे धरले म्हणजे बरोबर अर्थ लागतो.) आता सद्गुरुकृपेचे पुण्य असलेस सायुज्यतेचा अधिकारी होतो, आत्मस्वरूपी राहतो. 'आत्मस्वरूपीं म्हणजे आत्मरूपीं, म्हणजे आपलें रूप, आपले रूप म्हणजे स्वस्वरूप, स्वस्वरूप म्हणजे आरूप,

तत्त्वनिरसनाउपरि'[१७] असे दासबोध दशक १३ समास २ ओवी ३० मध्ये आहे. ते वर लिहिलेले प्रवृत्तिमार्गाचे गुरुकृपेचे पुण्य, सुकृत संपताच ढकलून देती असे वाक्य दासबोध दशक ४, समास १०, ओवी २६ मध्ये आहे. आता सद्गुरुकृपा व गुरुकृपा या दोन्ही मार्गांस एक म्हणणे अगर दोन्ही ज्ञाने एक आहेत असे समजणे यात संद्युक्तता पडते (इंद्रपदवी देणारी ती गुरुकृपा, सायुज्य देणारी ती सद्गुरुकृपा.) मग भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासका जनाः असे होते. याबद्दल दासबोध दशक ३ समास ९ यात मृत्युनिरोपण आहे. त्यात सुकृतातील जे आहे ते भोगण्यास फेरीत गेले (जन्म मरणाच्या फेरीत सापडले.) 'गेले, येकच उरले । स्वरूपाकार जे झाले ते'[१८] असे आहे.

(१६) आता रामदासांचे नित्य नैमित्तिक ग्रंथसंग्रहातील स्फुट समासात ज्ञान कशास म्हणावे, माहात्म्य व महंती, आत्मज्ञानास महत्त्वाचा (अभिमानाचा) विटाळ कसा होतो असे सर्व आहे. दोन्ही मार्गांचे ज्ञान एकच म्हणणे, गुरू व सद्गुरू एकच म्हणणे, अगर दत्तांनी किंवा आत्मज्ञानी संतांनी महंती केली असे शब्द निवृत्तिमार्गातील ज्ञान नव्हे. शब्दज्ञानाचे मार्गाची वहिवाट पडून गेलेने व जडून गेलेने त्या ज्ञानास ज्ञान म्हणावे का असा संशय येतो. अभिज्ञांनी सहजी मनन करून पाहिले असता खरे काय व खोटे काय याचे अनुमान होईलच. परंतु यास सत्संग पाहिजे.

याप्रमाणे लिहिण्यास आपलेकडून पत्राने आज्ञा झालेवरून आणखी चार ओळी जास्त झाल्या तरी हरकत नाही, अर्थ समजणेजोगे लिहावे अशी आज्ञा झालेने हा वर लिहिलेला मजकूर सुचून आलेने काही काही लिहिणे झाले. ते आपले कर्तव्यावरून झाले म्हणून आपले आभार मानत आहे. त्यात चुका, शंका, अडाणी मते असतीलतर ती काढून पुन्हा सुचवून द्याल, तर बरेच उपकार होतील. ते उपकार फिटण्यास काही केलेतरी किंवा लिहिलेतरी उपकार फिटणार नाहीत. का म्हणालतर पामर जन्म फार खोटा असा विसराळू आहे. याबद्दल कविवाक्ये – 'पामर जेन्म इदु बहु खोट्टी । याकागबारदु गुरु विगे

भेटी'[१९] ।। 'ह्यांग तीरीतु नीम्म उपकारा । गुरुराया गंभीरा'[२०] ।। या दोन्ही वाक्यांप्रमाणे तुमचे लिहिणेचे योगाने सर्व झाले. आपली कृपा निरंतर मनात राहून आणखी लिहिण्यास सुचवाल अशी आशा बाळगून आहे. कळावे. कृपा-लोभ निरंतर असू द्यावा, ही विज्ञापना.

वैशाख शु. ७ शके १८२६ फसली १३१४.

नोंदी :-

१. ऐसें म्हणोनि जगज्जीवन । तात्काळ रूप धरितसे सान । भानुदासासी बोले वचन । सांबळींत घालून मज नेई ।। मग गवाळे आणोनि तये क्षणीं । त्यांत बांधिले चक्रपाणी ।। -(भक्तविजय, ४३.२१२, २१३.)

२. की एक गोपी प्रेमें भुलोन । म्हणे विकावयासी आणिला कृष्ण । तेंचि सत्य करावया वचन । देव मडक्यांत साठवला ।। - (तत्रैव, १६.१४१.)

३. सांवता माळी भक्त प्रेमळ । त्याजपाशी जाय घननीळ । लपावया मागतां स्थळ । उदर तात्काळ चिरियेलें ।। -(तत्रैव, ९.१६३.)

४. श्रीगुरुवचन ऐकोन । सांगे आपण जातिहीन । मातंग नाम म्हणोन । स्थान आपुलें बहिर्ग्रामीं ।।१२।। श्रीगुरु म्हणती तयासी । वेदशास्त्रीं अभ्यास म्हणसी । आले विप्र चर्चेसी । वाद करी त्यांसवें ।। २४ ।। येणेंपरी पतितासी । ज्ञान झाले आसमासी । वेदशास्त्र सांगेसी । म्हणो लागला तये वेळीं ।।२८।। विप्र थराथरां कांपती । श्रीगुरुचरणीं लोळती । आमुची आता काय गति । जगज्ज्योती स्वामिया ।।३०।।

- (श्रीगुरुचरित्र, २७.१२, २४, २८, ३०.)

५. मनाचे श्लोक, १९७

६. एडका मदन । तो केवळ पंचानन ।। -(संतवचनामृत, पृ. १८१.) मूळ शब्द एडका आहे. यात कामदेवाच्या धोक्याचा विषय आहे. एडकाऐवजी रेडका घेतले गेले, मग त्याचे रेडा असे झाले. वास्तविक इथे रेड्याचा संबंध नाही.

७. ईद हुलियंथ मनस साद माडिदने । - (भीमाशंकर कवीचे पद.) हे पद सिंदगी संप्रदायातील भीमाशंकर कवीचे आहे. पदाची सुरवात सै सै

सद्‌गुरुविन दयदिंदेल्ला मै मरतेने ॥ अशी आहे. दिलेल्या ओळीचा अर्थ, ‘माझे मन वाघासारखे जहाल होते, ते मवाळ केले’ असा आहे (कन्नड परमार्थसोपान, पृ. ३४८, टिपण ४४.)

८. चरका येव येव येव येव बोले वो सुन बेगुजरवाली । चरका तेरा रंग बिरंगी पेणें लाल गुलाल । कातनवाली छेल छबेली गुज गुज डालत ताल ॥१॥ (पदसंग्रह, पृ. ३७-३८). पदातील गुज गुज याचे गुह्य गुह्य असे केले गेले आहे.

९. चार कोटी एक लक्षाचा शेवट । चौतीस सहस्र स्पष्ट सांगितले । -(नित्यनेमावली, पृ. ६५.)

१०. साकरेचा नव्हें ऊंस । आम्हां कैचा गर्भवास ॥ बीज भाजुनी केली लाही। जन्ममरण आम्हां नाहीं ॥ - (तुकाराम गाथा, अभंग (क्षेपक) ३८, पृ. ९५७.)

११. जन्म नाहीं मृत्य नाहीं । येणें नाहीं जाणें नाहीं । बंध मोक्ष दोनी नाहीं परमात्मयासी ॥ -(दासबोध, ८.८.२.)

१२. नित्यनेमावली, पृ. ३९.

१३. छंदे असाध्यही साधिती । नर ते नारायणही होती । दीनजन हरि आपुला करिती । जो सुखकंदा ॥ -(भक्तिमार्गप्रदीप, पद ३४, पृ. १५५).

१४. तुकाराम गाथा, अभंग १५८९

१५. वाल्मिकीनें जेथें तप केलें । तें वन पुण्यपावन झालें । शुष्क काष्ठीं अंकुर फुटले । तपोबळें जयाच्या ॥ -(दासबोध, १६.१.१०.)

१६. सुकृत आहे तों भोगिती । सुकृत सरताच ढकलूनि देती । आपण देव ते असती । जैसे तैसे ॥ -(तत्रैव, ४.१०.२६.)

१७. सद्रूप चिद्रूप आणि तद्रूप । स्वस्वरूप म्हणिजे आपलें रूप । आपलें रूप म्हणिजे अरूप । तत्त्वनिरसनाउपरि ॥ -(तत्रैव, १३.२.३०.)

१८. असो ऐसे सकळहि गेले । परंतु येकचि राहिले । जे स्वरूपाकार जाले । आत्मज्ञानी ॥ -(तत्रैव ३.९.५९.)

१९. पामरजन्मविदु बलु खोट्टि । याकागबारदु गुरुविगे भेट्टि । -(नागप्प, पृ. ६९) अर्थ- पामरजन्य खोटा आहे. यात गुरुंची भेट का बरे प्राप्त करून

घेत नाहीस ? (या जन्मात किती चुका केल्या त्यांची यादी या पदात आहे.)

२०. ह्यांगे तीरितु निम्मुपकार । इदु अपरंपार । ह्यागे हिंगिसलि जन्मद अवतार । गुरुराय गंभीर ॥ -(नागप्प, पृ. १००.) अर्थ - तुमचे उपकार अपरंपार आहेत. ते मी कसे फेडणार ? हे सद्गुरो, जन्म मरणाचा फेरा मी कसा चुकवू ?

xxxxx

	पत्र ५९	**पान ८२**
नवीन	तिकोटे	ज्येष्ठ शु. ४
क्रमांक	भीमरावांना पत्र	७.६.१९०५, शुक्रवार
७८		

श्री

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना. वडील अप्पा विजापुराहून तिकोट्यास आले आहेत. सर्व मजकूर आनंद आनंद आहे. उद्या शनिवारी ककमरीस जाणेचा बेत आहे. तसेच जतला जातील. नंदेप्पाकडून पत्र आले आहे. मीही भेटीस येणार आहे अशी सूचना आली आहे. एकंदर मंडळींस वडिलांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे. ती श्रुत करावी ही विनंती.

-गणेश नीलकंठ कुलकर्णी, तिकोटेकर

	पत्र ६०	**पान ८२**
नवीन	जमखंडी	आषाढ शु. ७
क्रमांक		९.७.१९०५, रविवार
७९		

श्रीगुरुसमर्थ

तीर्थरूप राजमान्य राजश्री अंबुरावजी अण्णा कुलकर्णी मुक्काम इंचगेरी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक नंदेप्पा न्यामगौड, मुक्काम

जमखंडी, याचा शिरसाष्टांग नमस्कार, विनंती, विज्ञापना. तागाईत मिती आषाढ शु. ७ रविवारपावेतो इकडील सर्वत्र मंडळी आनंदरूप असो. विशेष. श्रीसमर्थांची स्वारी येथेच आहे. आषाढ शु. १३ करून तदलबागीस जाणार आहेत. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. आपणांस पत्र पूर्वी लिहिले आहे. त्याप्रमाणे व्यवस्था करीतच आहां. आता विजापुरास पत्र लिहिले आहे. मंडपाची सर्व तयारी झाली किंवा कशी काय झाली आहे व पुढे काय व्हावयाचे आहे ते सर्व लिहावे. श्रावण मासाचे उत्सवास त्यांचेकडून सर्व तयारी होईल काय ? तुमचे अदमासास कसे दिसते ते लिहावे, म्हणून लिहिले आहे. त्याप्रमाणे तुम्ही सर्व खुलासा लिहावा. मंटपास पत्रे किती लागतील, लांबी–रुंदी किती असावी ते सर्व लिहून कळवावे. इकडील मंडळींचा तिकडील सर्वत्र मंडळींस फार फार नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. नागप्पा यांनीही फार फार नमस्कार सांगितला आहे. कोणी निंबरगीस जाणार असल्यास नागप्पा खुशाल असलेचे सांगून पाठवावे. श्रीसमर्थांनी एकंदर मंडळींस फार फार नमस्कार सांगितले आहेत. उमदीकडेही खुशाल असलेचे कळवीतच आहां. कळावे. बहुत काय लिहिणे ? लोभ करावा ही विज्ञापना.

ताजा कलम– याचे उत्तर टपालाचा शिपाई पत्र देताच लगेच उत्तर लिहून पाठवावे. त्याकरिता यालगत तिकिट ठेवले आहे. कळावे. सेवेशी श्रुत होय ही विज्ञापना.

पत्र २५२ पान २४३

नवीन क्रमांक ८०

(टिपण :– पत्रावर तारीख नाही. तिथीवरून इथे आणले. आधी लिहिलेल्या पत्रांत श्रावण सप्ताहाचा उल्लेख आहे. हे पत्र त्याच सुमाराचे असावे. हिशोबाने तारीख काढली. मजकूर जमतो.)

जमखंडी आषाढ शु. ११

१३.७.१९०५, सोमवार

श्री

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री अंबुराव अण्णा कुलकर्णी, मुक्काम इंचगेरी, वडिलांचे सेवेशी, बाळक नंदेप्पा न्यामगौड मुक्काम जमखंडी याचा कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. तागाइत मिती आषाढ शु. ११, सोमवारपावेतो इकडील सर्व मंडळी आनंदरूप असो. विज्ञापना. आपणांस चिमडाहून एक पत्र पाठवले आहे ते पोचलेच असेल. उत्तर अजून आले नाही, असो. श्रीसमर्थांची स्वारी आणखी दोन-चार दिवसांनी निघणार आहे. त्याप्रमाणे एकंदर मंडळी निघणेचे करीत आहेत. बाकी सर्व मजकूर आपणांस माहीतच आहे. त्याप्रमाणे करीतच आहां. तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री नागप्पा अण्णा निंबरगी यांचा नमस्कार प्रविष्ट व्हावा. महाराज ब्रह्मचारी (लिमये असावेत) व अण्णप्पा महाराज वगैरेंस साष्टांग नमस्कार सांगावा. मेलप्पा नासी याचा शिरसाष्टांग नमस्कार. निंबरगी व चडचण मंडळी आलेवेळी पत्राचा मजकूर व नागप्पा वगैरे मंडळी खुशाल असलेचे कळवावे. बहुत काय लिहिणे ? सेवेशी श्रुत होय ही विज्ञापना.

ताजा कलम- वीरभद्रप्पा कल्याणशेट्टी, नंदराया न्यामगौड व मलकप्पा मास्तर यांचा शिरसाष्टांग नमस्कार. आई जिऊबाईस व रंगूबाईस सदरी सर्वत्र मंडळींचा शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. एकंदर मंडळींस अप्पांनी नेमाबद्दल फार फार सांगितले आहे, ते प्रविष्ट करावे. बहुत काय लिहिणे ? सेवेशी श्रुत होय ही विज्ञापना.

पत्र १८१ पान १७७

नवीन क्रमांक ८१

जमखंडी भाद्रपद व. ३०

२६.९.१९०५, शुक्रवार

श्रीगुरू प्रसन्न

कृपासागर राजमान्य राजश्री रामचंद्रपंत दादासाहेब कुलकर्णी, होर्तीकर स्वामीजींचे सेवेशी, आज्ञाधारक नागप्पा निंबरगी याचा कृतानेक दंडवत नमस्कार. भाद्रपद व. ३० पावेतो, मुक्काम जमखंडी येथे मी व महाराज वगैरे खुशाल असो. विशेष. इकडे येऊन १०/१२ रोज झाले. सर्व मजकूर आनंद आनंद आहे. भक्तीचा थाट चालला आहे, तो विस्तारपूर्वक लिहिता पुरवत नाही. समर्थांचे कृपेचे गोष्टी सांगता, वर्णन करता येत नाहीत. इकडे पाऊस पुष्कळ झाला आहे. फार आनंद आनंद झाला. तुमचेकडे कसे आहे अशा सर्व हकीकतीचे उत्तर जमखंडी येथे कृपासागर राजमान्य राजश्री दादासाहेब आपटे यांचे घरी आहो, त्या पत्त्यावर लिहावे. तुमचे पत्रातील बाकी मजकूर मीच वाचून सर्व खुलासा वडिलांस सांगितलेप्रमाणे त्यांनी उत्तर लिहिणेस सांगितले. देहभाव कल्पित कल्पना करतो. जे भावाने अंतःकरण राहते त्याच भावाने समर्थ तात्काळ पुरवून देतात. त्याकरिता जे जे वेळी जे जे प्रसंग येतील ते मान्य करावे. लाभ अगर तोटा, संतोष अगर काळजी हे कर्तव्य जीवभावाचे आहे. तुमचे अंतःकरणात समर्थांचे योगेकरून जे जे होणे आहे ते मान्य करावे. हे सांगितलेवरून लिहिले आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. कळजी करू नये. नेहमी आठवण मात्र निरंतर असावी म्हणजे सर्व कार्यसिद्धी होते. याप्रमाणे तुम्हांस कळावे. एकंदर मंडळींस सवडीप्रमाणे, गाठ पडेल तेव्हा नेमाबद्दल वडिलांनी सांगितलेली प्रार्थना श्रुत करावी. तसदीबद्दल माफी असावी म्हणून सांगितले आहे. तुकाराम साधू महाराज, विठोबा गवंडी, देसाई, यांस याप्रमाणे श्रुत करावे. कळावे. बहुत काय लिहिणे ? कृपालोभ करावा ही विनंती.

पत्र १८५ पान १८२

नवीन क्रमांक

८२ (टिपण :- १८१ या मागच्या पत्राप्रमाणे हेही पत्र त्याच तिथीचे आहे म्हणून तारीख तीच येते. मजकूर व तिथी यांवरून हे पत्र इथे येते असे ठरवले. हेही पत्र जमखंडीहून नंदेप्पांनी लिहिले असावे.)

जमखंडी भाद्रपद व. ३०
२६.९.१९०५, शुक्रवार

श्री

Jo Baby

महाराज कृपासागर राजमान्य राजश्री अंबुराव महाराज, मुक्काम इंचगेरी, स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञाधारक नंदेप्पा बिन मल्लप्पा न्यामगौड याचा कृतानेक दंडवत व नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. भाद्रपद व. ३० रोज शुक्रवारपावेतो आनंदरूप असो. विज्ञापना. आपणांस परवा पत्र लिहिलेलेच आहे. त्या कार्डात खुलासा कळविलाच आहे. येथे भक्तीचा थाट आनंदात चालला आहे. पाऊस पुष्कळ लागला आहे. आपलेकडील हकीकत खुलासेवार कळवावी. लौकर कारखाना तयार करावा. नगारखान्याचा अण्णप्पांचा मक्ता झाला असेल. कळवावे. चारी झाडांस पल्लव फुटलेच असतील. बिल्वपत्रीचे झाड लागलेच असेल. धोंडिबाने मळ्यात फुलझाडे लावली असतील, कळवावे अगर त्या लोकांस कळविणेस सांगावे. धोंडिबाने सिदापूरची रोपे आणली असतील. अण्णप्पाने २-३ ठिकाणी फुलझाडे लावली असतील. विस्मरण पडू नये हे सांगावे. भक्तीकडे काही अंशी मन असावे असे सांगावे. सुज्ञच आहांत. निंबरगी-उमदीकडील वर्तमान, पाऊसपाणी, सर्व लिहावे. साहेबण्णा गाडीवाले यांनी महाराजांना दिलेले वचनाप्रमाणे त्याची खात्री झलि काय, कळवावे. अण्णप्पाचे मनाची खात्री असून खात्रीचे आनंद होऊन निंबरगीस गाडी देतो असे आनंदाने बोलला. पुन्हा चार रोजांत मनात कल्पना येऊन थुले (नुसतीच गाडी) दिले, आता निंबरगीस भांडी तुमचे तुम्ही पाहावी असे अंबुरावाजवळ बोललेचे समजले,

त्याचप्रमाणे झाले किंवा कसे, तोही खुलासा करावा. सारांश, मनाची ओढी भक्तीकडे पूर्णतः नसून विषयांकडे धावा असतो. असो. अण्णप्पा, नरसप्पा अण्णा पुजारी, तुम्हांस, रंगूबाई वगैरेंस नेमाबद्दल वडिलांनी अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत व्हावा व होर्ती मास्तरांस प्रार्थना सांगितली आहे त्यांस कळवावे. कळावे. बहुत काय लिहिणे ? कृपा-लोभ पूर्ण असावा ही विज्ञापना.

पत्र ६१ **पान ८३**

नवीन जत अश्विन शु. ९

क्रमांक ५.१०.१९०५

८३

श्रीगुरुसमर्थ

नागप्पा महाराज समर्थ, यांस प्रार्थना. तिकडे येणे झाले नाही याबद्दल क्षमा मागत आहे. घरी मंडळींस क्षमेसाठी दंडवत नमस्कार सांगावा. पौर्णिमेस इंचगेरीस येत आहे. जत मुक्कामी आहे. शिवलिंगव्वांनी सर्वांस नमस्कार सांगितला आहे. गंगाराम मामांस १६ हातांची पासोडी तयार करण्यास सांगावे.

आपला भाऊ

पत्र ६२ **पान ८४**

नवीन उमदी पौष शु. २

क्रमांक २८.१२.१९०५

८४

श्रीगुरुसमर्थ

हणमंतराव खवासखान हुलजंती यांस आशीर्वाद उपरि. जतहून आज घोडा, आलेले खोगीर, तंग, घामोळी (प्रवासात लागणारे घोड्याचे

साहित्य) लगाम, चऱ्हाट याप्रमाणे महादू मोरे याचेबरोबर पाठवले आहे. दोन प्रहरपर्यंत घोडा पोचवावा, असा करार करून, पोटगी दोन आणे देऊन पाठवला आहे. त्याचे पोटगी वगैरेची काळजी नाही. कोणत्या वेळेस येऊन पावला त्याचे उत्तर लिहावे. कृष्णा तुमचे गावाहून कधी गेला व डिकसाळची शेताची व पिकाची काय व्यवस्था केली ती सर्व हकीकत लिहावी. आणखी घोडा भीमा जतेहून आलेवर खेड्याने जाण्यास जरूर पडेल. तो देण्यास सवड होईल का ते लिहावे. कळावे. नेमनिष्ठेने असावे म्हणून प्रार्थना फार फार आहे. अभिज्ञच आहां. घरी वडील मंडळींस नमस्कार सांगावा. सुज्ञच आहां. आपलेस लिहावे असे नकोच आहे. कळावे. लोभ पूर्ण असावा हा आशीर्वाद. हसवी (निरोप्या) एक पाठवले आहे. पावल्याचे लिहावे. लोभ करावा हा आशीर्वाद.

पत्र ६३ पान ८४

नवीन
क्रमांक
८५ (टिपण :- नवीन क्रमांक ३३ वरील टिपण पाहावे.)

इंचगेरी पौष शु. १५

१२.१.१९०६, बुधवार

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री मेलगिरप्पा अण्णा नासी, मलकप्पा मास्तर, नंदराया गौडनवरू, वीरभद्रप्पा कल्याणशेट्टी, नंदेप्पा न्यामगौड वगैरे समस्तांस, मनात येते त्या त्या मंडळींस, वाचून दाखवलेले ऐकणाऱ्या मंडळींस, सभा मंडळी संस्थान जमखंडी, सर्व स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञाधारक अंबाजी इंचगेरीकर याजकडून दीर्घ दंडवत व शिरसाष्टांग नमस्कार. पौष शु. १५ रोज बुधवारपावेतो श्रीसद्गुरुकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. अलीकडे तुम्हांकडून पत्र वगैरे येऊन समाचार खुलासा होत नसलेने हे पत्र लिहवले आहे.

आता परमात्म्याने जगात अवतार धारण केला तो दिगंबर[१] रूपात केला असे समजून या जगात प्रवृत्तिमार्गाने वागणूक करतात. दिगंबर होऊन त्या आधारे राहतात. आता 'जगात पिशाच अंतरीं शहाणा । सदा ब्रह्मीं जाणा निमग्न तो'[२] ।। याचा अर्थ देवाने पिशाचरूपाने अवतार घेतला असा करून प्रवृत्तिमार्गात (व्यवहारात) तसे (पिशाचाप्रमाणे बेताल) वागतात. या गोष्टी प्रपंच करणाऱ्या माणसांस खऱ्या दिसून त्यांवर विश्वास ठेवतात. (भोंदू लोक) जगात भूत–भविष्य, वर्तमान (सांगून) नानाप्रकारचे चमत्कार, देखणी दाखवतात. त्यांवर (भोळे लोक) विश्वास अंतःकरणापासून ठेवतात. (लबाड लोक) कोठे कोठे नाना प्रकारे वेष घेऊन खेळ करतात व असल्या वागणुकीस सामान्यांकडून मान्यता मिळते. का म्हणालतर देह हा अनित्य असून अनित्य भावास वश होतो. आपण जसे आहोत (अनित्य) तशाच वागणुकीवर विश्वास पडून जातो. पण आपण नित्य असल्याची जाणीव असेलतर अनित्यावर विश्वास बसणार नाही. जैशास तैसा मिळून जातो. का म्हणालतर, 'भजकास पाहिजे भजन । पंडितास पाहिजे वित्पत्तीज्ञान', असे होऊन जात आहे.'[३] याकरिता समर्थांनी मुख्य वक्य सांगितले आहे की सूर्य उभा केला अगर भूत भविष्य सांगितले अशा ठकमार्गाचे ज्ञानाला ज्ञान म्हणू नये.[४] समर्थवाक्यावर भरवसा ठेवून वागलेने आजवर समर्थकृपेचा जो मार्ग चालला आहे त्याचे नाव आत्मज्ञान. दासबोध अध्याय १० समास ७, 'याकारणे पुण्यमार्गे चालावे'[५] असे म्हटले आहे. तो पुण्यमार्ग कोणता हेही प्राण्यास कळत नाही यास काय करावे ? असो. समर्थांची वाक्ये पुढीलप्रमाणे आहेत. अध्याय ११ समास ८ यात 'आधी वंदू सकळकर्ता । त्याचे भजनी प्रवर्ता'[६] अध्याय १० समास १० यात 'सांगणें वांगणेंचे काम नवे'[७] म्हणून आहे. अध्याय ९ समास २/३ यांत 'येक जाणण्यापरते किती पडले आटाआटी'[८] असे आहे. अध्याय १३ समास ७ यांत 'देवच बोलिला त्याचे अमान्य केले'[९] म्हणून आहे. हे सर्व जाणूनच आहां. सुज्ञ मंडळींस सुचवावे असे काही नाही. आता विजापुराहून आलेले

ज्ञानमार्गाचे पत्र दादासाहेब[१०] वगैरेंनी पाहिलेच आहे. त्याचे उत्तर पुन्हा लिहून पाठवले आहे. त्याची नक्कल करून तुम्हांस पाहण्याकरिता पातवली आहे, तर ते उत्तर त्यांचे पत्राला अनुसरून आहे किंवा कसे, त्यात मेळ आहे किंवा नाही, त्याचा विचार सर्व विचारवंत मंडळींनी विचार करून, मनन करून,वर लिहिलेल्या दासबोधातील ओव्या कितव्या, या पत्रातील हशील (महत्त्वाचा) मजकूर व वकिलांचे[११] पत्रातील मजकूर मनन होऊन उत्तर येईल असे करावे म्हणून प्रार्थना फार फार सांगितली आहे. त्यांचेकडून आलेले पत्राची नक्कलही ठेविली आहे. ते सर्व मनन होऊन मुख्य मुख्य अर्थाचे मनन व्हावे. सर्वांस हे पत्र दाखवावे. सर्वांनी पाहून परत उत्तरासह हे एकंदर प्रकरण इंचगेरीस पौर्णिमेचे संधीस पाठवावे. इकडील सर्व वर्तमान आनंद आनंद आहे. तुम्हांकडे सर्व आनंद असलेचे खुलासेवार लिहून पाठवावे. कळावे. बहुत काय लिहिणे ? कृपा-लोभ करावा ही विज्ञापना. आता नंबर १ (लिहीत असलेले पत्र), नंबर २ (वकिलांना लिहिलेले पत्र), नंबर ३ (वकिलांचे आलेले उत्तर) एकाग्र होऊन वाचून मनन करून सर्वांनी वाचलेप्रमाणे इंचगेरीस उत्तर पाठवावे. पूर्णिमेचे संधीस पोचेल असे करावे. सवड होईल तर महाराज रामप्पा महमदापूर यांजकडून शुद्ध अक्षराने नक्कल करून तिन्ही प्रकरणे उतरवून पाठवाल तर बरेच उपकार होतील. इकडील सर्व मंडळींस वाचणेस उपयोगी पडतील. सवड नसलेस हेच प्रकरण सर्व परत पाठवावे. तुम्हां सर्वत्रांस उद्योगात, व्यवसायात तसदी दिलेची सर्वांनी माफी करावी. मास्तर व रामप्पा यांस प्रार्थना. वर लिहिलेले मजकुराप्रमाणे करालच. ज्यांस या मजकुराचा अर्थ समजेल त्यांस मात्र अगत्य दाखवून त्यांचे मत घेऊन उत्तर लिहावे.

मकरसंक्रमणाची तीळयुक्त थैली, म्हणजे पिवळ्या रंगाच्या ६ व धगधगीत पांढऱ्या रंगाच्या ११ याप्रमाणे देऊन (थैल्या) पाठविल्या आहेत. तर त्या रंगांचा व अर्थाचा स्वीकार होऊन उत्तर येईल अशी इकडील उमेद फार आहे. कळावे. बहुत काय लिहिणे ? कृपा-लोभ

असावा ही विज्ञापना.

नोंदी :-

१. विवस्त्र राहणाऱ्या दिगंबर जैन साधूंबद्दल हा उल्लेख आहे.

२. नित्यनेमावली, पृ. ६३.

३. ज्ञानियांस पाहिजे ज्ञान । भजकांस पाहिजे भजन । साधकांस पाहिजे साधन । इच्छेसारिखे ॥ ...पंडितांस पाहिजे व्युत्पत्ती । विद्वांसास अध्ययनप्रीती । कळावंतां आवडती । नाना कळा ॥ -(दासबोध, ७.९.४१,४५.)

४. भूत भविष्य वर्तमान । ठाउकें आहे परिच्छिन्न । यासीहि म्हणिजेत ज्ञान । परि तें ज्ञान नव्हें ॥ -(तत्रैव, ५.५.३.)

५. याकारणें पुण्यमार्गे चालावें । भजन देवाचें वाढवावें । न्याय सांडून न जावें। अन्यायमार्गें ॥ -(तत्रैव, १०.७.१२.)

६. आधी वंदू सकळकर्ता । सकळ देवांचा जो भर्ता । त्यांचे भजनीं प्रवर्ता। कोणीतरी ॥ -(तत्रैव, ११.८.१.)

७. सांगणोवांगणीचें काम नव्हें । आपुल्या अनुभवें जाणावें । प्रत्ययावीण शिणावें । तेंचि पाप ॥ -(तत्रैव, १०.१०.५३.)

८. येका जाणण्यासाठीं । लोक पडिले आटाटीं । नेणतपणें हिंपुटी होती । जन्ममृत्यें ॥ -(तत्रैव, ९.३.४४.)

९. सर्व सांडून शोधा मजला । ऐसें देवचि बोलिला । लोकीं शब्द अमान्य केला । भगवंताचा ॥ -(तत्रैव १३.७.३३.)

१०. दादासाहेब आपटे, जमखंडी (धोंडो गोपाळ आपटे.) पत्र ९२ मध्ये त्यांनाच दादासाहेब म्हटले आहे.

११. नरहरराव कलमडी, विजापूर.

xxxxx

पत्र २६१ पान २७०

नवीन
क्रमांक
८६ (टिपण :- पत्र ६३ व प्रस्तुत पत्र २६१ ही दोन्ही एकाच तिथीची म्हणजे पौष शु. १५ ची आहेत. पत्रे जवळ आणण्याचे आणखी एक कारण म्हणजे २६१ पत्रात आले आहे की ११ तारखेस एका पत्राचे उत्तर लिहिले आहे, अर्थात् ६३ व २६१ दोन्ही पत्रे ११ तारखेनंतरची पाहिजेत. ६३ पत्राची तारीखही १० नसून १२ असावी. २६१ ची तिथी तीच, पौष शु. १५ आहे म्हणून त्याची तारीख तीच येते. ज्याचे उत्तर लिहिले ते पत्र आधीच्या तिथी-तारखेचे असावे. ६३ व २६१ दोन्ही जमखंडीस गेली आहेत. दोन्ही ज्ञानमार्गाचीच आहेत. तिथी एकच आहे या सूक्ष्म धाग्यावरून जवळ आणली.)

उमदी — पौष शु. १५
१२.१.१९०६, बुधवार

श्रीगुरुसमर्थ

महाराज राजमान्य राजश्री हरिपंत अण्णासाहेब दादा, अंताजीपंत दादासाहेब, वासुदेवपंत दादासाहेब साळवेकर, रामराव अण्णासाहेब टरके, महाराज निंबरगीकर विष्णुपंत समर्थ, चिंतोपंत दादासाहेब आपटे, मेलगिरप्पा अण्णा व मास्तरसाहेब वगैरे संतसभा मंडळींस व सर्वांस, स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञाधारक आपला उमदीकर भीमा याचा अति नम्रतेचा, अनन्य भावाचा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. पौष शु. १५ पावेतो श्रीमहाराजसद्गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्राचे उत्तर तारीख ११ जानेवारीला रवाना केले आहे. किती रोजांत येऊन पोचले ते लिहावे. आपले पत्र व सहस्रबुद्धे यांचे पत्र मार्गशीर्ष व. १२, तारीख २६ डिसेंबरची आहेत. आपले पत्र ७ जानेवारी रोजी पावले. असा अवधी होण्यास काय कारण हे समजत नाही. असो. आता प्रवृत्ती अगर निवृत्तिमार्गाने अंतःकरणातील खरा भाव कळून येत नाही, अशी दशा होऊ लागते, कारण अभ्यास कमी.

अनभ्यासाचा भाव जडून गेल्याने दोन्ही मार्गांचा खरा भाव कळत नाही. देह देखणीभाव दाखवतो. खऱ्यासारखे दिसावे अशी बाह्यात्कारी शोभा दिसून येते. परंतु कूटस्थातील भाव न्याराच असतो. असो. प्रवृत्तीततरी हा देह खऱ्या हुशारीने आपल्या भूषणाने कुठे असतो ? तेही कळत नाही. साधारण रात्री दोन प्रहरी कोणी एक रस्त्यात गस्तीत सापडला. तेव्हा गस्तीवाल्याने, 'कोण आहां' असे विचारले. 'का, मी आहे' असेच म्हणतो, (नाव सांगत नाही.) गस्तीवाला पुन्हा धमकावून विचारतो, 'मी म्हणजे कोण ?' तेव्हा मी अमुक नावाचा असा पत्ता सांगतो. तेव्हा तो गस्तीवाला घाबरून, 'महाराज तुम्ही आम्हां, मजकडून गैर भाषण झाले, चूक झाली,' असे बोलून जातो. यात खरोखर पाहता चुकीचा भाव आपणांकडेच येतो. परंतु देहास कळत नाही. अहंकारावर जातो (मी हा अहंकार, गस्तीवाल्याने मला ओळखावे असा अहंकार.) आधीच त्या मार्गाचा भाव कळून वागले असता देहाची शोभा व भूषण किती राहिले असते, (धमकावणी ऐकायला लागली नसती) असो. देहभाव करंटा असतो. त्याकरिता समर्थवाक्य आहे – 'देहभाव हरपला। जिता विठ्ठल बोलिला'[१] हे सर्व अभ्यासावर आहे. त्याकरिता दासबोधी अध्याय... यात, 'जाणत्याचे संगतीचे झिजावे,'[२] असे आहे. आता आज्ञेवरून ज्ञानमार्गाची हकीकत लिहिण्यास सुरवात करतो. माझी योग्यता तुम्हांस माहितच आहे. मला कोश, व्याकरण, प्रास कळत नाही. कारण वागणूक कानडीत पडलेने नर व मादी जेथे पडले असतील तिकडे लक्ष देऊ नये. क्षमा होऊन अर्थाकडेच लक्ष असावे म्हणून प्रार्थना आहे.वाघाचे पिल्लू जसे वाघापुढे खेळते तसा तुम्हांपुढे सलगीने लिहितो ते मान्य कराल अशी आशा धरून प्रार्थितो. का म्हणालतर, एका शुकास यवनाजवळ दिले, तो त्या भाषेत शिकला. एका शुकास पुराणिकाजवळ दिले, तो सुभाषितांत तत्पर झाला. तैसा संगतीगुण आहे. असो. दासबोधातील समर्थवाक्य अध्याय १३ यात, 'गुली परते काही ज्ञानमार्ग समजण्यास, या कारणे गुली परते कोणी येके असावे'[३] असे आहे. अध्याय ६ यात, 'गुप्त आहे उदंड धन, काय जाणती

सेवकजन'[४] असे आहे. अध्याय १७ यात, 'तळघरामध्ये उदंड द्रव्य, परि भोगूं नेणें,'[५] असे वाक्य आहे. ज्ञानेश्वरी ५ मध्ये 'मी माझा आठवण । विसरलें जयाचें अंतःकरण, तोच संन्यासी जाण । असे आहे. संन्यासी म्हणजे षडन्यासी, तोच सर्व संन्यासी, म्हणजे कूटस्थात मी एक अमुक योग्यतेचा आहे म्हणून जीवभावाने तेच रक्षीत असतो. तद्वत् कूटस्थातून शिवभाव रक्षीत गेले म्हणजे मी शिवभावाचा आहे, माझे कर्तव्य शिव शिववाचून दुसरा कोणताही भाव माझा नाही याची आठवण निरंतर झाली म्हणजे तोच संन्यासी असा अर्थ आहे.

ज्ञानास मूळ अग्नी, भक्तीला मूळ विरक्ती असे झाले म्हणजे तो ज्ञानास अधिकारी झाला. असा मार्ग असूनही शब्दज्ञान शिकून, जीवभावाने मी ज्ञानी आहे तेव्हा तसे वागावे असा कूटस्थात अभिमान बाळगून प्राणी वरवर संन्यासी (आशा नसलेला) असा देखावा दाखवतो. शब्दज्ञानाचा अर्थ असा आहे की साधुमार्ग म्हणजे घरादारावरची आशा सांडली, बोलणेही सोडले हे सत्य समजून, तसा अभिमान धरून तसाच देखावा दाखवणे. याप्रमाणे शिकून, हा त्या भावाने वागतो, ज्ञानी म्हणवितो, नरदेह धारण करतो. या देहाला ज्ञानी म्हणवून घेण्याची फार आशा असते. सत्त्वगुण आल्याने विषय आशा सोडली असे लोकांत दाखवतो, पण मी ज्ञानी ही भावना जडून गेलेली असते. त्या मार्गाचे योगाने काम, क्रोध वगैरे षड्विकार जडतात. असे किती सांगावे, असो.

मी संतोबा[६] (संतोबा पवार) यांच्यासारखा होतो असे एक ब्राह्मण म्हणत होता असे भक्तविजयात आहे. तेव्हा स्त्री, 'व्हा, आता उशीर नको' असे म्हणाली. त्यावरून त्यास ज्ञानाचा अभिमान चढला आणि संतोबांकडे गेला. ज्ञानविषय मस्तकात चढल्याने 'मी ज्ञानी झालो, संतोबासारखा मी वैराग्ययुक्त झालो' असा अहंकार मनात आल्याने, त्याचे त्यास न कळल्याने संतोबांस नमस्कारसुद्धा केला नाही. जीवभावाचा, शब्दज्ञानाचा अभिमान असल्याने वैराग्याचा भाव काय असतो ते कळले नाही. म्हणून अहंकार वाढला. त्या प्राण्यास कूटस्थातील भाव कळला नाही, त्याला तो तरी बिचारा काय करेल ? असो. संतोबा

म्हणाले, 'आता माझ्यासारखा झालास तर निस्पृही हो.' असे सांगून त्याचे अंगावरील वस्त्र वगैरे टाकविले, नंगा केला. तो ब्राह्मण रात्री थंडीमुळे कूटस्थात आग सुटून (त्रास होऊन) स्फुंदून स्फुंदून रडू लागला. दुसऱ्या दिवशी दोन प्रहरची वेळ झाली. भुकेने पोटात आग सुटली तेव्हा अभिमान सोडून बोवांस सांगितले. या बोवांनी लिंबाचा पाला आणून दिला. तेव्हा आणखी स्फुंदून स्फुंदून रडू लागला आणि 'माझे नशीब फुटके, परिणाम ठीक नाही' असे म्हणू लागला. तेव्हा बोवांनी त्यास अभय दिले की, 'तुला घरी जाण्याची आज्ञा देतो'. असे म्हणत आहेत तोच कूटस्थातून एक नमस्कार केला. नंतर महाराजांनी असे वचन दिले की, 'स्त्रीस सांगून बंदोबस्त करतो. तू त्याला आता रागे भरू नको असे तिला सांगतो'. असे म्हणताच, पुन्हा पायांना हात लावून, प्रतिज्ञा करून आणखी एक नमस्कार केला. घराकडे जातेवेळी अनन्यभावाने नमस्कार करून गेला. आता पाहा. मी ज्ञानी झालो अशा अहंकाराने एकही नमस्कार केला नाही, आणि विषयलोभाने कूटस्थातून तीन वेळा नमस्कार केला. असो. कूटस्थातील भाव तो काही निराळाच आहे.

तुका उतरला तुकीं । नवल आलें तीन्हीं लोकीं ॥ याचा अर्थ– तिन्हीं लोकीं म्हणजे स्वर्ग, मृत्यू, पाताळ हा एक (तिन्हीं लोकांत स्वतःला नवल वाटले.) दुसरा अर्थ तिन्हींत सापडले त्या लोकांत नवल झाले (तिन्हीं लोकांत इतरांना नवल वाटले.) तिसरा अर्थ स्मरण, ज्ञानचक्षू व अंतःकरण ह्या तीन गोष्टी. चौथा अर्थ– तुका म्हणजे अर्धोभावित लोचनी (अर्धोन्मीलित लोचनः) उतरला म्हणजे प्रवृत्ती, निवृत्ती व उपाधीतून तरला. (डोळे अर्धे मिटले, विषयांकडून नजर दूर झाली.) तुकी म्हणजे वस्तूवाचून जे जे बोलणे चालणे, ते तूक धरून (तोलून मापून) चालला, म्हणून तीन्हीं लोकी नवल झाले. वस्तूच्या योगाने (देवाने केल्याने) स्त्री, द्रव्य व भूमी या तिन्हींत हे सर्व झाले, आता तोच समोर आहे असे झाले म्हणजे नवल झाले हे चौथ्या अर्थाचे सार (अर्ध्या मिटलेल्या डोळ्यांपुढे रूप उतरले.)

आता भक्तीत धीर, उदार, गंभीर याचा अर्थ– एकच करितो आहे (देव एकच कर्ता आहे) यात आनंद मानणे यास धीर म्हणावे. उदार म्हणजे देहभाव सोडून भक्तीकडे वेळ घालवणे. गंभीर म्हणजे परस्त्री ही आई अगर मुलगी असा कूटस्थात भाव होणे. उदाहरणे– धीर– मकरध्वज वगैरे अनेक प्राण्यांनी धीर धरला. उदार– कबिराने कमालाचे शिर कापले (?). गंभीर– तुकाराम महाराज म्हणाले, 'हे का आई, पुरुष जगात काय कमी आहेत' ? 'तैसे म्हणो नये' असे म्हणाल्याबरोबर, 'अगोदर मला सांगितले असतेच तर तुझ्या पोटीच जन्म घेतला असता', असे म्हणून अभंग केला– 'टगडी बायको आली रे गड्यांनो, टगडी बायको आली । भल्याभल्यांसी ठकवुनि गेली । टगडी बायको आली हो'. याचे नाव गंभीर.

'अंतरी गेलिया अमृत । बाहेरी काया लखलखित'[७] असे अध्याय ८ यात आहे. ज्याचें अंतःकरण शुद्ध । त्यासि करणें न लगे बोध। डोळ्यांपुढे वस्तू दिसू लागली याचा अर्थ अंतःकरण शुद्ध. हीच मुख्य गोष्ट आहे. अंतःकरणापासून वीट नाही, कंटाळा नाही असा नेम केला– तरी शुद्धच. माझा जन्म व्यर्थ गेला असा अंतःकरणात पाझर फुटला म्हणजे शुद्ध. जेवताखाताना हुरहुर (तळमळ) अंतःकरणात लागली, (भक्ती नसताना नुसते खातो अशी भावना होणे), अग्नी झाला (पश्चात्ताप झाला) म्हणजे तेही शुद्ध, कारण पश्चात्तापेन शुद्धता असे आहे.

अपरोक्ष ज्ञान म्हणजे आपोआप जिकडे पाहावे तिकडे अवघे ब्रह्मरूप अक्षापुढे (डोळ्यांपुढे) दिसणे. आपोआप अंतःकरणापासून निष्ठेने नेम करणे, तेही अपरोक्ष. अगर आपोआप अर्थाने (अर्थ समजून– उमजून) एकाग्र होऊन निष्ठेने नेमाने वाचतो तेही अपरोक्ष. आपापल्या साक्षीने (अंतरात्म्याच्या साक्षीने) वागणे, देहास कोणतेही प्रकारची कामना नाही, कोणतेही प्रकारे विषय नाही, निष्काम भक्ती आहे, असे वागणे हेही अपरोक्ष ज्ञान.

दासबोध अध्याय १७ यात 'नाभीपासून उन्मेष वृत्ती । तेचि परा जाणिजे पश्यंती'[८] याचा अर्थ– नाभी म्हणजे कोणत्याही प्रकारची

भीती नाही, उन्मेष म्हणजे निर्भय अंतःकरणापासून प्रवृत्तीत अगर निवृत्तीत सर्व प्रकारे जीवपणा किंवा 'मी' निरसून जाणे, म्हणजेच परा. पश्यंती म्हणजे निजवस्तूची आपली भेट होणे. 'गुरुसी काय पुसावा, दोन्ही गोष्टी त्या कोण'[९] असे वाक्य अध्याय १२ यात आहे व 'हेही कळेना स्वभावे'. आता अध्याय ८ यात आहे[१०]– 'ते पुण्य भोगावयास तीनशे साठ मार्ग आहेत'[११]. याप्रमाणे ज्ञान समजून पुण्यभोग भोगण्यास पुण्य करून पुन्हा 'फेर पडे तो पस्तावेगा लक्ष चौऱ्यायशी चक्कर है'[१२]. याप्रमाणे आले आणि गेले. दासबोध अध्याय यात 'जे नेमकास न कळे ते बाष्कळास काय कळे'[१३] असे आहे. ज्ञानेश्वरी अध्याय ७ यात 'तिजा ज्ञानी प्रमाणे सर्व मार्ग आहे, चौथा ज्ञानी विरळा'[१४] असे वाक्य आहे. अध्याय तिसरा यात 'जे आत्मस्वरूपीं मिळाले ते येकचि राहिले । बाकी मार्गाचे गेले, गेले, गेले'[१५] असे आहे. आता गुरुंस तन मन धन द्यावे असे म्हणतात. तनाचे ठिकाणीं मन आहे आणि मनात गुरुकृपेचा भाव आहे (हेच धन). आपला भाव गुरुरूपी होण्यास धन किंवा भाव पाहिजे. गुप्त रीतीने अंतःकरणापासून नेमास बसले असता आत्मस्वरूप दिसले म्हणजे तीन्ही दान दिले असे होते. दुसरा अर्थ– तन, मन, धन म्हणजे दशेंद्रियांचे व्यापार तत्त्वतः नरकाप्रमाणे ठरले म्हणजे 'न' असे तत्त्वांत झाले (तन, मन, धन) म्हणजे धन.

'नडी नुडी'[१६] म्हणजे गुरुंनी सांगितलेप्रमाणे वागावे व गुरुंनी सांगितलेप्रमाणे चालावे. आता सहजी अर्थ– नडी म्हणजे प्रपंचात अगर परमार्थात जे कर्तव्य आहे ते चालवावे. गुरुंनी सांगितलेले स्मरणाची (नामादी) आठवण असू द्यावी म्हणजे नुडी. नेहमी मोक्षभागी विभागी असे असावे. तसेच 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे' असे असले म्हणजे सर्वप्रकारे ज्ञानमार्गास आनंद होतो.

'जेवीं बालक बोले बोबड्या वचनीं ऐकुनी जननी संतोषें'. 'डोळसाचा माग ऐकुनी कानीं । आंधळे चालती चाचपोनीं । तेवी मी बोले आर्षवाणी। कृपेकरूनी तुमच्या'[१७]. सर्व कलमवार जे जे आहे ते ते, त्या ओव्यांचे

एक एक चरण लिहावे. अमुक समास, अमुक ओवीत हा मजकूर आहे, असे सवडीप्रमाणे फुरसत करून वर लिहिलेप्रमाणे लिहावे. अभिज्ञांनी आपापले अंतःकरणात जसा अर्थ ठरेल तसा आपल्या बुद्धीने उत्तर निरनिराळे लिहाल अशी आशा व उमेद इकडे फार आहे.

'येक ज्ञान पाहून अतिकृपण । न बोले जीव गेल्याविण । भेणे भेणे धरूनि मौन । न बोले वचन सर्वथा' ।। हे भागवतातील अध्यायातील वाक्य आहे. साधक दशेतील अर्थ आहे.

संक्रमणाप्रीत्यर्थ तीळ शर्करायुक्त थैली देऊन पाठविली आहे. तो सर्वांनी स्वीकार करावा असा पाट (रीतीप्रमाणे स्वीकारावा). तद्वत् आपापले धर्माप्रमाणे प्रवृत्तीत जैसा षड्विकारांत रमतो, त्याप्रमाणे युक्त हरिमायेत गुप्त 'ळ' अक्षराची, शर्कराची लीनता, स्थिरता, होऊन स्वीकार व्हावा म्हणून प्रार्थना.

समर्थवाक्य, 'तिळाएवढे बांधुनि घर । त्यात राहे विश्वंभर । तिळाइतुकें बिंदुलें । तेणें त्रिभुवन कोंदाटलें । हरिहराचे मूर्ती । बिंदुल्यांत येतीं जातीं । तुका म्हणे हें बिंदुलें । तेणें त्रिभुवन कोंदाटलें' ।।

हे सर्व वाचणे झालेतरी व्यवसायात मन मलिन असते. करिता एकाग्र होऊन, चांगला स्वस्थ चित्ताने अर्थ करून सावकाश दोनवेळा वाचावे, म्हणजे अर्थ मनन होऊन, ज्या त्या कलमाचा अर्थ होऊन अध्यायांतील समासही निवडता येतील. जितक्या ओव्या आहेत, तेवढ्याच ओव्या व समास लिहावे म्हणून प्रार्थना फार फार आहे. समासातील ओव्या म्हणजे चार चरणांचा एकच श्लोक लिहावा. सारांश, 'चार कोटी एक लक्ष हे तुका' असे वाक्य व 'बारा अभंगाला सोडू नका' म्हणजे अभंगाला सोडू नका. तुकारामाचे अभंगाला भंगच नाही. त्याला हे तुका. तुका तुका. पुढे सगुण हे ब्रह्म.

नोंदी :-

१. रूपीं जडले लोचन । पायीं स्थिरावलें मन । देहभाव हरपला । तुज पाहता विठ्ठला ।। -(तुकाराम गाथा, अभंग १७०४, पृ. ३५९.)

२. जाणत्याचे संगतीने भजावें । जाणत्याचे संगतीनें झिजावें । जाणत्याचे संगतीनें रिझावें । विवरविवरों ॥ –(दासबोध, १८.२.५.)

३. तत्त्वांचा गलबला जेथें । निवांत कैचें असेल तेथें । याकारणें गुल्लीपरतें । कोणी येकें असावें ॥ –(तत्रैव, १३.५.२४.)

(अर्थ –जेथे तत्त्वांचा गोंधळ आहे, तेथे निवांतपणा नाही, म्हणून ज्याला समाधान हवे असेल, त्याने या गोंधळाच्या पलीकडे (गुल्लीपरते) असावे– बेलसरे).

४. गुप्त आहे उदंड धन । काय जाणती सेवक जन । तयांस आहे तें ज्ञान । बाह्यात्काराचें ॥ –(तत्रैव, ६.९.१.)

५. तळघरामधें उदंड द्रव्य । भिंतीमधें घातले द्रव्य । स्तंभीं तुळवटीं द्रव्य । आपण मधें ॥ लक्ष्मीमधें करंटा नांदे । त्याचें दरिद्र अधिक सांदे । नवल केलें परमानंदें । परमपुरुषें ॥ –(तत्रैव, १७.५.२१, २२.)

६. संतोबा पवार. समर्थ संप्रदायाच्या तंजावर येथील भीमस्वामी या मठपतींच्या नावाबरोबर संतोबा महाराज हे नाव येते. इथे नाव आलेले संतोबा तेच असतीलतर त्यांचा काळ इसवी सन १७५८ च्या सुमारास येतो. अधिक माहिती नाही. –(पंचधारा त्रैमासिक (हैदराबाद), जुलै–डिसेंबर २००८, पृ. २३, २७, २८.)

७. अंतरीं गेलिया अमृत । बाह्य काया लखलखीत । आंतरस्थिती बाणता संत । लक्षणें कैसीं ॥ –(दासबोध, ८.९.१.)

८. नाभीपासून उन्मेषवृत्ती । तेचि परा जाणिजे श्रोतीं । ध्वनिरूप पश्यंती । हृदयीं वसे ॥ –(तत्रैव, १७.८.१.)

९. सद्गुरूसी काय पुसावें । हेंही कळेना स्वभावें । अनन्यभावें येकभावें । दोनी गोष्टी पुसाव्या ॥ –(तत्रैव, १२.३.३.)

१०. आठव्या अध्यायात तीनशे साठ मार्ग वगैरे शब्द नाहीत. पण पहिल्या समासाच्या सुरवातीस त्याच अर्थी काही ओव्या आहेत. उदाहरणार्थ– नाना तीर्थें थोर थोरें । सृष्टीमध्यें अपारें... ऐसीं तीर्थें सर्वही करी । ऐसा कोण रे संसारीं । फिरों जातां जन्मवरीं । आयुष्य पुरेना ॥ –(तत्रैव, ८.१.३, ४.)

११. नातरी तीनशे साठ व्रतें । विधियुक्त केली समस्तें । की अश्वमेध घडले शतें । निष्कामबुद्धी निजनिष्ठें ।। -(भक्तविजय, १६.२, ५.)

१२. फेर पडे तो पस्तावेगा । लाख चौऱ्यांशी चक्कर है । करसे फलमो छोटे मोठे । बहुत जन्म का झोका है ।। -(नागप्प, पृ. १२३.)

१३. जें नेमकांस न कळे । तें बाष्कळांसी केवीं कळे । डोळस ठाकती आंधळे । कोण कामाचे ।। -(दासबोध, १७.१०.२६.)

१४. तो पहिला आर्त म्हणिजे । दुसरा जिज्ञासु बोलिजे । तिजा अर्थार्थी जाणिजे । ज्ञानिया चौथा ।। जयाचिये प्रतीतीचा वाखोरा । पवाडु होय चराचरा। तो महात्मा धनुर्धरा । दुर्लभु आथी ।। -(ज्ञानेश्वरी, ७.१०९,१३७.)

१५. असो ऐसे सकळहि गेले । परंतु येकचि राहिले । जे स्वरूपाकार जाहले । आत्मज्ञानी ।। -(दासबोध, ३.९.५९.)

१६. नुडि नडि इदे जन्म कडी ।। -(महाराजरवर वचन, पृ. ४०.)

अर्थ - बोलण्यासारखे वागणे असलेतर हाच जन्म अखेरचा.

१७. डोळसाचा माग ऐकूनि कानीं । आंधळे चालती चांचपोनी । तेवीं मी बोले आर्षवाणी । कृपेंकरूनि तुमच्या ।। -(भक्तविजय, ५.१५७.)

१८. येक ज्ञान पावोनि अतिकृपण । जीव गेलिया न बोले जाण । भेणें भेणें धरोनि मौन । न बोले वचन सर्वथा ।। -(भागवत, ११.१०.२०.)

xxxxx

पत्र २३० पान २२२

नवीन
क्रमांक

८७ (टिपण :- पत्रावर तारीख, तिथी, गाव, कुणी कुणाला लिहिले आहे, कशाचाच पत्ता लागत नाही. 'पत्र वाचून, मनन करून अर्थ लिहावा' या शब्दांवरून हा दुसऱ्या एखाद्या पत्राचा भाग असावा हे कळते. जमखंडीकर व विजापूरकर यांना पत्रे गेली आहेत असे इथे आहे. पौष शु. १५ ला जमखंडीकरांना ज्ञानमार्गाची ६३ व २६१ ही

पत्रे गेली आहेत, त्यांचा संदर्भ असू शकतो. विजापूरला २५९ हे पत्र पौष ३० ला गेले आहे. त्याचा संदर्भ असेलतर प्रस्तुत पत्र त्यानंतर जाऊ शकते. किंबहुना हे पत्र कोणत्याही पत्राचा शेवटचा भाग असू शकते. सुरवातीस 'तुम्ही दोघांनी पत्र वाचावे' असे आहे. दोघे कोण कळत नाही.)

श्री

तुम्हा दोघांस सवड होईल तेव्हा मन एकाग्र करून, वाचून, ज्या ज्या गोष्टींचा उल्लेख आहे त्या त्या पाहून एकूण तात्पर्य अर्थ काय झाला ते जर ठरेल तर त्याचे उत्तर अर्थ करून लिहावे. ह्या सवडीच्या फुरसतीच्या गोष्टी आहेत. उगीच पाहण्याकरिता पाठवले आहे. रिकाम्या ज्ञानगोष्टींचा व्यवसायात गलबला वाटतो, तथापि सवडीप्रमाणे पाहावे, मनन करावे. याचप्रमाणे विजापूर व जमखंडी मंडळींस पत्र पाठविले आहे. कळावे. आता तुम्हांस कळवितो की प्रवृत्तिमार्गाने अगर निवृत्तिमार्गाने झालेतरी मी अमुक झालो असे ठरते. अहंकार, मद, दंभ येऊन बेखबर होतो. यास उपायच नाही. आपोआप कळावे लागते. त्यावाचून समयी दुसरे कोण सांगतील ? असो. अज्ञानपणा येतो. येऊन प्राण्यास बुडवतो. असो.

पत्र २६२ पान २७७

नवीन
क्रमांक
८८ (टिपण :- नवीन क्रमांक ३३ या पत्रातील स्पष्टीकरण पाहावे. हे पत्र तुकडे जोडल्यासारखे विस्कळित आहे.)

उमदी पौष व. ...

श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री महाराज अंबुराव, अण्णप्पा,

मदप्पा, शिवप्पा, तसेच सावळसंग समर्थ मंडळी, सातलगाव समर्थ मंडळी व जिगजीवणी समर्थ मंडळी वगैरे सभामंडळींस, स्वामींचे चरणारविंदसेवेशी,

आज्ञाधारक आपला उमदीकर भीमा याचा अति नम्रतेचा अनन्यभावाचा त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. पौष व. ... पावेतो श्रीसमर्थमहाराजकृपेने आनंदरूप असो विशेष. 'समर्थाचिया घरचे स्वान । त्यास सर्वही देती मान' ॥ हाच अर्थ जन्मवरी पूर्वापार चाललेलाच आहे व बिंबून गेला आहे. यामुळे दुसरा अर्थच चालेना. त्यास उपायच घडेना. आपणतरी दुसरा अर्थ काय असेल त्याचे उत्तर लिहावे.

देह त्यागिता कीर्ती मागे उरावी याचा अर्थ कोणता असेल, तो दुसरा अर्थ कळवाल अशी इकडून उमेद फार आहे. आता या देहास काम, क्रोध, ममता, आशा, द्रव्य, मूलबाळ व स्त्री, श्रजेता (स्वतःच्या मोठेपणाचा अहंकार) अभिमान, तसेच धरलेले (सुरू केलेल्या) कर्माचा अभिमान हे अहंकार प्रवृत्तीत जडून गेले. आता निवृत्तीतील लोभ, ममता, काम, क्रोध, षड्‌रिपू सोडले, मी झालो. मला व्यवसायातील कर्तव्यच नाही अशा निष्ठेने (निश्चयाने, कल्पनेने) कूटस्थातील अहंकाराचे योगाने आम्ही आहो (श्रेष्ठ आहो) अशा भावाने कीर्ती करीत चालतात. परंतु ते येथील येथेच राहत आहे. बरोबर कोणतेही येत नाही. असे वाक्यही आहे. याचा अर्थ काय असेल तो खुलासेवार लिहावा. आता सहजी एक अर्थ– सर्व लहान थोर म्हणजे विद्वान धरून लहान मुलापर्यंत होतो. हा वहिवाटीवर आहे असे म्हणाल. परंतु ज्याला कोणीही नाही असा लहान मुलगा असतो. अशा मुलास वयात आलेबरोबर लाभ,तोटा, मान, अपमान, नुकसान, संतोष वगैरे सर्व आपोआप कळू लागते. तद्वत् दुसरा अर्थ का कळत नाही ? आता समर्थवाक्य 'जितका गाव तितका देव जनाकारणे', याप्रमाणे रुक्मानंद, महीपतीस्वामी, ज्ञानोबा, तुकाराम, रामदास वगैरे होऊन गेले. या जगात मागे त्यांचे देऊळ होऊन त्या ठिकाणी देवपणाच झाला आहे.

शिवाय सिद्ध पुरुषही होऊन गेले. त्यांचेही मागे उत्सव परंपरा चालली आहे. जीवभावाचा, तीनशे साठ मार्गांचा, कर्ममार्गाचा, कामनामार्गाचा, असे सर्व भावांचे भक्तीस कोठे देवपणा आला आहे, त्यांचा उत्सव चालत आहे.

आता जितके गाव तितके देव जनाकारणे अशा वाक्याचा अर्थ दुसरा काय असेल तेही खुलासेवार लिहावे. सारांश आपणांस तसदी दिलेबद्दल माफी असावी. उगीच विनाकारण मनास श्रम होईल असे मनात आणू नये. एक वेळा, दोन वेळा, तीन वेळा वाचून, मनन करून त्याचे खुलासेवार उत्तर लिहावे. एकेका अक्षराशी थांबून दोन दोन वेळा वाचल्याने अंतःकरणात अर्थ जडेल. याकरिता दोन तीन वेळा वाचून मनन करावे अशी प्रार्थना आहे. वर लिहिलेल्या गावांच्या मंडळींकडे पाठवून, वाचून, ज्याचे त्याचे बुद्धीप्रमाणे उत्तर आम्हांकडे पाठवावे.

हे सर्व अंतःकरणापासूनच्या भक्तीतील गोष्टी आहेत. प्रेमळांस आनंद तात्काळ होतो. हिरवटास विश्वासावर होये होये असेलतर (अनुभव नसला तरी विश्वासच नुसता असलातर) असेल. अशा भावाने समजूत होऊन पुन्हा लोकांचे बोली लागला तो सर्वस्वी बुडाला असे होत आहे. 'कचरटास काहीच कळत नाही'[१] असें दासबोधी आहे. ती ओवी कोणती व कोणत्या समासात आहे ते लिहावे. कूटस्थांतील भाव जाणला असता आनंद होतो. आता वाक्य, 'असा विरळा बळी धैर्यवंत'[२] हे कोणत्या समर्थांचे वाक्य आहे ते लिहावे.

आता सहजी पूर्वदिशेचा वारा सुटून आभाळ तळापासून चढत चढत पश्चिम दिशेकडे गेले म्हणजे सूर्य, तेज, नक्षत्रे आच्छादली जातात. जेवढा वेळ संगती गुण असतो तेवढा वेळ सूर्यावर अंधकार दिसतो. पण आत जैसा-तैसा असतो. असो.

समर्थवाक्य वर लिहिलेले कलम[३] २५ (कोणते कलम ?) मधील, कोणत्या समासातील आहेत ते लिहावे, अशी प्रार्थना आहे.

नोंदी :-

१. हिरवटासी दुरी धरावें । कचरटासी न बोलावें । संबंध पडतां सोडून जावें । येकीकडे ॥ –(दासबोध, ११.५.२१.)

२. रामदास म्हणे अवघेची गाबाळी । ऐसा विरळा बळी धैर्यवंत ॥ –(नवनीत, पृ. १४५.) वाक्य समर्थ रामदासांचे आहे हे मुद्रिकेवरून कळतेच.

३. कोणत्या कलमाचा संदर्भ आहे कळत नाही. या पत्रामधून सुसंगत कल्पनाही काढता येत नाही. बहुतेक सर्व वाक्ये कुठून कुठून उचललेली आहेत.

xxxxx

	पत्र ६४	**पान ८७**
नवीन	जत	पौष व. ११
क्रमांक	नानासाहेबांना पत्र	२१.१.१९०६, रविवार
८९		

श्रीगुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक कृष्णाचा दोन्ही कर जोडून, त्रिकाळी अति नम्रतापूर्वक चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. मिती पौष व. ११, रविवारपावेतो वडिलांचे चरणानुग्रहेकरून सर्व सुरक्षित असो. विज्ञापना. तीर्थरूप अप्पांना येथे येऊन दोन तीन रोज झाले. येथून धोंडूबाईकरिता[1] आलवण[2] घेऊन पाठविले आहे. आलवण ३२ हात आहे. किंमत ५ रुपये पडली आहे. चि. भीमाचे पत्र काल रोजी आले. जमाबंदीचे काम लवकर आटोपून जतेस येण्याचे करीत आहे म्हणून लिहिले आहे. उमदीस आलेवर लौकरच भीमरायास पाठवून देण्याचे करावे अशी बाळकाची विनंती आहे. परवा आबूलाल सनदीबरोबर पाठवलेले पत्र पोचलेच असेल. वरकड मजकूर अधिकोत्तर नाही. वडिलांप्रत विशेष काही लिहिणे बाळकास शक्य नाही. साखळीबद्दल अप्पांनी सांगितले की एक साखळी आहे. तिची किंमत करून त्या अदमासाने तिचे रुपये देण्याचे करावे. एक मात्र मोडली आहे. तेरा कड्या पाठवल्या आहेत. ही विज्ञापना.

धोंडूबाईंनी अप्पास आलवण व दुसरा जिन्नस, सोवळे, सांगितले होते. ते त्यांना आठवत नसलेने लिहिण्यास सांगितले आहे. आणखी काही हवे असलेस पाठवत आहे. सोड्डी व सुसलाद येथील वसूल आला असेलस त्यातून इंचगेरीस अंबुरावांकडे साळीचे रुपये जरूर पाठवावे. अंबुरावांनी रुपयांचा खोळंबा असलेचे सांगितले आहे. सबब जरूर रुपये पाठवून द्यावे. रुपये नसलेस कोणाकडूनतरी उसने घेऊन पाठवण्याचे करावे. त्यांना फार खोळंबा आहे. रुसुम घेतलेनंतर सोनलगी वगैरे शेताबद्दल जुडीची (शेतसारा) बाकी भरत आहे. ही विज्ञापना.

नोंदी :-

१. धोंडूबाई म्हणजे रघुनाथाचार्य आद्य (नानासाहेबांचे जावई) यांची बहीण असावी.

२. पूर्वीच्या काळी विधवा बायकांना विकेशी करीत म्हणजे डोक्यावरचे केस संपूर्ण काढून टाकीत. त्यांचा वेष म्हणजे आलवण. आलवण हे लाल रंगाचे लुगडे असे. ते लुगडे व फारतर पांढरे लुगडे यांखेरीज इतर रंगाची लुगडी वर्ज्य. त्यांच्यावर बंधने फार असत. त्यांना सोवळी बाई असे म्हणत. मागच्या पिढीत अनेकींच्या नशिबी असे दुर्दैवी जीवन येई. सुदैवाने आता ही दुष्ट प्रथा जवळजवळ नाहीशी झाली आहे.

xxxxx

पत्र ६५ **पान ८८**

नवीन
क्रमांक

९० (टिपण :- ६४ या मागच्या पत्राची तारीख २१.१.१९०६ असून तिथी पौष व. ११ आहे. या पत्राची तारीख २४.१.१९०६ आहे म्हणून तिथीही तीन दिवसांनंतरची म्हणजे पौष व. १४ येते.)

जत — पौष व. १४
२४.१.१९०६

श्रीगुरुसमर्थ

राजमान्य राजश्री वासुदेवरावसाहेब बिदनूरकर, मुक्काम गुडगेरी, स्वामींचे चरणारविंदसेवेशी, भाऊ उमदी याचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. तागाईत तारीख २४ जानेवारी सन १९०६ इसवीपावेतो श्रीसमर्थकृपेने सर्व वर्तमान आनंदरूप असो. विज्ञापना. तुमचे पत्र व मकरसंक्रमणाचे तीळ पाठवलेले युक्त (शुद्ध ? योग्य ?) मनाने एकरूप होऊन स्वीकार झाला. ती गोडी सांगावयास येत नाही, असा आनंद झाला. असाच निरंतर परामर्श घेत असावे. वडील आईस माझा शिरसाष्टांग नमस्कार स्मरणपूर्वक कळवावा. आपलेकडील एकंदर लहानथोर, मुलांबाळांसकट मंडळी खुशाल असलेचे खुलासेवार लिहावे. आपले हुद्याचा खुलासा, आपले ठिकाण, नाव, गाव, पत्ता लिहून येत असावा. सुज्ञच आहांत. इकडील व सावळसंगाकडील मंडळी खुशाल आहेत. पाऊसपाणी, धारण, पीक एकरूप आहे. आपण श्रीक्षेत्र काशी, गया, तीर्थक्षेत्रांस गेलेचे व पुण्य घडल्याचे ऐकून अत्यानंद झाला. हे सर्व सुकृताप्रमाणे आहे असे म्हणण्यास अडचण नाही.

आता घरी आई आहेत. त्यांची सेवा घडलेस यात्रेपेक्षा जास्त सुकृत होईल, असे वाटते. तुकारामांचे वाक्य आहे – 'मायबाप केवळ काशी । तेणें न जावें तीर्थासी । सर्व तीर्थाटण करिता । मायबाप नारायण'[1] ॥ असा वाक्याधार असलेचे आपण समजूनच आहां. त्या आधारे व रामदासांच्या मनाचे श्लोकांतील २०४ श्लोक आधार आहे. 'गुरूचिंतनेवीण कोठे न जाई'[2], तेही आपण जाणतच आहां. याचप्रमाणे आपणांस घडून येत आहे व आपले सुकृत हेही घडले यावरून आपले सुकृताविषयी लिहिण्यास पुरवत नाही. याबद्दल माझा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार फार फार आहे. कळावे. कृपा लोभ निरंतर असो द्यावा ही विज्ञापना.

हेच पत्री कृष्णा याजकडून अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. वर वडिलांनी लिहिले आहे ते श्रुत होईल. सर्व मंडळींस माझा शिरसाष्टांग नमस्कार आहे. मी संस्थानात तूर्त कामावर आहे. कायम जागा

मिळालेली आहे. पगार १० रुपये आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. कळावे, ही विज्ञापना.

इकडून मकरसंक्रमणाचे तीळ युक्त पिवळ्या रंगाचे सहा घेऊन त्यांपैकी एक व पांढऱ्या रंगाचे ११ घेऊन त्यांपैकी एक, असे दोन्ही रंगांचे पाठविले आहेत. प्रकृति-पुरुष व सगुण-निर्गुण दोन प्रकार असून निर्गुणच होऊन गेले. सगुण-निर्गुण दोन राहिले नाहीत. त्या त्या रंगाचा अर्थ होऊन स्वीकार व्हावा. या अर्थाचे उत्तर लिहून येईल अशी इकडील उमेद आहे.

नोंदी :-

१. मायबापें केवळ काशी । तेणें न वजावें तीर्थासी ॥१॥ पुंडलीकें काय केलें । परब्रह्म उभें केलें ॥२॥ तैसा होई सावधान । हृदयीं धरा नारायण ॥३॥ तुका म्हणे मायबापें अवधी देवाचीं स्वरूपें ॥ -(तुकारामगाथा, अभंग ३८९ (क्षेपक), पृ. ९९५).

२. न जायें जपासी । न जायें तपासी । न जायेंचि काशी । न जायें गयेसी । गुरूचिंतनेवीण कोठे न जायें । त्रिकाळीं सदा पाय तूझेचि पाहे ॥ -(मनाचे श्लोक, २०४.)

xxxxx

पत्र २५९ पान २५९

नवीन
क्रमांक

९१ (टिपण :- हे पत्र ज्ञानमार्गाची पत्रे या सदरात होते. आता ते वर्गीकरण ठेवलेले नाही. शिवाय या पत्रावर तारीख आहे. तारखेनुसार इथे आणले ते ६५ पत्रानंतर बसते. ६५ पत्राच्या दुसऱ्या दिवशीची तारीख आहे म्हणून या पत्रावर तिथीही ६५ पत्राच्या दुसऱ्या दिवसाची घातली आहे.)

उमदी पौष व. ३०

२५.१.१९०६

श्रीसद्गुरुसमर्थ

महाराज राजमान्य राजश्री नरहररावजी रावसाहेब वकील, स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, सेवक भीमाजी व्यंकटेश देशपांडे उमदीकर, याचा कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती. विज्ञापना. तारीख माहे जानेवारी २५, १९०६ इसवीपावेतो श्रीसमर्थगुरुकृपेकरून आनंदरूप असो. विज्ञापना. आपण समक्ष दर्शविलेप्रमाणे ज्ञानमार्गाचे खुलासेवार उत्तर लिहिण्यास उद्युक्त होऊन खालील मजकुराचे उत्तर–

(१) निर्गुण ब्रह्मास दर्शन, स्पर्शन, संभाषण नाही असा युक्तिवाद करून श्रुतीस बाधा येण्यासारखे होईल असा मुद्दा काढून, त्या आधारे खरे आहे असे म्हणण्यासही प्रवृत्तिमार्गातील कल्पनेतील कल्पित वाक्य काढलेले पाहून आनंद आनंद झाला. (परब्रह्मास म्हणजे निर्गुणास दर्शन, स्पर्शन, संभाषण नसताना संचवचनांतून अनेकदा तसा अनुभव आल्याचे म्हटलेले आहे. अर्थातच मग श्रुतिवचनाला बाधा येते असा मुद्दा कलमडींनी काढला असावा. त्याला हे उत्तर आहे. तरीही असा विचार केला याबद्दल आनंद दर्शविला आहे.) का म्हणालतर व्यवसायात सवड काढून, भक्तीकडे मन लावून, ज्ञानमार्गाची जिज्ञासा बाळगून खरे ज्ञान कोणते याची वाटाघाट केलीतरच ज्ञान सुलभ होते.

(२) पूर्वी शुकास गुरुभेटीस जाताना किती यातायात पडली, मीपणा घालविण्यास किती श्रम झाले पाहा. मग मीपणा गेलेवर प्रज्ञेस अधिकारी झाला (ज्ञानी झाला). एकनाथ स्वामींना टक्क्याचा हिशोब काढताना जन्माचा हिशोब सांगावा लागला. तद्वत् आपला युक्तिवाद फार विचाराचा आहे. आता कविशर्तीस (संतवचनांनी) श्रुतीस बाधा येण्यासारखे होईल असे झाले.

BS 3(42)

(३) 'परतस्तु सः'[१] 'अप्राप्य मनसा सह'[२]। असे वाक्य प्रवृत्ति–निवृत्ती दोन्ही ठिकाणी घेऊन दोन अर्थ होण्यास काय आशंका आहे ? ज्या ठिकाणी

41.72 (9)

बोल आहे ते वाच्य ज्ञान झाले. त्या अबोलास बोल आहे आणि बोलास अबोल यांत मेळ कसा पडेल ? मुळीच बोलच निघेल, अबोलास बोल अगर वाटाघाट मुळीच निघणार नाही.[३] (अबोलाचे किंवा निर्गुणाचे ज्ञान वाच्य रूपाने होते म्हणजे त्याला सगुणाचे रूप दिले जाते. पण बोलास अबोल म्हणजे वाच्य ज्ञानातून निर्गुणाचा अनुभव कसा येणार? प्रवृत्तीतून प्रवृत्तीच येणार, त्यातून निवृत्तीचे ज्ञान (अनुभव) किंवा चर्चा शक्य नाही. हा आक्षेप तत्त्वतः बरोबर आहे. परंतु सगुणाकडून किंवा सगुणाच्या आधाराने निर्गुणाला पोचता येते याला संतवचनांचा आधार आहे.) सगुणरूप नयनीं नयनीं आधीं दावा । मग तुम्ही वेदान्त गावा। असे वाक्य समजूनच आहां. मागे अवतारादिक होऊन गेले त्यांची उपासना चालू आहे. 'संभवामि युगे युगें'[४] । असे आहे. म्हणजे सगुणात येऊन निर्गुण होऊन गेले आहेत. सगुणात आलेतरी सगुण होऊन बसले नाहीत, निर्गुण ते निर्गुणच राहिले.

(४) वर लिहिलेल्या शर्तीप्रमाणे अबोलास बोल आहे, बोलास मात्र बोलच नाही[५] हे समजण्यास काय आशंका आहे ? सगुण भजनाने निर्गुण होत आहे, यास बाधा येण्यास काय आधार आहे ? सगुणात सगुण होऊन निर्गुण वस्तूची भेट युगे युगे झालेली आहे. दर्शन, स्पर्शन, संभाषण झालेले आहे. निर्गुण वाक्याचे शब्द गद्य, पद्य, आजवर श्रुतिवाक्य चालत आले आहे. त्या आधारे निर्गुण होत चालले आहे. मागे होते, आता नाही असे म्हणण्याने मात्र श्रुतिवाक्यास बाध येत आहे. सगुणात निर्गुणाचे दर्शन होते. तुकाराम महाराजांचा अभंग 'पाहा पाहा डोळेभरीं । मूर्ती सावळी गोजिरी'[६]। असा आहे. असे गद्य, पद्य झालेले आहेत. आता आपण लिहिलेल्या शर्तीवरून , 'द्वितीयाद् वै भयं भवति'[७] यावरून भवाचे भय चुकणार नाही असे दिसते. तर याची वाट कशी लावावी हे कळवावे म्हणून आपले लिहिणे झाले.

(५) कल्पित वाक्यास शंका घेणे किंवा आत्मज्ञानाचे शर्तीवरून श्रुतिवाक्य समजून घेणे (अनुभवाच्या कसोटीवर श्रुतिवाक्य समजून घेणे) म्हणजे खरा अर्थ समजणे. याला आधार समर्थवाक्य दासबोध दशक ६ समास

६, ओव्या २६, २७, २८[८]; ५४, ५५[९]. शास्त्रे भांडण तोडी असा कोण, आत्मज्ञानावाचून. निर्गुण स्वरूप दासबोधी दशक ७ समास ४[१०] ओव्यांत निरसन केलेले आहे. हे एकंदर समर्थ मुद्दा पुढील ओव्यांत आहे– दशक ९ समास १ 'सद्‌गुरू केलिया समजणार'[११] व 'विश्वास पडणार', 'विश्वासिता मुक्ति ला हे'[१२] असा वाक्याधार समजूनच आहां. दशक ३ समास ९ यात सर्व निरसन होऊन शेवटी येकचि उरले ते स्वस्वरूपी होऊन गेले आहेत. तेच जगात रुक्मांगद, महीपती स्वामी, तुकाराम, रामदास, ज्ञानोबा वगैरे पुष्कळ पुण्यवान होऊन गेले. त्यांना दर्शन, स्पर्शन, संभाषण झाले होते म्हणून आजवर चालत आले. का म्हणालतर 'पुण्यमार्गे चालले म्हणोनिया'.[१३] पुण्यमार्ग कोणता आहे, कशाला म्हणावे हेही मुळीच कळत नाही. हे कळण्यास निष्ठूरपणे (निश्चितपणे) साधन अभ्यास झाला पाहिजे. समर्थवाक्य 'धर्मामध्यें धर्म स्वरूपीं राहणें हा स्वधर्म' याचाही अर्थ कळत नाही. साधनाने कळून येतो. मुळीच सगुण राहत नाही, निर्गुणच होऊन जात आहे. मुख्य आपापले अंतःकरणात मी अमुक आहे असा भाव (मी श्रेष्ठ आहे असा अभिमान) मुळीच राहत नाही. निर्गुणच होऊन जात आहे. आधी मात्र व्यवसायात जो भाव अंतःकरणात धरला आहे त्याच भावाप्रमाणे प्राणी वागतो. पूर्वीच्या आपल्या जातीची (मूळ स्वभावाची) आठवण राहत नाही. व्यवसायाची (कर्तव्याची आठवण राहत नाही.) हल्लीच्या व्यवसायात मी अमुक आहे असे अंतःकरणात ठरून जाते. वास्तविक 'दरिद्री नृपती केले'[१४] असे झाले पाहिजे. याप्रमाणे सगुणच निर्गुण होऊन जातो असे मनात अनुमान होत आहे. आता या शर्तीवरून आपण खरे मानू नये (श्रुतिवाक्य व संतवचने यात विरोध आहे असे समजू नये.) अजून श्रुतिवाक्याचे आधारे पुन्हा या मतिमंदास ज्ञान सुचवून द्याल अशी आशा आहे. वर दिलेल्या शर्ती मुद्दाम काढून आपणांस तसदी दिल्याची माफी असावी. पुन्हा वाक्याधारे ज्ञानमार्गाचे मुद्दे काढून या मूढाकडून काहीतरी सेवा घडावी व मन त्यात निमग्न व्हावे अशी युक्ती योजून उत्तर यावे म्हणून फार फार प्रार्थना आहे.

(६) आता ७.९.१०[१५] या शर्तीची नक्की अर्थाची खात्रीने समजूत होत नाही असे आपण लिहिले त्याचे उत्तर– सगुण हे ब्रह्म विठलचि बोले येका पाऊले तुकाराम असा अभंग आहे. याचा अर्थ सगुण म्हणजे समर्थांनी सुचवले आहे की अजपामध्ये गुरुवाक्य (नाम) निरंतर (दिवसभरातील २१६०० श्वासोच्छ्वास म्हणजे अजपा) चालावे म्हणजे सगुण सहजी ब्रह्म झाले, अकर्तव्य झाले, जीवभाव राहिला नाही. विठ्ठलभाव झाला (सगुण हे ब्रह्म विठ्ठलचि बोले म्हणजे विठ्ठलच सगुणरूपाने बोलतो.) मग आपापल्या व्यवसायात राहिलातरी त्यात तुकाने (तोलून–मापून सतत निष्ठेने) रामराम चालविले की तुकाराम झाला. आता केलेले जे अभंग म्हणजे प्रपंचात अथवा परमार्थात जे कर्तव्य आहे त्या गोष्टीस भंग नाही म्हणून तुकारामांचे अभंगांना भंग नाही, अभंग होऊन गेले असा सहजी कल्पित अर्थ काढला आहे. तो खरा वाटत असेल त्याप्रमाणे उत्तर येईल अशी उमेद आहे.

(७) 'चार कोटी येक लक्ष चौतीस सहस्र स्पष्ट सांगितलें । सांगितलें हे तुका कथोनिया गेला । बारा अभंगाला सोडू नका । सोडू नका तुम्हां सांगितलें वर्म । भवपाशीं कर्मे चुकतील । चुकती यातायाती विठोबाची आण । करा हें पठण जीवें भावें । जीवें भावें करितां होईल दर्शन । प्रत्यक्ष सगुण । तुका म्हणे ।। याप्रमाणे प्रवृत्तिअर्थाने प्राण्याने हे चार कोटी अभंग हुडकावयास काशीच जावे, रामेश्वरास जावे, कोठे जावे, केव्हा मुक्ती होईल, आयुष्यही कसे पुरेल ? या एकंदरांवरून पाहिले असता चार कोटी एक लक्ष म्हणजे चारी अवस्थांत, चारी प्रहरांत प्राण्यास या कोटींत काळजीच लागली; त्या काळजीचे योगाने त्या ध्यासातच मरमरून जातात. म्हणून समर्थांनी चार कोटींत एक लक्ष (लक्ष्य) म्हणजे गुरुवाक्यावर लक्ष ठेवले असता असे सांगितले. याचप्रमाणे सर्व शर्तीचा अर्थ होत आहे. अशा कल्पित अर्थास आपण कबुली देणार काय ? याबद्दल पुन्हा उत्तर लिहून येईलतर, आपले आभार मानून आणखी ज्ञानमार्गास उत्तेजन होऊन काही काही समजून परस्परे उलगडा होत जाईल म्हणून प्रार्थना फार फार सांगितली आहे.

(८) समर्थवाक्य, 'सिंका आली, जांभई आली, माझा काळ व्यर्थ गेला'[१६] ।
असे भिऊन प्राणी चालला तर सगुणात निर्गुण होऊन जातो.

(९) मोक्षभागीं विभागीं म्हणजे मोक्ष जो आहे तो अक्षांतच (डोळ्यांत) आहे. त्यात विभाग म्हणजे अर्धा भाव लोचनी (अर्धोन्मीलित दृष्टी) असे प्राणी वागलेस डोळ्यांतील मोह निर्गुणाकडे गेल्याने म्हणजे अक्षाचे ठिकाणी निर्दोष होऊन निर्गुणाकडे पाहू लागल्याने अकर्तव्य झाला. त्यायोगे भगवत् चरणारविंदांचा मोह पडल्याने मोक्ष झाला असा कल्पित अर्थ मान्य कराल काय ? हेही उत्तर लिहाल अशी आशा आहे. म्हणजे जास्त कल्पना निघतील व आभार मानले जातील अशी प्रार्थना आहे.

(१०) आता 'अतर्क्यास तर्की अज्ञा कोण आहे'[१७] । याचा प्रवृत्तीतील व निवृत्तीतील अर्थ काढून अनुभवास अनुसरून लिहिण्यास उद्युक्त व्हाल असा भरवसा आहे.

(११) आता तुकाराम महाराजांचा अभंग, 'तुका म्हणे गर्भवासीं सुखें घालावें आम्हांसी' ।। असा आहे. याचे पूर्वी लिहिलेले अर्थाने समजूत झाली नाही. करिता, सर्व प्राण्यांस लागू होईल असा निर्गुणास अनुसरून केलेला अर्थ योजून उत्तर यावे.

फार तसदी दिल्याची माफी होऊन एका ओळीत माफी केल्याचे उत्तर येण्याची प्रतीक्षा आहे. आता व्यवसायात (वेळ काढून) एकाग्र होऊन दोन तीन वेळा वाचून, मनन होऊन खुलासेवार उत्तर लिहावे अशी फार फार प्रार्थना आहे. वाघाची पिल्ले वाघापुढे उड्या मारतात तशी सलगी केली आहे. मला लिहिता येत नाही. कोश, व्याकरण समजत नाही. आपण उत्तर लिहिण्यास आज्ञा केल्यावरून हे सर्व लिहिले. म्हणून आपले आभार मानत आहे. कळावे. कृपा-लोभ पूर्ण असो द्यावा, ही विज्ञापना.

दासबोध दशक १६ समास ९ यांत निरसन केले आहे[१८]. ते पाहिले असता खात्री होईल. मनाचे श्लोक १८० मध्ये 'जया मानिला देव तो पूजिताहे'[१९] असेही वाक्य आहे. हे सर्व जाणतच आहां. मकरसंक्रमणाचे तीळ शर्करायुक्त थैलीतून यालगत पाठविले आहेत.

पिवळ्या रंगाचे सहा व पांढऱ्या धगधगीत रंगाचे ११ आहेत. ज्या त्या रंगाचा अर्थाप्रमाणे स्वीकार होऊन उत्तर येईल अशी इकडील उमेद फार फार आहे. महाराज धोंडोपंत दादासाहेब यांस अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार वडिलांनी सांगितला आहे तो श्रुत करालच. घरी वडील मंडळींस माझा शिरसाष्टांग नमस्कार आहे, ही विज्ञापना. सहा पिवळे असल्याने, त्यायोगे त्या प्राण्यास महत्त्व येते (?) व नाना प्रकारे सुख भोगतो. परंतु शेवटी त्या भावास, त्या रंगास कल्प आहे (महत्त्व आल्यावर अहंकार येऊ शकतो.) तेच सहा पांढरे झाले असता सत्रावी सुंदरी[२०] होऊन सायुज्यता पावण्यास योग्य असा अर्थ अनुमानाने होईल. आपण खरा मानू नये पण यातून काही जास्त कल्पना निघालीतर कळवाल म्हणून लिहिले. अशा मजकुराचे मनन करून ज्ञानमार्गास उत्तेजन मिळते. व्यवसायात कोणास सवड होत नाही, तरीही हल्ली पत्राद्वारे बोध होत आहे. त्यासाठी वडिलांनी फार प्रार्थना व शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे.

नोंदी :-

१. इंद्रियाणि पराण्याहुः । इंद्रियेभ्यः परं मनः । मनसस्तु परा बुद्धिः । यो बुद्धेः परतस्तु सः ॥ -(भगवतद्गीता, ३.४२.)
अर्थ-इंद्रिये श्रेष्ठ आहेत; इंद्रियांहून मन वरचढ आहे; बुद्धीचा दर्जा मनाच्या वर आहे आणि (आत्मा) बुद्धीच्या पलीकडे (अधिक श्रेष्ठ) आहे.

२. यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ॥ -(तैत्तिरीय उपनिषद् २.४.१. दासबोधात ७.२.९ नंतर हा चरण आला आहे.)

३. तेथ आक्षे५ उत्तराचे बोल । काहींच नाहीं राहील । बोलचि जाले अबोल। अबोल बोलणें केवीं घडे ॥ -(पूर्णानंदचरित्र, लेखक हनुमनात्मज, ५.२९).
अर्थ- सगुण निर्गुण झाल्यावर त्याच्याबद्दल काही बोलता येत नाही.

४. धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ -(भगवद्गीता, ४.८.).

५. वाक्य अवघड आहे, पण पत्रातच पुढे अर्थाची सूचना आहे. अबोल म्हणजे निर्गुण व बोल म्हणजे सगुण असा अर्थ घ्यावा लागतो. अबोलास बोल

आहे म्हणजे निर्गुण परमात्मा सगुण रूपात अवतार घेतो. बोलाय बोल नाही म्हणजे सगुण रूप कायमचे किंवा सत्य नाही. परमात्म्याने सगुण रूप घेतलेतरी ते त्याचे खरे स्वरूप नाही. तो निर्गुणच राहतो. त्याच्या निर्गुण स्वरूपाला बाधा येत नाही.अबोल बोल झालेतरी ते वस्तुतः अबोलच राहते.

६. नित्यनेमावली, पृ. ३९

७. बृहदारण्यक उपनिषद् १.४.२.

८. वेदशास्त्र श्रुति स्मृती । तेथें वाक्यभेद पडती । ते सर्वही निवडती । सद्गुरूचेंनि वचनें ॥ वेदशास्त्रांचें भांडण । शस्त्रें तोडी ऐसा कोण । हे निवडेना साधुविण । कदा कल्पांती ॥ पूर्वपक्ष आणि सिद्धांत । शास्त्रीं बोलिला संकेत । याचा होय निश्चितार्थ । साधुमुखें ॥– (दासबोध, ६.६.२६, २७, २८).

९. म्हणोनि सृष्टी नाशिवंत । जाणती संत महंत । सगुणीं भजावें निश्चित । निश्चयालागीं ॥ सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें । सारासारविचारें। संतसंगें ॥ –(तत्रैव, ६.६.५४,५५.)

१०. ७.४ हा दासबोधातील संपूर्ण समास निर्गुणाचे वर्णन करतो. नाव विमळब्रह्मनिरूपण असेच आहे.

११. परब्रह्म म्हणिजे सकळांपरतें । तयास पाहाता आपणचि तें । हें कळे अनुभवमतें । सद्गुरु केलिया ॥ –(तत्रैव, ९.१.२९.)

१२. चढें ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगीं । म्हणे दास विश्वासिता मुक्ति भोगी ॥ –(मनाचे श्लोक, २१०.) ? 205 · [illegible]

१३. ज्ञानी मुक्त होऊन गेले । त्यांचें सामर्थ्य उगेंचि चालें । कां जे पुण्यमार्गें चालिले । म्हणोनिया ॥ –(दासबोध, १०.७.११.)

१४. मोक्षश्रिया आलंकृत । ऐसे हे संत श्रीमंत । जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ॥ –(तत्रैव, १.५.२१.)

१५. ज्याची उपासना जैसी । त्यासी प्रीती वाटे तैसी । तेथें वर्णितां दुजयासी। प्रशस्त न वाटे ॥ –(तत्रैव, ७.९.१०.)

१६. शिंक जांभई खोकला । तितुका काळ व्यर्थ गेला ॥ –(रामदासवचन,

पृ. १९६.)

१७. म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे । अतर्क्यास तर्की असा कोण आहे ॥ –(मनाचे श्लोक, १५८.)

१८. १६.९ या दासबोधातील समासाचे नाव नाना उपासनानिरूपण आहे. सगुण निर्गुणाचा विषयही आहे.

१९. जया मानला देव तो पूजिताहे । परी देव शोधोनि कोणी न पाहे ॥ –(मनाचे श्लोक, १८०.)

२०. सत्रावी सुंदरी ही रसाच्या अनुभवाची सूचक आहे.

xxxxx

	पत्र ६६	**पान ९०**
नवीन	उमदी	फाल्गुन शु. १५
क्रमांक		१०.३.१९०६
९२		

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. तारीख १० मार्चपावेतो सर्व आनंदरूप असो. विज्ञापना. तुकारामासमागमे पत्र लिहिले आहेच. ते पावलेच असेल. पंडितांचे पत्र कुलकर्णीनी मुद्दाम आणून दिले ते पावले. पंडितांचे हातातील जिन्नस ठेवून गेले आहेत ते पाहिजे असलेस लिहून पाठवावे. त्यांच्या मर्जीप्रमाणे करावे. निवरगीस मुद्दाम गडी पाठविला होता. सर्व खुशाल आहेत. सोन्याळ कुळाकडे स्टँपाचे तुमचे रुपये किती आहेत ते कळवावे. सोडीचे कूळ येणार आहे. थोडा बहुत सारा देतो, जतेस घेऊन जातो, रजिस्टर करून देतो, असा त्यांचेबरोबर समक्ष करार झाला आहे. पूर्वीचा मसुदा करून दिला आहे, त्याप्रमाणे तुमचे मर्जीप्रमाणे लिहून घ्यावे. सोनलगी येथील काम मंजूर झाले की काय, लिहावे. सोधू २, हणी हाग २, कणी १० (विविध प्रकारची कामे करणारे लोक) याप्रमाणे येतील. तुमचे मर्जीप्रमाणे व सवडीप्रमाणे सवडीने अगत्य पो (पाहावे? पाठवावे ?). शिवलिंगव्वा वगैरेंस नमन सांगून खुशालीचे उत्तर लिहावे.

बाकी सर्व आनंदच आहे. तुमचे कामाचा आनंद असून चैत्र मास[1] तेथेच करावा. दोघांनी आनंद मानून आनंदात असावे. मी सवडीप्रमाणे येईनच. पंडित महाराजास अभ्यास करणेस सांगत जावे. सारांश, नेमाने मात्र असावे. विसरू नये. कळावे, हा आशीर्वाद. जमखंडी वगैरे मंडळींस लिहिलेल्या ज्ञानमार्गाचे पत्राची नक्कल तुम्हांस पाहण्यास पाठवली आहे. दुसरे सहजी मार्गाचे (व्यवहाराचे) एक पत्र, याप्रमाणे पाठवले आहे.

नोंद :-

१. चैत्र मास म्हणजे चैत्र शु. ३ ला येणारी साधुबुवांची पुण्यतिथी. हे पत्र कृष्णरावांना जतेस गेले आहे. शिवलिंगव्वांना नमस्कार आहे त्यामुळे हे स्पष्ट आहे. परंतु साधुबुवांची पुण्यतिथी नेहमी उमदीस होत असे, ती जतेस करावी असे इथे आहे. काही कारणांनी बदल झाला असावा. महाराजांनी पत्र उमदीहून लिहिले असावे असा अंदाज आहे.

xxxxx

पत्र ६७ **पान ९०**

नवीन
क्रमांक

९३ (टिपण :- या पत्राच्या मागच्या-पुढच्या तारखा-तिथी जमतात पण पौर्णिमेचा उल्लेख जमत नाही. ही पुढच्या महिन्यातली पौर्णिमा असावी कारण यानंतर येणाऱ्या पत्रात अश्विन पौर्णिमेचा असलेला उल्लेख जमतो. इंचगेरीस पौर्णिमेस काही मंडळी नियमाने जात असत.)

जत भाद्रपद व. १३
१६.९.१९०६

श्री

त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. मिती भाद्रपद व. १३ पावेतो श्रीसमर्थकृपेने सर्व आनंद आहे. कालच ती. अप्पा व नागप्पा

श्रीमहाराजांचे मोडी हस्ताक्षरातील पत्र



पत्राचे देवनागरीत लिप्यंतर



पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ संपेतों पाहात गेलें ।
येका टांकेंचि लिहिलें । ऐसें वाटे ॥ –दासबोध, १९.१.४

श्रीमहाराज नेमासाठी बसत ती दुमजली इमारत, इंचगेरी



सुन्न मंडल में घर किया, बाजे शब्द रसाल ।
रोम रोम दीपक भया, प्रगटे दीन दयाल ।।

–कबीर

गगनमंडलात घर केले, रसाळ शब्दांचे गुंजन झाले,
रोमारोमांत प्रकाश झाला व दीनदयाळ प्रगट झाले.

निंबरगीकर वगैरे मंडळी येथे आली आहेत. पौर्णिमेचे संधीस तिकडे येतीलच. दुहेरी इमल्याबद्दल वडारास मक्ता दिलेप्रमाणे व समक्ष सांगितलेप्रमाणे भिंतीचे वगैरे सर्व काम वडील येणेचे आत तयार करवावे. लाकडे इमल्यासाठी खरेदी करावी व तयार ठेवावी. जमखंडीहून गणपतराव फौजदार[१] यांचेकडून पत्र आलेप्रमाणे सर्व तजवीज करावी, लागेल ती मदत करवावी असे सांगितले आहे ते श्रुत केले आहे. राजमान्य राजश्री अण्णप्पा व आजीबाई जिऊबाई, रंगूबाई वगैरे मंडळींस माझा शिरसाष्टांग नमस्कार फार फार आहे.

—कृष्णा उमदीकर.

नोंद :–

१. पटवर्धन. इंचगेरीच्या बांधकामास यांनी खूप मदत केली.

XXXXX

	पत्र २५६	**पान २४८**
नवीन	जत	अश्विन शु. ७
क्रमांक		२४.९.१९०६
९४		

श्रीगुरुसमर्थ

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री अंबुराव महाराज, मुक्काम इंचगेरी, वडिलांचे सेवेशी, सेवक कृष्णा उमदीकर याचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. मिती अश्विन शु. ७ पावेतो श्रीसमर्थकृपेकरून सर्व आनंद असो. विज्ञापना. परवा कार्ड पाठवले ते पोचले असेलच. तुकाराम सुतार दसरा झालेवर येत आहे. आलेवर त्यास लागेल ती मदत करावी. चुना वगैरे सर्व सामानाची तयारी असावी. कोणतेही प्रकारची हरकत येऊ नये. वडील अप्पा येथेच आहेत. पाऊस फार लागला आहे. बहुत- करून दसरा झालेवर पौर्णिमेस इंचगेरीस येतील. एक दोन दिवस पावसामुळे जास्त लागतील. मी सांगितलेले कामाची तयारी

करवावी. दिरंगाईने दिवसांवर, एकमेकांवर घालवू नये असे सांगितले आहे. सारांश येत्या सप्ताहापर्यंत सर्व काम संपवले पाहिजे अशी तयारी करवावी. वरकड मजकूर अधिकोत्तर नाही. कळावे. बहुत काय लिहिणे? ही विज्ञापना. वडाराकडून भिंत तयार करवावी. लाकडे खरेदी करून तयारी करावी अशी फार प्रार्थना आहे. सुस्त होऊ नये. होईल तेवढे लौकर करवावे एवढी विनंती आहे. एकंदर मंडळींस व बाबासाहेबांस नमस्कार श्रुत करावा. फार करून पौर्णिमेस येणे होईलच. पाऊस दररोज फार लागला आहे म्हणून सुस्त होण्यासारखे वाटते. तुकारामास पत्र लिहिले आहे. तो दसरा झालेवर येणार आहे. त्याला चांगली मदत करावी. चुना वगैरे तयार ठेवावा. कळावे.

	पत्र ६८	**पान ९१**
नवीन क्रमांक ९५	सावळगी	अश्विन व. ९ १२.१०.१९०६

श्री

चिरंजीव राजश्री भीमा याजप्रति, भाऊ उमदी मुक्काम सावळगी, याजकडून अनेक आशीर्वाद उपरि. अश्विन व. ९ पावेतो श्रीसमर्थकृपेकरून आनंदरूप असो. विज्ञापना. घोडी सामान कोरडा वगैरे पाठवलेले पोचलेच असेल. त्याप्रमाणे उत्तर लिहावे. खुशाल असलेचे निंबरगीस मुद्दाम कळवावे. करबसप्पास कळवावे. इंचगेरीस पत्र लिहून कळवावे की इमल्याचा कारखाना लौकर सप्ताहापर्यंत तयार करावा. चहूभोवती एकंदर सारवण्याची, चुना लावण्याची तयारी करवावी म्हणून कळवावे. भांडी म्हणजे थोरली तीन तपेली घेऊन ती पोचलेचे उत्तर आणवून घ्यावे. सदर तीन तपेली तेलसंगहून मोनाप्पाकडून घेऊन त्याचेबरोबरच मुद्दाम पोचवावी. अंबुरावांकडून ६५ रुपये घ्यावे असे सांगून पत्र लिहून पाठवले आहे. ते दिपवाळी झालेवर इंचगेरीस

पोचवतील. त्याबद्दल तुम्ही अंबुराव यांजकडे पत्र लिहून हकीकत कळवावी अगर हेच पत्र अंबुरावांकडे पाठवावे. अंबुरावांचे प्रकृतीबद्दल तुम्हांस माहिती असलेस उत्तरी कळवावे. जतेसही पत्र लिहिले आहे. दसऱ्याचे सणाबद्दल मी सांगितलेप्रमाणे व्यवस्था झाली किंवा नाही हे मोघम सूचना लिहून कळवावे. घरी वडील मंडळींस शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. याप्रमाणे महादेवभटजी निंबरगीकर यांचे पत्त्यावर जमखंडीस उत्तर लिहावे. कळावे, हा आशीर्वाद.

ताजा कलम – तुम्हांस सवड होईलतर इंचगेरीस जाऊन सदरहू व्यवस्था सांगून या पत्रातील मजकूर कळवून उत्तर लिहावे, हा आशीर्वाद.

–उमदीकर देशपांडे

पत्र ६९ पान ९२

नवीन
क्रमांक

९६ (टिपण :– ६८ पत्राची तारीख १२.१०.१९०६ असून तिथी अश्विन व. ९ आहे. प्रस्तुत पत्राची तारीख १३.१०.१९०६ आहे. म्हणजे तिथी अश्विन व. १० येते.)

जमखंडी अश्विन व. १०
अंबुरावांना पत्र १३.१०.१९०६

श्री

कृतानेक अनंत शिरसाष्टांग नमस्कार. जमखंडीस जाणे भागच झाले. मोनाप्पाकडून तीन थोरली तपेली घेऊन पाठवली आहेत. किंमत एकंदर मिळून रुपये ६५ ॅ≡ (६५ रुपये तीन आणे). दर २६॥।– (२६ रुपये तेरा आणे) गु. २४।= (२४ रुपये सहा आणे) द्यावे. गुरुनिंगप्पास १४ (?) सांगून पाठवावे. तपेले घेतले आहे व एका तपेल्याची किंमत अमुक असे कळवावे. चहूकडे सारवण्याचे वगैरे सप्ताहाचे बेताप्रमाणे तयारी करवावी. बाकीचे जतेहून पत्र लिहिलेलेच आहे. त्याप्रमाणे सर्वांनी काळजीने अगत्य अगत्य तयारी करवावी. सुज्ञच

आहां. सर्व माहिती आहे. लिहावे असे नकोच आहे. तुमचे भरवशावर मी इकडे गुंतलो आहे बरे. तुम्हां सर्वत्रांस नमन शिरसाष्टांग नमस्कार फार फार आहे. अण्णप्पा महाराज, फार काळजीने तयारी करवावी. महाराज बाबासाहेबांस नमस्कार कळवावा.

पत्र १७८ पान १७४

नवीन
क्रमांक
९७ (टिपण :– ६८ पत्रात तपेली घ्यावी असे असून ६९ मध्ये पाठवली आहेत असे आहे. प्रस्तुत पत्रात पोचल्याचे कळवावे असे आहे म्हणजे पोचली असावी. हा अनुक्रम पाहून पत्र इथे आणले. सप्ताहाच्या तयारीचा निर्देश आहेच. पत्रे ओळीने येतात.)

जत

श्री

थोरली तपेली तीन पोचल्याचे, किंमत किती दिली त्याचे व किती शिल्लक आहे त्याचे सर्व कळवावे म्हणून पत्र घातले होते पण त्याला उत्तर आले नाही. आता जरूर जरूर जतेस लिहावे. बैल बांधलेले दोन्ही गोठे सारवून सुरवून व्यवस्था करावी. आलेल्या मंडळींना उतरणेस अगदी सुलभ व संतोषाचे व्हावे असे करावे. चार गडी लागलेस लावावे व उत्तर लिहावे हो अंबुराव महाराज. तांदूळ १० रुपये, हरभरा डाळ ५ रुपये, तुरीची डाळ ५ रुपये, गूळ दोन मण, मीठ २ रुपये याप्रमाणे पत्र पाहताच विजापुरास मुद्दाम विश्वासुक माणूस पाठवून आणवावे. करडी घाणा घालून तेल करवावे. मिरची वगैरे आणावी. तुम्ही करीतच आहां, उगीच कळवले. पौर्णिमा सावळगीस होईल. नंतर कर्नाळ, ककमरीहून जतेस जाण्याचा बेत आहे. मग तिकोट्याहून इंचगेरीस येत आहो. इतक्यात सर्व काम आटोपावे. जमखंडी मंडळींनी तुकारामांना हुशार, शहाणा म्हणून भूषण देऊन प्रशंसा फार केली. हे भूषण

विजापुरासच झाले. पूर्वी विजापूरकरांनी मंटपस्थापना केली व सर्व काम शेवटास नेले अशी कीर्ती झाली पण त्यासाठी तोटा व फजितीही सोसावी लागते. आपले (अंबुरावांचे) कामावरून ही चांगली गोष्ट घडली. आपलीही स्तुती मंडळींनी केली. तुम्हां दोघांची ही प्रशंसा ऐकून महाराजांस आनंद आनंद होऊन गळ्यात भूषण घातलेसारखे झाले. दोघांनी हे पत्र वाचून अभिमान धरून सप्ताहाचे काम पुरे करावे, म्हणजे वरील स्तुतीस योग्य होईल. याप्रमाणे वडिलांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे. येणारे मंडळींस जिकीर पडू नये अशा काळजीने बेत करावा अशी प्रार्थना फार फार आहे. सुज्ञच आहा. निंबरगी वगैरेंकडे खुशालीचे कळवीतच आहां. ही विज्ञापना.

–आपला नागप्पा

पत्र ७० पान ९३

नवीन
क्रमांक

९८ (टिपण :– पत्रे ७० ते ७४ या पत्रांच्या तारखांवरून हिशोब करून तिथी काढल्या आहेत. एका पत्राची तारीख बदलावी लागली. आता तिथी–तारखा जमतात.)

जमखंडी अश्विन व. १३
अंबुरावांना पत्र १६.१०.१९०६

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक अति नम्रतेचा आनंदाचा शिरसाष्टांग नमस्कार. तुमचे अश्विन व. १० शनिवारचे पत्र मंगळवार व. १३ असे चार रोजांत पावले. मजकूर समजून आनंद झाला तो पत्री लिहिता पुरवत नाही. श्रीसमर्थ दयाळू, कृपाळू, आपले भक्तांचे संरक्षण करून आपले कार्य (भक्तांच्या कल्याणाचे कार्य) करून घेतात अशी माझी पक्की खात्री झाली आहे. सर्वत्र मंडळींस नमन शिरसाष्टांग नमस्कार अण्णप्पांस व

तुम्हांसही आहे. इकडे सर्व मंडळी आनंदात वेळ काढीत आहेत. भक्तीचा थाट चालला आहे. तुम्हांस सर्वांनी नमस्कार सांगितला आहे. पाऊस पाणी बरेच झाले आहे. कळावे. चिमड व जमखंडीचे कामाची तयारी झाली असल्यास धुमस वगैरे करू नये. ओले अगदी असू नये, असा बेत ठेवावा. दरवाजा लावावा. कोणतेही प्रकारे खोळंबा, कमतरता असे (महाराज) आलेबरोबर म्हणून घेऊ नये असे करावे. आमचे खुद्द मक्त्याचे वडारास दिलेले काम बंद करावे. आलेवर पाहू. तूर्त नको. तुकाराम गेले असलेतर येण्यासाठी गडी पाठवावा. पाठी तगादा लावावा. मीही एक पत्र लिहिले आहे. चहूभोवती सारवावे. चुना लावावा. थाट करावा. मी परवा एक पत्र लिहिलेच आहे, त्याप्रमाणे करावे. सारांश, भक्तीस योग्य व निर्विघ्न होईल असा बेताने खर्च करावा बरे. रिकामा खर्च होऊ नये, महाराज. हेच सांगणे आहे. पत्रात दर्शविले हे समजून मीही सुचवले आहे. अंतःकरणात सर्व प्रकारे माया असावी बरे. सर्व तुमचेच आहे बरे. यात फक्त सांगणारास जबाबदारी आहे, महाराज. सुज्ञच आहांत. समर्थ बाबासाहेबांचा मजकूर काहीच लिहिला नाही हे चूक आहे. कळावे. तुकाराम यास जरूर जाणेस व ...परस्पर जितका आकार आहे त्या बेताने व्यवस्था करावी. त्यातच थाट करावा. तुम्हांवर व आम्हांवर बोजा पडू नये असे निष्ठूर (स्पष्ट) मत पूर्वी सांगितले आहे. आताही पत्र लिहिले आहे. कळावे. सुज्ञ आहांत, लिहावे असे नकोच आहे. उमदी, निंबरगीस समाचार वर्तमान कळवावे. कळावे. बहुत काय लिहिणे ? ही विज्ञापना.

ताजा कलम- फक्त तुकाराम यास आबदा होऊ नये. खाणेपिणेस एकदोन रुपये पडले तरी द्यावे, खर्च करावे, असे सांगितले आहे. तसे केलेच असेल. गवंड्यास जमखंडीहून पाठवलेल्या मनीऑर्डर पैकी पगार देत जावा व जमखंडीकरांस कळवीत जावे. त्यांचेकडून जसे लिहून येईल तसे करावे. सुज्ञच आहांत. बहुत काय लिहिणे ? यात जर दहा पंधरात होईल तर खर्च करावा...

नंदेप्पा न्यामगौड व मेलप्पा नासी यांचा आपणांस शिरसाष्टांग

नमस्कार. आपण, अण्णप्पा, मातोश्री जिऊबाई, रंगूबाई व महाराज बाबासाहेबांस श्रुत व्हावे ही विनंती.

पत्र २५३ अ **पान २४४**

नवीन
क्रमांक
९९ (टिपण :- याआधी लिहिलेले पत्र ७० व प्रस्तुत पत्र पूर्णपणे एकच आहेत. म्हणून पुन्हा तोच मजकूर लिहिला नाही.)

	पत्र ७१	**पान ९५**
नवीन	जत	अश्विन व. १३
क्रमांक	भीमरावांना पत्र	१६.१०.१९०६
१००		

श्री

आशीर्वाद उपरि. विनंती, विज्ञापना. महादेवभटजी मुद्दाम बोलावणेस आलेमुळे वडील अप्पांचे जमखंडीस जाणे झाले आहे. सावळगीहून मुद्दाम पत्र आले आहे. त्यात जमखंडी, निंबरगी वगैरेंकडे पत्र लिहिण्याबद्दल आज्ञा असलेवरून लिहीत आहे. बरोबर नागप्पाही आहे. दिपवाळी सणास कोणी येणार नसल्याने हे पत्र मुद्दाम लिहिले आहे. बाकी कमीजास्त काही नाही. कळावे, हा आशीर्वाद.

–कृष्णाकडून

पत्र ७२ **पान ९५**

नवीन
क्रमांक
१०१ (टिपण :- वामनराव व राजारामपंतांनी काय शंका विचारल्या

होत्या माहीत नाही. त्यामुळे प्रस्तुत पत्रात जे उत्तर आहे ते कळत नाही. एकूण काही सुसंगत अर्थ लावता येत नाही.)

जमखंडी कार्तिक शु. १

१९.१०.१९०६

श्रीगुरुसमर्थ

कृपासागर सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री वामनराव दादाचार्य मास्तर व राजारामपंत अष्टेकर महाराज स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञांकित नागप्पा निंबरगी, मुक्काम जमखंडी, याचा कृतानेक दंडवत नमस्कार. विनंती. राजमान्य राजश्री कृष्णाजीपंत यांचेकडून जतेहून आलेले तुमचे पत्र पावले. एक तिकिट ठेवले होते तेही पावले. श्रीमंत पटवर्धन यांचेमार्फत आलेले, राजारामपंत यांचेही पत्र पावले. मजकूर समजून समर्थ महाराजांना फार आनंद आनंद झाला. पत्रात लिहिलेप्रमाणे श्रीसमर्थ सद्गुरुमहाराज यांचे इच्छेने अशी योजना (कोणती योजना ?) होऊन परस्परे आनंद होत आहे. ही सर्व कृती त्यांचीच आहे हे समजून घेऊन सर्व भार ज्याचे त्याचेवर टाकून उत्तर लिहिणेस मजला आज्ञा झालेवरून हे पत्र लिहीत आहे. सारांश, जयाचे अंतःकरण शुद्ध । तयासी करणे न लगे बोध ।। अशा वाक्याधारे अंतःकरणातील कूटस्थात चैतन्य जे आहे ते समर्थ त्या चैतन्यास मान्य होऊन त्या ठिकाणी निरंतर भुलीत असतो. अशा शर्तीप्रमाणे आपणांकडून लिहिलेला मजकूर सर्व तुमचाच आहे असे सांगितले. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. निरंतर आठव ते परब्रह्म । नाठव ते भवभ्रम ।। अशा वाक्याधारे समजूनच आहात. नामरूपीं जडलें चित्त । त्याचा दास मी अंकित ।। या शर्तीप्रमाणे आपण आहांत. सूचना देणेविषयी आज्ञा झालेने लिहीत आहे. महाराज व मी जमखंडीस येऊन पाच सहा रोज झाले. इंचगेरीस पौर्णिमेस दर महिना उत्सव होत असतो, तेथे जाणेचा बेत आहे.

पत्र ७३ पान ९६

नवीन
क्रमांक
१०२ (टिपण :– उत्सवाची तिथी माहीत असूनही आले नाहीत याबद्दल नाराजी दाखवली आहे. हा श्रावण सप्ताह असावा. तेव्हा झाले नाही तर निदान आता येणाऱ्या मार्गशीर्षात तरी यावे अशी सूचना पत्रात आहे.)

चिमड (संस्थान जमखंडी) कार्तिक शु. ५
अण्णा पंडित निवरगीकरांना पत्र २३.१०.१९०६

श्रीसद्गुरुसमर्थ

कृतानेक अनंत शिरसाष्टांग नमस्कार व आशीर्वाद उपरि. विज्ञापना. इंचगेरी उत्सवास येण्यास सवड झाली नाही. मार्गशीर्ष शु. ८ ते पौर्णिमेपर्यंत सप्ताह होतो ते माहीतच आहे. सोलापूर येथील व्यंकटेश लक्ष्मण कलबुर्गी, लक्ष्मण गोपाळ जोशी गिरणी कारकून, दत्तोपंत व विष्णुपंत फडके, बंडुअण्णा व बाची मास्तर वगैरे गुदस्ता (गतवर्षी) सप्ताहास आले होते, त्यांस माहीत आहे. त्याप्रमाणे हे पत्र दाखवून सर्वांस नेमाबद्दल शिरसाष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा. तुम्ही निवरगीस काकांस अगर वडिलांस कळवून उत्सवसंधीस म्हणजे पौर्णिमेस समाप्ती होत आहे त्या बेताप्रमाणे ज्यास जशी सवड असेल तसे करणे योग्य आहे असे सांगावे. अभिज्ञाप्रति विशेष लिहिणे नको. सुज्ञच आहांत. प्रल्हाद महाराजांस अति नम्रतेचा नमस्कार सांगावा.

–आपला उमदीकर भाऊ

पत्र १९७ अ पान १९६

नवीन
क्रमांक
१०३ (टिपण :– पुस्तकातील १९७ या पत्रात वेगवेगळ्या विषयांवर

लिहिलेली दोन पत्रे आहेत. पहिला भाग झाल्यावर पत्र संपल्याची खूण आहे पण पुढच्या भागाला क्रमांक दिलेला नाही. तो भाग अधांतरीच राहतो. पत्राचे हे दोन भाग वेगळे केले. दुसरा भाग २० क्रमांकाच्या पत्रानंतर बसतो. तो तिकडे नेला आहे व पूर्वी लिहून झाला आहे. २० पत्रानंतर जो भाग गेला त्याचा क्रमांक १९७ असाच ठेवला. आता पहिला भाग स्वतंत्र केला आहे. या भागाला, जो बऱ्याच पत्रांनंतर आला आहे, त्याला १९७ अ असा क्रमांक दिला. पुढचे क्रमांक चालू राहतात. प्रस्तुत भाग हा ७३ पत्राचा ताजा कलम असल्यासारखा आहे. अण्णा पंडितांना पत्र लिहिले, आता ते निवरगीस पाठवायचे आहे. पण त्यापूर्वी त्याची नक्कल ठेवावी अशा सूचनेचा हा भाग आहे. तो इथे चपखल बसतो. अर्थात तिथे तिथी तारीख नाही.

एक अडचण म्हणजे या भागावर पुन्हा 'श्री' आहे. पण इतर गोष्टी जमतात म्हणून ती गोष्ट सोडून द्यावी लागते, कारण तो भाग इथे जोडणे सुसंगत आहे. अण्णा पंडितांचे पत्र वाचून नक्कल करायची असेल-तर आधी अण्णा पंडितांना गेलेले पत्र पाहिजे. ते ७३ मध्ये सापडले. असो. सुसंगतीसाठी तार्किक युक्तिवाद करून पत्राची जागा ठरवली. अर्थात् त्यात अंदाज ही बाब आहेच ! हा अंदाज बरोबर असेलतर त्याचे गाव, तारीख, तिथी ७३ चीच असणार. मात्र ताजा कलम लिहिताना या बाबींचा उल्लेख अवश्य नसतो, म्हणून पुन्हा त्यांचा निर्देश केला नाही. हा भाग कोणा शिष्याला असावा.)

श्री

अण्णा पंडितांचे पत्र सर्वांनी वाचून त्याची नक्कल अक्षरशः काढून घेऊन नंतर निवरगीस जाणाऱ्याबरोबर जरूर पोचवावे. तुमचे पत्र पाहून मजकूर समजून आनंद झाला. असेच येणाऱ्यासमागमे पत्र लिहीत जावे. निवरगीस लौकर बोलावणे करून इकडे वारंवार वडिलांचे मर्जीप्रमाणे पाठवावे. कळावे, हा आशीर्वाद.

	पत्र ७४	पान ९७
नवीन	जत	कार्तिक शु. ७
क्रमांक	करबसप्पा आवटी यांना पत्र	२५.१०.१९०६
१०४		

श्री

अनेक शरण शरणार्थी विनंती. विज्ञापना. वडील अप्पा व नागप्पा निंबरगीकर हे जमखंडीस गेले आहेत. बहुतकरून येत्या पौर्णिमेस इंचगेरीस येणार असलेचे अप्पांचे पत्र आले आहे. तुम्हांस कार्ड लिहिणेची आज्ञा असलेवरून हे पत्र लिहीत आहे. तुमचेकडील खुशालीचे पत्र लिहावे. इकडील सर्व मंडळी खुशाल आहेत. कळावे. लोभ असावा हे शरणार्थी.

–उमदीकर कृष्णा

	पत्र ७५	पान ९७
नवीन	जमखंडी	कार्तिक शु. ११
क्रमांक		२८.१०.१९०६, रविवार
१०५		

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री महाराज अंबुराव यांचे चरण–सेवेशी, आज्ञाधारक नागप्पा निंबरगी, मुक्काम जमखंडी, याचा कृतानेक दंडवत. विनंती, विज्ञापना. कार्तिक शु. ११ रविवारपावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. महाराजांच्या नावाने आलेल्या तुमच्या पत्रातील खुलासेवार मजकूर समजला. फौजदार उद्या मनीऑर्डरने २५ रुपये पाठवीत आहेत. त्या बेताने खर्चाची व्यवस्था ठेवावी. आहे त्यात पोक्तपणाने दुसऱ्यास तसदी न देता हे कार्य आनंदाने होईल अशी तुम्ही व तुकाराम यांनी व्यवस्था लावावी. त्यांचेकडून फार चांगले केले अशी कीर्ती मिळवून घ्यावी. अशी कीर्ती होण्यास अंतःकरणात सर्व

कार्य आपलेच आहे असे समजून काळजीने बेताबेताने सर्व कार्य लौकर आटोपावे. आणखी दहा-पंधरा रुपये लागले तरी खर्च करावा. तेही पाठवीत आहे असे सांगितले आहे. त्यांना (फौजदारांना) पत्र लिहावे म्हणजे पाठवतील असे मला सांगितले आहे. सारांश, हे पत्र तुकारामांना दाखवून, तुम्ही व तुकाराम मिळून काळजीने करावे. लौकर करावे. पत्रेही (मंटपाला लागणारे पत्र) लौकरच येतील. तुकारामानी सांगितलेप्रमाणे आणण्यास पत्र गेले आहे. तोपर्यंत सर्व तयारी करावी. हा मजकूर दोन चार वेळा वाचून, मनन करून, त्या शर्तीप्रमाणे वागावे अशी प्रार्थना फार फार सांगितली आहे, ती तुम्हांस व तुकारामास श्रुत व्हावी. आता चहूभोवती सारवणे वगैरे काम तुमचे मर्जीप्रमाणे जसे वाटेल तसे योग्य ठिकाणी पाहून तेवढ्यापुरते बेताप्रमाणे करावे. नको असे वाटलेतर सोडून द्यावे. सारांश, चार पाच रुपयांत जितके होईल तितके योग्य पाहून थाट करावा. मार्गशीर्ष शु. १ पर्यंत सर्व तयार झाले पाहिजे व वाळले पाहिजे. एवढे मात्र आठवण ठेवून स्मरणपूर्वक करण्याची कृपा करावी असे फार फार सांगितले आहे कढई नको म्हणून तुकारामास पत्र लिहिले आहे. तपेली आल्याचे तुम्ही लिहिलेच नाही. अजून पोचली नसतील असे वाटते. तेही पत्र आल्यावर कळेल. बावा (बुवा; कोण कळत नाही) गेल्याचे लिहिले त्याचा फार आनंद झाला. नंदेप्पाचे पत्र पोचवले. एकंदर मंडळींनी तुम्हांस, घरचे मंडळींस व तुकारामास शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो प्रविष्ट व्हावा. आम्हांस जमखंडीकरांनी त्या (मागच्या) पौर्णिमेस इंचगेरीस येण्यास घडू दिले नाही. आता या पौर्णिमेसही येणेचे घडत नाही. काय करावे, उपाय नाही. याबद्दल तुम्हांस व आलेल्या मंडळींस क्षमेबद्दल त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. कार्तिक व. २ अगर ५ इतक्यात तिकोटेवरून येत आहो. तुम्हांस कळावे. या पत्राचे उत्तर जतेस जरूर जरूर लिहावे, म्हणजे मजला पोचत आहे. खुलासा होत आहे. तपेली आल्याचे, किंमत दिल्याचे वे कोणता कारखाना कसा झाला, सर्व खुलासेवार हकीकतीचे उत्तर कृष्णाकडे पाठवावे.

नंदेप्पाकडील रुपयेही दोन चार दिवसांत येतील असे त्यांनी सांगितले. तुम्हांस कळावे.

पत्र २०८ पान २०३

नवीन
क्रमांक
१०६ (टिपण :- या आधीचे ७५ क्रमांकाचे पत्र व प्रस्तुत २०८ पत्र पूर्णपणे एकच आहेत, म्हणून लिहिले नाही.)

8.7.21

पत्र ७६ पान ९९

नवीन जमखंडी कार्तिक शु. १२
क्रमांक २९.१०.१९०६
१०७

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री दत्तोपंत दादासाहेब नामदेव महाराज, मुक्काम बेळगाव, स्वामी गोसावी यांस, स्नेहांकित नागप्पा निंबरगीकर, मुक्काम जमखंडी याचा कृतानेक दंडवत, विनंती व नमस्कार. कार्तिक शु. १२ पावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. जमखंडीस येऊन अदमासे १५ दिवस झाले. मजकडून लिहवून आपणाकडे पाठवलेले पत्र तुम्हांस पोचले व त्याचे उत्तरही आज रोजी आले, त्याचा बराच आनंद झाला. फक्त एकंदर मजकुरावरून, पत्रातील रहस्य न घेण्याने व नीट अर्थ न केल्याने माझ्या पत्राला बिननावाचे पत्र असे समजलात. लिहिणाराने खाली आपली सही केली नसेल, तथापि पत्रातील मजकुरावरून पत्र नागप्पाने लिहिले असा अर्थ होत असून बिननावाचे म्हणून लिहिलेत. तेही ज्ञानाप्रमाणे म्हणण्यास उक्त (युक्त, योग्य) दिसून येईल असे वाटते (सही नसल्याने बिन नावाचे म्हटले ते

बरोबर आहे). असो. आता निवृत्तिमार्गाने काही अंश लिहीत आहे. सर्व प्रकारे मनाप्रमाणे घडून येण्यास त्या मनास निरंतर आठव (नामाची आठवण) पाहिजे व तीन वेळा निष्ठेने, गुरुकृपेची आज्ञा चालवली (पाळली) पाहिजे (त्रिकाळ नेम पाहिजे), म्हणजे त्या मनास कोणतेही आठव (?) (अडचण असा शब्द पाहिजे, किंवा त्या अर्थाचा दुसरा शब्द पाहिजे; किंवा नामाखेरीज इतर गोष्टींची आठव म्हणजे आठवण येणार नाही असे पाहिजे), येणार नाही. समर्थांचे वाक्य 'हरिनामाच्या चिंतनें बारा वाटा पळती विघ्नें असे आहे, हे समजूनच आहां. सर्व प्रकारे ओढून नेणे अगर घेणे हा गुरूंकडेच दोष आहे असे आपल्या लिहिणेवरून वाटते. याप्रमाणे काही अंशी लिहून येईल अशी इकडील फार उमेद आहे. याबद्दल एक सहजी गोष्ट– बापाने मुलास आपले पंगतीस जेवण्यास एकदा बोलावले. तो चावडीत छका–पंचवीस (पत्ते खेळणे किंवा असलाच काही खेळ) खेळत होता. त्या नादात निमग्न झालेल्या प्राण्यास (मुलास) पुन्हा 'बाप घाबरा करतो' (बाप आजारी आहे) व तिसऱ्यांदा 'बापाचा प्राण गेला' अशी खबर दिली तरी तो खेळात निमग्नच होता. पुढे शुद्धीवर आल्यावर त्या मायेचे (मायेचे, बापावरील प्रेमाचे)... लिंहावे तर पुरवत नाही. असो. बापाने किती ओढून घेतलेतरी त्या मुलाकडून योग (योग्य वर्तन) घडला नाही हा दोष बापाकडे म्हणता येईल का ? आता पिंजऱ्यात राघू असतो. तो बाहेर निघाला तरी मी पिंजऱ्यातच आहे असा भाव त्याचे अंतःकरणात जडून गेलेला असतो. पिंजऱ्यातून सुटून जावे असा भाव होत नाहीच.का म्हणालतर आधी गूळ, डाळ खाल्ल्याने त्याची सुटकाच होत नाही. हा दोष पिंजऱ्याचा म्हणता येईल काय हो राव ? आता गुरु–शिष्याची गोष्ट अगर देव–भक्ताची गोष्ट. निरंतर गुरुध्यास लागला असल्यास निरंतर गुरू आपल्याजवळच आहेत असे वाटण्यास भक्ताने निरंतर देव देव म्हणावे. भक्ताला कधीही, कोणत्याही प्रकारे विघ्ने आल्यास देव ती निर्विघ्न करेल व करतच आहे, असे वाक्य समजूनच आहांत. असे असून गुरूंकडे दोष आहे असे म्हणण्यात येत आहे. 'सहस्र अन्याय

जरी तुवा केले । तरी क्षमा करील गुरुमाय'[१] या वाक्यावरून तुमचे म्हणणे युक्त (योग्य) आहे असे वाटते (वास्तविक गुरूंकडे दोष आहे असे त्यांचे मत असेलतर त्यांनीच क्षमाही केली पाहिजे असा अर्थ आहे का ? तसा अर्थ नसेलतर 'युक्त आहे' याऐवजी 'युक्त नाही' असे पाहिजे). असो. आता सर्व प्रकारे चुकीची क्षमा होऊन, ज्या दिवशी तुमची व समर्थांची गाठ पडून बोलणे होईल तो दिन सुदिन आहे. बाकी सर्व मजकूर आनंद आहे. महाराजांनी तुम्हांस त्रिकाळी दंडवत नमस्कार फार फार सांगितले आहे, तो श्रुत व्हावा. महाराजांचे आज्ञेवरून हे सर्व लिहिणे झाले आहे. पूर्वी याचप्रमाणे मजकूर लिहिला होता. त्याबद्दल व याबद्दल क्षमा होऊन कृपा-लोभ असावा. नंदेप्पा अण्णा यांनी तुम्हांस दंडवत नमस्कार सांगितला आहे. कळावे. लोभ असावा. सुज्ञच आहां. ही विनंती.

या पत्राचे उत्तर, संस्थान जत येथे कृष्णाजी व्यंकटेश देशपांडे, उमदीकर यांच्या नावे पाठवावे, म्हणजे आम्हांस पोचेल.

–नागप्पा निंबरगीकडून

नोंद :-

१. सहस्र अन्याय जरि त्वां केले । क्षमा करील गुरुमाय माय माय । आतां तरि जाय–जाय–जाय । धरि सद्गुरूचे पाय ॥ –(रामदासवचन, पृ. १९४.)

x x x x x

	पत्र ७७	**पान १०१**
नवीन	जमखंडी	कार्तिक शु. १४
क्रमांक	भीमरावांना पत्र	१.११.१९०६, बुधवार
१०८		

श्री

आशीर्वाद उपरि. कार्तिक शु. १४, बुधवारी सावळगी मुक्कामी असो. (पत्र लिहिण्याच्या दिवशीच जाणार असावेत कारण तिथी व

तारीख तीच आहे. जाण्याआधी जमखंडीहून पत्र लिहिले आहे.) विज्ञापना. तुमचे पत्र पावले. मजकूर समजला. आनंद झाला. दोन तीन रोजांत जतेकडे जात आहे तरी रामू व एक पंच तारीख ५/६ इतक्यात आल्यास ठीक. येण्यास सांगावे. वाजंत्रीवाल्यांना आगाऊ ताकीद द्यावी. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. सर्व वडील मंडळींस नमस्कार सांगावा, हा आशीर्वाद.

–जमखंडीहून भाऊराव उमदीकर.

पत्र ७८ पान १०१

नवीन क्रमांक १०९

उमदी

... मे १९०७

श्री

राजमान्य राजश्री रामराव होर्तीकर मुक्काम... स्वामींचे सेवेशी, पोष्य भीमराव उमदी याचा कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती. तारीख... मेपावेतो समर्थसद्गुरुगुरुलिंगजंगम महाराजांचे कृपेने सर्व आनंदरूप असो. विशेष. तुमची दोन पत्रे आली. त्यांत पत्ता वगैरे लिहिला नाही म्हणून उत्तरास सुस्त झाले. उत्तरास जे पाहिजे ते नसले म्हणजे विलंब होतो. याचप्रमाणे भक्तीस मुख्य विरक्ती, ज्ञानास मूळ अग्नी, अंतःकरणास मुख्य मन याप्रमाणे झाले म्हणजे तत्काळ प्रचिती येते. आपले आपणास कळू लागते. तूक (समतोल) येतो. सारांश, अंतःकरणापासून नेम निष्ठेने चढवावा, वाढवावा म्हणजे सर्व कळू लागते, बरे. आठव ते परब्रह्म । नाठव तो भवभ्रम ।। असे वाक्य आहे. करिता निरंतर आठव असावा. यास उदाहरण– एक प्राणी आहे. त्याला देवाने थोरपणाचा हुद्दा दिला म्हणजे अंतःकरणात, 'मी थोर आहे, त्या योग्यतेप्रमाणे वागले पाहिजे' असे ठरून जाते व मागील विसर पडतो. त्याप्रमाणे मी प्रज्ञांपैकी (शहाण्यांपैकी, जाणीव असणारा) आहे असे ठरून निरंतर

(नामाचा) निदिध्यास लागून स्मरणाने असले म्हणजे त्या योग्यतेस पोचतो. सारांश, अभिज्ञच आहांत. याप्रमाणे आहांतच आहां. मी लिहावे असे नाहीच. निष्काम भक्ती म्हणजे बाप माझी वृद्धी करेल असे मुलाचे मनात काहीच नसते. ते अज्ञानात समजतच नसते. परंतु एक मात्र ठरले गेलेले असते की माझा धर्म म्हणजे बापाचे ऐकणे. एवढ्याच धर्माने बाप मुलास निरंतर सुखात ठेवून त्याचे कल्याण करतो. तसा भक्तीचे ठिकाणी थाट व्हावा, भक्ती वाढवावी अशा हेतूने भक्त निरंतर भक्ती वाढवू लागला म्हणजे देव त्याला निरंतर सुखात ठेवतो. भक्तीचे ठिकाणी कामना नसावी. भक्तीच करावी, वाढवावी, थाटात उत्सव करावा असे मनात ठरवून भक्ती चालवावी. असे करीतच आहां. तत्रापि वडिलांचे आज्ञेवरून, त्यांनी सांगितलेवरून लिहीत आहे. मी लिहिण्यास शक्तिहीन आहे. तरी सर्व तुमच्या मनास येईलच. याप्रमाणे समजून भक्ती चालवावी, वाढवावी. वडिलांनी याप्रमाणे करण्यास, नेमाने वागण्यास फार फार प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत व्हावी. कळावे. लोभ, ममता असू द्यावी ही विनंती.

आपला

भीमा उमदीकर देशपांडे

पत्र ७९ **पान १०३**

नवीन क्रमांक ११० जमखंडी

१८.५.१९०७

श्रीसद्गुरुसमर्थ

गुरुबाळप्पा अण्णा मसूती, करबसप्पा अण्णा आवटी वगैरेंस कृतानेक शिरसाष्टांग दंडवत. विनंती व नम्रतेचा साष्टांग नमस्कार. आम्ही जमखंडीस आहोत. सर्व मजकूर आनंद आनंद आहे. सवडीप्रमाणे फुरसत होईल तेव्हा इंचगेरीस जाऊन अंबुरावांना भेटून तेथील विचार

पाहावा. तो म्हणजे विजापूरकर, चडचणकर व आम्ही अशा त्रिवर्गाकरिता आठ खण इमला बांधण्यास दिला आहे. मक्ता ६५ रुपयांस दिला आहे. तो तयार झाला आहे किंवा नाही, याकरिता सवडीप्रमाणे जाऊन लौकर तयार करण्यास अंबुरावास सांगून यावे. एकंदर मंडळींस नेमाबद्दल वडिलांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे ती प्रविष्ट करावी. कळावे, ही विनंती.

– नागप्पा निंबरगी याजकडून

पत्र ८० पान १०३

नवीन क्रमांक १११

महालिंगपूर

वैशाख शु. ११
६.६.१९०७

श्रीगुरुसमर्थ

तीर्थरूप राजमान्य राजश्री भीमरावजी अण्णा देशपांडे, मुक्काम उमदी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक नागप्पा निंबरगी याचा दोन्ही कर जोडून साष्टांग दंडवत नमस्कार. वैशाख शु. ११ गुरुवारपावेतो मुक्काम महालिंगपूर येथे श्रीसद्गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. वडील, मी, नंदेप्पा व पुंडलिक हट्टी[1] इकडे खुशाल आनंदात आहोत. ज्येष्ठ शु. २/३ संधीस हळूरहून चिमडला येत आहोत. नंतर चिमडहून नावलगीहून, पुढे जमखंडीहून अगर अथणीकडून ऑगस्ट १/२ इतक्यात जतेस जाण्याचा बेत केला आहे. आणखी त्या बेतावर पत्र लिहीत आहे. कृष्णाजीपंत अण्णांकडे पत्र लिहिलेच आहे. त्यांसही हा बेत कळवीत आहे. तुम्हांस नेमाने, निष्ठेने व कष्टाने वागण्याबद्दल वडिलांनी फार सांगितले आहे. सर्व प्रकारे शांती, समाधान व धैर्य प्रपंचात असावे. भजन–पोथी निष्ठेने करीत जावे. अशा विषयी इंचगेरीस समक्ष सांगितले आहे त्याची आठवण ठेवून घर सोडून कुठे जाऊ नये अशी याद राखून राहावे. कोणाची उसाफरी करू नये. दुसऱ्यांची गोष्ट कानांवर घेऊ

श्रीमहाराजांच्या खडावा

मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी ।
तेथे तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही ।।

श्रीमहाराजांचा विडा कुटण्याचा खलबत्ता

विड्याबरोबर शिष्यांच्या अडचणींचे ठोकपीठ करणारा खलबत्ता.

श्री. गो. जांभळीकर या बालशिष्याला श्रीमहाराजांनी दिलेला अंगरखा

तुका म्हणे वत्स धेनुवेच्या चित्तीं ।
तैसें मज महाराज सांभाळिती ॥

नये. जरी कानांवर पडली तरी त्या गोष्टीचे मनात काही आणू नये. याप्रमाणे प्रपंचात असावे म्हणजे आनंदात वेळ जात आहे. याप्रमाणे वडिलांनी सांगितले आहे. तुम्हांस कळावे. मास्तरसाहेबांस शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. घरी वडिलांस (नानासाहेबांना) चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. कळावे. वडिलांप्रति विशेष लिहिणे शक्य नाही. ही विज्ञापना. नंदेप्पांनी तुम्हास व वडिलांस शिरसाष्टांग दंडवत नमस्कार सांगितला आहे.

नोंद :-

१. पुंडप्पा केंचप्पा हट्टी हे महाराजांचे अंगरक्षक. ते सतत महाराजांबरोबर असत. एकदा त्याला झोप लागलेली पाहून महाराज रागाने म्हणाले, 'तुला नेम करत बैस असे सांगितले होते, तू झोपला आहेस'. यावर पुंडप्पा म्हणाले, 'महाराज, नेम तुमचा तुम्ही पाहून घ्या.माझे काम तुमचे रक्षण करणे एवढेच आहे'. महाराज बोलले, 'तू कशाला करशील नेम, मीच तुझ्यासाठी करतो आहे ना' ? महाराजांचे हे वाक्य वाचून आपल्या डोळ्यांत पाणी उभे राहते की नाही ?

XXXXX

पत्र १८३ पान १७९

नवीन

क्रमांक

११२ (टिपण :- १८३-२०७-१८२ ही पत्रे बिनतारखेची आहेत. अशा पत्रांची जागा ठरवणे हे एक आव्हान होते. मजकुरावरून तारीख असलेल्या पत्रांत ती बसवण्याचा प्रयत्न केला आहे. ८० या पत्रात भीमरावांना उपदेश आहे, तसाच १८३ व १८२ मध्ये आहे. या धाग्यावरून (तो कमजोर असलातरी) ही पत्रे ८० पत्राच्या जवळ आणली आहेत. तिथी जमतात ही जमेची बाजू आहे. १८३ मध्ये

जोडा आला असल्यास द्यावा असे असून २०७ मध्ये त्याची किंमत सांगितली आहे म्हणून १८३ नंतर लागलीच २०७ घेतले. तिथी पाहिलीतर १८३ आधी व १८२ नंतर येते. तसा क्रम ठेवला आहे.)

जत वैशाख व. १०

भीमरावांना पत्र

श्री

आशीर्वाद उपरि. वैशाख व. १० पावेतो सर्व आनंदरूप असो. विशेष. सदाशिव कधी आला ? दररोज चांगले लिहिणे व भजन वगैरे करणेस सांगावे. जोडा आला असल्यास द्यावा. शनिवारी निंबरगीस जाण्यास सांगावे, अगर मर्जीप्रमाणे करू द्यावे. सारांश सांभाळावे बरे. रामा हळ्ळीकर, भोसेकर यांचा, तसेच अंकलगी, घेर्डी, सलगर, रडे (दडे ?) यांचा वसूल आला किंवा नाही ते लिहावे. निंबरगीकर गुजर यास दहा रुपये येसप्पाजवळ देऊन पाठवावे. दादाने वसूल काय आणला तेही लिहावे. मळ्याची हकीकत, आंब्याचे पीक व लावणीचे काम सर्व आनंदाचा खुलासा लिहावा. मळ्यात दुसरे बैलवाले घाट पडल्यास (कमी पडल्यास) मिळून घ्यावे अगर येसप्पाचे बैलावर मासीमचे अंगवाट (एकत्र) तिघेप्रमाणे करीत असलेस त्यास बैलाकरिता २५ रुपये बिनव्याजी देऊ करून जमवून करीत असलेस पाहावे. अगर दुसरे कोणी एक बैल देत असतीलतर पाहावे. सारांश, खटपट करून पाहावी. घरचा गडी महादू पुढे ठरवून घ्यावा. मोघम करू नये. बाकी घरची व्यवस्था वगैरे करून नेमाप्रमाणे पुस्तक वगैरे करून नेम करून व दररोज काहीतरी निदान पाच-दहा खर्डे लिहीत जावे. व्यर्थ वेळ घालवू नये. दिवसा निद्रा मात्र करू नये बरे. येसप्पा, गुरुनिंगप्पा, वगैरेंस नमन दंडवत आहे असे सांगावे. कोणी येणारे असतील त्यांचेबरोबर सहजी केळीची पाने वगैरे संतोषाने आणतील तर पाठवून द्यावे. भिडेने मात्र करू नये. असे पाहून देत जावे. लखूस कबुलायतकरिता स्टँपासाठी जतेस पाठवावे. आठ आण्यांचा स्टँप लागेल असे सांगावे. त्याचा गोंधळ (गोंधळाचा कार्यक्रम) झालेवर पाठवावे. ताकीद करावी. कळावे, हा

आशीर्वाद. वडिलांस त्रिकाळी साष्टांग नमन आहे. सदाशिव आपल्या चाकूचा दोरा विसरून गेला आहे. त्यास गोंडा आहे, चाकू मात्र नाही. चाकू त्याचेजवळ आहे की नाही ? येथे मात्र नाही. कळवावे. लखूस सांगावे. दहा-बारा वर्षे जमीन करणे असलेस कबुलायतीस रजिस्टरसह तीन रुपये पडतात. उगीच एका वर्षाचे कराराने केलेतर एक आणा प्रमाणे दोन चार कागदांवर (जास्त कागदावर) होतात. भवानीला[१] विचारून मर्जीप्रमाणे करावे. नको असलेस त्याप्रमाणे करू. कळवावे. तुम्हांस समक्ष सांगितलेप्रमाणे नेम करून घरातील परड्यातील काम करत जावे. सारांश, नेम चुकू नये. सर्व हकीकत लिहावी. निवरगीकडील वर्तमान लिहावे. कोणत्या गावाचा काय वसूल आला तो खुलासा लिहावा. त्याप्रमाणे करता येईल. कळावे.

हल्ली जत, करजगी महालात रोहिले लोक फार उपद्रव देत आहेत. हे नवीन सुरू झाले आहे. त्याकरिता पुण्यमार्गाने चालावे. धर्मे जया[२]. आपला स्वधर्म पाळावा. नेमनिष्ठेने वागावे. धर्मास जय आहे, कर्मास उपद्रव, असे वाक्य आहे. कळावे.

सदाशिवराव माणकेश्वर, धर्माने व इमानाने आपलेच घर व आपलीच मंडळी असे मनात ठेवून विश्वासाने व विद्याभ्यासाने राहावे बरे.

बालगावकरांना पत्र रवाना केले की नाही लिहावे.

नोंदी :-

१. लखू व त्याचा मुलगा भवानी हे गोंधळी होते. लग्न-मुंजीसारखे कार्य घरी झाले की गोंधळ घालण्याची पूर्वी पद्धत होती. ही एक परंपरागत पूजा असते. गाणी असतात. हे लोक जिथे बोलावणे येई तिथे जाऊन हा कार्यक्रम करीत. लखूचा असाच कार्यक्रम असावा. तो झाल्यावर त्याला पाठवण्यास सांगितले आहे. असो.

भवानीबद्दल एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. तो महाराजांचा नामधारक होता. १८९७ च्या नामधारकांच्या यादीत त्याचे नाव आहे. त्याने केलेले महत्त्वाचे कार्य म्हणजे त्याने महाराजांनी सांगितलेल्या

दासबोधाच्या अर्थाचा सारांश लिहून काढला आहे. तो जून-सप्टेंबर, १९९१ च्या सत्संगाच्या अंकात आहे. अक्षर स्वच्छ आहे. दासबोधाबद्दल आदराची चार-दोन वाक्येही आहेत. सारांश संपल्यावर त्याने सही केली आहे- ''दस्तुर भवानी लकु गोंधळी. तारीख १, माहे मार्च सन्न इसवी १८८४.'' त्याचे कार्य विशेष कौतुकास्पद आहे.

२. यतो धर्मः ततो जयः ॥ -(महाभारत, ५.१४१.३३.)

xxxxx

पत्र २०७ पान २०२

नवीन

क्रमांक

११३ (टिपण :- मागच्या पत्रात (१८३) उल्लेख केलेला जोडा आल्यास त्याची किंमत आठ आणे द्यावी असे इथे आहे. म्हणून पाठोपाठ आणले. तारीख-तिथी-पत्र कुणी लिहिले, कुणाला लिहिले या सगळ्यांच बाबतीत न-ना हाच पाढा आहे !)

श्री

आशीर्वाद उपरि. पत्र पावले. अण्णप्पास सांगितले आहे तशी सर्व व्यवस्था करावी. अंबुरावास पत्र टपालाने लिहावे. कल्लंभटजीबरोबर[१] १ रुपया दिला आहे. आठ आणे द्यावे. आमचे जोड्यास आठ आणे[२] द्यावे. सर्व खुलासेवार उत्तर शाईने लिहून कळवावे. कळावे, हा आशीर्वाद.

नोंदी :-

१. कल्लंभटजी निंबरगी हे जमखंडीचे. या घरातील बरेच लोक महाराजांचे नामधारक होते. याच घराण्यातील लक्ष्मणभटजी विशेष परिचित आहेत. नागेशभटजी, महादेवभटजी, शिवरामभटजी ही सर्व मंडळी याच निंबरगी घराण्यातील आहेत. यांच्यापैकी काही मंडळी गुरुदेवांकडेही येत असत.

२. जोड्याला आठ आणे पडत होते हे वाचून आज त्याची किंमत पाहिलीतर

महागाई किती पट वाढली आहे याची कल्पना येते.

xxxxx

पत्र १८२ **पान १७८**

नवीन भाद्रपद व. ३०

क्रमांक भीमरावांना पत्र

११४

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. भाद्रपद व. ३० पावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. इकडील सर्व खुशाल आहेत. दादास विचारून कृष्णाबाईस पाठवणे जरूर असल्यास पाठवून द्यावे. आपणच एक दिवस सवड काढून पोचवून जावे असे सांगावे. घरी मर्जी विचारून करणेस सांगावे. माझे दप्तरी लहान कात्री होती, ती नाही. तुम्ही कोणी काढली होती की पडली तपास करून कळवावे अगर इंचगेरीस कुणी द्रोणाकरिता घेतली असेलतर तेथे असावी. यावाचून कोठे गेली असेल पाहावे. नेम कट्टाने करीत जावा बरे. भीमाने जेवून निद्रा निद्रा करू नये असे फार फार सांगणे आहे. मास्तरसाहेबांस शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. सवडीने पौर्णिमेस इंचगेरीस येत जावे. हरतऱ्हा करून सवड काढून येण्याचा नेम धरावा, हीच उत्तम गोष्ट आहे. मर्जीप्रमाणे करावे. सारांश, दररोज कट्टाने नेम करावा. कळावे. हा आशीर्वाद. वडिलांस शिरसाष्टांग नमस्कार सांगावा.

पत्र ८१ **पान १०४**

नवीन विजापूर / धारवाड ?

क्रमांक अंबुरावांना पत्र १.११.१९०७

११५

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक अनंत दीर्घ दंडवत शिरसाष्टांग नमस्कार. धारवाडहून

महादेवभटजी विजापुरास येऊन ३-४ रोज बसले होते. त्यांनी सोडले नाही. शनिवारी निघून जात आहो. भक्तिथाट धारवाड येथे लिहिता पुरवत नाही असा समर्थांचा उत्सव चालला आहे. ज्याचे ते करून घेतात. आपण फक्त निमित्तमात्र असो. पूर्वी लिहिलेप्रमाणे तुकारामाकडून जिन्नस आणवावे. कारखाना लौकर तयार होईल अशा विषयी काळजी घेण्यास फार फार प्रार्थना सांगितली आहे. सर्व मंडळींस नमन. तिकडे आनंद असलेचे, कारखाना तयार झाल्याचे जमखंडीस सवडीने लिहावे. निंबरगीस कळवीतच आहां. बाकी सर्व मजकूर आनंद आनंद आहे. कळावे. मारुती शिवया ऊर्फ हणमंतरायास प्रार्थना. बाबांस सांगून मामांस सांगून लौकर तयार करवावे. कळावे.

–नागप्पा

	पत्र ८२	**पान १०५**
नवीन	तिकोटे	
क्रमांक	अंबुरावांना पत्र	२८.११.१९०७
११६		

श्रीगुरू प्रसन्न

कृतानेक दंडवत नमस्कार. आम्ही तिकोटेस आलो आहो. रविवार-सोमवार निघून सिदापूर-कन्नूर करून इंचगेरीस येत आहो. याबद्दल व्यवस्थेचे तपशीलवार पत्र लिहिलेच आहे. त्याप्रमाणे आम्ही येईपर्यंत तयारी होतच आहे. खात्री पक्की आहे. सुज्ञच आहां. अंबुरावांचे काम फार लौकर होते असे समजून आहो. जमखंडीस जाऊन आलो. तिकडे हवा वगैरे बरी आहे. उगीच बकवा आहे. तेथे १५ रोज पाऊस लागला आहे. विजापूरहून सामान आणतच आहां. त्याबद्दल लिहिलेच आहे. आमचेबरोबर पोचवण्यास नंदेप्पा आला आहे. कळावे, ही विनंती.

–नागप्पा

पत्र २२५ पान २१९

नवीन
क्रमांक

११७ (टिपण :- तिकोटे गाव व ८२ या मागच्या पत्रातील मजकूर लक्षात घेऊन हे पत्र इथे आणले.)

तिकोटे

श्रीसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. श्रीसमर्थकृपेने तिकोटे मुक्कामी आनंदरूप असो. विज्ञापना. मेलगिरप्पा वगैरेंस फार फार प्रार्थना व दूरदृष्टीचे नमस्कार सांगितले आहेत ते श्रुत करावे. सिदप्पा गळतगी यास सांगावे की शंकरव्वा यांनी नंदराया पडसलगी याजबरोबर १०८ रुपये पराप्पा होसमनी याजकडून घेऊन जरूर पाठवून देणे.

पत्र २२६ पान २१९

नवीन
क्रमांक

११८ (टिपण :- कार्तिक शु. ९ चा ज्या पत्राचा इथे उल्लेख आहे ते पत्र ८१ किंवा ८२ असू शकते. दोन्ही ठिकाणी सप्ताहाच्या तयारीचा निर्देश आहे. मजकुरावरून ८१-८२-२२५-२२६ क्रम लावला.)

जत कार्तिक शु. १५
... रविवार

श्रीगुरुसमर्थ

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री अंबुरावजी महाराज मौजे इंचगेरी, वडिलांचे चरणसेवेशी, बालक कृष्णाचा दोन्ही कर जोडून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. मिती कार्तिक शु. १५, रविवारपावेतो श्रीसमर्थकृपेकरून सर्व आनंद असो. विज्ञापना.

तीर्थरूप अप्पांकडील कार्तिक शु. ९ चे पत्र आले आहे. आपलेकडे पत्र लिहिले असल्याचे त्यात आहे. त्याप्रमाणे पत्र येऊन पोचले असेलच. आता सालाबादाप्रमाणे सप्ताहाची तयारी आपलेकडून होतच आहे. तयारी चाललीच असेल. मी लिहावे, सुचवावे, असे काही नाही. आपण सुज्ञ आहांत. फक्त सूचना कळवावी अशी आज्ञा लिहून आलेवरून या पत्राने विनंती लिहिली आहे. वरकड मजकूर अधिकोत्तर नाही. अप्पांचे जतेस येणे होईल अगर परभारे तिकोटेवरून इंचगेरीस जाणे होईल असे लिहिले आहे. नरसप्पा[१] येथेच आहे. आजारी आहे... बालकास विशेष काही लिहिणे शक्य नव्हे. ही विज्ञापना.

नोंद :-

१. हे नरसप्पा शापेटी असावे.

xxxxx

पत्र २१३ पान २१०

नवीन
क्रमांक

११९ (मागच्या काही पत्रांप्रमाणे हेही पत्र मार्गशीर्ष सप्ताहाच्या तयारीचे आहे. तिथीही जुळतात म्हणून इथे आणले.)

जमखंडी कार्तिक व. ४
...शनिवार

श्रीसद्गुरुसमर्थ

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री अंबुराव महाराज दादासाहेब ऊर्फ अंबुरावजी, वडिलांचे सेवेशी, बालक नागप्पाचा दोन्ही कर जोडून दंडवत नमस्कार. विनंती, विज्ञापना. तागाईत मिती कार्तिक व. ४ शनिवारपावेतो जमखंडी मुक्कामी आनंदरूप असो. विशेष... दोन पत्रे मुद्दाम लिहिली. जरूर जमखंडीस लिहिणेविषयी सांगितले असून उत्तर आले नाही. तूर्त कार्यकारणापुरते तुमचे मर्जीस येईल त्याप्रमाणे लौकर

चुना लावणेचे, सारवण्याचे गडी लावून करवावे. सारांश आम्ही येईपर्यंत तयारी व्हावी अशी काळजी असावी. लाकडे, रांगोळी वगैरे बेत ठेवीतच आहां. बांधण्याची वगैरे तयारी झालीच असेल, त्याबद्दल सांगणे लिहिणे नकोच आहे. सारांश सर्व प्रकारची तयारी जरूर जरूर करवावी. तांदूळ स्वस्त मिळत असेलतर, तुमचे मर्जीस येईलतर २ मण घेऊन ठेवावा. अगर मुद्दाम हणमंतरावास विजापुरास पाठवून तुकारामांना घेऊन खालील आणवावे.

तांदूळ २ मण रु. २५, हरभरा डाळ रु. १०, गूळ आठ मण रु. १६, तुरीची डाळ रु. ४, गहू १२ पायल्या रु. ६, घासलेट रु. २, एकूण रु. ६३.

कोणास तरी पाठवून जिन्नस आणवावे. विठोबाकडे जितके रुपये असतील ते मागून घ्यावे. कमी पडत असतील तर बाबाचार्यांकडून मागून घ्यावे. आम्ही त्यांस सूचना कळवीत आहो. निंबरगीहून रुपये तुमच्या मर्जीप्रमाणे आणवावे. तूप नंदेप्पा आणत आहे. दोन ठिकाणी उसने दिलेले गहू आणवून घ्यावे. तयारी तुमचे मर्जीप्रमाणे करावी. आम्ही आठ रोजांत येत आहो. इकडे हवा वगैरे बरी आहे. सर्व प्रकारे आनंद आनंद आहे. वडिलांप्रत विशेष काय लिहिणे ? ही विज्ञापना.

पत्र २३१ पान २२३

नवीन
क्रमांक

१२० (टिपण :- हे पत्र २१३ ची जवळजवळ प्रत आहे. काही गोष्टी नवीन अशा नाहीत. एखादी सूचना नवीन आहे. जेव्हा दोन व्यक्तींना काम सांगितले असेल तेव्हा महाराज दोघांनाही स्वतंत्र पत्रे लिहीत. कुणीही दुर्लक्षित राहत नाही व स्वतंत्र पत्र आल्याचा आनंदही होतो. महाराज शिष्यांची मने कशी जपत त्याचे उदाहरण म्हणून हे पत्र ठेवले आहे. पत्राची तिथी अर्थातच मागच्या पत्राची आहे.)

जमखंडी | कार्तिक व. ४
शनिवार

श्रीगुरुसमर्थ

महाराज तुकाराम साधू महाराज यांस प्रार्थना. खाली लिहिल्याप्रमाणे सर्व जिन्नस, चांगले माप व चांगला माल चौकशी करून घ्याव्वा. अंबुरावांची सूचना तुम्हांकडे येईल त्याप्रमाणे करावे.

१ तुरीची डाळ चांगली असावी. खोटा माल घेऊ नये. चौकशीने घ्यावी. १ हरभरा डाळ चांगली वर लिहिल्याप्रमाणे चौकशीने घ्यावी. १ तांदूळ तुमचे मर्जीप्रमाणे दोन पोती घ्यावे. १ गहू बारा पायली. १ गूळ आठ मण.

याप्रमाणे जिन्नस घ्यावे. अंबुरावांकडून जितके रुपये येतील तितके सूचनेप्रमाणे करावे. विठोबाकडील येतील तर ठीकच आहे. नाहीतर कमी पडतील तितके रुपये बाबाचार्यांकडून घ्यावे. बाकी मजकूर म्हणजे सप्ताहास जे जे तुमचेकडून करणेचे, ते करीतच आहां. मृदंग लौकर पाठवावा अगर घेऊन यावा. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. एकंदर मंडळींस त्रिकाळी नमस्कार नेमाबद्दल वडिलांनी सांगितला आहे, तो श्रुत करावा. तुमचे पत्र पावले. मजकूर समजून आनंद झाला. ही विनंती. कृपासागर वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री बाबाचार्य ऊर्फ बाबासाहेब यांस वडिलांनी त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे. अंबुरावांकडून सूचना येईल त्याप्रमाणे अगत्य करावे.

तुकाराम[१] हे पत्र घेऊन तुम्हांस दाखवतील त्याप्रमाणे तुम्हीही मुद्दाम जाऊन चौकशी करून माल देववावा. बाकी मजकूर आनंद आहे. कळावे, ही विज्ञापना.

–नागप्पा याजकडून

नोंद :-

१. यापुढील मजकूर अंबुरावांसाठी असावा.

xxxxx

	पत्र ८३	**पान १०५**
नवीन	उमदी	मार्गशीर्ष व. १२
क्रमांक		१.१.१९०८, मंगळवार
१२१		

श्री

तीर्थस्वरूप श्रीमंत मातोश्री लक्ष्मीबाई आईसाहेब केळकर वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक भीमाचा दोन्ही कर जोडून चरणी मस्तक ठेवून त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत मार्गशीर्ष व १२ पावेतो श्रीसद्गुरुकृपेने व आपले आशीर्वादाने आनंदरूप असो. विशेष. वडील आपलेकडून गावास आल्याला आता दोन रोज झाले. तिकडील अनन्यभावाची सर्व हकीकत सांगितलेवरून मनास परम आल्हाद वाटून संतोष झाला तो पत्री लिहिता येत नाही. असो. वडिलांचे आज्ञेवरून पत्र लिहीत आहे. सद्गुरुवचन– नारायणाने प्रवृत्ती–निवृत्ती दोन्ही ठिकाणी अधिकार (स्वातंत्र्य) दिल्याने प्रवृत्तिमार्गात क्षमा, दया, शांती, कृपा असलीच पाहिजे. निवृत्तीतही याप्रमाणे असली पाहिजे. नारायणाचे ठिकाणी थोरपणा अगर लहानपणा नाही. तो भक्तांचे अधीन झाला आहे. त्याने अधिकार दिलेप्रमाणे वर्तणुकीत क्षमा पाहिजेच, म्हणजे आनंद होत आहे. सहस्र अन्याय जरि त्वां केले । क्षमा करिल गुरुमाय ।। असे वाक्य आहे. भक्तविजय अध्याय २ मध्ये जयदेव स्वामींनी क्षमा, धीर धरल्याचे व त्यायोगे त्यांचा जयजयकार होऊन महत्त्व वाढल्याचे आहे. प्रपंच परमार्थ दोन्हीकडे क्षमेने संतोष, आनंद जयजयकार होतो, हे जाणतच आहां. ज्ञानमार्गास आपली योग्यता असलेने वडिलांनी सांगितलेवरून मनास उत्सुकता अशी झाली की ती पत्री लिहिता पुरवत नाही. या आत्मज्ञानाचे मार्गाने ही गोष्ट सर्वमान्य होणार आहे. करिता या आत्मज्ञानाविषयी मागे किती बड्या बड्या लोकांचा, जनक राजाचा दाखला लिहिता पुरवत नाही. म्हणूनच आजवर कीर्ती गाजत आहे. आता नव्याण्णव कोटी राज्यावर लाथ मारून आत्मज्ञानाकडे लक्ष देऊन 'गोपीचंदलाला माल मुलुख छोड जाना'[1]

असे वाक्य आहे. याप्रमाणे आत्मज्ञानाची स्तिती (स्थिती ? स्तुती ?) असल्याचे ऐकून मनास फार संतोष वाटला. एकंदर मंडळींस व आपल्यास नेमाने, निष्ठेने व कष्टाने वागण्याबद्दल वडिलांनी अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत व्हावा. कळावे, बहुत काय लिहिणे ? कृपा-लोभ करावा, ही विज्ञापना.

नोंद :-

१. हरिसे कोई नहीं बडा । दिवाने क्यों गफलत में पडा ।। गोपीचंदने बचन सुनकर । महल मुलुख सब छोडा ।। कहत कबीरा सुन भाई साधो । हरिचरण चित्त जडा ।। -(पदसंग्रह, पृ. २०-२१.)

xxxxx

	पत्र ८४	**पान १०७**
नवीन	उमदी	मार्गशीर्ष व. १४
क्रमांक		२.१.१९०८, गुरुवार
१२२		

श्रीसद्गुरुसमर्थ

महाराज तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री अंबुराव महाराज, मुक्काम इंचगेरी, वडिलांचे सेवेशी, बालक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणांवर मस्तक ठेवून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत मिती मार्गशीर्ष व. १४, रोज गुरुवारपावेतो श्रीसमर्थ सद्गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुम्हांकडे तुकारामाचे पत्र आलेले समजले. त्यांस जे सांगितले आहे त्याप्रमाणे सर्व तयारी करवावी. बंद वगैरे करू नये. काम चालू असावे. दोन सुतार विजापूरहून येत आहेत. तुकारामही येईल. त्यास पत्र लिहिले आहे. सारांश, समक्ष सांगितलेप्रमाणे सर्व तयारी असली पाहिजे. अण्णप्पाही तयारी करीतच आहे. त्यास तुमची मदत आहेच. त्याबद्दल लिहिणे नको आहे. तुमचे वचनाप्रमाणे

सर्व तयारी ठेवावी. खांबाचे खाली ठेवण्याचे दगडही वडाराकडून तयार करवून ठेवावे. ज्याप्रमाणे जमखंडीहून येईपर्यंत खोली वगैरे तयार केली होती, त्याप्रमाणे सर्व तयारी करून ठेवावी. वाहवा म्हणून घ्यावे, म्हणून फार फार प्रार्थना सांगितली आहे. नेमाबद्दल सर्वत्रांस साष्टांग नमस्कार सांगितला आहे तो श्रुत व्हावा. कळावे. वडिलांप्रत जास्त विशेष लिहिणे बालकास शक्य नाही, ही विज्ञापना.

	पत्र ८५	**पान १०८**
नवीन	सोलापूर	माघ व. १२
क्रमांक	अंबुरावांना पत्र	२९.२.१९०८
१२३		

श्री

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. इकडील सर्व आनंदरूप आहे. महाराजांनी तुम्हांस शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे. दोन्ही बाजूच्या पायऱ्या व दरवाजा तयार झालाच असेल. त्याबद्दल शंकाच नाही. परंतु मी उगीच कळवतो. याबद्दल महाराजांस पूर्ण खात्रीच आहे. दासबोधी जैसी शर्ती आहे त्याप्रमाणे आपण आहांत, म्हणजे दूरदृष्टीचे आहांत असे सांगितले. अण्णप्पा महाराजांनी पूर्वी सहा रुपयांचा मक्ता देऊन पलंग वगैरे तयार केले होते. त्याप्रमाणे विश्वास व पूर्ण खात्री झाल्याने पुन्हा चौघड्याचा मक्ता देऊन आले आहेत. तोही तयार झालाच असेल असे वाटते. आम्ही येथून फाल्गुन शु. ३ गुरुवार, होर्ती-सावळसंगास येत आहो. विहिरीचे काम, मोट, वगैरे सुरुवात होऊन तयारी होत असेल असे वाटते. म्हणून उत्तर कळवले नसेल. उत्तर कळविण्याविषयी सांगितले होते. तयारी असल्यावर उत्तर पाठविणेचे कारण पडले नसेल. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. तुम्हां एकंदर मंडळींस नेमाबद्दल फार फार प्रार्थना सांगितली आहे. शहर (सोलापूर ?) गुंडा महाराज यांनी तुम्हांस दंडवत नमस्कार सांगितला

आहे. मीही त्यांचेबरोबर येत आहे. सुज्ञांप्रत अभिज्ञांस सुचवावे, लिहावे असे नकोच आहे. सर्वांपरि सर्व भूतांचे रिणकरी आहांत. (सर्वांवर तुमचे ऋण आहे कारण तुमचे सर्व काम उत्तम व भक्तीचे आहे), म्हणून वडिलांनी नमस्कार सांगितला आहे. ही विज्ञापना.

आपला

नारायण गणेश दामले[१]

नोंद :-

१. इंचगेरी मठाच्या जागेच्या करारपत्रावर साक्षीदार म्हणून नारायण गणेश दामले यांची सही आहे.

xxxxx

पत्र २३९ पान २३३

नवीन
क्रमांक

१२४ (टिपण :- हे पत्र ८५ या मागच्या पत्राचा ताजा कलम असल्यासारखे आहे. पलंग तयार करून घेण्यास सांगितले असून पूर्वी तसे केल्याची (पत्र ८५ मध्ये हे आहे) आठवण दिली आहे. दरवाजा लावण्याचाही विषय आहे. म्हणून इथे आणले. तारीख व तिथी तीच घातली आहे.)

माघ व. १२

२९.२.१९०८

श्री

अंबुराव महाराज यांस प्रार्थना फार फार आहे. अंतःकरणापासून स्मरणपूर्वक करावे ते-

५ पलंग तयार करून ठेवावे.

२ दोन्ही दरवाजे लावावे, हूक वगैरे आणवावे.

एकंदर दरवाजाची कोंडी (कडी-कोयंडा) पाहून घालवावी. एवढे

काम अगत्य अगत्य काळजीने करणे. विज्ञापना. साष्टांग नमस्कार फार फार आहे. एवढे मागणे आहे हे पुरवून दिले पाहिजे. बाकी मजकूर... आमची व्यवस्था काम.... आहे.

पत्र ८६ पान १०९

नवीन

क्रमांक

१२५ (टिपण :– ८५ पत्रात 'फाल्गुन शु. ३, गुरुवार', असा एक उल्लेख आहे. प्रस्तुत पत्राची तिथी 'फाल्गुन शु. २' असून 'उद्या गुरुवार' असे इथे एक वाक्य आहे. म्हणून या पत्राचा वार बुधवार येतो.)

सोलापूर फाल्गुन शु. २

करबसप्पा आवटी यांना पत्र ४.३.१९०८, बुधवार

श्रीगुरुसमर्थ

दंडवत नमस्कार. फाल्गुन शु. २ पावेतो श्रीसमर्थकृपेने आनंद आनंद असो. इंचगेरीस पौर्णिमेस येत आहे. सेट्टप्पा रिकामा असलेस इंचगेरीस येणेचे सांगावे. उद्योगी असलेस मग नको. सर्वत्रांस नेमाबद्दल प्रार्थना सांगावी. उद्या गुरुवार होर्तीकडे जाणार आहो. कळावे. लोभ करावा ही विज्ञापना.

–उमदीकर

पत्र ८७ पान १०९

नवीन

क्रमांक

१२६ (टिपण :– ८६ व ८७ पत्रांवर एकच तारीख आहे, म्हणून तिथीही तीच येणार. दोन्हींची एकच.)

सोलापूर — फाल्गुन शु. २

कृष्णरावांना पत्र — ४.३.१९०८, बुधवार

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. तुमचे पत्र सात रोजांने पावले. उशीर फार का लागला ? असो. उद्या फाल्गुन शु. ३, गुरुवार निघून निंबाळ-होर्तीवरून चार रोजांत इंचगेरीस जात आहे. सर्व समर्थकृपेने आनंद आनंद आहे. तुम्हांकडील खुशालीचे खुलासेवार उत्तर इंचगेरीस लिहावे. उमदीसही कळवावे. सर्व प्रकारे आनंद आहे. नेमाने असावे हेच सांगणे आहे. कळावे, हा आशीर्वाद.

पत्र १८८ — **पान १८६**

नवीन क्रमांक

१२७ (टिपण :- या पत्रावर तारीख, तिथी यांचा अभाव आहे. पत्र सोलापूरच्या साधकांना लिहिलेले आहे. ते कोणत्या वर्षाचे आहे नक्की सांगता येत नाही. अंदाज असा की, ८५, ८६, ८७ ही पत्रे सोलापूरहून गेली आहेत, तेव्हा तिथून आल्यावर सर्वांना मिळून लिहिलेले हे पत्र लगेचच लिहिले असावे. महाराजांची पत्र लिहिण्यातली तत्परता माहीतच आहे. आणखी एक धागा लागतो. ८५ पत्रात सोलापूरहून महाराज होर्ती-सावळसंगमार्गे इंचगेरीस जाणार होते असे आहे. ८६ व ८७ मध्ये होर्ती मार्गाने इंचगेरीस जाणार असे असून १८८ या प्रस्तुत पत्रातही होर्ती सावळसंग याच मार्गाचा निर्देश आहे. ८७ व १८८ दोन्ही पत्रांत उत्तर इंचगेरीस पाठवण्यास सुचवले आहे. या सर्वांवरून पत्र इथे बसते.)

उमदी — १९०८

श्रीगुरुसमर्थ

श्रीसमर्थसद्गुरुमहाराज मंडळी, शंकरराव, व्यंकटराव, दत्तोपंत,

शंभोराव वगैरे मंडळींस निश्चयाकरिता शिरसाष्टांग नमस्कार करून प्रार्थना आहे की नामनिष्ठेने असले पाहिजे. दासबोध दशक ४ समास ३[१], ओव्यांत आहे त्याप्रमाणे सर्वांनी करीत जावे. डोळ्यांत गुंगी असू नये. अंतःकरणात हर्ष असलेस जांभया येत नाहीत. अशा निष्ठेचा नेम सकाळी एक तास केल्याचे फळ म्हणजे आधीचे ११ तासांचे निरसन होत आहे. संध्याकाळचे एक तासाने दिवसातील ११ तासांचे व्यवहाराचे निरसन होत आहे. नंतर तूक (योग्यता) कळू लागते. नंतर उत्सुकता होऊन प्रेम वाढते. तदनंतर सख्यभक्ती घडत आहे. सख्य झाले म्हणजे धन्य होऊन गेले. अशी निष्ठा दोन वेळा सर्वांनी ठेवावी. याबद्दल प्रार्थना फार फार आहे. आईसाहेब बयाबाई यांस मस्तक चरणी ठेवून नमस्कार. वर लिहिलेप्रमाणे दोन वेळा साधाव्या. कल्पना आल्या तरी आपणहून दूर होऊन जात आहेत. यात निष्ठा मुख्य आहे. याप्रमाणे घरी मंडळींसही सांगावे. लोकडे बाई यांसही सांगावे. असे झाल्याने इकडील ओढी निरंतर तेथे (देवाचे ठिकाणी) आहे असे समजावे. निष्ठेची प्रचिती, अनुभव तत्काल परस्परे (आपोआप) येत आहे. याप्रमाणे सर्वांनी वाचून, मनन करून, अर्थ करून घेऊन अंतःकरणात निरंतर आठवण ठेवावी. बयाबाई तुमचे दृष्टीपुढे गाढव, माकड आल्याचा अर्थ शंकरराव आलेवर सांगतो असे म्हटले होते, पण त्याची मला आठवण[२] आली नाही. त्याचा अर्थ असा– सर्वांस पहाटे गाढ झोप न येऊ देता, वा म्हणजे वेळ वाया जाऊ दिला नाही, म्हणून गाढवा. माकड दिसले याचा अर्थ डोळ्यांत माया झाल्याने झोप न घेता सर्वांनी तत्त्वाकडे दृष्टी दिल्याने दोन गोष्टी घडल्या. याचा अर्थ डोळ्यात मा (माया म्हणजे प्रेम, देवाबद्दल प्रेम) झाल्याने वस्तूकडे लक्ष होत चालले, म्हणजे वस्तू दिसत आहे. नंतर अंतःकरणात प्रेम वाटून सख्यता घडत आहे म्हणजे झाले. याप्रमाणे अर्थ सांगून नेमाने व कट्टाने सर्वांनी वागत जावे, म्हणून नमस्कार करत आहे व मागणेही मागत आहे. 'आठवण तुम्ही द्यावे पांडुरंगा[3]' याप्रमाणे प्रार्थना आहे. सर्वांना मान्य होऊन भक्तीकडे निश्चय करावा म्हणजे सर्वतोपरी आभारी आहे. असो. सुज्ञच आहां.

होर्ती मुक्कामी दोन–तीन मुक्काम होऊन सावळसंगास जात आहो. नंतर इंचगेरी. इतक्यात सर्वांनी या पत्राचा अर्थ समजून घेतलेचे उत्तर खुलासेवार लिहावे, अशी आशा बाळगून आहे. तर पूर्णिमेचे आत इंचगेरीस उत्तर यावे. कळावे. विष्णुपंत[४] दादासाहेब यांस नागप्पा याचा दंडवत नमस्कार. तुम्हांस वडिलांनी नमस्कार सांगितला आहे. सर्वांस हे पत्र समजून देऊन उत्तर लिहावे. तसबीर (तसबीर म्हणजे छायाचित्र असावे का ? कुणाचे ? कळत नाही) मास्तर वगैरेंनी घेतली. निष्कांचन (किंमत न घेता) देणेविषयी महाराजांनी सांगितलेवरून मी दिली. आता दोन प्रतीचे दोन चांगले ऐटदार आरसे लावून देतच आहां. (तसबिरीला काच लावून फ्रेम करायची असावी) परंतु सूचना लिहिली. विष्णुपंत देणार आहेत असे वचन वडिलांनीही सांगितले आहे. त्याप्रमाणे घेऊन येतच आहां. सुज्ञच आहां. कळावे. निंबाळ नाडगौड यांनी दिले नाही. कळावे, ही विज्ञापना.

नोंदी :-

१. नामस्मरणभक्तिनाम समास. या समासात पूर्णपणे स्मरणभक्तीचा विषय आहे. महाराजांचे प्रस्तुत पत्रही नामस्मरणभक्तियोग आहे असे म्हणता येईल.

२. 'बयाबाईंना गाढव व माकड दिसले याचा अर्थ शंकरराव आलेवर सांगतो असे म्हटले होते पण त्याची आठवण राहिली नाही' असे पत्रात आहे. कदाचित् शंकरराव पोथीस आल्यावर त्यांच्यापुढे व इतरांपुढेही अर्थ सांगण्याचा विचार असावा. मजकूर केवळ बयाबाईंपुरता नसून सर्वांसाठी आहे. पण अर्थ सांगणे विसरले गेले. म्हणून सोलापूरहून आल्यावर, बहुतेक उमदीहून, हे पत्र तपशीलवार लिहिले असावे असा अंदाज आहे.

३. आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा । कींव माझी सांगा काकुलती ॥२॥ तुका म्हणे तुम्ही निरवल्यावरी । मग मज हरी उपेक्षीना ॥४॥ – (तुकाराम गाथा, अभंग १५३९, पृ. ३२२.)

४. विष्णुपंत फडके. यांनी नित्यनेमावलीच्या पहिल्या दोन आवृत्त्या, १९११ व १९१६ साली प्रसिद्ध केल्या.

xxxxx

पत्र ९९ पान ११७

नवीन
क्रमांक

१२८ (टिपण :- या पत्रावर १९०८ एवढीच तारीख आहे. तिथीप्रमाणे हे पत्र इथे बसते. तारीख अंदाजे २७.५.१९०८ असावी. मागच्या पुढच्या तिथी-तारखा जमतात. नागप्पांचे लग्न १९०८ साली झाले, त्याच्याशीही हे साल जमते.)

इंचगेरी वैशाख व. ९
२७.५.१९०८, रविवार

श्रीसद्गुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य राजश्री बाबाचार्य महाराज अण्णा, मुक्काम विजापूर, वडिलांचे चरणसेवेशी, बालक अंबाजी कुलकर्णी, मुक्काम इंचगेरी, याचा दोन्ही कर जोडून अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. इकडील सर्व मजकूर आनंदरूप असो. श्रीसद्गुरुसमर्थ महाराज उमदी, हे नागप्पा महाराज यांचे लग्नास येथे आले होते. आनंद झाला. लग्न बरेच झाले. महाराजांनी सांगितलेवरून त्यांचे आज्ञेवरून पत्र लिहिले आहे. तर आपलेकडून चैत्र सप्ताहाबद्दल वर्गणी आठ रुपये मागून घेण्यास आज्ञा केली आहे. तरी रुपये हळी सायेबण्णा याचेबरोबर देऊन पाठवावे. कळावे, ही विज्ञापना.

मिती वैशाख व. ९ रविवार.

-अंबाजी श्रीनिवास कुलकर्णी

13721

नवीन
क्रमांक
१२९ (टिपण :- यानंतर २१०-२२७-८८-२२८ असा क्रम लावला आहे. तिथी व मजकूर यांचा खूप विचार केला कारण पत्र ८८ सोडून उरलेली तीन पत्रे बिनतारखेची आहेत. ८७ पत्र फाल्गुनातले व ८९ पत्र भाद्रपदातले आहे. मधल्या महिन्यांचा विचार करून तारखा ठरवल्या. यापैकी तीन पत्रांत (२१०, २२७ व २२८) श्रावण सप्ताहाचा उल्लेख आहे. इतर मजकूर या क्रमाप्रमाणे जमतो म्हणून बरीच पुढे छापलेली पत्रे इथे आणली आहेत. तिथी जमतातच.)

तिकोटे   ज्येष्ठ शु. ५
                    ७.६.१९०८

श्रीसद्गुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री अंबुराव महाराज क्षेत्र इंचगेरी, स्वामीजी गोसावी यांसी, स्नेहांकित सेवक नागप्पा निंबरगी याचा कृतानेक दंडवत. विनंती, विज्ञापना. ज्येष्ठ शु. ५ पावेतो समर्थकृपेने तिकोटे येथे आनंदरूप असो. विज्ञापना. आपले पत्र विजापूर मुक्कामी आले. मजकूर समजून आनंद होऊन सर्वांस आज्ञेप्रमाणे श्रुत केला. गवंड्याबरोबर सांगून पाठविलेप्रमाणे त्यांनीही तुम्हांस सांगितले असेल. सारांश विजापूरकर यांचेच कर्तव्य आहे असे समजू नये. सर्व कर्तव्य आपलेच आहे असे अंतःकरणात ठेवून, भूतदया ठेवून कारखान्यावर नजर असावी, अशाबद्दल प्रार्थना तुम्हांस व अण्णप्पा महाराज यांसही फार फार वडिलांनी सांगितली आहे. त्याप्रमाणे मान्य होऊन, दया करून, साहाय्य करत जावे. लौकर होण्यासाठी आपले कार्याकडे नजर असावी हेच मागणे आहे. दुसऱ्यांचे बोलणे-ऐकणे आपण ऐकून अंतःकरणात कठोरता असू नये. देहभाव खोटा आहे. सर्व ठिकाणचा जात नाही, म्हणून आपणही त्यात शिरून कठोरता धरून गेलेतर श्रेष्ठता पदवी कशी येईल ? सारांश, सुज्ञच आहां. कळावे.

13721

आता नवी घातलेली खोली आहे त्या ठिकाणी दरवाजा करून माती घालून घटणी वगैरे लौकर करावी. वाळून तयार झाले पाहिजे, अशी मेहनत घ्यावी.

माडीवर पंधरा पाट आहेत. ते सुताराकडून तयार करवून घ्यावे. पाट, दरवाजा, बाक याप्रमाणे तयार करून त्याची मजुरी द्यावी. आल्यावर आम्ही देत आहो. बाकी श्रावणमासी उत्सव आहे. लाकडे अगर जेवण्याचे पानांची व्यवस्था ठेवतच आहां. त्याबद्दल लिहिणे नकोच आहे. तिक्रोटेहून होनवाड, ककमरीकडे जाणेचा बेत आहे. जमखंडीहून नंदेप्पा वगैरे येणार आहेत अशी सूचना आली आहे. याप्रमाणे इकडील वर्तमान आहे. कळावे.

चहू बाजूंनी अण्णप्पा यास सांगितलेप्रमाणे काटे व बी वगैरे घालून बंदोबस्त करणेस सांगावे. मंटपावरील फुलझाडे पावसाळ्यात घालणेस अण्णप्पा यास सांगावे. कळावे. लोभ करावा ही विज्ञापना.

एकंदर अंतःकरणाचे नामधारक मंडळींस नेमाने असणेबद्दल व कट्टाने नेम करणेबद्दल, एकंदरांस अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार वडिलांनी फार फार सांगितला आहे, तो अगत्य श्रुत करावा. तसदीबद्दल तुम्हांसही याचप्रमाणे प्रार्थना आहे, असे सांगितले आहे ते श्रुत व्हावे. ही विज्ञापना.

पत्र २२७ पान २२०

नवीन
क्रमांक
१३० (टिपण :– मठाचे पैसे नागप्पांकडे असत म्हणून त्यांना पत्र असावे. ते महाराजांबरोबर लच्याणला गेले नव्हते काय ?)

लच्याण आषाढ शु. १४

सुबराय/नागप्पा यांना पत्र १५.७.१९०८

श्रीसद्गुरुसमर्थ

कृतानेक अनंत दंडवत. अति नम्रतेचा नमस्कार. आषाढ शु. १४, लच्याण मुक्कामी समर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. इकडील मजकूर सर्व आनंदरूप आहे. पाऊस होऊन पेरणी चालली आहे. सोलापुरी भक्तिथाट झाला तो लिहिता सांगता पुरवत नाही, असा आनंद झाला. आता श्रावण सप्ताहास दररोज पाच पन्नास मिळवणार अशी आगाऊ उद्योगाची व्यवस्था करून व्यापारी[१] सप्ताहास येत आहेत हे तुम्हांस माहीतच आहे. असो. विजापुरास आषाढ व. ६/७ पर्यंत राहणार आहोत. हे पत्र पोचताच चांगला विश्वासुक गडी करून त्याचेबरोबर रुपये १०० पाठवावे अगर मनीऑर्डर होत असलेस तुकाराम बिन नरसप्पा सुतार यांचे नावे, उपली बुरुजाजवळ घर आहे त्यांचेकडे करावी, अगर आषाढ व. ७/८ संधीस पोचावे असे मुद्दाम मजुरीचा गडी करून पाठवावे. या मुदतीत न झालेस, आम्हीच येथे उसने घेऊन तुम्हांकडे गडी पाठवत आहो असे होत आहे. असो. जमखंडी–सोलापूर मंडळी श्रावणमासी येत असलेचे तुम्हांस माहीतच आहे. असे मंडळींचे अंतःकरण भक्तीकडे जडून गेलेने समर्थांकडून त्यांचे मनोदयाप्रमाणे घडून येत आहे. ही गोष्ट आत्याबाईंस (संगव्वा नावाची निंबरगी महाराजांची मुलगी) अनुभवाने तेव्हाच समजणार आहे. दुसऱ्यांस कळणार नाही. (निंबरगी) महाराजांपासून वागणूक असलेने त्यांस कळणार आहे. त्यांस अति नम्रतेचा व अनन्य भावाचा दंडवत नमस्कार वडिलांनी सांगितला आहे. ते मामा (गंगाधरमामा) व आई (सिद्दव्वा, निंबरगी महाराजांची सून) वगैरे मंडळींस श्रुत व्हावे. तुम्हांस व भाऊराव[२] यांसही याचप्रमाणे आहे. बाकी एकंदर मंडळींस माझा अति नम्रतेचा दंडवत नमस्कार सांगावा. कळावे. कृपा–लोभ करावा ही विनंती.

–नंदेप्पा न्यामगौड, मुक्काम लच्याण

नोंदी :–

१. साधारण नेहमीच्या अंदाजाप्रमाणे साधक मंडळी किती जमतील, आपला

व्यापार किती होईल असा नफा–तोट्याचा विचार करून व्यापारी मंडळी उत्सवाचे ठिकाणी येत असतात. सर्व मंडळींची व्यवस्था करावी लागते म्हणून सूचना असावी.

२. निंबरगी महाराजांचे नातू. निंबरगी महाराजांच्या देवळात (निंबरगी येथील) ते एकटेच भजन करत असलेतरी त्यांचा खडा आवाज गावात ऐकू जाई असे सांगतात. भाऊराव सावळसंग यांच्याबद्दलही असेच ऐकले आहे.

xxxxx

पत्र ८८ पान १०९

नवीन
क्रमांक

१३१ (टिपण :- पत्रावर तिथी मिती अ.व. १२ आहे. ती आं. व १२ हवी. हा अश्विन महिना नसून आषाढ आहे. तारीख जुलैमधली आहे.)

तिकोटे मिती आषाढ व. १२, शके १८३०
कृष्णरावांना पत्र २५.७.१९०८

श्रीगुरुसमर्थ

तीर्थस्वरूप सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री कृष्णाजीपंत अण्णा देशपांडे, मुक्काम जत, यांस, तिकोटीहून महालिंगप्पा बन याचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. आता आपणांस पत्र लिहिण्यास कारण की श्रीसद्गुरुमहाराज यांची स्वारी आज संध्याकाळी होनवाडाहून आली. तुम्हांस कळावे. सोमवारी इंचगेरीस जाणेचा बेत आहे. कळावे. श्री. मातोश्री गंगाबाई यांचा आशीर्वाद. तसदीबद्दल क्षमा असावी. कळावे, हा नमस्कार.

–आपला महालिंगप्पा बन

13.7.21

पत्र २२८ **पान २२१**

नवीन इंचगेरी आषाढ व. ३०

क्रमांक २८.७.१९०८, शनिवार

१३२

श्रीसद्गुरुसमर्थ

श्रीगुरुमूर्ती महाराज राजमान्य राजश्री सुबराय अण्णा मुक्काम निंबरगी, स्वामींचे चरणसेवेशी, सेवक अंबाजी कुलकर्णी मुक्काम इंचगेरी, याचा दोन्ही कर जोडून त्रिकाली दीर्घ दंडवत. विनंती, विज्ञापना. मिती आषाढ व. ३० पावेतो सर्व मंडळी क्षेमरूप असो. विज्ञापना. महाराज सद्गुरुसमर्थ उमदी व महाराज नागप्पा वगैरे मंडळी गुरुवारी सायंकाळी येथे आली आहेत. उद्या रविवारी सप्ताह (श्रावण) सुरू आहे, तर आपण खाली दिलेले सामान घेऊन जरूर आले पाहिजे.

देव व देवाचे सामान, घड्याळ १, मृदंग १

येणेप्रमाणे जिन्नस घेऊन येणे. महाराज नागप्पा जमखंडीहून मोती वगैरे म्हणजे कानातली भावली (बाळी, भिकबाळी) घेऊन आले आहेत. त्याची किंमत सव्वा एकतीस (३१।) घेऊन येणेचे करावे. कळावे. बहुत काय लिहिणे ? ही विज्ञापना.

पत्र १८० **पान १७६**

नवीन

क्रमांक

१३३ (टिपण :- पत्रावर न तारीख, न तिथी. श्रावण सप्ताहाचा निर्देश आहे त्या आधारावर इथे आणले.)

इंचगेरी

कृष्णरावांना पत्र

श्री

आशीर्वाद उपरि. येथील सर्व श्रावणसप्ताह आनंदरूप चालला आहे.

तुम्ही नेम मात्र करीत जावा बरे. हेच सांगणे फार फार आहे. स्नेही मंडळींत वेळ घालवू नये. वरिष्ठ अंमलदाराकडे जर वेळ द्याल त्यास सांगणे नाही (हरकत नाही). वरिष्ठ स्नेही केले असता, वेळ दिला असता, तीच पदवी येईल. सारांश, सुज्ञपणाने वागावे. मागे रिकामे स्नेही करून भोग घेतला आहे. तुम्हीच करून तुम्हीच भोगावे लागते. परंतु ऐकणारे, काळजी करणारे यांना (वडील माणसांना) पाहावा अगर ऐकावा लागेल असा प्रसंग (दुःखाचा) होऊ नये. किती गुप्त असला तरी साधु–संतांस कूटस्थातील भाव तेव्हाच कळून येतो बरे. सारांश, पुण्यमार्गाने वागावे व पाहत जावे ही गोष्ट. दृष्टी व स्मरण निरंतर असावे म्हणजे सर्व रीतींनी आनंद असतो बरे. ही गोष्ट अंतःकरणात स्मरण व दृष्टी चालता बोलता असावी, म्हणजे पुण्यमार्ग झाला. रात्री नेम जितका होईल तितका करत जावा. नेम धरावा. तूर्त सवड आहे. हीच वेळ अंतःकरणापासून ठरवून नेम करीत जावे. असो. सरकारी कामात हुशारीने वागावे. कोणत्या वेळी घाला पडेल सांगता येत नाही. म्हणून हुशारीने व निष्ठूर असावे. आता, कोणावर वहीम वगैरे म्हणू नये. शिपाई लोकांवर वर्म असू नये. सर्वांबरोबर तोंडी गोड, आत आपले हुशार असावे. लाच वगैरे घेऊ नये. हेच वजा द्यावे लागते (जे घेतो ते टिकत/पचत नाही. मोठ्या पटीने द्यावे लागते.) करिता परद्रव्य व परस्त्री दोन्हींवर शपथ वाहून निष्ठूर वागावे बरे. हेच सांगणे आहे. भोग येत असतात, तरी हुशारीने राहावे. बाकी सुज्ञच आहां. सांगणे नको आहे. वर लिहिलेल्या दोन्ही गोष्टी अंतःकरणात ठेवाव्या. कळावे. बाकी भीमा सांगेल. दाल तेच पाठवावे. येणाऱ्याबरोबर लौकर मेणबत्त्या चार पाठवाव्या. शिवलिंगव्वा वगैरेस नमन सांगावे. कळावे. तुम्ही हुशार असावे. रिकामा वेळ घालवू नये.

15 7 21 M.3.41 DC

पत्र २४४ **पान २३७**

नवीन उमदी श्रावण शु. २

क्रमांक अंबुरावांना पत्र ३०.७.१९०८, सोमवार

१३४

श्रीसद्गुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणांवर मस्तक ठेवून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत मिती श्रावण शु. २, सोमवार, तिसरे प्रहरापावेतो श्रीसमर्थसद्गुरुकृपेने व आशीर्वादिकरून इकडील लहान-थोर मंडळी सर्व खुशाल असो. विशेष. काल वेदमूर्ती गुंडाचार्य पुराणिक यांनी निरोप कळविला तो समजला. काल जतेहून तीर्थस्वरूप अण्णाचे पत्र आले. तिकडे खुशाल आहेत. मीही सवडीप्रमाणे येत आहे. बाकी मजकूर काही विशेष नाही. वडिलांप्रत विशेष काही लिहिणे बालकास शक्य नाही. ही विज्ञापना.

हेच पत्री महाराज राजमान्य राजश्री वेदमूर्ती महादेवभटजी वगैरे संतसभेस माझा शिरसाष्टांग नमस्कार आहे. कळावे.

कासपा कनूर घोडा घेणेस येतो. रविवार-सोमवारी येतो असे परवा सांगितले आहे. घोडा खराब करू नये, घरी बांधावा. पावसात खराब होत आहे, असे अण्णप्पास सांगावे.

पत्र ८९ **पान ११०**

नवीन

क्रमांक

१३५ (टिपण :- इतर काही पत्रांप्रमाणे याही पत्रावरून स्वतःच्या देशपांडे घराण्यातील, तसेच सासुरवाडीच्या निवरगीकरांनी महाराजांना तरतऱ्हेचा त्रास दिला हे कळते.)

उमदी भाद्रपद शु. ३

२९.८.१९०८, शनिवार

श्रीसद्गुरुसमर्थ

चिरंजीव दादा यासी भाऊ याचे अनेक आशीर्वाद उपरि. विज्ञापना. भाद्रपद शु. ३, रोज शनिवारपर्यंत आनंदरूप असो. विज्ञापना. तुम्ही आमचे घराण्यात पाळी वहिवाट दाखला होऊ नये अशी युक्ती योजना करून, लोकांचे बोलीवरून अर्ज केल्याचे समजले. ही गोष्ट काही बरोबर होत नाही. जर तुम्हांला स्वतः करणेची (शेतीची व्यवस्था) असेलतर तुम्हीच तेथे स्वतः राहून काम करावे, अगर बदली नेमून घ्यावी. हे न करता दुसऱ्यास नेमीन असा आग्रह असलेस वतनाचा दाखला बुडवीत आहांत असे झाले. तुमचे नावाने दाखल केल्याने हानी केली असे होईल. ही गोष्ट खरी की खोटी हे समजून घेण्यास आमचे अगत्याचे (जवळचे/आप्त) मंडळीपैकी भीमराव भोसेकर, बाबण्णा कुलकर्णी अगर गाडगीळ मास्तर या त्रिवर्गास विचारून ते जसे सांगतील त्याप्रमाणे भीमाबरोबर जाऊन सरळ करून यावे. तुमची यत्ता (इयत्ता/योग्यता) जी असेल तिची मास्तरांची खात्री पटवावी. तुमच्या योग्यतेप्रमाणे ते पुरवून देतील. वतनदारी गोष्टींबद्दल सभ्य लोकांस विचारून पुढचे परिणाम पाहून वागत जावे. गैरशिस्त वागू नये. आमचे जीवमान असेपर्यंत भाऊपणा (मोठेपणा) दाखवू नये. जी तुमची समजूत, तिची वर लिहिलेप्रमाणे त्रिवर्ग खात्री करून देतील, अगर जामीन राहतील. सारांश, तुम्हीच टाकळीत राहून सर्व व्यवस्था करावी. कामाअंती जेव्हा कार्य पडेल तेव्हा भीमा येऊन सही करील. अगर भीमाकडून बदली नेमून घ्यावे (दुसऱ्या कुणाला तरी काम सांगावे.) तुमची शक्ती जशी असेल तसे करून घ्यावे. हे सोडून आमचे घराण्यात नेमू नये असा अर्ज करणे वाजवी नव्हे. ही गोष्ट वर लिहिलेल्या त्रिवर्गास विचारून समजूत करून घ्यावी. कळावे, हा आशीर्वाद.

हेच पत्री वर लिहिलेले त्रिवर्गास साष्टांग नमस्कार. वर लिहिलेप्रमाणे त्याची समजूत काढून स्वतः तुम्ही जामीन राहून भीमाबरोबर त्यास पाठवावे. कळावे, ही विनंती.

आपला

भाऊ उमदी

पत्र २२४ पान २१८

नवीन
क्रमांक

१३६ (टिपण :- या पत्रावर तारीख नाही पण तिथी पूर्ण आहे. त्यावरून हे पत्र सप्टेंबर १९०८ चे ठरते. हिशोब करून तारीख ७ सप्टेंबर येते.)

जमखंडी भाद्रपद शु. ११, शके १८३०
अंबुरावांना पत्र ७.९.१९०८

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक दंडवत अनंत शिरसाष्टांग नमस्कार. तुमचे पत्र पोचले. मजकूर समजून आनंद आनंद झाला. इकडे पाऊस उत्तम आहे. सर्वप्रकारे आनंद आहे. तुमचेकडे पाऊस कसा आहे ते कळवावे. कारखाना लौकर करणेविषयी सांगितलेच आहे. त्याप्रमाणे करीतच आहां. सुज्ञच आहां. या विषयी पूर्वापार खात्रीच आहे. दूरदृष्टीचे आहां अशाबद्दल वडिलांनी खात्रीने आम्हांस कळविले. त्याचप्रमाणे तुम्ही करीतच आहां. नरसिंगराव तात्या पुजारी यांसी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार आहे. वडिलांनीही याचप्रमाणे सांगितले आहे. नेमाबद्दल प्रार्थना फार सांगितली आहे. बाकी मजकूर खुलासेवार उत्तर येईलच. एकंदरांस आपले पत्राप्रमाणे नमस्कार प्रविष्ट केले आहेत. रामभाऊ, गोखले[1],नागप्पा व आपटे महाराज सर्वांनी तुम्हांस अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत व्हावा.

–नंदेप्पा न्यामगौड

नोंद :-

१. हे मोरोपंत गोखले असावेत. त्यांचा उल्लेख पुष्कळ वेळा येतो. त्यांच्या आईला म्हणजे पार्वतीबाई गोखले यांना लिहिलेली पत्रे पुस्तकात आहेत.

XXXXX

पत्र ९० पान १११

नवीन
क्रमांक
१३७ (टिपण :– ८९ पत्राची तारीख २९.८.१९०८ असून तिथी भाद्रपद शु. ३ आहे. ९० या प्रस्तुत पत्राची तारीख २६.९.१९०८ म्हणजे २७ दिवसांनंतरची आहे त्यावरून तिथी भाद्रपद व. ३० येते.)

जमखंडी भाद्रपद व. ३०

गुरुबाळप्पा आवटी यांना पत्र २६.९.१९०८

श्रीगुरुसमर्थ

दीर्घ दंडवत व नमस्कार. जमखंडी येथे आनंद आनंद आहे. पाऊस फार लागला आहे. सर्व खुशाल आहेत. एकंदर मंडळींस नेमाबद्दल प्रार्थना फार फार सांगितली आहे. सर्वांस सांगावी. सेट्टपास सांगावे. भक्तिथाट बरा चालला आहे, तो लिहिता पुरवत नाही. असो. समर्थांची गोष्ट वर्णन करता येत नाही.

जमखंडी येथे महाराज राजमान्य राजश्री दादासाहेब आपटे यांचे पत्त्यावर उत्तर लिहावे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे.

–रामभाऊ फडणीस

पत्र ९१ पान ११२

नवीन
क्रमांक
१३८

जमखंडी भाद्रपद व. ३०

कृष्णरावांना पत्र २६.९.१९०८

श्रीगुरुसमर्थ

अनेक आशीर्वाद. जमखंडी येथे आनंदी आनंद आहो. भक्तिथाट लिहिता पुरवत नाही. समर्थकृपेच्या गोष्टीचे काय वर्णन सांगू ? पाऊस फार लागला आहे. सर्व आनंद आनंद आहे. सर्वांस नमन सांगावे. उमदी, निंबरगीकडे पाऊस कसा आहे वगैरे खुलासा व टाकळीबद्दल

सर्व खुलासा सवडीप्रमाणे करालच. तुम्ही नेमनिष्ठेने असावे म्हणून सांगणे आहे. बाकी मजकूर आनंद आनंद आहे. दसऱ्यापर्यंत दादासाहेबांनी (आपटे) ठेवून घेतले आहे. कळावे, हा आशीर्वाद.

–उमदीकर याजकडून

पत्र ९२ **पान ११२**

नवीन क्रमांक १३९ जमखंडी अश्विन शु. २/३

२८.९.१९०८

श्रीगुरुसमर्थ

श्रीमंत तीर्थस्वरूप मातोश्री लक्ष्मीबाई आईसाहेब केळकर वडिलांचे सेवेशी, बालक रामभाऊ याचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. अश्विन शु. २, मुक्काम जमखंडी येथे मी व नागप्पा व समर्थ महाराज वगैरे मंडळी खुशाल आनंदरूप असो. अलीकडे तिकडील खुलासेवार पत्र येऊन समाचार कळला नाही. नारायणराव (गोडबोले) महाराज स्मरणाने लिहिणारे, परंतु व्यवसायात सवड नसेल म्हणून असे झाले असेल, असो. आता सर्वत्र मंडळी, भावे, बापट, देशपांडे वगैरे सर्वत्रांस वडिलांनी नेमाबद्दल व निष्ठेने वागणेबद्दल प्रार्थना फार फार सांगितली आहे. रावजी देशपांडे व मास्तरसाहेब वगैरे सर्वत्रांसही याचप्रमाणे विनंतीचा नमस्कार सांगितला आहे. जमखंडी येथे दहा बारा रोज मुक्काम आहे. महाराज राजमान्य राजश्री धोंडो गोपाळ ऊर्फ दादासाहेब आपटे यांचे घरी आहो. या पत्त्यावर उत्तर यावे. आज पाच, सहा रोज इकडे पाऊस उत्तम झाला. हवा वगैरे सर्व आनंद आनंद आहे. श्रावण एक महिना भक्तिथाटाने वेळ आनंदात गेला. जमखंडी वगैरे गावांतली थोर थोर मंडळी पुष्कळ, बरीच जमली होती. सारांश, घडी एक जाती आनंदाची असा वाक्याधार आहे. श्रीमंत मंडळी त्यायोगे आनंदात वेळ काढतात, म्हणून सर्वांस आनंद आनंद वाटत आहे. असो. बाकी सर्व

Not included

आनंद आनंद आहे. कृपा पूर्ण असो द्यावी ही विज्ञापना. याच पत्री नारायणराव गोडबोले यांस अति नम्रतेचा नमस्कार सदरीवरून श्रुत होईल. आपण...

पत्र २३२ पान २२४

नवीन क्रमांक १४० (टिपण :- हे पत्र तिथीप्रमाणे इथे आणले. मजकूर जुळतो.)

अश्विन शु. ३

२८.९.१९०८ /

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. अश्विन शु. ३, शनिवारपावेतो सर्व आनंद आहे. काल नाटीकरसमागमे हकीकतीचे पत्र लिहिले आहे. त्याप्रमाणे उत्तर लवकर आनंदाचे खुलासेवार लिहावे... मीही दसरा करून अगर तिकडून लिहून येईल त्याप्रमाणे करीत आहे. सर्वांस नमन दंडवत विज्ञापना फार फार सांगावी व त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. कळावे, हा आशीर्वाद. दादा का आला नाही तेही लौकर लिहावे. कळवावे. तोड करून घेतली असेल असे वाटते. लिहावे.

पत्र ९३ पान ११३

नवीन क्रमांक १४१ जमखंडी अश्विन शु. ४

२९.९.१९०८

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. तुमचे पत्र व तसबीर मुद्दाम गडी घेऊन आला ते पाहून आनंद आनंद झाला. (पुस्तकातील १८८ पत्रात एका

तसबिरीबद्दल लिहिले होते तीच ही आहे का ?) गड्यास वाटेसाठी पोटास देऊन निरोप दिला. मलम सांगितलेले मनुष्यास कमी आहे काय, ते दराप्पा यास विचारून, मुद्दाम पाहून हकीकतीचे उत्तर पाठवावे. घरचे अकाचे (अक्कांचे ?) सुरू करवावे (औषध ?) गंगाबाई डॉक्टरसाहेब आई येऊन पोचलेचे कळवावे. त्यांस, तुम्हांस, दराप्पास, महानिंगप्पा महाराजांस, दानप्पा कवी यांस मुद्दाम नेमाबद्दल वडिलांनी प्रार्थना फार फार सांगितली आहे ती श्रुत करावी. उत्तर लिहावे. तसदीबद्दल माफी असावी. पाऊस वगैरे आनंद आनंद आहे. भक्तिथाट लिहिता येत नाही. समर्थ...

	पत्र ९४	**पान ११४**
नवीन	जमखंडी	अश्विन शु. ७
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	३.१०.१९०८
१४२		

श्रीगुरुसमर्थ

अनेक आशीर्वाद. दोन्ही पत्रे पावली. आनंद आनंद झाला. गुरुवार १३/१४ स तेरदाळ मोनाप्पा ठरवून गेला तेथे जाणार. धारवाडचे पत्र आले. बोलावणेस येणार. त्यांस आता नको असे उत्तर लिहिले आहे. बाकी पाऊस, धारण वगैरे सर्व आनंद आनंद झाला आहे. सर्व प्रकारे इकडे आनंद आनंद आहे. दादा जर खटपट करीत आहे, तर तुम्ही सहन करावे. लाभच आहे असे कळवावे. आनंदाने असावे असे लिहावे. कळावे, हा आशीर्वाद.

	पत्र ९५	**पान ११४**
नवीन	जमखंडी	अश्विन शु. ७
क्रमांक	भीमरावांना पत्र	३.१०.१९०८
१४३		

श्रीगुरुसमर्थ

अनेक आशीर्वाद उपरि. इकडील मजकूर सर्व आनंद आनंद आहे. पाऊसपाणी, धारण वगैरे सर्व प्रकारे आनंद आनंद आहे. मास्तरसाहेबांस व वडिलांस अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. भक्तिथाट लिहिता पुरवत नाही. समर्थ कृपेची गोष्ट अशी आहे. तुम्ही कामाची काळजी करू नये. दादाचे मनास येईल तसे सहनशील अंतःकरणापासून होऊन आनंद मानावा म्हणजे आनंदच होईल हे पक्के समजून बिनकाळजीने असावे. अज्ञानपण असेल त्याबाबत गैरसमजूत समजू नये, असा सहनशीलपणा असावा हे सांगणे आहे. कळावे, हा आशीर्वाद (दादा अज्ञानाने चुका करत आहे, मुद्दाम करत नाही, तरी गैरसमजूत करून घेऊ नये असा भावार्थ असावा का ?)

	पत्र ९६	**पान ११५**
नवीन	जमखंडी	अश्विन शु. ११
क्रमांक		६.१०.१९०८
१४४		

श्रीसद्गुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न कृपासागर राजमान्य राजश्री रामरावजी दादासाहेब होर्तीकर स्वामीजींचे चरणारविंदसेवेसी, आज्ञांकित नागप्पा निंबरगी याचा कृतानेक दीर्घ दंडवत, अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. अश्विन शु. ११ पावेतो जमखंडी येथे आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र पावले. विस्तारपूर्वक मजकूर समजून अति आनंद आनंद झाला. कूटस्थातील भावाप्रमाणे हकीकत समजून अतिशय प्रेमाने उद्युक्तता होऊन मजकडून उत्तर लिहवले आहे. ते ज्याचे कृपेने आनंदयुक्त आहे तोच सर्व प्रकारे आनंद आनंद देत आहे. कोणतेही प्रकारे रक्षण करणारा तोच आहे. तोच सर्वांपरी रक्षीत आहे म्हणून कोणतेही प्रकारे आनंदास व्यथा न आणता, होईल तितके ज्या वेळी फावेल त्या वेळी स्मरण

करीत जावे, जाता-येता, खाता-पिता, बसता-लिहिता, दृष्टी, नाम आठवणीतच आणून उद्योग करीत जावे, म्हणजे बस आहे. त्या विषयी कोणतीही कल्पना आणू नये. निरंतर आठवण असली म्हणजे झाले. आठव तो परब्रह्म नाठव तो भवभ्रम हे वाक्य जाणतच आहां. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. पाऊस, धारण, हवा वगैरे सर्व आनंद आहे. तुम्हांकडे आनंद असल्याचे उत्तर कळविणेबद्दल वडिलांनी प्रार्थना सांगून अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे. कोणतेही प्रकारे काळजी करू नये म्हणून फार फार सांगितले आहे. हिप्परगीचे तुमचे पाहुण्यांना नेमाने असणेबद्दल महाराजांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे, ती त्यांना वरचेवर पत्राने कळवीत जावी. कळवलेचे उत्तरही लिहावे. कळावे, बहुत काय लिहिणे ? कृपा-लोभ पूर्ण असावा ही विज्ञापना.

–आपला सेवक, नागप्पा

उत्तर लिहिणेचा पत्ता– वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री शिवराम भटजी यांस पोचले म्हणजे आम्हांस पोचत आहे.

पत्र ९७ पान ११६

नवीन
क्रमांक
१४५ (टिपण :- पत्र ९४ ची तिथी अश्विन शु. ७ व तारीख ३.१०.१९०८ आहे. प्रस्तुत पत्राची तिथी अश्विन व. ७ आहे म्हणून तारीख १५ दिवसांनंतरची म्हणजे अंदाजे १८.१०.१९०८ येते.)

तेरदाळ — अश्विन व. ७
कृष्णरावांना पत्र — १८.१०.१९०८

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. तेरदाळ मुक्कामी आठ रोज आहोत. सर्व आनंद आनंद आहे. पीकपाणी, धारण, हवा सर्व आनंद आहे. भक्तीचा थाट विस्तार लिहिता येत नाही असा चालला

आहे. श्रीसमर्थांचे गोष्टी काय वर्णन करता येत आहे ? असो. ज्याचे त्याने करून घेत आहेत. तुमचे पत्र मोनापाचे नावाने लिहिलेले पोचले. मजकूर पाहून वडिलांना आनंद झाला. आता उद्या शनिवारी होसुराहून, नंतर नावलगीवरून १२/१३ ला शिवरामपंत निंबरगी यांचे घरी प्रतिपदेपर्यंत आहोत. नंतर रडरटी व अथणीवरून तिकडे निघण्याचा बेत आहे. बाकी मजकूर परवा लिहिलाच आहे. त्याप्रमाणे आनंदाचे खुलासेवार उत्तर सवडीप्रमाणे लिहीतच आहां. कळावे, लोभ करावा ही विज्ञापना.

–नंदेप्पा न्यामगौड.

	पत्र १८	**पान ११७**
नवीन	उमदी	पौष शु. १
क्रमांक		२४.१२.१९०८, गुरुवार
१४६		

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री तुकाराम साधू महाराज, मुक्काम विजापूर, स्वामींचे सेवेशी, पोष्य भीमा उमदीकर याचा अनंत दीर्घ दंडवत, विनंती विज्ञापना. तागायत मिती पौष. शु. १, रोज गुरुवारपावेतो श्रीसमर्थसद्गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. इकडून मृदंग पाठविला आहे, तर डावे बाजूचे काढून नीट दुरुस्त करणेचे आहे. तर नीट करवून जी किंमत पडेल ती लिहून कळवावी, म्हणजे किंमत पाठवीत आहे. सारांश तीनही मृदंग चांगले आवाजाचे झाले पाहिजेत अशी नजर ठेवावी. बाकी मजकूर– तीर्थरूप अप्पा गावीच आहेत. सुज्ञांप्रत विशेष काय लिहिणे ? कृपा–लोभ असू द्यावा ही विज्ञापना.

15.7.21

पत्र २४० **पान २३४**

नवीन
क्रमांक
१४७ (टिपण :- तिथीप्रमाणे पत्र इथे आणले. नंतर हिशोब करून तारीख काढली.)

इंचगेरी फाल्गुन शु. १
भीमरावांना पत्र २४.२.१९०९

श्रीसद्‌गुरू प्रसन्न

कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती विज्ञापना. फाल्गुन शु. १ पर्यंत समर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. आपलेकडून पत्र आलेले पोचले. वरचेवर खुलासेवार पत्र पाठवीत जावे. तिकडे हवा वगैरे कशी आहे कळवीत जावे. इकडे हवा वगैरे बरी आहे. तीर्थस्वरूप कृष्णाजीपंत अण्णांकडे, डफळापुराकडील व जतेकडील हवाबदल वगैरे हकीकत कळविणेकरिता, पत्र घातले आहे. वडील अप्पा येथेच आहेत. जतेकडील वर्तमान वगैरे खुलासेवार आपले पत्रात लिहीत जावे. कळावे, ही विज्ञापना. तीर्थस्वरूप नानासाहेब अप्पांस माझा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार प्रविष्ट व्हावा, ही विज्ञापना.

–अंबाजी इंचगेरी याजकडून

पत्र १०० **पान ११८**

नवीन विजापूर फाल्गुन शु. १०
क्रमांक कृष्णरावांना पत्र १.३.१९०९, सोमवार
१४८

श्रीगुरुसमर्थ

अनेक आशीर्वाद उपरि. उद्या मंगळवारी इंचगेरीस जात आहोत. पूर्णिमेस नरहरपंत वकील वगैरे सुट्टीत पाच रोज येणार आहेत. तूर्त सोलापूरकडे जाणे रहित केले. पुढे उत्सव[1] झाल्यावर पाहू असे त्यांस

सांगून पाठविले. बाकी सर्व आनंद आनंद आहे. याप्रमाणे उमदीस व निवरगीस भीमास कळवावे. पत्र लिहावे व जमखंडीसही कळवावे हा आशीर्वाद.

नोंद :-

१. चैत्र शु. ३ ची साधुबुवांची पुण्यतिथी किंवा चैत्र शु. १३ ची निंबरगी महाराजांची पुण्यतिथी.

XXXXX

पत्र १०१ पान ११८

नवीन
क्रमांक
१४९ (टिपण :- या पत्रातील तळटीप बरोबर नाही. शेवटच्या ओळीत उमदीचे असे आहे. ते उमदीस असे पाहिजे. साधुबुवांची पुण्यतिथी महाराज उमदीस नसले तरी उमदीसच होई. साधुबुवांचे साहचर्य सोनगी-चिमड गावांशी आहे. ते १२ वर्षे उमदीस असूनही त्यांचा उल्लेख उमदीचे साधुमहाराज असा होत नाही. उमदीचे साधू म्हणजे निःसंशय भाऊसाहेब महाराज. उमदीस उत्सव करून महाराज नंतर इंचगेरीस जाणार होते. असो. शेवटच्या ओळीतील चे हा हस्तदोष आहे. तिथे स करून तळटीप काढली आहे.)

विजापूर फाल्गुन शु. १३, शके १८३०
४.३.१९०९, गुरुवार

श्री

कृपासागर राजमान्य राजश्री चिंतोपंत अण्णा व नंदेप्पा न्यामगौड स्वामींचे चरणारविंदसेवेशी, सेवक आज्ञांकित रामचंद्र ऊर्फ रामभाऊ फडणीस तिकोटेकर, मुक्काम विजापूर याचा कृतानेक अनंत शिरसाष्टांग अति नम्रतेचा नमस्कार. श्रीसमर्थसद्‌गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुम्हांकडे २-३ कार्डे लिहून हकीकत कळवलीच आहे. इकडील सर्व

वर्तमान आनंद आनंद आहे. पौर्णिमेस इंचगेरीस जात आहो, कारण रावसाहेब नरहरपंत वकील वगैरे पाच दिवस सुट्टी असल्याने इंचगेरीस येत आहेत. करिता सोलापुरास जाणे रहित केले. चैत्र शु. ३ उमदीस साधुमहाराजांचा उत्सव करून शु. ९ स इंचगेरीस येणार, याप्रमाणे खुलासा कळविला. एकंदर मंडळींस, निंबरगी मंडळी, आपटे, वीरभद्रप्पा, मेलगिरिअप्पा, मलकप्पा, शिवप्पा वगैरेंस नेमाबद्दल अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार फार फार सांगितला आहे, तो श्रुत व्हावा. नावलगी, चिमड मंडळींची गाठ पडेल तेव्हा नमस्कार श्रुत करीतच आहां. याबद्दल रिणको नाम आहांच आहां. लिहिणे नकोच आहे. भक्तीचे ठिकाणी उत्सुकता व्हावी अशा शर्तीकडे लक्ष असल्याने रिणको नाव लिहिले गेले. असो. चिंतोपंत दादासाहेब यांच्या आई उमाबाईसाहेबांनाही नमस्कार. जिऊबाई पटवर्धन येथे आहेत. सर्व आनंद आनंद आहे. आता तिकोटेकर गणपतराव पवार नामे मुलगा इंचगेरीस सप्ताहास आला होता, त्या वेळी तुम्ही पाहिलाच आहे. तो सहज आठ रोज महाराजांबरोबर येथेच आहे. त्याने येथे आलेवर आपल्या बुद्धीने काव्य, ओव्या रचून एक बुक[1] केले आहे. समर्थकृपेने ज्याची त्याची बुद्धी काम करीत असते. ते लिहिता येत नाही. असो. कळावे, कृपा-लोभ निरंतर असू द्यावा, ही विज्ञापना.

आपला सेवक रामभाऊ तिकोटे याजकडून ताजा कलम- नंदेप्पा येथे आले आहेत. सर्व आनंदाचा खुलासा सांगितला त्यावरून आनंद झाला. श्रीमंत रावसाहेब दादा आपटे व भाऊराया, एकंदरांस वडिलांनी प्रार्थना करून नमस्कार सांगितला आहे. पाठवलेले बुक त्याचे बुद्धीने स्वतः केले आहे या विषयी दुसऱ्या कोणीही काहीएक सांगितले नाही, म्हणून आश्चर्य वाटून तुम्हांकडे पाहण्यास पाठवले आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. कळावे, लोभ असावा ही विनंती.

नोंद :-

१. हे बुक म्हणजे नित्यनेमावलीतील पंचसमासी आहे. ती १९११ च्या पहिल्या

आवृत्तीपासून आजतागायत नित्यनेमावलीच्या प्रत्येक आवृत्तीत आहे. प्रत्येक आवृत्तीच्या वेळी काही काढ-घाल झाली आहे, पण मुख्य साचा तोच आहे. १९७६ सालच्या आवृत्तीत मात्र तिची बरीच मोडतोड केली गेली आहे.

xxxxx

पत्र १९२ पान १९२

नवीन
क्रमांक

१५० (टिपण :- ९८ क्रमांकाच्या पत्रात (२४.१२.१९०८) मृदंग पाठवण्यास सांगितले होते. प्रस्तुत पत्रात मृदंग ३-४ महिने आला नाही असे आहे. म्हणजे २४.१२.१९०८ नंतर ३-४ महिने झाले. प्रस्तुत पत्रात निंबरगी महाराजांचा पुण्यतिथी सप्ताह चालू असल्याचे आहे म्हणजे चैत्र शु. ९ ते १३ ही तिथी येते. दोन्ही गोष्टींचा मजकूर जमतो, म्हणून हिशोब करून तारीख व तिथी ठरवून पत्र इथे आणले.)

इंचगेरी चैत्र शु. ११/१२
२.४.१९०९

श्रीगुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री तुकाराम महाराज व रामराव वगैरे मंडळी, संतसभेकडील असतील त्या सर्वांस, स्वामी गोसावीजींचे चरणारविंदसेवेशी, सेवक अंबुरायाचा त्रिकाळी स्मरणाप्रमाणे अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार व दंडवत. विनंती. इंचगेरी येथे समर्थांचा सप्ताह[1] सुरू आहे. जमखंडी वगैरे मंडळी सुरवातीपासून आली आहेत. सर्व आनंदात वेळ जात आहे. सुज्ञच आहांत. लिहावे, कळवावे असे तुम्हां सभेस नकोच आहे. उमदीकर यांचे आज्ञेवरून लिहीत आहे. माझ्या मतीचे नव्हे हे समजून मान्य करून उत्तर कळविले नाही असे होऊ नये. मनात याद खरोखर असावी, विस्मरण पडू नये म्हणजे भक्तिमार्गास उत्तेजन येत आहे. असो. आता सभामंटपाची जी तयारी

अनुकूल असेल ती सर्व जरूर जरूर घेऊन येऊन तयारी करून दाखवावी. जे कमी असेल ते सर्व इकडून पुरवण्यास जमखंडीकर तयार आहेत. करिता जरूर जरूर येऊन बेतपात सर्व समजून सांगून जावे. जी तयारी लाकडे वगैरे घरी करून ठेवले असेल ते जरूर घेऊन यावे. जरी आणण्यास भाडे पडले तरी ते आम्ही देतो. आल्याबरोबर देतो. जी तयारी तुमचे हातून होईल ती आणून दाखवून जावे, म्हणून जरूर पत्र लिहिले आहे. तुकाराम याने जरूर यावे म्हणजे सर्व कळेल. मृदंगासाठी उमदीकर याने खुद्द आपले पदरचे १५ रु. तीन-चार महिने झाले दिले आहेत, तरी भजनास अनुकूल नाही. असो. उपाय नाही. आतातरी तयार असल्यास घेऊन यावे, अगर तुमचा तरी घेऊन यावे. काय करावे ? तुकारामांचा अभंग आहे[२]- 'सांगसांगुनी धमल्लो । पाठी जेगाचे ल्लागल्लो । जेग ऐकीनासे जाले...' अशा वाक्याप्रमाणे करू नये. स्मरणपूर्वक याद राखून वागावे. यावाचून दुसरे कर्तव्य कोणते आहे बरे, तुकाराम महाराज ? कळावे, लोभ करावा ही विनंती. तात्यासाहेब दत्तोपंत यांस प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. वचनाप्रमाणे एक जिन्नस येऊन पोचला, दुसरा जिन्नस मिळाला नसेल अगर अनुकूल नसेल अगर स्मरणात विस्मृती पडली असेल. असो. कैसेतरी चालत आहे. कळावे. एकंदर मंडळींस, नामदेव व विठोबा, सभामंडळी, गोडबोले व त्यांचे धनी यांस अति नमन, नेमाबद्दल प्रार्थना फार फार सांगितली आहे असे कळवावे. विसरू नये. अगत्य कळवावे बरे. घरी मंडळींसही सांगावे ही विनंती. भवानसिंग, दुसरे भवानराव यांस वगैरेंसही श्रुत करावे ही विनंती. बाबाचार्य[३] असतील तर त्यांस सांगावे.

नोंदी :-

१. ही निंबरगी महाराजांची पुण्यतिथी आहे.

२. सांगसांगून दमलो । पाठीं जगाचे लागलो । जग ऐकेनासें झालें ।... (या अभंगाचा संदर्भ मिळाला नाही.)

३. बाबाचार्य काव्य.

xxxxx

नवीन क्रमांक १५१

(टिपण :- या पत्राखाली पुस्तकात दिलेली तळटीप बरोबर नाही. बयाबाई सोहनी या नामधारक होत्या. २३.३.१९०७ रोजी राहत्या घरी त्यांनी नाम घेतले. १९०७ च्या यादीत[१] त्यांचे नाव आहे. महाराज त्यांच्या घरी उतरत. नामधारकांखेरीज ते कुठेही उतरत नसत हा अप्रत्यक्ष पुरावा आहेच. ही तळटीप काढली आहे.)

सोलापूर चैत्र व. ७
१२.४.१९०९ सोमवार

श्री

कृपासागर राजमान्य राजश्री वीरभद्रप्पाअण्णा व मेलगिरिअप्पा नासी, मुक्काम जमखंडी, स्वामी गोसावी यांसी अखंडित लक्ष्मीअलंकृत आज्ञांकित सेवक नंदेप्पा न्यामगौड मुक्काम सोलापूर, याचा कृतानेक दीर्घ दंडवत. अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती विज्ञापना. चैत्र व. ७ रोज सोमवारपावेतो श्रीसमर्थसद्गुरुकृपेने आनंदात असो. विशेष. आजच सोलापूर येथे मी व सद्गुरू महाराज उमदीकर, नारायणराव व रामभाऊ फडणीस याप्रमाणे येथे आलो आहो. इकडील सर्व वर्तमान आनंद आनंद आहे. तुम्हांकडील सर्व खुलासेवार कळविण्याविषयी व एकंदर मंडळींस म्हणजे आपटे दादासाहेब वगैरे, व गिरमल्लप्पा[२], शिवप्पा, मास्तर व निंबरगी मंडळी एकंदरांस नेमाने असण्याबद्दल वडिलांनी अति नम्रतेची प्रार्थना फार फार सांगितली आहे ती श्रुत करावी. तुमचे खासगत मजकुराबद्दल खुलासा लिहावा. सोलापूर येथे फौजदार चावडीनजीक बयाबाई सोहनी यांचे घरी दत्तात्रय रामचंद्र फडके यांचे नावाने लिहिले असता आम्हांस पोचत आहे. महाराज शिवरामभटजी व तिपण्णा वगैरेंस अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत व्हावा. कळावे. कृपा-लोभ करावा ही विनंती.

नोंदी :–

१. सोनेरी पाने, पृ. १८४. या याद्या श्री. बाबासाहेब संगोराम यांच्या संग्रहातून घेतल्या आहेत.

२. हे महाराजांचे एकनिष्ठ भक्त. इंचगेरी येथील निंबरगी महाराजांचे देऊळ, महाराजांचे देऊळ व त्यांना जोडणारा सभामंटप या सर्वांचा खर्च त्यांनी केला आहे. एकदा व्यापारात खोट येऊनही ते मागे सरले नाहीत. यांचा जमखंडीस कापसाचा व्यापार होता.

xxxxx

	पत्र १०३	**पान १२०**
नवीन	सोलापूर	वैशाख शु. १
क्रमांक	सुबराय भीमण्णा	२१.४.१९०९, बुधवार
१५२	निंबरगी यांना पत्र	

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. विज्ञापना. वैशाख शु. १ रोज बुधवारपावेतो श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने सोलापूर मुक्कामी आनंदात असो. विज्ञापना. तुमची वाट आजवर पाहिली, परंतु सवड झाली नसेल म्हणून आला नाही. सोलापूर येथे फौजदार चावडीनजीक बयाबाई सोहनी यांचे वाड्यात दत्तो रामचंद्र फडके यांचे नावाने ३० तीस रुपये चांगले वाजवून मनीऑर्डर करून जरूर जरूर पाठवावे. काही सामान खरेदी घेतले आहे, करिता पाहिजे आहे. बाकी मजकूर सर्व आनंदानंद आहे. पौर्णिमेस इंचगेरीस येणार आहो. कळावे. महाराज नागप्पा महाराज यांस अति नम्रतेचा दीर्घ दंडवत नमस्कार आहे. वडिलांस लिहिलेप्रमाणे लवकर मनीऑर्डर करून पाठवावे. वडिलांनी वडील मंडळींस अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. दत्तोपंत व विष्णुपंत (फडके बंधू) वगैरेंनी आपलेस नमस्कार सांगितला आहे. कळावे.

–नंदेप्पा मल्लप्पा न्यामगौड

	पत्र १०४	पान १२१
नवीन	सोलापूर	वैशाख शु. ६
क्रमांक	करबसप्पा आवटी	२६.४.१९०९
१५३	यांना पत्र	

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. वैशाख शु. ६, सोलापूर मुक्कामी आनंदरूप असो. इकडील वर्तमान सर्व आनंद आनंद आहे. तुम्हांकडे पत्र लिहिणेस अण्णासाहेब (कृष्णराव) यांस लिहिले होते. त्यांनी लिहून कळविले असेल. एकंदर मंडळींस नेमाबद्दल वडिलांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. पूर्णिमास आम्ही इंचगेरीस येत आहो. सवड असल्यास संगप्पा (आवटी, चडचण) व तुम्ही यावे. येताना निंबरगीवरून सर्व हकीकत समजून यावे. कळावे, ही विनंती.

–नंदेप्पा जमखंडी याजकडून

	पत्र १०५	पान १२२
नवीन	चडचण	ज्येष्ठ शु. १५
क्रमांक		३.६.१९०९ गुरुवार
१५४		

श्रीगुरुसमर्थ

श्रीसद्‌गुरुमहाराज सकलगुणसंपन्न कृपासागर सभामान्य राजमान्य राजश्री नागप्पा महाराज मुक्काम श्रीक्षेत्र (निंबरगी) सध्या वास्तव्य श्रीक्षेत्र इंचगेरी, स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञाधारक दास, बालक बसू कोळगिरी याचा चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. श्रीसद्‌गुरुकृपेने व आपले चरणकृपेने चडचण मुक्कामी आनंदरूप असो. विशेष.

भीमरावही येत आहे. खुशाल आहे. कळावे. कृपा-लोभ पूर्ण

असो द्यावा. सुज्ञाप्रति विशेष लिहिण्याची शक्ती नाही.अभिज्ञच आहां, ही विज्ञापना.

आपला बालक

ज्येष्ठ शु. १५ गुरुवार

वडील तीर्थस्वरूप आजीबाईसाहेब सिद्दव्वा आईसही (नागप्पांची आई) माझा नमस्कार व वडिलांनीही नमस्कार सांगितला आहे. कळावे.

पूर्णिमेस यावे तरी मंडळींनी ठेवून घेतले. त्यातून भरलेला ओढा व पाऊस यामुळे राहणे प्राप्त झाले. सर्व आनंद आनंद आहे. शनिवारी उमदीस जाणे होईल. तीर्थस्वरूप कृपासागर राजमान्य देवमान्य महाराज वडील बाबासाहेब (अंबुराव महाराज) यांस वडिलांनी शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे, तो व पत्र पावल्याचे श्रुत करावे. वडिलांनी तुम्हांसही नमस्कार सांगितला आहे तो श्रुत व्हावा. अण्णप्पा महाराज यांसही याचप्रमाणे आहे. पुजारी वगैरेंस नमस्कार आहे.

पत्र २५१ **पान २४३**

नवीन
क्रमांक
१५५ (टिपण :- हे पत्र व मागचे १०५ पत्र दोन्ही एकच आहेत. दोन्ही पत्रे एकच असल्यामुळे हे पत्र पुन्हा लिहिले नाही.)

पत्र १०६ **पान १२३**

नवीन इंचगेरी ज्येष्ठ व. ५
क्रमांक ८.६.१९०९, मंगळवार
१५६

श्रीगुरुसमर्थ

महाराज सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री करबसप्पा अण्णा आवटी, शेखरप्पा अण्णा भतगुणकी वगैरे सभामंडळींचे चरणसेवेशी,

आज्ञांकित सेवक बसप्पा कल्लप्पा मुधोळ मुक्काम कोळगेरी, हल्ली वस्ती समर्थांबरोबर, याचा शिरसाष्टांग दंडवत नमस्कार. श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने इंचगेरी मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. शनिवारी तुमचे मंडळींचे निरोपाने आनंदात उमदीस पोचलो. वाटेत ओढा वगैरे, चिखल वगैरे नसून परम रमणीय आनंदाने वेळ जात आहे. दोन चार मुक्काम येथे होतील. साहेब मंडळी (कलमडी ?) आनंदाने आज विजापुरास गेली. समर्थकृपेचे गोष्टी पत्री लिहिता पुरवत नाही. असो. ज्याचे ते करून घेत आहेत. सुज्ञच आहांत. अभिज्ञ मंडळींस लिहावे अगर सुचवावे नकोच आहे. कळावे. सावकार सिदप्पा यांस सुचवावे की तुम्ही विचारलेले गोष्टी शास्त्रमर्यादेवरून सहजी वहिवाटीस पडून गेल्या आहेत. प्रवृत्तिमार्गाने कृष्णाबाई, भीमाबाई, गंगाबाई अगर काशीबाई असे नाव पडून जाते. आता निवृत्तिमार्गाने पाहिले असता पुरुष अगर स्त्री दोन्ही नव्हे. मुख्य योगाने अर्धनारीनटेश्वर म्हणला गेला. ही विचाराची अगर तर्काची गोष्ट नव्हे. 'आतर्क्यास (अतर्क्यास) तरकता कोण आहे'[१]. त्या मार्गाने वागले म्हणजे सर्व आपोआप कळो येते, असा मार्ग आहे, असे सहजी गाठ पडेल तेव्हा बोलण्यास हरकत नाही. मुद्दाम जाऊन बोलू नये. तुम्हांस कळण्याकरिता समजावले आहे हो करबसप्पा. वादाचे वगैरे नव्हे. अनन्य भावास समजणेचे, सांगणेचे गोष्टी आहेत. कुतर्क करणाऱ्यास उगीच बोलू नये अशी गोष्ट आहे. असो. आजीबाई व आईबाई, परसप्पाचे घरची मंडळी, काशीबाई, नागव्वा, तुकव्वा वगैरेंस नेमाने असणेबद्दल प्रार्थना फार फार फार सांगितली आहे ती गाठ पडेल तेव्हा कळवावी. तसदीबद्दल माफी होऊन निरंतर आठव असो द्यावा हेच मागणे सर्वांस आहे. कळावे. कृपा-लोभ पूर्ण असो द्यावा ही विनंती. शेट्टेप्पा महाराजांस दंडवत नमस्कार सांगावा.

–आपला सेवक बसू

ज्येष्ठ वद्य ५, मंगळवार, इंचगेरीहून.

पत्र १०७ पान १२४

नवीन क्रमांक १५७ — कोळगेरी — आषाढ शु. ९, २७.६.१९०९, रविवार

श्रीगुरुसमर्थ

चिरंजीव भीमराव बाबा यास आशीर्वाद उपरि. श्रीसद्‌गुरुकृपेने आनंदात कोळगेरी मुक्कामी असो. विशेष. उद्या जतेस जाण्याचा बेत आहे. तुम्हांकडील क्षेम मजकूर खुलासेवार लिहावा. आठ ८ रोज जत मुक्कामी आहो. नंतर तिकोटेकडून इंचगेरीस जाणे होईल. बाकी सर्व आनंद आनंद आहे. वडिलांस (नानासाहेबांस) नमस्कार सांगावा. मास्तर वगैरेंस नमस्कार सांगावा. नेमाने निष्ठेने स्मरणपूर्वक वागत जावे हेच सांगणे आहे. कळावे, हा आशीर्वाद.

पत्र १०८ पान १२४

नवीन क्रमांक १५८ — जत — आषाढ व. ३, ६.७.१९०९, मंगळवार

श्रीगुरुसमर्थ

तीर्थस्वरूप सकलगुणसंपन्न कृपासागर राजमान्य सभामान्य देवमान्य राजश्री नंदेप्पा अण्णा न्यामगौड, जमखंडी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक आज्ञाधारक सेवक बसप्पा कल्लप्पा मुधोळकर, हल्ली वस्ती कोळगेरी, याचा त्रिकाळी नमन व अति नम्रतेचा शिरसाष्टांग दंडवत नमस्कार. आषाढ व. ३, मंगळवार, श्रीसद्‌गुरुकृपेने जत मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. वडील अण्णा (कृष्णराव) यांनी परवा पत्र लिहिले आहेच. आईसाहेब शिवलिंगव्वा अक्का यांनी माझे गळ्यातील रुप्याची रुद्राक्षमाळ पाहून तैशीच एक पाहिजे असे सांगितले. तेव्हा खरे रूद्राक्ष मणी मिळतीलतरी येताना घेऊन आल्यास मग माझेसारखे

रूप्याने करवून देता येईल (चांदीत गाठवून देता येईल). खरे रूद्राक्ष येथे मिळत नसलेने लिहिले आहे. माझे गळ्यातील मणी शोभिवंत रूप्याने जडवलेले असल्याने खऱ्यासारखे दिसतात, परंतु ते खरे नव्हेत म्हणून लिहिले आहे. जर मिळतीलतर, सहजी खटपट न करता मिळालेतर आणावे. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. दोन-चार रोजांत ककमरीहून तिकोटेस जाणे होईल. बाकी तिकडील सर्वत्र मंडळींस त्रिकाळी नेमाबद्दल वडिलांनी प्रार्थना व नमस्कार फार फार सांगितले आहेत ते सवडीप्रमाणे श्रुत करीतच आहां. याबद्दल रिणको नाम आहांच. वडिलांप्रत विशेष लिहिणे शक्य नाही. ही विज्ञापना.

पत्र १०९ पान १२५

नवीन
क्रमांक
१५९ (टिपण :- या पत्रावर मागच्या १०८ पत्राचीच तारीख आहे म्हणून तिथीही तीच येते.)

जत आषाढ व. ३
६.७.१९०९, मंगळवार

श्रीगुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य राजश्री करबसप्पा अण्णा, संगप्पा अण्णा वगैरे, मुक्काम चडचण, स्वामी गोसावी यांसी त्रिकाळी दंडवत शिरसाष्टांग नमस्कार. श्रीसद्गुरुसमर्थकृपेने जत मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र इंचगेरीहून जतेस आले, ते पाहून मजकूर समजून आनंद झाला. आम्ही तिकोटेवरून इंचगेरीस येत आहो. सर्व मजकूर आनंद आनंद आहे. एकंदर मंडळींस नेमाबद्दल प्रार्थना वडिलांनी सांगितली आहे ती श्रुत करावी. तुम्हीही त्या बेताप्रमाणे येतच आहां. सुज्ञांप्रति लिहिणे नको. इकडे पाऊसपाणी वगैरे बरे आहे. वडील आजोबा

शिवनिंगण्णा यांस नमस्कार सांगावा. कळावे, लोभ करावा ही विनंती.

–बसप्पा कोळगेरी याजकडून

पत्र ११० पान १२६

नवीन

क्रमांक

१६० (टिपण :– १०८ पत्राची तारीख ६.७.१९०९ असून तिथी आषाढ व. ३ आहे. प्रस्तुत ११० पत्राची तारीख १४.७.१९०९ आहे. त्यावरून तिथी आषाढ व . ११ येते.)

कनमडी आषाढ व. ११

कृष्णरावांना पत्र १४.७.१९०९

श्रीसद्‌गुरुसमर्थ

अनेक आशीर्वाद उपरि. श्रीसमर्थकृपेने कनमडी मुक्कामी आनंदरूप असो. विज्ञापना. तुम्हांकडील खुलासेवार उत्तर यावे. उमदी शानभोग वगैरेंचे काय झाले ? भीमाकडील घेर्डीप्रमाणे काम झाल्याचे उत्तर आले असेलतर इकडे कळवावे. कात्राळचे काम लवकर होणेबद्दल तगादा करावा. वरचेवर आपले कामाकरिता जाऊन विचारीत जावे. विसरू नये. 'गर्जकू अक्कल नाही[1]' अशी नजर असावी. कळावे, हा औशीर्वाद.

हेच पत्री किंकराची विज्ञापना. आनंद आनंदरूप सद्‌गुरुकृपेने असो.

–बसू कोळगेरी

नोंद :–

१. गरजवंताला अक्कल नसते, ही मराठी म्हण आहे.

xxxxx

पत्र १११ — पान १२६

नवीन क्रमांक १६१

तिकोटे — श्रावण शु. ४

कृष्णरावांना पत्र — २२.७.१९०९, शुक्रवार

श्रीसद्‌गुरुसमर्थ

अनेक आशीर्वाद उपरि. श्रीसद्‌गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. कलमडी–बिजरगीहून काल गुरुवारी तिकोटेस आलो. सर्व आनंद आहे. येथून फार करून सहा–सात रोजांत हट्टीकडे जाणे होईल असे वाटते. पौर्णिमा इथे होईल अगर हट्टीस. याप्रमाणे आनंदात वेळ जात आहे. तुम्हांस कलमडीहून लिहिलेच आहे (पत्र ११०). त्याप्रमाणे घेर्डीचा मजकूर, उमदीकडील खुलासा, तसेच शानभोग व काशीकर यांचा खुलासा लिहावा. आज जमखंडीहून नंदेप्पा आला आहे. सर्व आनंद आहे. कळावे, हा आशीर्वाद.

पत्र ११२ — पान १२७

नवीन क्रमांक १६२

(टिपण :– पत्र १११ चीच तारीख आहे. म्हणून तिथी तीच येते. १११ मधीलच हकीकत आहे. १११ पत्र कृष्णरावांना होते तीच हकीकत आणखी कुणाला तरी कळविली आहे.)

तिकोटे — श्रावण शु. ४

२२.७.१९०९, शुक्रवार

श्रीसमर्थ

कृतानेक शिरसाष्टांग दंडवत नमस्कार. श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने तिकोटे मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. तुम्हांकडे जतेहून पत्र लिहिलेच आहे. आता आम्ही इंचगेरीकडे जाणार आहो. उद्या पौर्णिमा फार करून येथे अगर हट्टीस होईल असे वाटते. बाकी सर्व आनंद आहे.

नवीन
क्रमांक
१६३ (टिपण :- ११० पत्रात कात्राळच्या कामाला तगादा लावावा असे आहे. या पत्रात तेच आहे. या धाग्यावरून पत्र इथे आणले. तारीख हिशोब करून काढली.)

उमदी — अश्विन शु. १
कृष्णरावांना पत्र — २०.९.१९०९

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. अश्विन शु. १ पावेतो श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. तुमचे पत्र भीमरावाबरोबर आले, ते खुलासेवार पत्र व कार्डही पावले. आनंद झाला. इकडील सर्व खुशाल आहे. भीमरावही आज टाकळीहून आला आहे. तुम्ही नेमाने, निष्ठेने व कट्टाने असावे. नेहमी जाता येता नाम व दृष्टी स्मरणपूर्वक असावी बरे. हेच सांगणे फार फार आहे. एकंदर मंडळींसही प्रार्थना श्रुत करावी. कामात इमानीने वागावे म्हणजे बढतीच होत आहे. मी इंचगेरीस दोन रोजांत जाण्याचा बेत आहे. काही विजापूर वगैरे मंडळी आली आहेत, सबब जावे असा बेत आहे. तैसेच मल्लप्पाकडे जात आहे. बांध घातला असे त्याचे म्हणणे आहे. मी नको असे सांगितले असून, असे म्हणत आहे. अण्णप्पास विचारावे. त्यांनी सांगितले की काय ? असो. त्याचा स्वभावच पडला. तक्रारीवाचून वागणूकच नाही. असो. नोव्हेंबर महिन्यात भीमा येईल तेव्हा नंबर, गाव, चांगला दाखला आमचे वहिवाटीप्रमाणे, दरसाल देत आलेप्रमाणे आमचे हिश्शाचा दाखला चांगला लिहून घ्यावा. भीमासही समक्ष सांगितले आहे बरे. अंतःकरणापासून एकमेकाने विषयाकडे लक्ष न देता, ज्ञानाने (शहाणपणाने) वागावे. पैशाचे ऋण, उसने बरेच आहे. साळी, मटकी म्हशीचा कडबा वगैरे घेतला आहे त्याचा बराच खर्च झाला आहे. असो. कसे झालेतरी सर्व प्रपंच आटोपून घेतला आहे, हाच आनंद मानतो. तुम्हीही याचप्रमाणे अंतःकरणात आनंद

मानीत जावे हेच सांगणे फार फार आहे. अंकलगीस लागण करावी. नजर असावी. हंगरगाची लागण व चौथाई हेही लिहावे. अरळीचे ऋण दिले किंवा नाही, तेही लिहावे. माड्याळ कुळाकडून वसूल घेऊन बाकी जे असेल ते द्यावे. कात्राळचा अद्याप निकाल करून घेतला नाही. असो. पाठी लागावे अगर अण्णप्पाकडून, बोरगीकरांकडूनतरी खटपट करवावी. मीही नोव्हेंबरात येणे होईल तर येईन. असो. आनंदाने एकमेकांस सांगून अंतःकरणाने वागावे. कळावे, हा आशीर्वाद. घरी (पत्नीला) नेमाने असणेस सांगत जावे. सारांश, महाराजांची मुले असे नाव राखावे हेच सांगणे आहे. कळावे, इंचगेरीस जरूर पत्र पाठवावे.

पत्र १९५ **पान १९५** 1150 / 16.7.21

नवीन क्रमांक

१६४ (टिपण :– याच्या मागचे पत्र १९३ व प्रस्तुत १९५ पत्र जवळजवळ सारखीच आहेत. दोन्हींची तिथी एकच आहे. मजकुरावरूनही ती एकाच दिवशी लिहिली आहेत असे कळते.)

उमदी अश्विन शु. १

कृष्णरावांना पत्र २०.९.१९०९

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. अश्विन शु. १ पावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुम्हांकडून आज खुलासेवार पत्र व कार्ड पोचले. नेमनिष्ठेने असावे. एकंदर मंडळींस प्रार्थना फार फार आहे ती श्रुत करावी. खरेपणाने वागत जावे. इमानीस यश, कीर्ती आहे. भीमा इंडीस गेला आहे. आज येईल. सर्व आनंद आनंद आहे. मीही दोन चार दिवसांत इंचगेरीस जावे असा बेत आहे. असो. मल्लप्पाने बाकी रुपयांत बांध घातला असे म्हणणे आहे. बांध घालू नये असे मी समक्ष सांगितले असूनही लबाडी केली आहे. काय करावे, असो. अण्णप्पास कळवावे. अंकलगीचे लागण

करावे. नोव्हेंबर मध्ये भीमा येईल तेव्हा आमच्या हिश्शाच्या गावाचा नंबर लिहून दाखला घेणेविषयी समक्ष सांगितले आहे. पुढे दाखला चांगला राहील असा दाखला लिहून घ्यावा. त्याचा आकार चौथाई धरून बाकीचे त्याचे त्यांनीच घेऊ दे, अशी अंतःकरणापासून दया असावी. खर्चाची अडचण उसण (उसनवारी) वगैरे फार आहे. एकमेकांत अंतःकरणाने (मायेने) वागावे हेच सांगणे फार फार आहे. हा आशीर्वाद.

पत्र २१७ पान २१३

नवीन
क्रमांक
१६५ (टिपण :- या पत्रावर पुस्तकात 'महाराजांनी कृष्णरावांना पाठविलेल्या एका पत्राचा शेवटचा भाग आहे' अशी टिपणी आहे. त्याप्रमाणे कृष्णरावांना लिहिलेली पत्रे वारंवार पाहिली. १९३ व १९५ या दोन्ही पत्रांत पैशांची अडचण आहे असे म्हटले आहे. २१७ मध्ये काही पैसे पाठवण्याची सूचना आहे. म्हणून १९५ च्या पाठोपाठ हे पत्र आणले. १९३ नंतरही जाऊ शकते पण मग १९५ मध्ये पुन्हा आलेला पैशांच्या अडचणीचा उल्लेख जमत नाही. दुसरे म्हणजे १९३, १९५ दोन्हीमध्ये अडचण सांगितल्यावर पैसे पाठवण्यास सांगणे बरोबर वाटले. असो. भीमरावांच्या या गावाहून त्या गावाला जाण्याचा मजकूर मात्र नीटसा जमत नाही. पण गावे आसपासची असल्याने त्यांचे जाणे-येणे सारखे चालू असावे. १९५ नंतर काही दिवसांनी २१७ पत्र लिहिले असावे. मध्यंतरी भीमराव आणखी कुठे गेले असावेत. हे पत्र (२१७) आणखी कुठेही बसत नाही. हीच जागा बरोबर दिसते.)

अश्विन शु. १
२०.९.१९०९

तूर्त २५-३० रुपयांची अडचण फार आहे. ते नागप्पाबरोबर पाठवावे. बाकी सर्व आनंद आहे. भीमाचा पगार झाला काय, कधी

येणार, ते कळवावे. कात्राळचे जप्तीचे काय झाले ते सर्व लिहावे. घोडा येईलतर मी येईन. जशी सवड होईल तसे करता येईल. सर्वत्र मंडळींस नेमाबद्दल नमन फार फार आहे. प्रार्थना आहे, ती कळवावी. तुम्हीही स्मरणाने असावे हा आशीर्वाद. अग्नूबरोबर परवा पाठवलेलेच दाल १६ हाती जरूर पाठवावे.

ताजा कलम– निंबोणीपैकी पांढरी गाय चुकार होऊन पंधरा दिवस झाले. कोठे सापडली नाही. जतेकडे कोंडवाडीस येईल तर लक्षात असावे. कळावे. शिंग भोळ आहे (शिंग नाही). उमर ४–५ वर्षांची. पांढरी आहे. हे ध्यानात ठेवून तपास करावा.

पत्र १९६ पान १९६

नवीन
क्रमांक
१६६ (टिपण :– हे पत्र कोणा रुक्मांगद राजे यांना लिहिले आहे. तिथी–तारीख–गाव–सही काहीही नाही. संदर्भ काही लागत नाही. त्यामुळे अमुकच जागा अशी ठरवता आली नाही. १९६ असा त्याचा पूर्वीचा क्रमांक असूनही १९५ नंतर लागलीच घालता आले नाही. मध्ये एक पत्र ठेवावे लागले.)

श्रीसद्‌गुरुसमर्थ

राजाधिराज सद्‌गुरू रुक्मांगद राजे यांचे समर्थचरणी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. दोन–चार पत्रांनी विदित केले व झाले. तेव्हा प्रवृत्तिमार्गाने अगर लौकिकी मार्गाने दीर्घ चालले (विलंब झाला) म्हणजे अंतःकरण विस्मरण करीत आहे. त्याचा तो स्वभावच आहे. असो. एतथ्य विषय (हा विषय) अंतःकरणापासून आला पाहिजे होता परंतु मुंबई व मास्तर व जमखंडी अशी मंडळी जवळ असल्याने सवड झाली नाही. त्या मंडळींचे उपाधीत वेळ घालवावा लागला. त्यायोगे तिकडे

येण्याचे रहित केले. क्षमा असावी. अगर अभिज्ञाने करीतच आहां. त्या विषयी खात्रीच आहे. आप्त आहांत तेव्हा त्या मार्गाने कोणत्याही प्रकारे संशय नाहीच, असे असून विलंब का लागला ? कृष्णास मुद्दाम बोलावणे करून घ्यावे. याप्रमाणे भीमासही सांगितले आहे.

पत्र ११३ पान १२७

नवीन
क्रमांक
१६७ (टिपण :- बराच हिशोब करून तिथी ठरविली.)

अश्विन शु. २
२१.९.१९०९

इंचगेरी मठाच्या जागेचे करारपत्र

श्रीरामसमर्थ

यादी (करारनामा असा अर्थ असावा) सुबराय (सुबराय बिन भीमण्णा म्हणजे भीमण्णांचा मुलगा सुबराय) बिन भीमण्णा निंबरगी व नागप्पा बिन मलकप्पा माशाळ उमदीकर व अंबाजी श्रीनिवास कुलकर्णी जिगजीवणीकर व तुकाराम बिन नरसप्पा सुतार विजापूरकर व नंदेप्पा बिन मल्लप्पा न्यामगौड जमखंडीकर व शंकरप्पा बिळूर ककमरीकर वगैरे सार्वजनिक मंडळी, भक्तीकडे येणारी, यांस- जिवाजी भिमाजी कुलकर्णी इंचगेरी व भिमाजी गोविंद कुलकर्णी उमरजकर, सन १३१९ फसली, तारीख १९ माहे सप्टेंबर सन १९०९ इसवी. भिमाजी गोविंद यांचे खाते असून जिवाजी भिमाजी यांचे वहिवाटीत असलेले, सर्व्हे नंबर १६५, एकर ११०२०, आकार ४ पैकी अगदी खराब खडक बिनआकाराचे रान असलेले, त्या ठिकाणी उत्सव, भजन, पोथी निरंतर भक्ती चालत असल्याने, सर्वजण येत असल्याने, पूर्वपश्चिम लांबी १८० हात, दक्षिणोत्तर रुंदी १२६ हात, यासी चतुःसीमा- पूर्वेस नंबर १६४, दक्षिणेस गिरगावास जाण्याचा सरकारी रस्ता, पश्चिमेस या

नंबरांपैकी दगड घालून खूण केली आहे. उत्तरेस या नंबरांपैकी जमिनीत कुंपण घातले आहे. या चतुःसीमेतील खराब रान वर लिहिलेले रुंदी-लांबी हात या नंबरांपैकी सार्वजनिक उपयोगाकरिता श्रीसमर्थ गुरुलिंगजंगम महाराज सद्‌गुरू यांचे उत्सवाकडे जागा दिली आहे. त्या जागेवर आमचे अगर आमचे इस्टेट वारसदाराचे वारसा अगर हक्क व मानपान कोणतेही प्रकारचे चालणार नाही. सदरहू जागेवर सार्वजनिकांचा हक्क आहे. शिवाय या नंबराचे दक्षिण बाजूकडे सार्वजनिक लोकांनी विहीर खणून बांधून काढलेली वरवंटासहित आहे. या सार्वजनिक बागाइत व फुलझाडांकरिता व लोकोपयोगाकरिता विहिरीवर सार्वजनिकांचा हक्क आहे. त्यावर या नंबराचे खातेदारांचा हक्क नाही. सार्वजनिक कामास पुरून जास्त पाणी झाल्यास खातेदारांनी आपले नंबरात बागाइताकरिता घेणे. इकडे कमी पडण्याचे काम करू नये हे लिहून दिले. यादी, सही, तारीख, सदर दस्तुर बाबाजी रामचंद्र कुलकर्णी मौजे कन्नूर मुक्काम इंचगेरी.

(येथे पोष्टाची एक पैशाची चार तिकिटे लावून त्यावर या सह्या केल्या आहेत.)

जिवाजी भिमाजी कुलकर्णी

भिमाजी गोविंद कुलकर्णी, उमरज, मुक्काम इंचगेरी, दस्तुर खुद्द.

साक्ष

१) नारायण रघुनाथ देवस्थळे दस्तुर खुद्द 1

१) सिदलिंगया बिन चनबसया मठ 2

१) बापू मलपा गोगार दस्तुर खुद्द 3

१) विष्णु रामचंद्र फडके दस्तुर खुद्द मुक्काम सोलापूर 4

१) नारायण गणेश दामले दस्तुर खुद्द मुक्काम सोलापूर रत्नागिरीकर 5

१) धोडप्पणा गुरुनिंगप्पा भामसवी दस्तुर खुद्द 6

१) हणमंत गोविंद कुलकर्णी दक्षिण उमरज मुक्काम इंचगेरी दस्तुर खुद्द 7

पावतीचे एक आण्याचे तिकिट लावून सह्या केल्या आहेत. तारीख...
जिवाजी भिमाजी कुलकर्णी इंचगेरीकर
भिमाजी गोविंद कुलकर्णी मुक्काम इंचगेरी दस्तुर खुद्द

पत्र ११४ पान १३०

नवीन
क्रमांक

१६८ (टिपण :– हिशोबाप्रमाणे ही तिथी निज कार्तिक शु. ११ असावी. त्यावर्षी अधिक कार्तिक महिना धरला म्हणजे पुढील हिशोब जमतात.)

जत (निज) कार्तिक शु. ११
करबसप्पा आवटी यांना पत्र ३०.११.१९०९

श्रीगुरुसमर्थ

अति नम्रतापूर्वक नम्रतेचा दीर्घ दंडवत. विनंती विशेष. इकडील सर्व खुशाल आहेत. तीर्थरूप अप्पा हे तेरदाळहून जमखंडीस येऊन तेथून तिकोटेवरून इंचगेरीस जाणेचा बेत असल्याचे लिहून आले आहे. तुम्हांस पत्र लिहिणेस आज्ञा झालेवरून हे पत्र लिहिले आहे. वरकड मजकूर सर्व आनंद आहे. नंदेप्पणणा वगैरे मंडळी सर्व खुशाल आहेत. कळावे, लोभ करावा ही विनंती.

–उमदीकर कृष्णाजी देशपांडे

पत्र ११५ पान १३०

नवीन
क्रमांक

१६९ (टिपण :– कार्तिक व. ४ ही पत्रावर छापलेली तारीख निज कार्तिकातील आहे. अधिक कार्तिक होऊन गेला आहे.)

चिमड	(निज) कार्तिक व. ४
कृष्णरावांना पत्र	१२.१२.१९०९, बुधवार

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत शिरसाष्टांग नमस्कार. कार्तिक व. ४, बुधवार, चिमड मुक्कामी श्रीसमर्थकृपेकरून आनंदरूप असो. विशेष. चिमडहून जमखंडीस ११/१२ तिथीच्या संधीस (सुमारास) जाणे होईल. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. याप्रमाणे उमदीस कळवावे. भीमराव अण्णास मुद्दाम् पत्र लिहून कळवावे की मुत्या कयकाडी (कैकाडी) गावात असेलतर उमरजी भीमरावाकडून सांगवून सप्ताहास (मार्गशीर्ष) येणे अशी तजवीज करावी. नागप्पा उमदी (माशाळ) यास कळवावे म्हणजे मुत्या सप्ताहास येईल असे करवावे. अगर बाबण्णा कुलकर्णी यास मुत्यास आणवून इंचगेरीस पाठवावे म्हणून लिहावे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. अक्का वगैरे मंडळींस वडिलांनी प्रार्थना सांगितली आहे म्हणून कळवावे. चडचणकर बसप्पा व निंबरगी नागप्पा यास आनंद असल्याचे कार्ड लिहून पाठवावे असे सांगितले आहे. कळावे, ही विज्ञापना.

–नंदेप्पा याजकडून

	पत्र ११६	**पान १३१**
नवीन	तिकोटे	मार्गशीर्ष शु. १
क्रमांक	जयवंतप्पा धोत्री	२४.१२.१९०९
१७०	यांना पत्र	

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक साष्टांग दंडवत नमस्कार. मार्गशीर्ष शु. १ पावेतो तिकोटे मुक्कामी समर्थकृपेने आनंद आनंद असो. हटी-सिदापूरहून इंचगेरीस ६/७ (मार्गशीर्ष शु. ६/७ आहे. सप्ताह दोन दिवसांनी सुरू होणार असतो) रोजी इंचगेरीस जात आहो. हालहवाल सर्व आनंद आनंद आहे. नवी झांगटी सोनाराकडून आली असल्यास जरूर इंचगेरीस

पाठवावी. बाकी किंमत आल्यावर देत आहो. जरूर पाठवावी. कळावे.

–नंदेप्पा

पत्र २०३ पान २००

नवीन
क्रमांक

१७१ (टिपण :– मागच्या ११६ पत्रात तिकोट्याहून सिद्दापूरला जाण्याचा जो कार्यक्रम सांगितला आहे, तोच इथे आहे म्हणून पत्र इथे आणले.)

तिकोटे

कृतानेक दंडवत विनंती. तिकोटैं मुक्कामाहून सिदापूरला जाण्याचा बेत आहे. उद्या सोमवारी गाडी घेऊन येणार आहेत. याकरिता बाबाचार्य वैद्य वगैरेंस वडिलांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे. वकील महाराजांना (नरहरराव कलमडी) फार फार प्रार्थना कळवावी. कळावे, लोभ करावा ही विनंती.

–आपला नागप्पा निंबरगी

पत्र २४९ पान २४१

नवीन
क्रमांक

१७२ (टिपण :– पत्रे २४९–२०९–११७ हा क्रम साळी खरेदीच्या विषयाला धरून लावला आहे. २४९ व २०९ यांवर तारीख नाही. विषयाप्रमाणे ही पत्रे क्रमाने घातली आहेत. तिथी जमतात.)

जत पौष शु. १३

श्री

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री महाराज अंबुराव महाराज, मौजे इंचगेरी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक कृष्णाचा दोन्ही कर जोडून

त्रिकाळी अति नम्रतापूर्वक शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. मिती पौष व. १३ पावेतो श्रीसमर्थकृपेने आनंदात असो विज्ञापना. इकडील वर्तमान सर्व खुशाल आहे. तुम्हांकडील एकंदर मंडळींस, घरी मातोश्री जिऊबाई आईस, अण्णप्पा महाराजांस, सर्वत्रांस माझा त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. कळावे. वडील अष्टमी/नवमी (या तिथी वद्य पक्षातील असाव्या) संधीस येणार. त्याबद्दल वडिलांनी सांगितले आहे की आपल्यास घोड्याबद्दल अडचण नसून घोडा रिकामा असल्यास रामप्पाबरोबर पाठवावा. खरोखर सवड असल्यास पाठवावा म्हणजे वर लिहिलेल्या संधीस वडील घेऊन येतील.

साळीबद्दल ५ रु. पाठविले आहेत. बाकी आणताना घेऊन येतील.

मासीम यास कोरबूपणाचे (शेतीसंबंधी काम) कामामुळे सवड झाली नाही म्हणून आला नाही. गिरगावकरास बोलावून सुरू करावे (काहीतरी काम असावे) असे सांगितले आहे. पूर्वी तपशीलवार एक पत्र लिहून ठेवले होते तेही पाठविले आहे. आपले सवडीप्रमाणे अंतःकरणात जसे ठरेल तशी व्यवस्था लवकरच होईल असा बेत ठेवावा म्हणून फार फार प्रार्थना तुम्हांस व अण्णप्पास सांगितली आहे. सुज्ञच आहां. कळावे. सुज्ञांप्रति विशेष काय लिहिणे ? कृपा-लोभ निरंतर असो द्यावा ही विज्ञापना.

	पत्र २०९	**पान २०५**
नवीन क्रमांक १७३	उमदी	पौष व. ७ शुक्रवार

श्रीसद्गुरुसमर्थ

तीर्थस्वरूप सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री अंबुरावजी बाबासाहेब महाराज, मुक्काम इंचगेरी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी शिरसाष्टांग नमस्कार. विनंती,

विज्ञापना. पौष व. ७ शुक्रवारपावेतो आपले चरणकृपेकरून श्रीसद्गुरुसमर्थ यांचे अनुग्रहाने आनंदरूप असो. विशेष. इकडील सर्व मजकूर आनंद आनंद आहे. आपणास पत्र लिहिणेस वडिलांनी सांगितलेवरून लिहिले आहे. कन्नूर भीमण्णाकडून तगादा करून जिन्नस लवकर आणवावे. सर्व झाडांस काटी बंदोबस्त लावावी व चहूभोवती, चहू कोनी डोळ्यांनी पाहून जेथे गुरे-मेंढरे येण्यासारखे आहे तिथे काटी लावावी. दोन्ही दरवाजे दोन्ही बाजूंना घट्ट घट्ट चिखलाने बडवून मग सारवावे म्हणजे कुत्रा वगैरेंचा संपर्क होऊ नये असा बंदोबस्त करावा. लवकरच कुंभी बांधवावी. सुस्त करू नये. हे पत्र पाहिल्याबरोबर कुंभाराकडून पन्हळ २०-२५ करण्यास तगादा वरचेवर लावावा. वतनदारी गोष्ट आहे म्हणून वरचेवर स्मरणपूर्वक करावे. विसरू नये. जोत सोप्यास व स्वैंपाकघरापुढे लवकर करवावे. माती आत घालून भरण्याचे गडी लावून जोते भरून घ्यावे. माती वाटेवर किंवा आमचे योग्य जागेवर खळगा करू नये अशा बेताने खांदवून माती घ्यावी. स्वैंपाकखोल्यांत माती घालून घटणी करवावी (जमीन समतोल करावी) म्हणजे आमचे कार्यास उपयोगी पडेल. सर्दी जाईल. करिता घटणी लवकर करवावी. गडी लावण्यास हयगय करू नये. स्वस्त गडी मिळतो म्हणून ढिलाईवर घालून ऐन प्रसंगात, उत्सवात विघ्न येऊ देऊ नये. त्याकरिता गड्यास दोन आणे करार करून सर्व कलमांचे कार्य लवकर पूर्णिमेचे आत झाले पाहिजे असे वडिलांनी फार फार सांगितले आहे. वरचे कलम चांगले वाचून, दररोज हे पत्र पाहून स्मरणपूर्वक हा कारखाना लवकर करावा. सुस्ती करू नये. विसरू नये. अगत्य अगत्य लवकर करावे. कापणेचे काम तुमचे मर्जीप्रमाणे करावे. कासीमला पाठवले आहे. कळावे. साळीबद्दल १० रुपयांपैकी ५ रुपये देऊन पाठविले आहे. तुमच्याजवळ २ रुपये आहेत असे अप्पा म्हणत होते. असतीलतर ते २ व हे ५ असे ७ रुपये तुमचे खर्चास अडचण असल्यास घ्यावे. बाकी ३ रुपये मुद्दाम साळी आणताना पाठवतो. जर आगाऊ पाहिजे असतीलतर गडी पाठवावा म्हणजे पाठवतो. कळावे, बहुत काय लिहिणे?

कृपा-लोभ करावा ही विज्ञापना.

ताजा कलम- सारा गोळा करण्याचे सुमारास आणखी साळी मिळतील तर १० रुपयांच्या घेऊन ठेवाव्या. हेच पत्री राजमान्य सभामान्य देवमान्य जिवाजीपंत अण्णासाहेब महाराजांस साष्टांग नमस्कार. सदरी वडिलांस लिहिलेप्रमाणे कलमवार व्यवस्था तुम्हीही अगत्य अगत्य मेहनतीने करावी. सर्व झाडे १५ रोजांत आणवावी. शिल्लक राहू नये. स्मरणपूर्वक काळजीने करावे. खांबाची वगैरे झाडे घेऊन तोडवावी. हयगय करू नये. ढिलाईवर पाडू नये. अगत्य अगत्य काळजीने करावे, याबद्दल वडिलांनी फार फार नमस्कार सांगितला आहे. अंतःकरणात स्मरण ठेवून अप्पा येईतोपर्यंत कलमवार व्यवस्था झाली पाहिजे. गडी लावण्यास हयगय करू नये. हे पत्र पाहिल्याबरोबर गडी लावून सर्व कार्य करून घ्यावे म्हणून फार फार प्रार्थना सांगितली आहे. कळावे.

	पत्र ११७	**पान १३१**
नवीन क्रमांक १७४	जत	पौष व. १२ ६.२.१९१०

श्री

सकलगुणसंपन्न रामचंद्र सोनार उमदीकर यांस समक्ष सांगितलेप्रमाणे झांगटी १ व खलबत्ते २ तयार असल्यास नानासाहेब काकांस देऊन रुपये घ्यावे. झाले नसल्यास लवकर पुढील पौर्णिमेसतरी तयार करून घ्यावे. चुकू नये. वरचेवर सांगून घेऊ नये असे मनात स्मरण ठेवावे म्हणून सांगणे आहे. मासीम यास कळवावे की कागरटगीचे उत्तर बाबण्णा कुलकर्णीने जतेस पाठवतो असे सांगितले होते अगर इंचगेरीस पाठवतो असे सांगितले होते, ते का पाठवले नाही अशा विषयी त्यास विचारून ते पत्र मुद्दाम देऊन पाठवण्यास अगत्य अगत्य

सांगावे. झांगटी तयार असल्यास गुरुनिंगप्पाकडून उसने घेऊन द्यावे. आठ रुपये त्यास आगाऊ दिले आहेत. कळावे.

पत्र २०० **पान १९८**

नवीन क्रमांक १७५ (टिपण :- पत्रावर तारीख, तिथी नाही. मागच्या पत्रात (११७) झांगटीबद्दल चौकशी होती. झांगटी आली आहे असे प्रस्तुत पत्रात आहे. म्हणून इथे आणले आहे.)

उमदी/जत

श्रीगुरुसमर्थ

महाराज अंबुराव यांस प्रार्थना. झांगटी थोरली १, व लहान १, एकूण २. टाळ थोरले २ जोड एकूण वजनाची यादी आहे ती पाहून दर १६ शेरांस २९ रुपये प्रमाणे हिशोबाने, १ धडा, १ शेर साडेसात आणे भार दर २९ रुपये दराने आकार ९।॥ ≡ ।, नऊ रुपये सव्वा पंधरा आणे आकार होतो म्हणून गणपतराव दादांनी सांगितले व यादही आहे. समक्ष तोच (रामचंद्र सोनार. यांचा ११६ व ११७ पत्रांत उल्लेख आहे) आला आहे, तरी रुपये द्यावे. त्याची जुनी झांगट आहे ती त्यास परत द्यावी. त्याकरिता आला आहे तर ती असलेली झांगट त्याची त्यास द्यावी. बाकी सर्व आनंद आहे. खोली चांगली समक्ष सांगितलेप्रमाणे बिनचूक चांगली असावी अशी तयार लवकर व्हावी हेच सांगणे आहे. सर्वांस व आपल्यास नेमाबद्दल नमन नमस्कार आहे.

-आपला भाऊ

पत्र ११८ **पान १३२**

नवीन क्रमांक १७६ उमदी माघ शु. १

१०.२.१९१०, गुरुवार

श्रीसद्‌गुरुसमर्थ

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री महाराज अंबुराव मुक्काम इंचगेरी वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणी मस्तक ठेवून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत मिती माघ शु. १ रोज गुरुवारपावेतो श्रीसमर्थसद्‌गुरुकृपेने आनंदरूप असो. विशेष. इकडून रामराव महाराज यांना पाठविले आहे तर घोडा सामानासहित पाठवून द्यावा. साळी खरेदी घेणेचे आहे. ते नऊ शेराप्रमाणे भाव ठरल्याचे समजते. ठीक आहे. साळी निम्मे मास्तरसाहेब व निम्मे आम्ही घेणेचे ठरले आहे. मास्तरसाहेबांचे म्हणणे असे आहे की पाखडून वगैरे झालेतरी नऊ शेराप्रमाणे पडावे. शिवाय मास्तरसाहेबांचे म्हणणे की साळी येथपर्यंत आणून घातल्या असता फार मेहेरबानी होत आहे. तेव्हा सहजी अण्णप्पा महाराज यांची शेताची रास वगैरे झाल्यावर बैल देऊन पाठविल्यास बरे होत आहे. तेव्हा तुमचेकडून जसे लिहून येईल तसे करीत आहो. साळी येथे आल्यावर ४० रुपये गड्याबरोबर पाठवीत आहे. बाकी मजकूर रामराव तोंडजबानी सांगता विदित होईल. कळावे. वडिलांप्रत विशेष काही लिहिणे शक्य नव्हे ही विज्ञापना.

महाराज–स्वामी–देव यांसी वडिलांनी नेमाबद्दल अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो प्रविष्ट करावा. याचप्रमाणे सर्व मंडळींस नेमाबद्दल नमन सांगितले आहे. कळावे. तिन्ही गुरांचे राखणावळीबद्दल एक रुपया देऊन पाठविला आहे. आणखी जे होईल ते पत्र लिहून कळवावे म्हणजे पाठवीत आहे. महाराज ब्रह्मचारीबुवांस, अंबुराव, अण्णप्पा वगैरे मंडळींस मास्तरसाहेबांनी शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे. तो श्रुत व्हावा. कळावे.

पत्र ११९ **पान १३३**

नवीन	जत	माघ शु. १२
क्रमांक	सुबराय व नागप्पा	२१.२.१९१०
१७७	यांना पत्र	

श्री

कृतानेक दीर्घ दंडवत नमस्कार. विज्ञापना. मिती माघ शु. १२ पावेतो श्रीसमर्थकृपेने जत मुक्कामी आनंदरूप असो. विज्ञापना. जतेहून आठ-पंधरा रोजांत इंचगेरीस येणे होईल. नंतर पंढरीस जाण्याचा बेत आहे. तर त्या बेतावर तुम्ही आपले व्यापाराची व्यवस्था करून एक आठ रोज सवड होईल तर यालच. याविषयी लिहिणे, कळविणे नकोच आहे. सुज्ञच आहां. नंदेप्पा वगैरे येतीलच असे आहे. बाकी मजकूर आनंद आहे. जतेकडे तुम्हांकडील खुलासा लिहून येणे जरूर होते. तो सवड फुरसत झाली नसल्याने लिहिला नसेल असे वाटते. नाहीतर तुम्ही लिहून कळवणारच अशा दर्जातील योग्यतेचे आहांत व दूरदृष्टीचे अभिज्ञ आहांत. परंतु हे लिहिण्याचा प्रसंग यावयास नको होता, तरी सुज्ञांस लिहिणे भाग पडले (लिहिण्याची वेळ आली. पत्र का लिहिले नाही हे विचारण्याची वेळ आली.) अण्णा, अक्का व मामा वगैरेंस वडिलांनी दंडवत व नमस्कार सांगितला आहे तो श्रुत व्हावा. कळावे. लोभ करावा ही विज्ञापना.

–रामभाऊ फडणीस याजकडून

पत्र २४५ **पान २३८**

नवीन

क्रमांक

१७८ (टिपण :– लिमये ब्रह्मचारी यांनी लिहिलेल्या या पत्रावर तिथी व वार आहे. चैत्र शु. ९ ते १३ या निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीच्या सप्ताहाचा उल्लेख आहे, तसाच १२० पत्रात आहे. ११८ मध्ये ब्रह्मचारी

बोवास नमस्कार आहे. या सर्वांवरून पत्र इथे आणले. मात्र तिथी माघ व. ४ असेलतर वार सोमवार पाहिजे. मंगळवारच असेलतर तिथी माघ व .५ पाहिजे. हस्तदोषाने अशी चूक होऊ शकते.)

इंचगेरी माघ व. ४

२८.२.१९१०, सोमवार

श्री

कृतानेक अनंत नमस्कार. आपण गेल्यावर पत्र वगैरे आले नाही. इकडे उत्सवास दर पौर्णिमेस काही लोक येतात. त्या संधीस पाच-सात रोज उमदीकर महाराज राहतात. ही गोष्ट विष्णुपंत फडके यांस माहीतच आहे (या उल्लेखावरून हे पत्र सोलापूरला कुणालातरी गेले असावे असे दिसते.) चैत्र शु. ९ ते १३ पर्यंत उत्सव दर साली होत आहे. मी तीन महिने येथेच राहिलो आहे. फार आनंद झाला आहे. एकंदर मंडळींस नेमाबद्दल महाराजांनी प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत व्हावी.

-हरी गोपाळ लिमये, ब्रह्मचारीबोवा

पत्र २५० **पान २४२**

नवीन क्रमांक १७९ (टिपण :- या पत्रात साळी पोचल्याचा उल्लेख आहे म्हणून ते ११८ पत्राच्या पाठोपाठ आले पाहिजे पण ११९ व २४५ या पत्रांच्या तिथी लक्षात घेऊन ती पत्रे २५० च्या आधी घातली आहेत.)

उमदी फाल्गुन शु. १०

१९.३.१९१०, गुरुवार

श्रीसद्‌गुरुसमर्थ

महाराज तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री अंबुराव महाराज मुक्काम इंचगेरी, वडिलांचे सेवेशी, बालक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी

चरणांवर मस्तक ठेवून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत मिती फाल्गुन शु. १० गुरुवारपावेतो श्रीसमर्थसद्‌गुरुकृपेने व आपले आशीर्वादेकरून सुखरूप असो. विशेष. आपलेकडून पत्र आले ते पावले. पाहून फार आनंद झाला. पत्रात लिहिलेप्रमाणे पावणेचार मण साळी पाठविल्या त्या पोचल्या. माप बरोबर भरले. आपण स्वतः मोजलेचे योगाने बरेच माप बरोबर झाले. तीर्थरूप अप्पा शनिवारी येतच आहेत. त्या वेळी रुपये घेऊन येतील. इकडून झांगटी देऊन पाठवली आहे. कळावे. वडिलांप्रत विशेष काही लिहिणे बालकाला शक्य नाही. विज्ञापना.

ताजा कलम- जयवंतप्पा व मल्लप्पा यांनी आपलेस नमस्कार सांगितला आहे. आपण पाठविलेले डहाळे (ओला हरभरा) जयवंतप्पा वगैरे मंडळींनी स्वीकार केले. महाराज अण्णप्पा व जिऊबाई आई यांस माझा नमस्कार सांगावा. महाराज रामभाऊ फडणीस यांनी आपलेस व संतमंडळींस नमस्कार सांगितले आहेत. कळावे.

पत्र २२१ पान २१६

नवीन
क्रमांक
१८० (टिपण :- पत्रावर न तारीख न तिथी. ११९ पत्राप्रमाणेच इथेही सुबरायांस भेटण्यास बोलावले आहे.)

उमदी

सुबरायांना पत्र

श्रीसद्‌गुरुसमर्थ

तुम्हांस प्रार्थना. तुमचे हातून आजोबांची (निंबरगी महाराजांची) सेवा घडली पाहिजे. त्यांनी तुम्हांस आनंदात ठेवले असूनही त्यांना दुसऱ्यांकडून सेवा व उत्सव करून घ्यावा लागत आहे. देऊळ बांधणेही सुरू झाले आहे. हे उपकार काही अंशी मनात आणावे. महाराजांचे

वंशात जन्म झालेची धन्यता मानावी. व्यवहारातील लाभ-तोटा मनात न आणता पूर्वापार दूरदृष्टी असावी. सुबराय दूरदृष्टीचा आहे असे महाराज म्हणत. मग विषयाकडे भ्रम का सुटला ? अक्कासाहेब (संगव्वा, निंबरगी महाराजांची मुलगी व सुबरायांची आत्या) या दूरदृष्टीच्या असून त्यांनी तन-मन आपले बापाकडे (निंबरगी महाराजांकडे) दिले. आपलेस लिहिलेली गोष्ट अगदी खरी आहे हे त्यांनाही पटेल. याबद्दल परवा नागप्पास सांगितले आहे. त्याप्रमाणे उदईक (उद्या) सूर्योदयाबरोबर तुम्ही व नागप्पा जरूर जरूर येऊन भेटून जावे अशी प्रार्थना दोघांस आहे. कळावे.

-तुमचे सेवकाकडून

पत्र २१२ पान २०९

नवीन
क्रमांक

१८१ (टिपण :- (पत्रे २१२ व २४८). ११९ व २२१ या पत्रांतून सुबराय व नागप्पा यांना भेटून जाण्यास सांगितले आहे. २४८ पत्रात ते भेटून गेले असे आहे. म्हणून २२१ पत्रानंतर २४८ पत्र आले पाहिजे. २४८ मध्ये तांबटाला मजुरी देण्याचा विषय आहे. आता, तांबटाला पाठवले आहे हे पत्र (२१२) मजुरी देण्याच्या विषयाच्या आधी पाहिजे, म्हणजे २४८ च्या आधी पाहिजे. म्हणून सुबराय-नागप्पांना भेटून जाण्यास सांगणे व त्यांनी भेटून जाणे हा एक क्रम आणि तांबटाला पाठवणे व त्याच्या मजुरीचा विषय यांचा एक क्रम हे दोन्ही विचारात घेऊन २२१-२१२-२४८ असा क्रम लावला आहे. वरील दोन्ही विषय बरोबर जुळतात.)

उमदी

श्रीसद्गुरुसमर्थ

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री अंबुराव बाबा व नंदेप्पण्णा, मुक्काम

इंचगेरी, गोसावी वडिलांचे सेवेशी, भीमाचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार व दंडवत. श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. इकडून मदकारिअप्पा तांबट यास पाठविले आहे, तर घागर व तपेलीस बूड घालणेस व बोगण (पातेले) वगैरे भांडी कल्हई करण्याकरिता पाठवले आहे. त्यास समक्ष सांगितले आहे. खरेपणाने पोट भरण्यासारखी मजुरी घ्यावी, कमी करू नये, जास्त मागू नये, असे वचन घेतले आहे. त्याप्रमाणे सर्व काम करून घ्यावे. त्याला कोळसा द्यावा व राहण्यास एक खोली द्यावी. त्याची मजुरी वगैरे जी मागेल ती तुमच्या मर्जीप्रमाणे द्यावी. सारांश, तुम्ही माहितगारच आहां. नंदेप्पाचे दोन कोट दत्तूजवळ दिले आहेत. ते पोचल्याचे व कारखाना चालल्याचे व तांबट याचे काम सुरू झाल्याचे सर्व हकीकतीचे वरचेवर पत्र तांबट याजजवळ देत जावे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. वडिलांनी एकंदर मंडळींस प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत व्हावी. कळावे. बहुत काय लिहिणे ? कृपा-लोभ करावा ही विज्ञापना. कल्हई करण्यास कथिलाकरिता (कल्हई करण्यास लागणारा पदार्थ) १ रुपया समक्ष दिला आहे. कळावे.

पत्र २४८ पान २४०

नवीन क्रमांक १८२

उमदी

अंबुराव व नंदेप्पा यांना पत्र

श्रीसद्गुरुसमर्थ

कृतानेक अति नम्रतेचा नमस्कार. विज्ञापना. तुमचे पत्र व कार्ड पावले. मजकूर समजून फार फार आनंद झाला. ज्या ठिकाणी तुम्ही आहांत त्या ठिकाणी वडील असल्याप्रमाणे आज मितीस आनंद चालला आहे. याचप्रमाणे आनंद देत जावा. बाकी मजकूर सर्व आनंदरूप आहे. पाऊसपाणी बरेच झाले आहे. तांबट यास मजुरी नंदेप्पाचे मर्जीप्रमाणे द्यावी. नंदेप्पास व व्यंकप्पास सांगावे. नागप्पा निंबरगी आपण

सांगितलेप्रमाणे रक्कम दोन-चार दिवसांत घेऊन येत आहे असे सांगावे. सुबराय व नागप्पा उमदीस आले होते. त्यांस समक्ष सांगितले आहे. त्यांचे तंट्याचा निकाल झाला. पावती वगैरे सर्व झाले. कळावे, ही विज्ञापना.

	पत्र १२०	**पान १३३**
नवीन	इंचगेरी	चैत्र शु. ८
क्रमांक		१७.४.१९१०
१८३		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृपासागर तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री कृष्णाजीपंत अण्णा देशपांडे मुक्काम जत, वडिलांचे चरणसेवेशी, सेवक अंबाजी कुलकर्णी, मौजे इंचगेरी, याचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी अति नम्रतेचा नमस्कार. विनंती, विज्ञापना. श्रीसमर्थकृपेने आनंदात असो. विज्ञापना. आज रोजी श्रीसद्‌गुरुसमर्थ अप्पा येथे आले आहेत. सप्ताह (निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीचा सप्ताह) चैत्र शु. ९ सोमवारी सुरू होत आहे, १३ स पूर्ण होत आहे. जमखंडी मंडळी वगैरे आली आहेत. चिरंजीव राजश्री जिवाजी भिमाजी यांचे साक्षीची मुदत २० एप्रिलची असून येणेस सवड होत नाही याबद्दल मुन्सीफ कोर्टात अर्ज आज रोजी टपालमार्गे पाठविला. अंगात बरे नाही त्यासाठी जिवप्पाकडून अर्ज करविला आहे. आणखी मुदत ठरून आलेवर येत आहे. कळावे. वडील समर्थ महाराजांनी खटलेसंबंधी काही काळजी करू नये म्हणून सांगितले आहे. त्यावरून श्रुत केले आहे. कळावे, ही विज्ञापना. तारीख १७.४.१९१० इसवी. पत्र आपणांस लवकर पोचण्यास नॉट पेड केले आहे. क्षमा असावी.

पत्र १४१ पान १४७

नवीन
क्रमांक
१८४ (टिपण :- याच्या आधी लिहिलेले पत्र चैत्रातील आहे. प्रस्तुत पत्रातील ज्येष्ठ शु. १५ या नंतर येणाऱ्या तिथीच्या उल्लेखावरून हे पत्र चैत्रातील तिथीच्या काही दिवस नंतरचे असावे. १२१ पत्र आषाढातील आहे. म्हणून १२० (चैत्र) व १२१ (आषाढ) यांच्या मध्ये ज्येष्ठातील हे पत्र घातले आहे.)

इंचगेरी ज्येष्ठ

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य श्रीगुरुमहाराज राजश्री नागप्पा अण्णा निंबरगी स्वामीजींचे चरणसेवेशी, बालक अंबाजी कुलकर्णी मुक्काम इंचगेरी, याचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग दीर्घ दंडवत. विज्ञापना. इकडील सर्व मजकूर आनंदरूप असो. विज्ञापना. विहिरीचे काम सुरू आहे. खर्चासाठी २५-३० रुपये पाहिजे आहेत. ते रुपये आपणांकडून मागून घेणेविषयी श्रीसद्‌गुरुसमर्थ अप्पा यांनी पत्र लिहिणेस सांगितलेवरून लिहिले आहे, तर आपणांकडून कोणी खात्रीचा विश्वासुक मनुष्य इकडे आलातर त्याजबरोबर पाठवावे. नाहीपेक्षा आपण ज्येष्ठ शु. १५ पौर्णिमेस इकडे येत आहांत तेव्हा समक्ष घेऊन येणे. कळावे, ही विज्ञापना.

-अंबाजी कुलकर्णी

पत्र २५३ (आ) पान २४६

नवीन
क्रमांक (टिपण :- प्रस्तुत पत्र या आधीच्या १४१ पत्राची पुनरावृत्ती आहे.
१८५ म्हणून पुन्हा लिहिले नाही.)

पत्र १२१ पान १३४

नवीन क्रमांक १८६

विजापूर — आषाढ शु. ७

कृष्णरावांना पत्र — १३.७.१९१० बुधवार

श्रीसद्‌गुरुसमर्थ

अनेक आशीर्वाद, उपरि. आषाढ शु. ७ बुधवार, विजापूर मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र व त्यातील पत्र सर्व पाहून आनंद झाला. इकडील मजकूर सर्व खुशाल आहे. आज उद्या सोलापुराहून कोणीतरी येईल. नंतर तिकडे जाण्याचा बेत आहे. याप्रमाणे उमदीकडे कळवावे. भीमास पत्र द्यावे. चांगला विश्वासुक माणूस किंवा स्वतः जाऊन मंडळींस उमदीकडे न्यावे. याप्रमाणे वाट पाहत आहेत असे जरूर जरूर उमदीस व भीमास लिहावे. सोनूबाई वगैरे सर्व खुशाल आहेत. बोलावणेची वाट पाहत आहे. त्याकरिता गाडी घेऊन जरूर जरूर जाणेचे लिहावे. एकंदर मंडळींस नमन सांगावे. कळावे, हा आशीर्वाद.

पत्र १२२ पान १३४

नवीन क्रमांक

१८७ (टिपण :– पत्रावर 'महाराजांचे आपल्या वडील बंधूंस पत्र' अशी संपादकांची टिपणी आहे. मायन्यावरून हे पत्र वडील बंधूंना म्हणजे नानासाहेबांना असेल असे वाटत नाही. मागच्या १२१ पत्रात 'भीमरावांना निरोप द्यावा' असे आहे. त्यावरून हे पत्र भीमरावांना असावे.)

सोलापूर — आषाढ शु. १०

भीमरावांना पत्र — १६.७.१९१०, शनिवार

श्री

शिरसाष्टांग नमस्कार. आषाढ शु. १०, शनिवार, समर्थकृपेने

सोलापूर मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. विजापुराहून कार्ड लिहिलेच आहे. त्याप्रमाणे करीतच आहां. बापूराव डोणगाव हे द्वादशी करून दोघांस उमदीस पाठवीत आहेत. भाडे वगैरे गाडीचे मीच देतो, विश्वासुक गडी बरोबर देतो असे सांगितले आहे. त्याप्रमाणे झालेतर ठीकच आहे, नाहीतर तुम्ही आणवून घ्यावे. तुमचे मामीस ठेवून घ्यावे. निवरगीहून याप्रमाणे करण्यास परवानगी मिळाली आहे असे सांगितले आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. आम्ही आठ–दहा रोजांत इंचगेरीकडे जात आहोत. कळावे, ही विज्ञापना.

–रामभाऊ फडणीस याजकडून

पत्र १३१ पान १४०

नवीन
क्रमांक
१८८ (टिपण :– या पत्रावर १९१० एवढीच तारीख आहे पण अश्विन शु. १ ही तिथी आहे. १२२ पत्रावर तारीख व तिथी दोन्ही आहेत. त्यावरून १३१ ची तारीख काढली.)

अश्विन शु. १
६.१०.१९१०

श्रीसद्‌गुरुसमर्थ

तीर्थस्वरूप महाराज राजमान्य राजश्री अंबुराव बाबा महाराज मुक्काम इंचगेरी वडिलांचे सेवेशी, बालक, भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणांवर मस्तक ठेवून अति नम्रतापूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. तागाईत मिती अश्विन शु. १ पावेतो श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने व आपले आशीर्वादिकरून आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र पाहून फार फार फार आनंद आनंद आनंद व संतोष वडिलांस झाला. काल पाऊसही बराच झाला आहे. सर्व प्रकारे आनंद आनंद आहे. अभिज्ञांप्रति विशेष लिहिणे नको. सुज्ञच आहां. विहिरीचे काम

लवकर होईल असा बेत ठेवावा. तुमचे मर्जीप्रमाणे करावे असे वडिलांनी सांगितले आहे. बाकी मजकूर नंदेप्पाने तोंडजबानीने सांगितल्यावर विदित होईल. कळावे. वडिलांप्रति विशेष काय लिहिणे बालकाला शक्य नाही. ही विज्ञापना.

	पत्र १२३	**पान १३५**
नवीन	जत	अश्विन व. १
क्रमांक	सुबराय व नागप्पा	२२.१०.१९१०
१८९	यांना पत्र	

श्रीगुरुसमर्थ

अति नम्रतेचा दीर्घ दंडवत नमस्कार. विनंती, विज्ञापना. इकडील सर्व मंडळी श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने आनंदात असो. तीर्थरूप अप्पा हे इथे आले आहेत. त्यांनी तुमची प्रकृती बरीच बिघडली आहे असे सांगितले. हल्ली तुमची प्रकृती कशी काय आहे ते उलट टपाली कळवावे. महाराजांची (निंबरगी महाराजांची) समाधी सुरू आहे किंवा कसे तेही लिहावे. सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री सुबरावजी अण्णा यांना माझा अति नम्रतेचा दीर्घ दंडवत नमस्कार आहे. तसेच संगव्वा अक्का व सुबराय वगैरे मंडळींस तीर्थरूप अप्पांनी नेमाबद्दल फार फार प्रार्थना सांगितली आहे. तुमचे प्रकृतीबद्दल उत्तर लवकर पाठवावे म्हणजे अप्पांना कळवीत आहे. कळावे. सुज्ञांप्रत विशेष काय लिहिणे ? ही विज्ञापना.

–कृष्णा उमदीकरकडून

	पत्र १२४	**पान १३६**
नवीन		
क्रमांक		
१९०	(टिपण :– पत्रावर पौष शु. २ अशी तिथी आहे. तारीख ऑक्टोबर	

महिन्याची आहे. ऑक्टोबरमध्ये पौष येत नाही. ही तिथी हिशोबाने अश्विन व. २ येते. १२३ पत्राच्या तिथीशी ही तिथी जुळते.)

उमदी — अश्विन व. २

नागप्पांना पत्र — २३.१०.१९१०

श्रीगुरू प्रसन्न

कृतानेक दंडवत नमस्कार. तुम्हांस पत्र लिहिलेप्रमाणे जिन्नस पाठवलेत परंतु किंमत लिहिली नाही. असे करू नये. किंमत वगैरे कळवीत जावे, नागप्पा महाराज हो. काळे लुगडे ठेवून घेतले आहे. किंमत कळवावी. दुसरी हिरवी किरणी, १४ हात लांबी व २ हात रुंदी या मासलेची जरूर आणिवणेचे करावे. आणल्यावर जरूर जरूर कळवावे. १५ हाताची उपयोगी नाही, १४ हातच पाहिजे. याप्रमाणे आणून पाठवावी. खोळंबा आहे. घरी एकंदर मंडळींस व आईस, इंचगेरीहून आली असल्यास, फार फार प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. तुम्हांस व भाऊरायांसही नेमाने असणेबद्दल सांगितले आहे. कळावे, लोभ असावा ही विज्ञापना.

–रामभाऊ फडणीस याजकडून

पत्र १३० अ पान १३९

नवीन
क्रमांक
१९१ (टिपण :– प्रस्तुत पत्र व याच्या आधीचे १२४ पत्र, एकच आहेत. गंमत म्हणजे पत्र तेच असून तारखा वेगवेगळ्या आहेत ! १२४ पत्रात तारीख पूर्ण लिहिलेली आहे, तीच ग्राह्य धरली आहे. तिथी चुकली आहे हे मागच्या १२४ पत्राच्या टिपणात लिहिलेच आहे. दोन्ही पत्रे एकच असल्याने पुन्हा लिहिले नाही.)

पत्र १२५ पान १३६

नवीन

क्रमांक

१९२ (टिपण :- या पत्राची तारीख २६.६.१९१० नसून २६.१०.१९१० पाहिजे. मागची काही पत्रे ऑक्टोबरमधीलच आहेत. २६.१०.१९१० ही तारीख पुढच्या मागच्या पत्रांशी जुळते.)

जत — अश्विन व. ९

सुबराय व नागप्पा यांना पत्र — २६.१०.१९१०

श्री

कृतानेक दंडवत नमस्कार. श्रीसमर्थसद्‌गुरुकृपेकरून जत मुक्कामी आनंदरूप असो. विज्ञापना. समर्थांचा कारखाना (निंबरगी महाराजांचे देऊळ) बांधणे सुरू आहे किंवा कसे तो खुलासा कळवावा. कारखान्यावर कोण आहे, तसेच तिकडील हकीकत कळवावी. कानडी पद 'गुरुराया नानु, वर जन्म बल्लेन'[1] हे पद भाऊरायांकडून लिहून घेऊन जरूर पाठवावे म्हणजे आम्हांस पोचेल. जतेस तीर्थरूप अप्पांचे पत्त्यावर उत्तर लिहावे. तुमचा उद्योग बरा चाललेची खुलासेवार हकीकत कळवावी. वडिलांनी तुम्हांस फार फार विनंतीचा, प्रार्थनेचा नमस्कार सांगितला आहे. सुबराय अण्णा, गुरुपादप्पा अण्णा, भाऊराय अण्णा, मामासाहेब (गंगाधर मामा) यांना अति नम्रतेचा नमस्कार अगत्य सांगावा. याप्रमाणे वडिलांनाही नमस्कार आहे तो श्रुत करावा. आईस व आत्याबाईस सांगावे. कळावे. सुज्ञाप्रत जास्त काय लिहिणे ? ही विज्ञापना.

—नंदेप्पा जमखंडी

नोंद :-

१. गुरुदेव नानु । नरजन्म ओल्ले । – (बोधसुधे, १९४८, अनुभवपदशतक (२), पृ. ४४. अर्थ– 'गुरुराया आता मला नरजन्म (कोणताच जन्म) नको'.) कवी रुद्र नावाच्या गुरूंचा शिष्य आहे.

xxxxx

	पत्र १२६	**पान १३७**
नवीन	चिमड	कार्तिक शु. ६
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	८.११.१९१०
१९३		

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. कार्तिक शु. ६ पावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. चिमडाहून तेरदाळास शुक्रवारी ९ नवमीस जाणे आहे. तेथे चार मुक्काम होतील. नंतर हळूर याप्रमाणे बेत आहे. सर्व आनंद आहे. जमखंडीहून कार्ड पाठविले आहे. पाऊस इकडेही काही काही थोडा लागलाच आहे. असो. तुम्हांकडील, इंचगेरीकडील व उमदीकडील खुलासा कळवीतच आहां. करबसप्पा चडचण, अंबुराव व तिकोटीस याप्रमाणे खुलासा कार्ड पाठवावे. एकंदर मंडळींस नेमाबद्दल प्रार्थना प्रविष्ट करावी. कळावे, हा आशीर्वाद.

ताजा कलम– नंदेप्पा न्यामगौड याचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. अक्कांसही (शिवलिंगव्वा अक्का) नमस्कार. माझी स्वतःची गोष्ट तुम्हांस माहीत आहे, ती सप्ताहास येतेवेळी घेऊन यावे. कळावे.

	पत्र १२७	**पान १३७**
नवीन	तेरदाळ	कार्तिक शु. १०
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	१२.११.१९१०
१९४		

श्रीसद्गुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. समर्थकृपेने तेरदाळ मुक्कामी आनंदरूप असो. इकडून जमखंडीस ६/७ संधीस जाणे होईल असे वाटते. असो. समर्थांची मर्जी. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. याप्रमाणे अंबुरायास व उमदीस कळवावे. खुलासेवार खुशालीचा खुलासा व आपले खटलेचे निकाल कळवावे. रामूचे काम कैसे झाले ते कळवावे. जमखंडीस

वीरभद्रप्पाचे नावे पत्र लिहावे म्हणजे पौर्णिमेचे आतबाहेर ५/६ सुमारास जात आहे तेव्हा पोचेल या बेतावर लिहावे. नंदेप्पा यांनी अक्कांस नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. कळावे, हा आशीर्वाद.

	पत्र १२८	**पान १३८**
नवीन	जत	कार्तिक व. २
क्रमांक	करबसप्पा आवटी	१९.११.१९१०
१९५	यांना पत्र	

श्रीगुरुसमर्थ

अति नम्रतेचा दीर्घ दंडवत नमस्कार. तुमचे परवाचे एक कार्ड पावले. जिकडील तिकडे कळविले. इकडील सर्व मंडळी क्षेम आहेत. तीर्थरूप अप्पांकडून पत्र आले. तेरदाळवरून जमखंडीस वद्य ५/६ सुमारास येणे होत आहे. सर्व खुशालीचे व आनंदाचे लिहिले आहे. तुम्हांस मुद्दाम कळविणेस आज्ञापत्र लिहून आलेवरून पत्र लिहिले आहे. वरकड मजकूर अधिकोत्तर नाही. कळावे, ही विनंती.

–उमदीकर कृष्णाकडून

	पत्र १२९	**पान १३८**
नवीन	जमखंडी	कार्तिक व. १२
क्रमांक	जयवंतप्पा धोत्री	२९.११.१९१०
१९६	यांना पत्र	

श्री

कृतानेक दंडवत नमस्कार. कार्तिक वद्य १२ जमखंडी मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. चिमड वगैरे मंडळी पालखी घेऊन येणार आहेत (मार्गशीर्ष सप्ताहासाठी). करिता तुम्ही म्हणजे नागप्पा माशाळ, शिवप्पा आवटी, जयवंतप्पा धोत्री वगैरे येणाऱ्या मंडळींनी गुरुवारी

संध्याकाळपर्यंत इंचगेरीस येऊन पोचावे. लक्ष्मणा यासही घेऊन यावे. वाजंत्री व पुजारी यांस जरूर जरूर घेऊन यावे. कोठे गेले असल्यास बाबांना सांगून नाटेकर यास आणवून वाजंत्रीवाल्यांना घेऊन यावे. रामप्पा अण्णा कुलकर्णी यांस सवड असल्यास त्यांसही घेऊन यावे. मास्तरसाहेब यांस सांगावे. कळावे. करबसप्पांना गुरुवारी यावे असे सांगावे.

–नंदेप्पा याजकडून

पत्र २४३ पान २३६

नवीन क्रमांक

१९७ (टिपण :– प्रस्तुत पत्रातील तिथी व मजकूर मागच्या १२९ पत्रामधील तिथी व मजकुराशी जुळतात. तिथी पुढच्या १८९ पत्राच्या तिथीशीही जुळते. म्हणून हे पत्र इथे आणले. तारीख हिशोबाने काढली आहे.)

इंचगेरी — मार्गशीर्ष व. ३

कृष्णरावांना पत्र — १९.१२.१९१०, सोमवार

श्रीसद्गुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना.

तागाईत मिती मार्गशीर्ष वद्य ३ सोमवारपावेतो आपले आशीर्वादे-करून आनंदरूप असो. विशेष. इंचगेरी येथे सप्ताह (मार्गशीर्ष सप्ताह) थाटाने, आनंदाने उत्सव झाला. आज रोजी उमदीस जात आहे. चिरंजीव अण्णप्पा बालगावकर हे येतील. त्या वेळी निंबरगी नागप्पा बिन भीमण्णा नीलवाणी यांचे नावे २०० दोनशे रुपयांचा दस्त लिहून घ्यावा. बोबलाद येथील जमीन लिहून घेणेचे आहे. व्याजामध्ये ५ वर्षे कराराने जमीन तुमच्या कब्जात दिली आहे, जमीन कोणाला पाहिजे त्यास लागणीस

द्यावी अशा कराराने नागप्पाचे नावे लिहून घेऊन, रजिस्ट्रारची पावती अण्णप्पाकडून तुमचे नावे लिहून घेऊन इकडे पत्र पाठवावे, म्हणजे बालगावकर यांना रक्कम देण्यात येईल. बाकी मजकूर अण्णप्पा तोंडजबानीने सांगेल म्हणजे सर्व वर्तमान विदित होईल. वडिलांप्रत विशेष काही लिहिण्यास बालकास शक्य नाही. ही विज्ञापना.

ताजा कलम- तीर्थरूप अप्पा हे इंचगेरीहून अष्टमी संधीस उमदीस येत आहेत. कळावे.

पत्र १८९ **पान १८८**

नवीन क्रमांक १९८

पंढरपूर

मार्गशीर्ष व. ८

२४.१२.१९१०, शनिवार

श्रीगुरुसमर्थ

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री अंबुराव बाबा महाराज मुक्काम इंचगेरी, वडिलांचे चरणसेवेशी, बालक कृष्णाचा अति नम्रतेचा नमनपूर्वक शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. मार्गशीर्ष वद्य ८ शनिवारपावेतो श्रीसमर्थकृपेकरून सर्व आनंदित असो. विशेष. पंढरपुरी शुक्रवारी वद्य ७ रोजी येऊन पोचलो. देवाचा नवस संपूर्ण आनंद आनंद झाला, तो पत्री लिहिता येत नाही असा झाला. असो. आम्ही सर्व मंडळी पौष शु. ३ अगर ४ संधीस इंचगेरीस येत आहो. तुम्ही समक्ष सांगितलेप्रमाणे सर्वांचे अंतःकरणात विठ्ठलराज शिरून तुमचे मताप्रमाणे सर्वांनी अंगिकार केला व समर्थ विठ्ठल... येईपर्यंत तयार करून कोठीत ठेवावे... चांगले सडवून एक मण घेऊन... तूप एक मण आणून तेही कोठीत ठेवावे. एवढी तयारी अंतःकरणापासून जरूर जरूर करावी. विठ्ठलमूर्ती बलभीमाचे उजवीकडे[1], रखुमाई याप्रमाणे बलभीमाचे पुढे तुमचे मर्जीप्रमाणे बसविणेचे जागेची तयारी असावी. चुना घोटून ठेवावा. आलेबरोबर सर्वांचे व तुमचे मर्जीप्रमाणे कायम करता येईल. सारांश,

तुमचे भक्तीने विठोबा येत आहे. त्याची सर्व काळजी तुम्हांसच. गावातील सर्वांचे मत घेऊन एक काहील (खीर शिजवण्याची भली मोठी कढई) तुमचे काळजीचे लोकांकडून करवावी. सर्व खटपट तुमचीच आहे असे मंडळींना सांगून तयारी ठेवावी. वारकरी मंडळी व भक्तमंडळी यांना आणणेस जिगजीवणी कृष्णप्पा[२] यांस...

(अपूर्ण)

नोंदी :-

१. या मूर्तींच्या स्थापनेचा सप्ताह इंचगेरी येथे पौष शु. ४, बुधवार फसली १३२० तारीख ४ जानेवारी १९११ रोजी मोठ्या प्रमाणावर साजरा झाला. मूर्ती कुठे बसवायच्या होत्या याचा उलगडा पत्रातील सूचनांवरून होत नाही. असो. सप्ताहाबद्दलचा उल्लेख व सामानाचा हिशोब पत्रांच्या पुस्तकात पृष्ठ ३४९ ते ३५१ वर आहे.

२. कृष्णप्पा हे अंबुरावांचे वडील बंधू.

	पत्र १३०	**पान १३९**
नवीन	पंढरपूर	मार्गशीर्ष व. ८
क्रमांक	सर्व संतमंडळींना पत्र	२४.१२.१९१०, शनिवार
१९९		

श्रीगुरुदेव

समर्थांचा महिमा सर्व संतमंडळींस कळावा. पांडुरंग व महाराज यांची भेट झाली तेव्हा उत्साह, प्रेम, आनंद यांची झुंबड झाली. कोणी पाहिले त्यांस कळेल[१]. महाराज व पांडुरंग यांची भेट झाली तेव्हा पुष्पवर्षाव झाला. तो सर्व आनंद भक्तांनी पाहून जयजयकार करत, आनंदाने टाळ्या पिटत, गर्जना करत, नाचत देवद्वारी येऊन उत्हासाने भजन केले. त्वरित महाराज पांडुरंगाची भेट घेऊन परत आले. सर्व

संतमंडळी यांस मज दीनाचा नमस्कार.

नोंद :-

१. हे पत्र शिवलिंगव्वांनी सर्व संतांना उद्देशून लिहिले आहे. महाराज व पांडुरंग यांच्या भेटीचा प्रसंग स्वतः शिवलिंगव्वा अधिकारी असल्याने त्यांना प्रत्यक्ष दिसला. इतरेजनांना आनंदाचा अपूर्व लाभ झाला हे त्यांचे भाग्य.

xxxxx

पत्र २०२ पान २००

नवीन

क्रमांक

२०० (टिपण :- हे पत्र व आधीचे १३० पत्र पूर्णपणे एकच आहेत. १३० पत्रावर तारीख आहे. ते तारखांच्या पत्रात छापले होते. प्रस्तुत पत्रावर तारीख, तिथी काहीच नाही. १३० चीच पुनरावृत्ती आहेतरी त्यावर तारीख नसल्याने ते बिनतारखेच्या पत्रात घातले गेले होते. प्रस्तुत पत्र व १३० पत्र समान असल्यामुळे पुन्हा लिहिले नाही.)

पत्र १३२ पान १४१

नवीन

क्रमांक

२०१ (टिपण :-मागील दोन-तीन पत्रे (१८९, १३०, २०२) २४.१२.१९१० या तारखेची असून त्यांची तिथी मार्गशीर्ष व. ८ आहे. त्यावरून २०.१.१९११ या प्रस्तुत पत्राची तिथी पौष व. ५ येते. म्हणून या पत्राच्या मजकुरात उल्लेख असलेली मार्गशीर्ष शु. ५/६ ही तिथी माघ शु. ५/६ असली पाहिजे. या तिथी, तारखा, मागच्या पुढच्या पत्रांशी जुळतात.)

पौष व. ५

भीमरावांना पत्र २०.१.१९११

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक अनंत अति नम्रतेचा शिरसाष्टांग दंडवत नमस्कार. तुमचे कार्ड पावले. मजकूर समजून आनंद आनंद झाला. जमखंडीहून माघ शु. ५/६ संधीस तिकोटेहून इंचगेरीस जात आहो. इकडील सर्व वर्तमान आनंद आनंद आहे. नागप्पा अण्णा माशाळ, जयवंतप्पा धोत्री, शिवप्पा आवटी वगैरेंस माझा दंडवत नमस्कार आहे. महाराज मास्तरसाहेब, अण्णप्पा महाराज वगैरेंस वडिलांनी अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा ही विज्ञापना.

पत्र १३३ **पान १४१**

नवीन क्रमांक २०२ उमदी पौष व. १४

कृष्णरावांना पत्र २९.१.१९११, सोमवार

श्रीसद्‌गुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणांवर मस्तक ठेवून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागाईत मिती पौष व. १४ रोज सोमवारपावेतो वडिलांचे आशीर्वादिकरून सुखरूप असो. विशेष. काल नाटीकरबरोबर पाठवलेले पत्र येऊन पोचलेच असेल. मी उद्या मंगळवारीच गावास जात आहे. तीर्थरूप अप्पा पुढल्या रविवारी जालिहाळवरून इंचगेरीस जात आहेत. नांगरे आले असतीलच. कात्राळ मजकूर लिहून कळवावे. पौर्णिमेस इंचगेरीस एक पत्र लिहावे. घरचा नांगरे हे आमचे आम्ही निकाल करून घेतो, असे बोलून गावास गेले आहेत. दोघांचे मत एक असल्यासारखे धोरण बोलला. त्यावरून तुम्हांस कळविले आहे. खरे, खोटे त्याचे समजतच नाही. ते विचारून खुलासा लिहावा. फार करून

तैसे बालगावकर करणार नाही असे समजते. याजवरून काय ते समजून घ्यावे. ती. अप्पा यांनी सांगितले आहे की दोन हात रुंद, आठ हात लांब असे सोळा हात, फार पातळ असू नये, साधारण तुमचे मर्जीप्रमाणे मांजरपाठ पंचा काकांस पाहिजे तो पाठवावा. तानाबाईस हिरव्या रंगाचे लुगडे चवदा-पंधरा हाताचे पाहिजे आहे तेही पाठवावे. अगदी खोळंबा आहे. बाकी मजकूर सर्व खुलासा उत्तर पाठवावे. कळावे. वडिलांप्रत विशेष काही लिहिण्यास बालकास शक्य नाही. कळावे, ही विज्ञापना.

	पत्र १३४	**पान १४२**
नवीन क्रमांक २०३	विजापूर	फाल्गुन व. १ शके १८३२
	भीमरावांना पत्र	१५.३.१९११, बुधवार

श्रीसद्गुरू प्रसन्न

आशीर्वाद उपरि. फाल्गुन व. १, शके १८३२ रोज बुधवार, विजापूर मुक्कामी सर्व सुखरूप असो. विज्ञापना. नवमी/दशमी इतक्यात उमदीस इंचगेरीहून येत आहो. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. चैत्र शु. ३ बेताप्रमाणे व्यवस्था ठेवीतच आहां. इकडील सर्व मजकूर आनंद आहे. भक्तीकडील येणारे मंडळींस नमस्कार प्रविष्ट करावा हा आशीर्वाद.

ताजा कलम- करबसप्पा आवटी वगैरेंस अति नम्रतेचा दंडवत नमस्कार. वर लिहिलेप्रमाणे करीतच आहां. कळावे.

पत्र १८७ **पान १८५**

नवीन क्रमांक २०४

(टिपण :- पत्रावर फक्त तिथी आहे. प्रस्तुत पत्रात महाराजांनी ओवीबद्ध पत्र मिळाल्याचा आनंद दर्शविला आहे. असे एखादे पत्र गुरुदेव रानडे यांच्याकडून गेले असावे. त्याला हे उत्तर आहे. ज्येष्ठ शु. १ चे हे

पत्र १३० पत्रानंतर व १३५ पत्राच्या आधी बरोबर बसते.

पूर्वी एक ओवीबद्ध पत्र गुरुदेवांनी २८ जुलै १९०९ रोजी महाराजांना लिहिले होते (पारमार्थिक पत्रव्यवहार, पत्र क्रमांक ८), परंतु त्यावर महाराजांनी काय लिहिले होते ते माहीत नाही.)

चडचण ज्येष्ठ शु. १

श्रीरामभाऊ रानडे यांना पत्र २७.५.१९११

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक अनंत आशीर्वाद. श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने ज्येष्ठ शु. प्रतिपदा चडचण मुक्कामी आनंदरूप असो. तुमचे पत्र पावले. ओवीबद्ध असल्याने मनास फारच आनंद आनंद झाला. असेच निरंतर कळवीत जावे. नेमाने असावे. चुकू नये म्हणून सांगणे फार फार आहे. 'आठव तो ब्रह्म नाठव तो भवभ्रम'। हे वाक्य ठाऊकच आहे. वडिलांस[1] अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगावा. कळावे.

–आपला उमदीकर

नोंद :-

१. गुरुदेवांच्या मातोश्री पार्वतीबाई.

xxxxx

पत्र १३५ पान १४२

नवीन क्रमांक २०५

उमदी

ज्येष्ठ शु. ११

७.६.१९११, बुधवार

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य राजश्री निंगप्पणा सावळगी मुक्काम पुणे. स्वामीजींचे सेवेशी, आज्ञांकित रामभाऊ फडणीस याचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. ज्येष्ठ शु. ११ रोज बुधवार मुक्काम उमदी येथे श्रीसदगुरुसमर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे जतीहून पाठवलेले

पत्र आज पोचले. मजकूर समजला. सारांश, महाराजांनी सांगितलेप्रमाणे व समर्थवाक्य तुकारामाचे, 'हाका मारूनि सांगे तुका । नाम घेता राहू नका' । तद्वत दोन–चार पत्रांनी व समक्ष हाका मारून सांगितले असून सिद्धांत गोष्ट पत्राने लिहून कळविली, हे आताचे प्रसंगी योग्य नव्हे. प्रपंच–परमार्थ दोन्ही चालवावे अशी माया ठेवून अभ्यास करीत जावे. या गोष्टीस (असे न केल्यास) परस्परे दूषण येणार आहे असे महाराजांनी कळविले होते. तोच मजकूर पत्रात दर्शविला. असो आता चांगला अभ्यास करावा. नेहमी नामदृष्टी ठेवीत जावी म्हणजे सर्व कार्य साधून येत आहे. काही काळजी करू नये असे महाराजांनी सांगितले आहे. तुम्हांस श्रुत व्हावे. मल्हारपंत[1] दादा व रामराव[2] दादा यांसी याजप्रमाणे सांगणेविषयी फार फार प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. ज्येष्ठ वद्य ५/६ संधीस इंचगेरीहून सोलापुरास जाणार आहेत. विष्णुपंत फडके आले होते, ते परत गेले. आता ५/६ संधीस येणेविषयी त्यांना सांगितले आहे. ते येणार आहेत तेव्हा आम्ही जाणार आहो. त्या संधीस खुलासेवार हकीकतीचे पत्र लिहावे. रामराव याची प्रकृती व काम, व मल्हारपंत याचा उद्योग, तसेच परवा सप्ताहास आले होते त्या गृहस्थांचे व एकंदर मंडळींचे नाववार (नावाप्रमाणे) उत्तर लिहून कळवावे असे सांगितले आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. तुम्ही मात्र चांगला अभ्यास करावा म्हणजे काळजी दूर होत आहे. कळावे. कृपा–लोभ असावा ही विज्ञापना. एकंदर मंडळींस वडिलांनी नेमाबद्दल प्रार्थना फार फार सांगितली आहे. ती श्रुत करावी. कळावे, ही विज्ञापना.

नोंदी :–

१. मल्हारपंत जोशी

२. रामभाऊ रानडे

xxxxx

पत्र १३६ पान १४४

नवीन क्रमांक २०६

सोलापूर — आषाढ शु. ७

भीमरावांना पत्र — ३.७.१९११, सोमवार

श्रीसद्गुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. आषाढ शु. ७ सोमवार, सोलापूर येथे समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे कार्ड पावले. मजकूर समजून आनंद झाला. कृष्णाला दोन पत्रे लिहिली. उत्तर आले नाही. एकादशी-द्वादशीनंतर विजापुरास जाणार आहो. तुम्हांकडील खुशालीचा खुलासा विजापुरास तुकाराम (सुतार) याचे नावे पत्ता लिहून उत्तर पाठवावे म्हणजे त्या संधीस जात आहो तेव्हा आम्हांस पोचेल. एकंदर मंडळींस व वडिलांस (नानासाहेब) अति नम्रतेचा नमस्कार प्रविष्ट करावा. कळावे, हा आशीर्वाद, एकंदर मंडळी म्हणजे संतसभेपैकी येणारे मंडळींस नमस्कार सांगावा.

पत्र १३७ पान १४४

नवीन क्रमांक २०७

(टिपण :- प्रस्तुत पत्र (पद्य) व १६४ (गद्य) दोन्हींमध्ये निःशब्द ज्ञान श्रेष्ठ असल्याचे आहे. १६४ पत्र सोमनाथपंत जोशी (पंचनदीकर) यांना आहे. म्हणून हेही (१३७) पत्र त्यांनाच असावे.)

इंचगेरी — भाद्रपद शु. ८/९

सोमनाथपंतांना पत्र — ३०.८.१९११, शुक्रवार

1717 KIG

श्रीसद्गुरुसमर्थ

षट्शास्त्र खरा मानणार । सद्बुद्धि ओळखणार । सद्विद्या जाणणार। प्रज्ञावंत ॥१॥ त्याचा संतोष जाणणार । कुशलत्व समजून घेणार । ज्ञाता-ज्ञेय-ज्ञान समजणार । महापुरुष ॥२॥ तुमचे कार्डातील मजकूर।

पाहुनी आनंद मन फार । अति नम्रतेचा नमस्कार । साष्टांग भावे ॥३॥ असेच सर्व वर्तमान । खुलासा लिहून । नाव गाव कळवून । आनंदित करावे ॥४॥ वडील जनांस तुमचे । गुरुमहाराजांचे नम्रतेचे । नमस्कार साष्टांग भावेचे । विदित करावे ॥५॥ आनंद झाला सप्ता श्रावण । तुम्हांला कटाने नामस्मरण । चुकू नये म्हणून । सांगितले आहेत ॥६॥ आठव तो ब्रह्म । नाठव तो भवभ्रम । हे जाणतसा वर्म। तुम्ही शहाणे ॥७॥ तुमचे लेखन ओव्यापर । हे शब्दांतील विस्तार । ज्ञानयोग अपार । परि निःशब्द नव्हे ॥८॥ याचप्रमाणे निःशब्दाचे । अर्थ समजून साचे । घ्याल अशी आशा मनीचे । धरुनि लेखन संपवितो ॥९॥ रामभाऊ आपला मतिहीन । परि समर्थांचे आज्ञेवरून । उत्तर लिहिले सद्गुरू स्मरून । अति नम्रभावे ॥१०॥

मिती भाद्रपद शु. अष्टमी उपरांत तिथी नवमी भृगुवार सकाळी अति प्रेमे विनंती लिहून घेतली असे. तुमचे विष्णुपंत फडके, त्यांनाही तुमचे पत्राचा मजकूर समजून आनंद झाला. नेमनिष्ठा जास्त केल्याने, वाढविलेने अंतःकरणात ज्ञान पूर्ण होत आहे. त्याप्रमाणे उत्तर खुलासेवार लिहून कळवावे म्हणून प्रार्थना फार फार सांगितली आहे. कळावे.

पत्र २०१ पान १९९

नवीन क्रमांक २०८

(टिपण :– या पूर्ण पत्रात सुरवातीस १३७ पत्रातील १० ओव्यांपैकी ७ ओव्यांची (बव्हंशी) पुनरावृत्ती झाली आहे. त्या ओव्या लिहिल्या नाहीत. उरलेला भाग पुढे लिहिला आहे. पत्र त्याच दिवशीचे असावे.)

भाद्रपद शु. ८/९

३०.८.१९११

मजकुराचे ओव्यांच्या स्वरूपात लिखाण झाले. तो सर्व शब्दांतील विस्तार झाला. तोही ज्ञानयोग आहे. परंतु याचप्रमाणे निःशब्दातील

अर्थ समजून घ्याल अशी इकडील आशा फार फार आहे. कळावे. कृपा–लोभ करावा ही विनंती.

–रामभाऊ फडणीस

पत्र २४१ पान २३४

नवीन क्रमांक

२०९ (टिपण :– या पत्रावर तिथी, तारीख काहीही नाही. पण मजकुरावर नजर टाकल्याबरोबर अंबुरावांनी जी पुस्तके पोस्टात टाकण्यासाठी होर्तीला पाठविली, ती नित्यनेमावलीची पहिली आवृत्ती असावी असा अंदाज करता येतो. अर्थातच हे पत्र १९११ सालच्या पत्रांत बसू शकते. तोपर्यंत नित्यनेमावली तयार झाली असावी. प्रस्तुत पत्रात महाराज इंचगेरीस असल्याचा उल्लेख आहे. नित्यनेमावलीची पहिली आवृत्ती प्रसिद्ध करणारे विष्णुपंत फडके इंचगेरीसच होते (पत्र १३७ ता. ३०.८.१९११). आता महाराज आणि विष्णुपंत दोघेही इंचगेरीस असल्यामुळे पाठविलेली पुस्तके नित्यनेमावली असावीत आणि हे पत्रही त्याच सुमारास लिहिले गेले असावे. म्हणून ते पत्र ३०.८.१९११ ला लिहिलेल्या १३७ पत्राच्या जवळ आणले.)

इंचगेरी

रविवार

श्रीसद्गुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य राजश्री धोंडोपंत दादासाहेब मास्तर[1] मुक्काम होर्ती, स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, सेवक अंबाजी कुलकर्णी मुक्काम इंचगेरी, याचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती विज्ञापना. श्रीसद्गुरुसमर्थ अप्पा येथेच आहेत. टपालात घालणेकरिता लखोटे २ दोन, बुक तीन धारवाडास जाणेची व कार्ड एक असे कागद व बुकावर लावणेकरता तिकिटासाठी दोन पैसे

पाठवले आहेत. तर पोचल्याबद्दल व रवाना केल्याबद्दल उत्तर यावे. कळावे. वडिलांनी तुम्हांस अति नम्रतेची प्रार्थना फार सांगितली आहे, ही विज्ञापना.

सोलापूरचे पत्रावर तिकीट लावणेचे आहे. तीन पैसे पाठवले आहेत. जास्ती लागल्यास उत्तर यावे. हे लखोटे वगैरे जरूर जरूर रवाना करावे. सुज्ञच आहां. लिहावे असे नको. याचे खाली उत्तर तपशीलवार लिहिणे. कळावे. महाराजही येथेच आहेत. तुम्हांस व एकंदर मंडळींस नमस्कार फार फार आहेत. उद्या सोमवारी उमदीस जात आहे. ही विनंती. 1.9.1911

नोंद :-

१. मास्तर म्हणजे पोस्टमास्तर असावेत. इंचगेरीला त्या वेळी पोस्ट ऑफिस नव्हते. टपालाचे सर्व व्यवहार होर्तीच्या पोस्ट ऑफिसातून चालत.

xxxxx

	पत्र १३८	**पान १४५**
नवीन	परगणे करजगी	अश्विन शु. ५
क्रमांक		२५.९.१९११, बुधवार
२१०		

श्री

यादी, मल्लप्पा बिन निंगप्पा खांडेकर मौजे जालिहाळ तालुका यासी, व्यंकटेश खंडेराव उमदीकर व त्रिंबक भीमराव देशपांडे बालगावकर परगणे करजगी, संस्थान जत १३२१ फसली. मौजे लवंगा येथील आमचे जमिनीत बांध, सर्वे नंबर ७२ यात दोन ताल नादुरुस्त होते, तर ते दोन्ही ताल दुरुस्त करविले. त्याचा खर्च ७३ रुपये झाला आहे. सदरहू तालीस रोजगारी लावून घातले. हिशोब रुजू रुजवात समक्ष दाखविले ते कबूल आहे. तालीचे दुरुस्तीचा खर्च आम्ही देणेचा करार आहे. त्याप्रमाणे सदर रुपये आमचे सदरी नंबरात चौथाई हिस्सा आहे

त्या हिश्शात वजा करून देत जाऊ. सदरहू नंबराचे सन १३२१ फसलीचे आमच्या हिश्शाचा माल तुम्ही दिला तो पावला. आता तुमचे ७३ रुपये सन १३२२ फसलीपासून राशीवर आमचे तुमचे सवडीप्रमाणे वजा करून देत जाऊ, हे लिहून दिले. यादी, सही तारीख २५.९.१९११ दस्तुर त्रिंबक भीमराव देशपांडे.

सही–त्रिंबक भीमराव देशपांडे, परगणे करजगी दस्तुर खुद्द ''१३२१ फसली तारीख अश्विन शु. ५, बुधवार जालिहाळ मुक्कामी याद ७३ रुपयांचे आम्ही व बालगावकर निम्मे निम्मे द्यावे. पिकावर द्यावे. माल घ्यावा''

(हा मजकूर महाराजांच्या हस्ताक्षरांत आहे.)

पत्र २२२ (२) पान २१७

नवीन क्रमांक

२११ (टिपण :– हे पत्र 'पारमार्थिक पत्रव्यवहार' या पुस्तकात पृष्ठ ३४ वर आहे. अंबुरावांनी लिहिलेले आहे. तारीख ६.१०.१९११, तिथी नाही, परंतु ती या आधीच्या १३८ पत्रावर असलेल्या तिथीवरून काढली आहे. ती अश्विन व. १ येते. प्रस्तुत पत्र गुरुदेवांच्या १५.९.१९११ या (पारमार्थिक पत्रव्यवहार, पृष्ठ ३३) पत्राला महाराजांनी लिहिलेले उत्तर आहे. तेथील 'हात शेकणे चालू ठेवावे का ?' या गुरुदेवांच्या प्रश्नाला 'शेकणे चालू ठेवावे' असे इथे उत्तर आहे.

पुस्तकात २२२ या पत्राचे २२२ (१) व २२२ (२) असे दोन भाग केले असलेतरी दोन्ही तिथे एकत्र छापले आहेत. २२२ (२) वर 'श्रीरामभाऊ रानडे यांना पत्र' असा उल्लेख आहे. २२२ (१) वर कोणाचाच उल्लेख नाही पण ते पत्र पंचनदीकरांना असावे असा अंदाज आहे. अधिक स्पष्टीकरण पुढे २२२ (१), नवीन क्रमाकांच्या २४८ पत्राच्या टिपणात आहे.)

इंचगेरी — अश्विन व. १

६.१०.१९११

श्रीसद्‌गुरुसमर्थ

आपलें पत्र पावलें । लिहिलें तें सर्व समजलें । बहुतानंदें मन भरलें। माझें रामराया ॥१॥ औषध नित्य घ्यावें । जप ध्यान करीत जावें । शेकण्याचेंही चालवावें । आपली प्रकृती पाहोन ॥ २॥ सद्‌गुरुसमर्थांची स्वारी । आहे मुक्कामीं इंचगेरी । राहून चार पाच दिवसवरी। पुढे जातील ज्ञानदायका ॥३॥ बहुत काय लिहिणें आहे । सर्वजण खुशाल आहे । तिकडील संतचरणीं ठेवित आहे । मस्तक आपलें ॥४॥

–आपला सेवक अंबुराव

पत्र २१९ — पान २१४

नवीन

क्रमांक

२१२ (टिपण :– महाराजांचा धाकटा मुलगा भीमराव याला नानासाहेबांनी (महाराजांचे वडील बंधू) दत्तक घेतले होते. त्या दत्तक विधानाचा हा मसुदा आहे. नानासाहेबांचा मुलगा मल्हारराव याचा जन्म १८७४ (१२८४ फसली) साली झाला असे पुस्तकातील २९८ पानावर आहे. त्यांच्या मृत्यूची तारीख १.१०.१९१० भाद्रपद वद्य १३ शके १८३२ असल्याचे एक टिपण मिळाले होते. पण त्याला कुठूनही दुजोरा मिळाला नाही. ती तारीख बरोबर असल्यास मृत्युसमयी त्यांचे वय ३६ वर्षे होते. त्यांचे लग्न किंवा संतती याविषयी काही माहीत नाही. भीमरावांचे दत्तकविधान केव्हा झाले हेही माहीत नाही. परंतु मल्हाररावांच्या मृत्यूची तारीख बरोबर असल्यास दत्तकविधानाचा मसुदा करण्याचा सन त्यांच्या मृत्यूनंतर किंबहुना वर्षश्राद्धानंतर म्हणजे साधारण १९११ येईल. नानासाहेबांचे वय १९११ मध्ये ७० च्या आसपास होते. मसुद्यात

त्यांच्या अशक्तपणाचा उल्लेख आहे. ही गोष्ट मसुदा १९११ साली झाला असावा या अंदाजाशी जुळते. एकूण अंदाजावरच हे पत्र इथे आणले.)

उमदी

१९११

महाराजांच्या हस्ताक्षरातील दत्तकविधानाचा मसुदा

डफळापूर अगर जत मर्जीप्रमाणे साधेल त्या ठिकाणी दाखला जबाब करून ठेवावा.

ऐसाजे (असे आहे की) माझी प्रकृती अशक्त असल्याने मजजवळ भिमाजी यास ठेवून घेऊन माझे हिश्शाची जमीन, घर, जागा, जिनगी, टाकळी कुलकर्णीपणाचा हिस्सा, डफळापूर व जत देशपांडेपणाचे उत्पन्न, माझे हिश्शाचे उत्पन्नाचे सर्व त्याचे ताब्यात देऊन त्याची वहिवाट चालत आली आहे. त्यावर अलीकडे तारीख माहे... चे फारकत झालेले कराराप्रमाणे सर्व इनामाची वहिवाट त्याची आहे. चौथाईही सदर भिमाजीच भरत आहे. तरी सदर अमुक... गावचे यादीबरहुकूम त्याचे नाव दाखल व्हावे. खंडेराव यशवंत (दादा) याचे उगीच पोकळ गाव (नाव ?) आहे, ते कमी होऊन जुडीदार (सारा भरणारा) भिमाजी मार्तंड असे नाव दाखल व्हावे. याप्रमाणे जत देशपांडे (कृष्णराव) याचे हिश्शाप्रमाणे ज्याचे त्यास दाखल आहेत. त्याप्रमाणे नवीन अगट ऐब अगटाप्रमाणे (कायद्याप्रमाणे) सदर भिमाजीचे नाव व्हावे म्हणून.

डफळापूर येथे

देशपांडेपणाचे वतनात माझे हिश्शाचे सर्व उत्पन्नास वहिवाट भिमाजी याचे नावे करून त्याचे ताब्यात लहानपणापासून दिले आहे. त्यावर तारीख अमुक... चे फारकतीप्रमाणे सर्व उत्पन्न माझे हिश्शाचे त्यास दिले असोन आता संस्थान डफळापूर येथे माझे हिश्शाचे हक्क रुसुम जो आहे तो भिमाजी मार्तंड नावे करून त्यास मिळावा. माझे अशक्तपणामुळे जाणे येणे होत नाही म्हणोन अर्ज.

आशीर्वाद उपरि[1]. सारांश तुमचे मर्जीप्रमाणे दाखला जबाब करून ठेवावा. कारण कागद दस्तात नमूद नाही. मोघम आहे. कोणीतरी पुढे

जिकीर करणेस हक्क उरू नये. त्याचे जबाबात सर्व उरकून दाखला करून उत्तर द्यावे म्हणजे झाले असे माझे मत आहे. यात तुमचे मत जैसे असेल तैसे करावे हा आशीर्वाद.

नोंद :-

१. शेवटचा परिच्छेद महाराजांनी भीमरावांना उद्देशून लिहिला असावा.

XXXXX

पत्र १८४ पान १८१

नवीन
क्रमांक
२१३ (टिपण :- दत्तकाच्या मसुद्याच्या पाठोपाठ हे पत्र आणले याचे कारण असे की भीमरावांनी इथे 'बालक नारायणाने उर्फ भीमाने' असा स्वतःचा उल्लेख केला आहे. नारायण हे नाव इतरत्र आलेले नाही. मग हे दत्तक गेल्यानंतरचे नाव असावे. या अंदाजाने हे पत्र इथे आणले.)

जमखंडी अश्विन व. ४
....१९११

श्रीगुरुसमर्थ

बालक नारायणाचा ऊर्फ भीमाचा चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग अति नम्रतेचा नमस्कार. अश्विन व. ४ पर्यंत वडिलांचे आशीर्वादेकरून श्रीसमर्थकृपेने आनंदित असो. जमखंडीत येऊन १२ रोज झाले. येथील आमचे मंडळी खुशाल आहेत. पाऊस फार झाला. आजवर सुरूच आहे. धारण सर्व जिन्नस चढत चालले. असो. समर्थकृपेच्या गोष्टी काय वर्णन कराव्या अगर लिहाव्या ? ते अशक्य आहे. भक्तिथाट सांगता लिहिता पुरवत नाही अशी भक्ती वाढत चालली... माझ्या जिवाच्या स्वभावाप्रमाणे चार आणे कमी झाली आहे, असे मला वाटते. सर्वजण, आजी वगैरे बरीच झाली आहे अशी स्तुती करतात, आनंद मानतात.

परंतु मनाची ओढी चार आणे कमी दिसलेली पुन्हा बारा आण्यांत मिळून जावी असे मनात येत आहे (पुन्हा बारा आण्यात म्हणजे विषयात मिळून जाईल की काय अशी भीती वाटते. तसे होऊ नये अशी इच्छा आहे.) परंतु सत्त्वाने आनंद आनंद वेळ जात आहे. असा अर्थ महाराज सांगत. पोथीवर घालून वोघ असतो (पोथीत ओघाने सांगितलेले असते) की ज्याचे द्रव्य बिन इमानीचे अगर ओक्रीचे (वक्रीचे म्हणजे हीन दर्जाचे) म्हणजे बिन इमानीचे (म्हणजे लबाडीचे) असेलतर ते द्रव्य असिस्तोपर्यंत अशा प्राण्यास मदांध बुद्धीने भ्रम पडून वक्रीचा भाव प्राण्यास असतो. द्रव्यनाश करून घेऊन पुढे दरिद्री होतो, अशी दशा होते. बुद्धीचा भ्रम जात नाही कारण धृतराष्ट्रास विदुरनीतीत किती सांगितले तरी बुद्धीचा भ्रम गेला नाही. तद्वत प्राण्यास कोणत्यातरी प्रकारचा भ्रम पडून जाऊन निद्रा अगर वाईट क्रियेकडे कूटस्थात भ्रम होऊन नाश पावतो. असा वरचेवर अर्थ सांगतात. मला मनास खात्री होत चालली आहे की धृतराष्ट्र म्हणजे गुरुकृपा असून अंध होऊन डोळ्यांपुढे काही प्रकाश मिळवला नाही तेव्हा आम्हीच धृतराष्ट्र असे म्हणण्यात काय अशक्य आहे ? विदुर म्हणजे अंतःकरणातील विकार दूर होत नाही तो दूर करून धृतराष्ट्रपणा सोडून नीतीने वागावे म्हणून सर्वांस वरचेवर सांगत आहेत, ते माझ्या मनात ठरल्याने सर्व हकीकत वडिलांस...

अपूर्ण

	पत्र १३९	**पान १४६**
नवीन	जमखंडी	कार्तिक व. १३
क्रमांक	सुबराय व नागप्पा	१८.११.१९११
२१४	यांना पत्र	

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक अनंत अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. कार्तिक व.

१३ पावेतो जमखंडी मुक्कामी आनंदरूप असो. मार्गशीर्ष शु. ७/८ इंचगेरीस येत आहो. इकडील सर्व मजकूर आनंद आनंद आहे. घरी वडील मंडळींस अति नम्रतेची प्रार्थना वडिलांनी सांगितली आहे ती श्रुत करावी. सप्ताह सामान इकडूनच खरेदी घेऊन येत आहे. त्याचा आकार अदमासे १२५ रुपये पाहिजे आहे. सुज्ञच आहां. कळविणेचे नकोच आहे. कळावे, ही विज्ञापना.

–नंदेप्पा याजकडून

	पत्र १४०	**पान १४७**
नवीन	तिकोटे	मार्गशीर्ष शु. ६
क्रमांक	भीमरावांना पत्र	२६.११.१९११, रविवार
२१५		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. मार्गशीर्ष शु. ६ पावेतो श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तिकोटीहून उदईक सोमवारी इंचगेरीस जात आहो. इकडील सर्व मजकूर आनंद आनंद आहे. जमखंडीहून तुम्हां एकंदर मंडळींस कार्ड लिहिलेच आहे. वाजंत्रीवाले व पुजारी यांस सवड असेलतर वडिलांनी समक्ष त्यांस सांगितलेच आहे, त्याप्रमाणे त्यांस सांगावे. एकंदर मंडळींस नेमाबद्दल प्रार्थना वडिलांनी फार फार सांगितली आहे ती श्रुत करावी ही विज्ञापना.

27.11.1911

–नंदेप्पा याजकडून

	पत्र १४२	**पान १४८**
नवीन	इंचगेरी	पौष शु. १३
क्रमांक	भीमरावांना पत्र	५.१.१९१२, मंगळवार
२१६		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. पौष शु. १३ पावेतो श्रीसद्‌गुरु–समर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. अप्पा रविवारी दोन प्रहरी येऊन पोचले. सर्व आनंद आहे. हवाही बरी आहे. तुम्हांकडील खुशालीचे खुलासेवार कार्ड लिहीत जावे म्हणजे खुलासा समजत जाईल. तूर्त आठ रोज येथे मुक्काम होईल. कळावे बहुत काय लिहिणे ? ही विज्ञापना. तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री नानासाहेब अप्पा यांस अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार फार फार आहे. संतमंडळींसही अति नम्रतेचा साष्टांग नमस्कार फार फार आहे. ही विज्ञापना.

–अंबाजी कुलकर्णी इंचगेरी

	पत्र १४३	**पान १४८**
नवीन	उमदी	पौष व. १
क्रमांक	नागप्पांना पत्र	९.१.१९१२
२१७		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. श्रीसमर्थकृपेने उमदी मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. तुम्हांस समक्ष सांगितलेप्रमाणे बकळ (वाकळ) लांबी रुंदी सोळापर्यंत असलीतरी फार कृपा होत आहे. अशी बेताने जरूर जरूर मामासाहेबांस विणविणेस सांगावे हो, नागप्पा महाराज. अगर भाऊराया याने मामांस अगत्य सांगावे. लवकर करवावी. एकंदर मंडळींस वडिलांनी अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. हिरवे लुगडे सोलापूरहून आणीतच आहां. कळावे.

–रामभाऊ याजकडून

पत्र २२९ **पान २२२**

नवीन
क्रमांक
२१८ (टिपण :– तिथीप्रमाणे पत्र इथे आणले.)

इंचगेरी पौष व. १०
१८.१.१९१२, मंगळवार

श्री

महाराज राजमान्य राजश्री भीमण्णा अण्णा मौजे निंबरगी, सेवेशी, सेवक अंबाजी श्रीनिवास कुलकर्णी, मुक्काम इंचगेरी शरणार्थी. विनंती विशेष. संगप्पा अण्णा चाटे यांनी आपण ४० चाळीस रुपये दिलेले आज रोजी पोचले. धारण कसे भरती करणे ते संगप्पाबरोबर लिहून कळवावे. ५/६ दिवसांनी पाठवून देणे ही विनंती.

–अंबाजी कुलकर्णी
मिती पौष व. १०, मंगळवार

पत्र १४४ **पान १४९**

नवीन
क्रमांक
२१९ (टिपण :– या पत्रावर फाल्गुन प्रतिपदा इतकीच तिथी आहे. ती वद्य असणार कारण पुढच्या १४५ पत्रावर प्रस्तुत पत्राचीच तारीख ३.३.१९१२ असून तिथी फाल्गुन वद्य १ आहे. म्हणून याही पत्राची तिथी तीच येते. एकाच दिवशी दोन्ही मुलांना साधारण त्याच मजकुराची पत्रे गेली आहेत.)

सोलापूर फाल्गुन व. १
भीमरावांना पत्र ३.३.१९१२

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. फाल्गुन प्रतिपदा रविवार. येथे श्रीसमर्थकृपेने

सोलापूर मुक्कामी आनंदात असो. विशेष. तुम्हांकडून पत्र वगैरे येऊन खुलासेवार कळवीत जावे. साधुमहाराजांचा उत्सव (चैत्र शु. ३) फार करून येथेच होणेचे मंडळींचे मत आहे. तुम्हीही तेथे सालाबादाप्रमाणे करीत आहां. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. इकडे हवा बरी आहे. तुम्हांकडील सर्व खुलासेवार सोलापुरास पत्र जरूर लिहावे. कळावे, हा आशीर्वाद.

	पत्र १४५	**पान १४९**
नवीन	सोलापूर	फाल्गुन व. १
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	३.३.१९१२, रविवार
२२०		

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. फाल्गुन वद्य १ रविवारपावेतो सोलापूर येथे समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे कार्ड मुचंडीहून लिहिलेले येथे काल येऊन पोचले. मजकूर समजला. आनंद झाला. वरचेवर खुलासेवार कळवीत जावे. इकडे हवा वगैरे बरी आहे. मामाही येथेच आहे. फार करून माझा चैत्र शु. ३ साधुमहाराजांचा उत्सव येथेच होईल असे मंडळींचे मत आहे. तुम्हांकडील व उमदीकडील खुशालीचा खुलासा लिहावा. सोलापूर पत्ता- बयाबाई सोहोनी यांचे वाड्यात चावडीनजीक या पत्राचे खुलासेवार उत्तर उमदीस कळवावे. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. कळावे, हा आशीर्वाद.

–उमदीकर याजकडून

	पत्र १४६	**पान १५०**
नवीन	सोलापूर	फाल्गुन व. २
क्रमांक	अंबुरावांना पत्र	४.३.१९१२, सोमवार
२२१		

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक अनंत दंडवत नमस्कार. फाल्गुन व. २ सोमवारपावेतो श्रीगुरुकृपेने सोलापूर मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. आम्ही सोलापुरास येऊन ७/८ रोज झाले. चैत्र शु. ३ येथेच होईल असे मंडळींचे मत आहे. असो. आम्ही चैत्र शु. ८/९ इंचगेरीस येत आहो. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. सर्वत्रांस नेमाने असणेबद्दल सांगितले आहे ते श्रुत करावे. शेट्टेपास कळवावे. आमचे इकडे येणेचे ठरले नव्हते. तितक्यात बोलावून घेतलेवरून येणे झाले. असो. कळावे, लोभ करावा ही विनंती.

–रामभाऊ फडणीस याजकडून

ताजा कलम– एकंदर मंडळींस सांगितलेप्रमाणे व तुम्ही एकंदर घरास गेल्याप्रमाणे सोलापूर येथे चौकीनजीक बयाबाई सोहोनी यांचे वाड्यात उत्तर यावे.

	पत्र १४८	**पान १५१**
नवीन	सोलापूर	फाल्गुन व. ८
क्रमांक	भीमरावांना पत्र	११.३.१९१२, सोमवार
२२२		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. फाल्गुन वद्य ८ रोज सोमवार सोलापूर मुक्कामी श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र पोचले. मजकूर पाहून आनंद आनंद झाला. असे स्मरणपूर्वक महिन्या–दीड महिन्यात पत्र पाठवून समाचार कळविला तो फार आनंदच आहे. कृष्णाकडून सर्व हकीकतीचे पत्र परवा आले त्यावरून तुम्हांकडील सर्व समाचार समजला. नंतर तुमचेही पत्र आज आलेवरून तोही आनंद झाला. चैत्र शु. ३ झाल्यावर सावळसंगावरून शु. ८/९ इंचगेरीस जात आहो. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. सप्ताहास[1] वाजंत्रीवाल्यास इंचगेरीस

जाण्यास सांगावे. त्याची मर्जीखुशी असल्यास येईल. साधुमहाराजांचा उत्सव सालाबादाप्रमाणे करीतच आहां. लिहिणे नको आहे. नंदेप्पा जमखंडी हा देऊळ[2] बांधण्याचे कारखान्याकरिता इंचगेरीस आहे. येथे आला नाही. तिकोटी नरसिंहाचार्य आले होते. ते सर्व गोष्टी जमवून घेत आहेत. चैत्र मासी उत्सवास इंचगेरीस येण्यास त्यांना लिहिले आहे. उत्सव झाल्यावर उमदीसही घेऊन येत आहे. नंतर सर्व खुलासा होईल. बाकी मजकूर आनंद आहे. हवा वगैरे बरी आहे. सहजी कार्ड लिहिण्यास काही अडचण नाही असे असता लिहीत नाही. असो. कळावे, हा आशीर्वाद.

–उमदीकर याजकडून

नोंदी :–

१. हा निंबरगी महाराजांच्या पुण्यतिथीचा सप्ताह.

२. निंबरगी महाराजांच्या इंचगेरी येथील समाधीवरील देऊळ.

xxxxx

पत्र १४७ पान १५०

नवीन क्रमांक २२३

(टिपण :– हे पत्र व १४८ पत्र जवळजवळ एकच आहेत. तिथी व तारीख १४८ पत्राप्रमाणेच आहेत. १४८ पत्रामध्ये मजकूर जास्त असल्याने आधी घेतले आहे व पूर्ण लिहिले आहे. १४७ मध्ये त्यातलाच काही भाग असल्यामुळे ते पुन्हा लिहिले नाही.)

पत्र १४९ पान १५२

नवीन क्रमांक २२४

इंचगेरी — चैत्र. व. ६

कबीरसाहेबांना पत्र — ७.४.१९१२

श्रीसद्गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. चैत्र व. ६ इंचगेरी मुक्कामी समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र पावले. नंदेप्पास व वडिलांस मजकूर समजून आनंद आनंद झाला. खुदासाहेब याप्रमाणे नाव ठेवावे. घरचे मंडळींचे इच्छेप्रमाणे तेही ऊर्फ नाव ठेवावे. इकडील सर्व मजकूर आनंद आनंद आहे. हवा वगैरे बरी आहे. चैत्र उत्सव (निंबरगी महाराजांची पुण्यतिथी) थाटाने झाला. येथे देऊळ बांधण्याचा कारखाना सुरू केला आहे. त्या कारखान्यावर नंदेप्पा येथेच राहिले आहेत. मल्लप्पा, शिखरप्पा (शेखरप्पा ?) व साहेब, कबीरसाहेब, शंकरप्पा, वेंकटराव वगैरे एकंदर मंडळींस नेमाबद्दल प्रार्थना वडिलांनी सांगितली आहे ती श्रुत करावी. बाकी मजकूर आनंद आहे. कळावे, लोभ करावा ही विनंती.

–नंदेप्पा न्यामगौड याजकडून

पत्र २३६ पान २२७

नवीन क्रमांक २२५

(टिपण :– २३३ व २३६ ही दोन्ही पत्रे गंगाधरची (महाराजांचा मेव्हणा) आहेत. यांपैकी २३६ पत्र आधीचे असावे. २३६ मध्ये पैशाची मागणी असून २३३ मध्ये पैशांचा हिशोब दिला आहे. २३३ पत्रात 'परवाचे पत्रात पुष्कळ पाल्हाळ मजकूर होता', असे असून २३६ पत्रात हा पाल्हाळ आहे. म्हणजेच २३६ पत्र २३३ च्या आधी घेतले पाहिजे. २३६ पत्रावरील मे महिन्याचा उल्लेखही चुकीचा आहे. तो महिना एप्रिल किंवा त्या आधीचा असावा.

आता २३६ या पत्राबद्दल बोलायचेतर इथे सुरुवातीस गंगाधरने स्वतःबद्दल काही मजकूर लिहिला आहे. नंतर एकदम दादा पंडितांना पत्र लिहिणे सुरू केले आहे. पुढे भक्तिमार्गाशी संबंधित तो मजकूर

आहे. त्यात काही महत्त्वाची वाक्ये व अवतरणे आहेत. महाराजांचे बोलणे अनेक वेळा गंगाधरच्या कानी पडले असणार. त्यांतील मन मानेल ती वाक्ये उचलली आहेत. एकूणच हा सर्व मजकूर अशुद्ध, दुर्बोध, विस्कळित आहे. ही दोन पत्रे गंगाधरच्या व्यक्तित्वावर चांगला प्रकाश टाकतात. 'घरच्या' मंडळींचा महाराजांना कसा त्रास होत होता ते या दोन पत्रांवरून स्पष्ट होते.)

२८.४.१९१२ च्या थोडी आधीची

श्री

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, तत्चरणी लडिवाळ मुग्ध बालक गंगाधर याचा अति नम्रतापूर्वक त्रिकाळी चरणी शिरसाष्टांग नमस्कार. तदुपरि विज्ञापना. तारीख... पावेतो वडिलांचे अनुग्रहेकरून आनंदरूप असो. विज्ञापना. आपली स्वारी गेल्यावर अलीकडे पत्राने परामर्श झाला नाही. तत्रापि सवडीप्रमाणे झाल्याने अंतःकरणात आनंद होऊन मन संतोष होत आहे. माझा अभ्यास समक्ष पाहिलेप्रमाणे आनंदरूप चालला आहे. इकडील सर्व मंडळी खुशाल आहेत. वडिलांकडून खुंशालीचे उत्तर स्मरण होईल तेव्हा लिहून येईल अशी आशा बाळगून आहे. इंग्रजी अभ्यासास, कॉपी वगैरे घेण्यास, बुक वगैरे घेण्यास व शरीरभूषण ठेवण्यास व मुलाचे स्वभावास उपाय नाही, तरी काहीतरी खाण्यास या एकंदरांस मुख्य म्हणजे द्रव्य असले पाहिजे. म्हणजे सर्व थाटाने आनंदाने होत आहे. अभिज्ञच आहां. मी बाळकाने लिहावे असे काही नाही. सारांश मजला तूर्त पाच-सहा रुपये पाठवावे. कळावे. वडिलांप्रति विशेष लिहिण्याची बाळकास शक्ती नाही.

तीर्थस्वरूप दादा पंडित अण्णा यांस शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. वडील जन्म दिलेले, संरक्षण केलेले समर्थ मंडळींस वर लिहिले आहे, त्यावरून तुम्हांस श्रुत होऊन सर्व मनन होईलच. त्याप्रमाणे करावे. घरी वडील मंडळींस बालकाचा नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार प्रविष्ट करावा. मी खुशाल आहे असे कळवावे. आता

भक्तिमार्गातील काही मजकूर येथे वडिलांनी सुचविले त्याच्या योगाने लिहून कळविले म्हणून यात मी निर्दोषी आहे असे समजणेस उघड होत आहे. अभिज्ञच आहां. असो. प्रवृत्ती अगर निवृत्ती दोन मार्ग आहेत. द्वैत-अद्वैत, ज्ञान-अज्ञान, निंदा-स्तुती, वर्म-स्नेह, कथा-अनुभवी, लोभ-निष्ठूर असे दोन मार्ग असल्याने प्राण्यास एक अभ्यास पडून कथारूपी जडून गेल्याने मनात त्यात धैर्य असणारे देवादिक समर्थ मागे होऊन गेले त्यांसही असेच प्रसंग पडले व झाले. वनवास भोगले. ब्रह्मादिकांस चुकत नाही, होणारे भविष्य देवादिकांस चुकले नाही. अशा समजुतीने मनात ठरवून घेऊन त्या अभिमानाने, प्राण गेलातरी अभिमान सोडणार नाही असा सिद्धांत, धादांत, वेदांत ठरवितात. आता या गोष्टीस उपायच नाही. दोन (दुसरा) अर्थ आहे, तो अर्थ प्रचितीस आला नाही. प्रवृत्ती कथाभागाची जडून गेल्याने तेच धरून बसला, त्यास कोणाचा उपाय चालत नाही. यास मुख्य विश्वास अंतःकरणापासून ठेवून जाणलेल्या गोष्टीचे विवरण केल्याने कळो येतो. तोपर्यंत एकदेशी प्रवृत्तिमार्गाने चाललेल्या प्राण्यास काहीच न कळता मायाजाळात पडून, दुःख भोगून रात्रंदिवस दगदगीत आयुष्य घालवून शेवटी दुःखदायक नीच योनीत पडतो. पुन्हा तीच धांदल. एकाची एकाने नरडी धरणे, भुतास भूत होऊन दुःख देणे अशा मायाजाळात अडकून पडणे यास दुसऱ्याचा उपाय नाही. आपोआप समजून घेणे आहे. यात लोभ अगर क्षोभ म्हणजे राग याचेच बरोबर स्मरण राहते. या दोन्ही गोष्टी अधोगतीच्या आहेत असे शरीरास समजून येत नाही. का म्हणालतर, शरीर अनित्य आहे, त्या अनित्य शरीरास जे जे सुख अगर वृत्ती, अगर ज्ञान-अज्ञान, पुण्य-पाप, मान-अपमान, दानधर्म, देव-गुरू, स्नान-ध्यान इत्यादी सर्व जोडलेले आहेत. तेही अनित्यच आहेत. आता या प्राण्याने कोणत्या आधाराने वागावे हे काहीच कळून येत नाही म्हणून प्राणी मायाजाळात पडतो, दुःख भोगता भोगता दररोज दगदगीत वेळ घालवून लोभी अगर क्षोभी होतो. करिता प्राण्याने सत्संग धरून विश्वासाने अंतःकरणापासून वागावे म्हणजे त्या योगाने

आनंदात वेळ जाऊन घडी एक जाती आनंदाची, गोविंदाची असा वेळ जाऊन वेळोवेळी आनंद प्रसंग पडून त्या सुखाने लोभ-क्षोभ दोन्ही राहत नाही. 'विधात्याचा रेशे कोण फिरवी, विधात्याचे रेशा सद्गुरू फिरवी[१]', 'ब्रम्हकू मेक मारी[२]' अशी वाक्ये आहेत. असे असूनही प्रवृत्तिमार्गाने जाऊन 'माझे नशीबच असे' असे समजून विनाकारण जन्माची हानी करून घेतो, यास दुसऱ्यांचा उपाय नाही. असो. प्रपंचात प्राण्याने जसे वागावे तसे वागत नाही. दुसऱ्यांस आपल्यापासून सुख व्हावे, आनंद व्हावा, असे कुठेच स्मरण नसते, चिंतन नसते. फक्त आपल्याच लाभ-तोट्यावर नजर असते. ही प्राण्याची वागणूक नव्हेच. दुसऱ्यांस आनंद द्यावा. आपल्याकडून दुसऱ्यांना लाभ व्हावा, सुख व्हावे, दुसऱ्यांच्या मनात असावे असे कळत नाही. का, तर एकदेशी अभ्यासामुळे. यात 'सांगणे वाघणे काम नसतो[३]' ज्याचे त्यानी आपोआप समजून घेतले पाहिजे अशा गोष्टी आहेत. समर्थांचे वाक्य- 'देस काळ पाहून चालती'[४] असे थोडे, असे समर्थांचे वाक्य आहे. ज्याचे त्यास कळून येतच नाही, म्हणून त्याला मायाजाळ बाधतो. असो. सारांश, आपल्याकडून दुसऱ्यांस सुख मिळावे, आनंद वाटावा, आनंद द्यावा, मर्यादा राखावी, त्यांचे उरी राहावे, अशाने वृद्धी होते, सुख होतो, आनंद होतो. अशा प्रकारे न्याय-अन्याय दोन्ही आपल्याकडेच असतात. दुसऱ्यांवर निमित्त ठेवणे, आपलेच खरे आहे असे समजणे हे मायाजाळातील, तमातील गोष्ट आहे. त्यालाच ज्ञान समजून अडकून बसतो यास उपाय नाही. या एकंदर प्रकारास समर्थ वाक्य- जे कूपामध्ये बेडूक राहात । ते काय जाणती पयोब्धीची मात । तेवी गुरुभक्तीचे खूण निश्चित । मायाल्लोभी यास कळेना ।। की पिपीलिकाचे मार्गाने । पिलीलिकाच चालू जाणे । तेवि वैष्णवाचे मनीची खूण । भाविकावाचून कळेना ।। असे ऐकुनी वचनोक्ती । म्हणे काय सांगावे तुम्हां प्रती । मीन नीटच धारा चढती । ते आणिका गती अवघड ।। हे सर्व जाणून आहांतच. मी लिहावे असे काही नाहीच. अभिज्ञच आहांत. तुम्हां वडिलांपुढे मी बालक सत्तेने जशी वाघाची पिले वाघापुढे खेळतात, तशी तुम्हांपुढे ही

हकीकत ठेवली आहे. हे मनात येईलच. सारांश मी आनंदात आहे. वरचेवर पत्र पाठवून बालकाचा परामर्श होत असावा हेच मागणे आहे. कळावे, ही विज्ञापना. मुख्य धर्म प्रवृत्ती व निवृत्ती, त्यांपैकी प्रवृत्तिधर्म तरी कोठे राहिला ? फक्त शरीरधर्म व भाव यांचाच धर्म ठाऊक झाला आहे. परंतु स्वधर्म कोठेच राहिला नाही. आता मी सावकार आहे, तरी कुळास सुख द्यावे, सुखात ठेवावे, त्यांची वागणूक अगर गैरपणा वगैरे मनात न आणता त्यांचे वासनेने असे वेळप्रसंग घडून वनवास भोगतात या करंटेपणास दुसऱ्यांचा उपाय नाही, ज्याचे त्यास समजणे आहे. अशा प्रसंगात आपणच समजून त्यांना सुख द्यावे हा माझा धर्म होय, म्हणून क्षमारूपी आनंदाने आपला धर्म राखतो (राखावा). याप्रमाणे वडील आपला धर्म राखतात की आपल्याकडून मुलास सुख व्हावे, लोभ व्हावा. गुरूने याचप्रमाणे सहस्र अन्याय जरी असले तरी आपल्ला शेरणागतास क्षेमा करून सुखात ठेऊन, आपले पधवी देतो, असा धर्म राखल्याने वर लिहिल्याप्रमाणे दुसऱ्यांस सुख द्यावे, संतोष द्यावा व आपल्या लाभ–तोट्याकडे लक्ष अंतःकरणापासून ठेवू नये, स्वधर्माकडेच लक्ष ठेवावे असे असल्याने धन्य धन्य म्हणून घेतात व मग थोरपणा राहतो. झिजल्यावाचून थोरपणा कसा राहील ? हा प्रवृत्तिमार्ग झाला. आता निवृत्तिमार्गातीलतरी मुळीच कळत नाही. 'प्रज्ञावाचून जेन्मवरी कोटी यज्ञे केले. येका अंगुस्ठावरी तप केले'[५] तरी समजणार नाही. मुख्य गुरुप्रज्ञा पाहिजे तेव्हा कळून येणार आहे. आणखी अनुमान केले असता कनिष्ठ धर्मात धर्म आहे असे समजणेस मन उद्युक्त होते. कनिष्ठ, मध्यम दोन्हीत कल्प (योग्य) निवडण्याचे वेळी मुख्य जागा सुटते. तिसरे कनिष्ठ जागा ओलांडून एका मैलावर दोन्हीस उत्तम–मध्यमास जागा देऊन प्राणी भोग भोगतो. वनवास सांगता येत नाही, बोलता येत नाही असे दुःख झाले व कठीण प्रसंग पडलातरी कनिष्ठ जगात असलातरी त्याने कठीण प्रसंगी सहाय्य केले. आता त्या कनिष्ठास जागा दिली नाहीतर अनुमान निघते की कोठे धर्म राहिला ? असो. पूर्वी वहिवाट घरातील जनावर बाहेर परगावास नेले म्हणजे दाखला

लागत होता. त्याप्रमाणे आता उत्तम मध्यमास दाखला पाहिजे. या एकंदरांवरून मुख्य दोन मार्ग आहेत. दोन प्रकारची माया आहे. प्रकृति-पुरुष असे दोन प्रकार आहेत. एकदेशी अर्थ कथाभागाचा समजून प्राणी बुडू लागलातर त्यास उपाय नाही. असो. हे सर्व अभिज्ञ मंडळी समजूनच आहां. मी उगीच अज्ञ मूलपणाने समजून काहीतरी पुष्कळ अक्षरे लिहिल्याने अक्षर घोटेल, हात साफ होईल अशा हेतूने लिहून काही कल्पित विचक्षण मजकुराने अक्षर कसे येते हे समजून बहुभाषा लिखित केले आहे, तरी न्यून क्षमा होऊन पुढे निरंतर लिहिणेचे ठिकाणी वृद्धीच वाढवावी, लिहवावे. करिता एकंदराचा अक्षराचा पुन्हा लिहवाल अशी आशा बाळगून उत्तराची वाट पहात आहे. म्हणजे मनास उत्तेजन मिळावे असे लिहून येईल असे करावे. सुभाषा, अन्वय, प्रास, किंवा स्त्रीलिंग पुल्लिंग असे युक्तीचे लिहिणे असे व्याकरण पंडितावाचून कळत नाही. तत्रापि कानडी भाषेचे अभ्यासाचे गोष्टीवर जे लिहिले ते शुद्ध होऊन अर्थांतरयुक्त वाक्याचे लिखित होईल तो दिन आनंदाचा असे वाटून त्या अनुसार उत्तर लिहिण्यास उद्युक्त होईल. मूढ अज्ञानपणाला, चुकीला क्षमा होऊन युक्त मजकुराचा विचार कळवावा ही विज्ञापना.

नोंदी :-

१. विधात्याची रेषा कोण फिरवी । सद्गुरू फिरवी -(संदर्भ मिळाला नाही.)

२. ब्रह्मकू मेख मारी -(संदर्भ मिळाला नाही.)

३. सांगणोवांगणीचें काम नव्हें । आपुल्या अनुभवें जाणावें । प्रत्ययेविण जें सिणावें । तेंचि पाप ॥ -(दासबोध, १०.१०.५३.)

४. जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देश काळ प्रसंग जाणे । तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ॥ -(तत्रैव, १४.७.२८.)

५. कोटी यज्ञ केले निराहारी निरोदक । नेत्र करूनी सूर्याभिमुख । येका अंगुष्ठावरी देख । मंत्र जपे सबीज ॥ -(एकनाथ, भावार्थरामायण, प्रसंग ५४, ओवी ८०.)

xxxxx

नवीन क्रमांक २२६

वैशाख शु. १२
२८.४.१९१२

श्री

बाळक गंगाधर उर्फ अण्णाचा दोन्ही कर जोडून चरणी मस्तक ठेवून त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. वैशाख शु. १२ पावेतो वडिलांचे अनुग्रहेकरून उत्तम आनंदरूप असो. विशेष. इकडील सर्व मंडळी खुशाल आहेत. निवरगीहून परवा सोमवारी मंडळी येऊन पोचली. वडिलांचे पत्र पाहून आनंद झाला. असाच निरंतर बाळकाचा परामर्श घेऊन आनंदात ठेवणारे वडील आपण आहांत. मी अज्ञान मंद बुद्धीचा, लिहावे अशी शक्ती नाही, तत्रापि आज्ञोत्तर असल्याने मी निर्दोषी असे मन उद्युक्त आहे. परवाचे पत्रात पुष्कळ पाल्हाळ मजकूर होता. अक्षराकडे अलक्ष झाले. अज्ञान बाळकाचे चुकीच्या गोष्टींकडे लक्ष गेले. आनंद होण्यास विलंब झाला असे दर्शविले. मूढ बालकाच्या चुकीची क्षमा होऊन निरंतर ज्ञानाची वृद्धीच करावी अशी बाळकाची मागणी आहे. समक्ष सांगितलेल्या गोष्टीस फेर पडला तरी माफीच करावी. तशी केलीच आहांत. यात काही लिहिणे नकोच आहे. आता माझा अभ्यास बराच चालला आहे. घरी तगादा व मजवर नजरही ठोका. त्यायोगे अभ्यासाचा योग व वेळ घडतो. असो. आता वडिलांस हिशोब दाखवतो[1].

२	आपण आलेवेळी समक्ष रुजूच दिलेले आहे. रुपये २ बुक वगैरेस खर्च झाले होते.
१०॥–	धोतर जोडा २ व मला धोतरपान १ व थोराचे बाराबंदी २ व कोट १ व मला तीन सदरे, कोट, टोपी मिळून ७॥– व चर्म जोडा २ रु. ॥ व शिंपी मजुरी १ रुपया एकूण १०
०॥०	फी ०।० व स्लेट ०।० कागद वगैरे किरकोळ मिळून
१३८–	तेरा रुपये खर्च झाले आहेत. बाकी शिल्लक २ रुपये.

नोंद :-

१. वर गंगाधरने दिलेला हिशोब जमत नाही.

XXXXX

पत्र १५० पान १५२

नवीन क्रमांक २२७

वैशाख व. १०
११.५.१९१२

चिलर जावक नंबर ४९८० ता. ११.५.१९१२ इंडि मामलेदार कचेरिंद हिंचगेरि ग्रामस्थरिगे हुकूम. निम ऊर सर्वे नंबर १६५ दरल्लि देवस्थानकट्टिदु परवानगि इल्लदे कट्टिदबग्गे केलस नडदु ५० रुपायि दंड तगोंडु अष्ट क्षेत्र सदरील सर्वे नंबरदल्लिंद वजा माडि सार्वजनिक केलसदबग्गे assign माडि अदरमेलिन वजा आगबेकंत मेहेरबान डेप्युटि इलाखे साहेबबहादुर अवरु नं. ५१२ ता. २२.२.१२ ने अभिप्राय कोट्टिदु मंजूर माडिदबग्गे मेहेरबान Collector साहेबबहादुर अवरु नंबर २४८ ता. १८.३.१२ ने बंदिरुत्तदे. आ प्रकार रक्कम५० रुपायि जमा आगिरुत्तदे. मुंदिन तजवीजिबग्गे हुजूरगे रिपोर्ट आगिरुत्तदे. दाखले इटकोळ्ळरि ११.५.१२

Sd नाडकर्णि
मामलेदार इंडी

स्वैर मराठी रूपांतर

वैशाख व. १०
११.५.१९१२

किरकोळ जावक नंबर ४९८०

इंडी मामलेदार कचेरीकडून इंचगेरी ग्रामाधिकारी यांना हुकूम. तुमच्या गावातील सर्व्हे नंबर १६५ मध्ये परवानगी न घेता देवस्थान बांधले आहे. त्या बाबतीत कारवाई होऊन ५० रु दंड वसूल करून देवळाचे क्षेत्र (भाग) वरील सर्व्हे नंबरमधून वजा करावा. तेवढा भाग

सार्वजनिक कामाकरिता राखून ठेवून त्या सर्व्हेमधून वजा करावा असे मेहरबान डेप्युटी इलाखे साहेबबहादूर यांनी नंबर ५१२, तारीख २२.२.१९१२ यानुसार मंजूर केले आहे. मेहेरबान कलेक्टर साहेब-बहादूर यांच्या नंबर २४८, तारीख १८.३.१९१२ अन्वये हे आले आहे. त्यानुसार ५० रुपयांची रक्कम जमा झाली आहे. त्याप्रमाणे दाखला तुमच्या रेकॉर्डवर ठेवून घेणे.

११.५.१९१२ — सही- नाडकर्णी,
मामलेदार इंडी

नवीन क्रमांक २२८	**पत्र २१८** चडचण	**पान २१४** ज्येष्ठ शु. ८ २४.५.१९१२

श्रीरामचंद्र प्रसन्न

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक जीवबाळप्पाचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. ज्येष्ठ शु. ८ चडचण मुक्कामी समर्थकृपेने, वडिलांचे आशीर्वादिकरून आनंदरूप असो. विशेष. माझी प्रकृती आता बरी आहे. शक्तीही बरी होत चालली आहे. काही काळजी करू नये. ज्येष्ठ पौर्णिमेस इंचगेरीस गुरुवर्य महाराज व मी जात आहोत. ज्येष्ठ बहुळ (कृष्णपक्ष/वद्य पक्ष) ४/५ स सोलापुरास महाराज जात आहेत. तेथून पत्र घालीत आहे. हे पत्र पाहताच उत्तर इंचगेरीस वडिलांकडून येऊन समाचार कळल्यास आनंद होईल. पोस्ट होर्तीतून मौजे इंचगेरी येथे अंबुराव महाराज कुलकर्णी यांचे नावाने लिहिल्यास मजला पोचत आहे.

पत्र २२३ पान २१७

नवीन
क्रमांक

२२९ (टिपण :- जीवबाळप्पा संगम यांच्या २१८ पत्राला हे उत्तर असावे.)

जीवबाळप्पा संगम यास पत्र

पत्र पोचले आपले । मन अत्यानंदे भरले । त्याचे वर्णन जरी केले। तरी कमी होय ।।१।। अंतःकरण करावे निर्मळ । मन करावे निश्चळ। विश्वास ठेवावा जीवूबाळ । सद्‌गुरुवचनावर ।।२।। नेम पाळावा कडकडीत। आठवावे नाम घटकेघटकेत । ऐसे आहे सांगणे बहुत । समर्थांचे आपणांस ।।३।। बहुत काय लिहिणे आहे । सर्वत्र खुशाल आहे । समर्थांनी सांगितला आहे । नमस्कार आपले वडिलांस[1] ।।४।।

–रामभाऊ फडणीस

नोंद :-

१. जीवबाळप्पांचे वडील कृष्णराव संगम. कृष्णराव व जीवबाळप्पा या दोघांनी ७.४.१९०९ या एकाच दिवशी नाम घेतले –(सोनेरी पाने, पृष्ठ १८२.)

xxxxx

पत्र १९१ पान १९१

नवीन
क्रमांक

२३० (टिपण :- हे पत्र जीवबाळप्पांना असल्यामुळे इथे आणले. यावर तिथी, तारीख नाही. केवळ नावाकरिता आणले.)

श्रीगुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य राजश्री जीवबाळप्पा संगम महाराज, मुक्काम विजापूर, आज्ञाधारक रामभाऊ फडणीस मुक्काम जमखंडी याचा कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने आनंदरूप असो. इकडील

सर्व आनंद आनंद आहे. सप्ताह सुरू आहे. उत्सव... चे ते पत्री लिहिता येत नाही. तो थाट, उत्सुकता, प्रेम, आनंद काय सांगू ? सांगता येत नाही. ज्याचे त्याने अंतःकरणातील गोष्टी अंतर्यामी कूटस्थातील कूटस्थातच समजणार आहेत. असो. याप्रमाणे नेम व निष्ठा पाळावी म्हणून श्रीसमर्थांनी फार फार फार प्रार्थना व नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे. वडिलांसही सहजी कळवावे. सप्ताहात उत्सवात भेटीचा लाभ होतच आहे. तुकाराम महाराज यास सांगावे की एकंदर मंडळींस वडिलांनी नेमाबद्दल नम्रतेचा नमस्कार फार फार फार सांगितला आहे. तो सर्वांस विठ्ठल सख्यास तुम्ही सांगावा. घड्याळाची मजुरी विचारून उत्तर पाठवावे. विष्णुपंत दादासाहेब, रामराव आलमेल, रामराव होर्ती, दत्तप्पा महाराज सर्वांस कळवावे. सर्व प्रज्ञांपैकीच आहेत. कळवावे असे नकोच आहे. सुज्ञांप्रती विशेष काय आहे ? ही विज्ञापना.

पत्र २०६ पान २०२

नवीन
क्रमांक
२३१ (टिपण :- याला न तारीख न तिथी. मजकूर असा आहे की कुठेही बसू शकतो. मागच्या पुढच्या पत्रांशी विसंगती येऊ नये म्हणून इथे आणले.)

उमदी

डॉ. भिडे यांना पत्र

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृपासागर देवमान्य महाराज भिडे डॉक्टरसाहेब वस्ती मळा, उमदी पौ। (पोस्ट) उमदी. कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती, विशेष. भेटीची इच्छा झाल्याने हे मागणे केले आहे. काही अंश देहभावावर, म्हणजे दात लुकलुक करीत आहे तो काढविणेचे आहे. दोन्ही प्रकारचा आनंद द्याल म्हणून प्रार्थना केली आहे. तरी आज संध्याकाळी सवड असल्यास

यावे अगर उदईक सकाळी पहाटेस येऊन जरूर असल्यास जावे. माझे मत दोन मुक्काम येथे व्हावेत. अशी आशा बाळगून विनंती केली आहे. कृपा–लोभ असावा ही विनंती.

आपला सेवक

भाऊ

गाडगीळ याचा नमस्कार. वरील विनंती मान्य करून आल्यास आनंद वाटणार आहे. निवांत भेट होऊन बरेच दिवस झाले आहेत. ही विनंती.

–आपला हरी गाडगीळ

पत्र २२०   पान २१६

नवीन

क्रमांक

२३२ (टिपण :– काही संदर्भ लागत नाही. कुठेही बसू शकते. मागच्या पुढच्या पत्रांशी विसंगती नाही म्हणून इथे आणले.)

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. तात्या यलमर याने येऊन सांगितले की तुम्ही फार काळजीत आहां. म्हणून रामभाऊस पाठविले आहे. कोणत्याही प्रकारची काळजी करू नये हा आशीर्वाद.

पत्र १५१   पान १५३

नवीन

क्रमांक

२३३ (टिपण :– हे पत्र शैलीवरून कृष्णरावांनी लिहिलेले असावे.)

जत   ज्येष्ठ शु. १५

भीमरावांना पत्र   १.६.१९१२, गुरुवार

श्रीगुरुसमर्थ

आशीर्वाद उपरि. परवा पत्र पाठविले ते पोचले असेल. तीर्थरूप अप्पा हे काल बुधवारी आले आहेत. येथेच मुक्काम आहे. सोमवारी डफळापुरास जावे म्हणतात. येताना दासबोध व रामदासी मनाचे श्लोकांची वही असे बसप्पाचे दप्तरांत विसरून आले असल्याने त्यांचा खोळंबा होत आहे. करिता दासबोध बुक, मनाचे श्लोकांची वही व हातातील वाजविण्याच्या चिपळ्या असे राहिलेले आहेत ते मुद्दाम पाठवून देणेचे करावे. फारच खोळंबा आहे. लवकर पाठवून देणेबद्दल अप्पांनी सांगितले आहे. ते मुद्दाम सनदी शिपाई अगर कोळीबरोबर पाठवावे. वरकड मजकूर अधिकोत्तर नाही. कळावे, हा आशीर्वाद.

पत्र १५३ पान १५४

नवीन क्रमांक

२३४ (टिपण :- १५२ पत्र आषाढ शु. १४ चे असून १५३ पत्र आषाढ शु. १३ चे आहे. म्हणून १५३ आधी घेतले. त्याची तिथी तारखेवरून केलेल्या हिशोबाप्रमाणे श्रावण शु. ११ येते. परंतु इथे तिथी आषाढातील आहे याचा अर्थ असा की ज्येष्ठ किंवा आषाढ अधिक असावा.)

कनमडी आषाढ शु. १३

भीमरावांना पत्र २६.७.१९१२

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. मिती आषाढ शु. १३ कनमडी मुक्कामी श्रीसमर्थकृपेने आनंद आनंदरूप असो. विज्ञापना. कनमडीवरून हट्टीवरून आषाढ वद्य ४/५ सुमारास विजापुरास जात आहोत. नंतर इंचगेरीस (महाराज श्रावण सप्ताहास जात असावेत). याप्रमाणे आनंद आनंद व सर्व खुशाल आहे. हवा वगैरे बरी आहे. पाऊस साधारण झाला आहे. पुस्तकास येणारे मंडळींस वडिलांनी नमस्कार फार फार

सांगितला आहे तो श्रुत करावा. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. कळावे. लोभ पूर्ण असावा ही विज्ञापना.

–रामभाऊ फडणीस याजकडून

पत्र १५२ पान १५४

नवीन क्रमांक २३५

(टिपण :– मागच्या पत्राच्या दुसऱ्या दिवशीची तिथी या पत्रावर आहे म्हणून तारीख पुढची येते.)

कनमडी आषाढ शु. १४

करबसप्पा आवटींना पत्र २७.७.१९१२

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. आषाढ शु. १४ पावेती श्रीसद्‌गुरु–समर्थकृपेने कनमडी मुक्कामी सुखरूप असो. विशेष. आषाढ व. ३/४ कनमडीवरून विजापुरास जात आहो. नंतर इंचगेरीस येत आहो. एकंदर आजपावेतो भक्तिथाट आनंद आनंद चालला आहे. पत्री लिहिता येत नाही. पाऊस साधारण आहे. हवा वगैरे बरी आहे. एकंदर मंडळींस नेमाबद्दल वडिलांनी फार फार प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. कळावे, ही विज्ञापना.

–बसप्पा कल्लप्पा मुधोळ, कोळगिरीकर

(बसू कोळगिरी)

पत्र १५४ पान १५५

नवीन क्रमांक २३६

जत आषाढ शु. १५

अंबुरावांना पत्र २८.७.१९१२

श्रीगुरुसमर्थ

बाळकाचा अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. श्रीसमर्थकृपेकरून इकडील सर्व आनंद असो. विज्ञापना. आपले मागील पत्राप्रमाणे पासोडी तयार करविली आहे. सहा रुपये किंमत पडत आहे. पाठविणेस आज्ञा झाल्यास उमदीकडून पाठवीत आहे. जास्त किंमत आहे असे वाटत असल्यास मजला येथे ठेवून घेत आहे. फार जाड काढली आहे. आपले आज्ञेनुसार तजवीज करीत आहे. तीर्थरूप अप्पांची स्वारी कनमडीहून विजापूरकडे आज जाणार होती. विजापुराहून इंचगेरीकडे येणार. वरकड मजकूर अधिकोत्तर नाही. सुज्ञांप्रत विशेष काय लिहिणे ? ही विज्ञापना.

–उमदीकर कृष्णाकडून

	पत्र २०४	**पान २००**
नवीन	इंचगेरी	श्रावण व. ४
क्रमांक	रामराव होर्तीकरांना	२.९.१९१२
२३७	असावे	

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक अनंत अति नम्रतेचा नमस्कार. श्रावण व. ४ पावेतो श्रीसमर्थकृपेने इंचगेरी मुक्कामी आनंदरूप असो. तुमचे कार्ड पावले. मजकूर समजून आनंद झाला. असेच पत्राने खुलासा नाव, गाव, उद्योगाची हकीकत कळवीत जावी. इकडील सर्व मंडळी आनंद आनंद आहेत. तुम्हांकडील वडील मंडळींस महाराजांनी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. श्रावण सप्ताह आनंद झाला (होत आहे.) नेमाने व कट्टाने स्मरणपूर्वक नेम करीत जावे. चुकू नये असे सांगितले आहे. 'आठव तो ब्रह्म नाठव तो भवभ्रम' हे जाणतच आहां. कार्डातील...

पत्र १५६ **पान १५६**

नवीन उमदी भाद्रपद व. ९

क्रमांक कृष्णरावांना पत्र ५.१०.१९१२

२३८

श्रीसद्गुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बालक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. तागाईत मजकूर वडिलांचे आशीर्वादिकरून आनंदरूप असो. विशेष. वडील अप्पा हे उमदीस आले आहेत. मी परवा टाकळीहून आलो. पाऊस बरा झाला आहे. लहान–थोर मंडळी सुखरूप आहेत. वडील फार करून दसऱ्याचे आत–बाहेर जतेकडे येण्याचा मानस आहे. काय होते ते पाहावे. शिवलिंगव्वा व राधाबाई वगैरेंस वडिलांनी नेमाबद्दल प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. कळावे. बसप्पा कोळगिरी हा काल गेला आहे, त्याची गाठ पडेल. कळावे, ही विज्ञापना.

पत्र १५७ **पान १५६**

नवीन उमदी अश्विन शु. २

क्रमांक कृष्णरावांना पत्र १३.१०.१९१२

२३९

श्रीसद्गुरुसमर्थ

बाळक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणी मस्तक ठेवून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तारीख... मजकूर पावेतो आपले आशीर्वादिकरून आनंदरूप असो. विशेष. आपले कार्ड येऊन पोचले. लिहिला मजकूर समजला. परवा इकडून कार्ड लिहिले आहे ते पोचलेच असेल. घरी नवरात्र घातले आहे. इकडे पाऊसपाणी बरे आहे. तीर्थरूप अप्पा यांचे पौर्णिमेस इंचगेरीकडे अगर जतेकडे येणे होत आहे ते पाहावे असे म्हणत होते. बाकी मजकूर सर्व

आनंद आनंद आहे. वहिनीस नेमाने असावे म्हणून फार फार सांगितले आहे. तसेच राधाबाई व शिवलिंगव्वांना प्रार्थना नेमाने असणेबद्दल सांगितली आहे, श्रुत व्हावी. कळावे.

	पत्र १५८	**पान १५७**
नवीन	उमदी	अश्विन शु. २
क्रमांक	रामजी बाबाजी कांबळे	१३.१०.१९१२
२४०	यांना पत्र	

श्रीसद्गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत साष्टांग नमस्कार. विज्ञापना. श्रीसमर्थकृपेने उमदी मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. तुम्हांकडून परवा आलेले गृहस्थ येऊन गेलेवर सर्व वर्तमान त्यांनी सांगितलेच असेल. परवा तिमप्पा सायबराव हांडे, रामचंद्र गुरप्पा दाळगे हे दोघे उमदीस आले होते. तिकडून अलीकडे विष्णुपंतांकडून वर्तमान खुलासा कळत नाही. करिता, मन व अंतःकरण निरंतर असावे. नेमाने असावे अशा विषयी वडिलांनी प्रार्थना फार फार सांगितली आहे ती श्रुत व्हावी. रामजी, विष्णुपंत, व्यंकटराव, दत्तोपंत व आईसाहेब सोहोनी वगैरे मंडळींस वडिलांनी नेमाने असणेबद्दल प्रार्थना फार फार सांगितली आहे. ती श्रुत करावी. पत्राचे उत्तर पाठवावे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. इकडे पाऊसपाणी बरेच झाले आहे. एकंदर मंडळींस याचप्रमाणे नेमाने असणेबद्दल प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. कळावे.

–रामभाऊ फडणीस याजकडून

	पत्र २३८	**पान २३२**
नवीन		
क्रमांक		
२४१	(टिपण :– घोडीबद्दलचा करार व त्या संबंधात बसप्पा पाटील	

(कोळगिरीकर) व बसप्पा कल्लप्पा मुधोळकर (राहणार कोळगिरी) या दोघांचा उल्लेख पुढच्या १५९ पत्राशी जमतो म्हणून इथे आणले.)

उमदी

श्रीसद्गुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री बसप्पा पाटील[१] अण्णा मौजे कोळगिरी स्वामी गोसावी, यांसी श्री. रामभाऊ मुक्काम उमदी याचा दंडवत नमस्कार. घोडीबद्दल अग्नोबा यास समक्ष सांगितले आहे. त्याप्रमाणे तुमची मर्जी असेलतर करावे. म्हणजे घोडीची किंमत धरून त्याप्रमाणे निम्मे रुपये तुमचे व निम्मे मालकाचे याप्रमाणे तुम्हीही बसप्पा मुधोळ याजबरोबर सांगून पाठवले होते. त्याप्रमाणे निम्मे रुपये अग्नोबाबरोबर द्यावे म्हणजे दोघांचा अधिकार निम्मा निम्मा होत आहे. तसे कृष्णाजीपंतांजवळ वडिलांनी सांगितले असून त्याप्रमाणे केले असेलतर बरे झाले. नसेलतर निम्मी किंमत द्यावी म्हणजे तुमचा निम्मा हक्क राहिला. घोडीवर दोघांचा हक्क व पुढील उत्पन्न निम्मे निम्मे असे होत आहे. यात तुमची मर्जी जैसी असेल तैसे करावे. याप्रमाणे बसप्पा बरोबर सांगून पाठवले होते. त्याप्रमाणे असल्यास फार बरे झाले. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. कळावे, लोभ करावा ही विनंती.

–रामभाऊ फडणीस मुक्काम उमदी याजकडून

ताजा कलम– तीर्थरूप पाटील साहेब यांस रामप्पाकडून शरण शरणार्थी. सदरी वडिलांनी लिहिलेप्रमाणे निम्मे रुपये द्यावे. येथे ३०–३२ पर्यंत मागतात. तुमच्या मर्जीस येईल त्याप्रमाणे निम्मे रुपये अग्नूबरोबर पाठवावे. मी उमदीहून उद्या हुलजंतीस जाणार आहे. याप्रमाणे लोकांस कळवावे. लोभ करावा ही विनंती.

–रामचंद्र गणेश कुलकर्णी

नोंद :–

१. बसप्पा पाटील कोळगिरीकर (त्यांना अण्णा किंवा साहेब म्हटले आहे) आणि बसप्पा कल्लप्पा पाटील मुधोळकर (राहण्याचे ठिकाण कोळगिरी)

या दोन भिन्न व्यक्ती आहेत. एकाचे मूळ गाव कोळगिरी तर दुसऱ्याचे फक्त राहण्याचे गाव कोळगिरी. दोघांचे बसप्पा हे नाव एकच. गाव कोळगिरी हे मुळातले कुणाचे व राहण्याचे कुणाचे याचा घोटाळा होतोच. म्हणून हे भिन्न आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. बसप्पा मुधोळकर हे बहुधा बसू कोळगिरी असा स्वतःचा उल्लेख करतात. असो. ही जोडी १५९ व १७१ या पत्रांत पुन्हा भेटते.)

xxxxx

	पत्र १५९	**पान १५७**
नवीन	उमदी	अश्विन शु. ७
क्रमांक	बसप्पा मुधोळ यांना पत्र	१८.१०.१९१२
२४२		

श्रीसद्गुरुसमर्थ

सकलगुणसंपन्न राजश्री बसप्पा मुधोळकर मुक्काम कोळगिरी यास दंडवत नमस्कार. तुम्ही गेल्यापासून काही वर्तमान कळविले नाही. आम्ही दसरा झालेवर जालिहाळवरून इंचगेरीस जात आहो. बसप्पा पाटील (कोळगिरीकर) याजकडून रुपये[1] आले नाहीत. त्यांस सांगावे. बाकी मजकूर आनंद आहे. पाऊसपाणी बरे झाले आहे. तुमचे घरची मंडळी, रामप्पा, पाटील, मल्लप्पा, सिवबाई वगैरेंस नेमाबद्दल प्रार्थना फार फार सांगितली आहे ती श्रुत करावी. पाटील यांसही सांगावे. कळावे, ही विनंती.

–रामभाऊकडून

जतेसही तिकडे येणे होत नाही म्हणून कृष्टप्पास कळविले आहे.

–रामभाऊ याजकडून

नोंद :–

१. हे घोडीचे पैसे असावेत.

xxxxx

पत्र १६० **पान १५८**

नवीन क्रमांक २४३ (टिपण :- या पत्राची तारीख ३ नसून १३ पाहिजे म्हणजे मागच्या पुढच्या तारखा जमतात.)

जमखंडी कार्तिक शु. ३

भीमरावांना पत्र १३.११.१९१२

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक साष्टांग नमस्कार. कार्तिक शु. ३ जमखंडी मुक्कामी समर्थकृपेने आनंद असो. विज्ञापना. पीक-पाणी, हवा वगैरे बरी आहे. भक्तिथाट वगैरे बरा चालला आहे तो लिहिता येत नाही असा चालला आहे. पंचमीस चिमडास जात आहे (ही पांडव पंचमी चिमड येथे साजरी होत होती असे स्मरते). नंतर तेरदाळ ९/१० पर्यंत राहणे होईल. पूर्णिमेचे आतबाहेर जमखंडीस येत आहो. सर्व आनंद आनंद आहे. तुम्हांस हकीकतीचे पत्र लिहिले आहेच. ते पोचलेच असेल. वाजंत्रीवाल्यांना सप्ताहास आणविणेविषयी बाबण्णास सांगून आणविणेचे केल्यास बरे होत आहे. आणखी कृष्णप्पा सोनार यासही सांगून नागप्पा-बरोबर जिन्नस पाठवून द्यावे. कोळगिरीचे जिन्नस तेही लवकर करणेस सांगावे. तुम्हांस माहीतच आहे. पोथीकडे येणारी मंडळी व वडील मंडळी यांस वडिलांनी प्रार्थना फार फार सांगितली आहे ती श्रुत करावी. माझाही अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार श्रुत करावा. कळावे, ही विज्ञपना.

-अंबाजी कुलकर्णी, मुक्काम जमखंडी

पत्र १६३ पान १६०

नवीन
क्रमांक
२४४ (टिपण :– या पत्रात बहुतेक मजकूर १६० प्रमाणेच आहे. म्हणून हे पत्र १६० च्या जवळ व १६१ च्या आधी आणले आहे. तारखेप्रमाणेही इथे जुळते.)

जमखंडी — कार्तिक शु. ३
१३.११.१९१२

श्रीसद्गुरुसमर्थ

भीमराव यास नमस्कार. तुमचे पत्र पाहून, मजकूर अगदी खुलासेवार कळविलेवरून वडिलांस आनंद आनंद झाला. असेच लिहीत जावे. चिमडास कार्तिक शु. ५ ला जात आहो. नंतर तेरदाळ येथे जात आहो. तेरदाळ जिल्हा सांगली संस्थान येथे पोस्ट आहे. बाकी मजकूर सर्व आनंद आहे.

नंदेप्पा, अण्णप्पा, विठ्ठल देसाई व व्यंकप्पास, महाराजांची खोली, होर्तीकरांची खोली व दक्षिण बाजूचे काम करवीतच आहां. सर्व काळजी तुम्हांस आहे ती घेतच आहां. तुमचे भरवशावर मला इकडे घेऊन आले आहेत.

पत्र १६१ पान १५९

नवीन तेरदाळ — कार्तिक शु. ९
क्रमांक १८.११.१९१२, सोमवार
२४५

श्रीसद्गुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य राजश्री रामप्पा कुलकर्णी होर्तीकर कारकून मुक्काम विजापूर, स्वामींचे सेवेशी, सेवक अंबाजी कुलकर्णी इंचगेरी हल्ली मुक्काम तेरदाळ, संस्थान सांगली पोस्ट तेरदाळ, अति नम्रतेचा

शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. कार्तिक शु. ९ रोज सोमवार–पावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. आपलेकडून पत्र आले ते पोचले. लिहिला मजकूर सर्व समजला. समर्थ अप्पांस वाचून दाखवला. आनंद आनंद झाला. ज्ञानमार्गाचा व अनुभवाचा मजकूर पत्रात लिहिला तो इतकाच झाला असे नाही. अनिर्वाच्य ज्ञानाचा व अतर्क्याचा मजकूर किती लिहिला तरी पुरत नाही. हा मजकूर पाहून फार आनंद झाला. हल्ली इकडे सप्ताह वगैरे दर दिवशी थाटाने चालला आहे. इकडे हवा, पाऊस, पीक सर्व चांगले आहे. वडील समर्थांनी नेमाबद्दल व कट्टाने–निष्ठेने वागणेविषयी प्रार्थना आपणांस व सर्व नामधारक मंडळींस सांगितली आहे ती श्रुत करावी. पूर्णिमेस जमखंडीस येणेचा बेत आहे. कळावे, ही विज्ञापना

	पत्र १६२	**पान १५९**
नवीन	तेरदाळ	कार्तिक शु. १०
क्रमांक	करबसप्पा आवटी	१९.११.१९१२
२४६	यांना पत्र	

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. कार्तिक शु. १० पावेतो श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. आम्ही तेरदाळ मुक्कामी आहो. १२/१३ संधीस तिकोटेहून इंचगेरीस जात आहो. भक्तिथाट पत्री लिहिता येत नाही असा चालला आहे. असो. ज्याचे तो करून घेत आहे. इकडे पीकपाणी, हवा वगैरे फार बरे आहे. तुमचेकडील गुरुबाळप्पा, संगप्पा, शेखरप्पा, शेटेप्पा व एकंदर लहान थोर मंडळींस नेमाबद्दल प्रार्थना फार फार सांगितली आहे ती श्रुत करावी. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. कळावे, लोभ करावा ही विनंती.

–रामभाऊ फडणीस याजकडून

नवीन क्रमांक २४७

पत्र १६४   **पान १६०**

इंचगेरी   माघ शु. ३

९.२.१९१३

श्रीसद्‌गुरुसमर्थ

श्रीसद्‌गुरुवाक्य मनन करता लोकांवर उपकार होऊन सर्वांस ज्ञानप्राप्तीस उत्सुकता, प्रेमाचा लोट पिण्यास आधार, शर्तीचा ज्ञानाधिकारी, देवमान्य सभामान्य राजमान्य राजश्री सोमनाथपंत दादासाहेब जोशी मास्तर स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञाधारक अंबुराव याजकडून कृतानेक अनंत अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. माघ शु. ३ पावेतो श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने आनंदरूप असो. तुम्हांकडून नमस्कारशतक व पद्यरचना पाठवली ती सर्वांस मान्य होऊन झालेला आनंद, उत्सुकता, अंतःकरणातील प्रेम व प्रेमाचा लोट लिहिता येत नाही असा आनंद झाला. सर्वांस मान्य झाले. याचप्रमाणे ज्ञानमार्ग प्रवृत्तिमार्गाने जसा आनंद झाला तसा अनिर्वाच्य निःशब्दाच्या अर्थाने व्हावयाचा (झाला पाहिजे). त्या शर्तीकडे लक्ष लागून त्या अर्थाचा जोर होण्यास निःशब्दाची वेळ घडून आली असता तो विस्तार व ज्ञान वाचेने सांगता येणार नाही. धन्य धन्य होऊन अनिर्वाच्य मार्गास निर्गुण अकर्तव्य व निष्काम भक्तिथाटाचा जगास उपयोग होऊन उपकार होईल. कीर्ती राहील. याप्रमाणे सुज्ञ आहां. अभिज्ञांप्रति लिहिणे नको. महाराज इंचगेरी येथेच आहेत. देवळाचा कारखाना तयार होत चालला आहे. पाडव्याचे आत पूर्ण होईल. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. हवा वगैरे बरी आहे. तुमचे वडिलांस अति नम्रतेचा अनंत शिरसाष्टांग नमस्कार वडिलांनी सांगितला आहे तो श्रुत करावा. तुम्हांसही नेमाने, कट्टाने, निश्चयाने वेळ घालवण्याबद्दल प्रार्थना फार फार फार सांगितली आहे ती मान्य होऊन असे वागावे म्हणून वडिलांना आशा फार फार आहे. दासबोधी दशक ४, समास ३, ओव्या १० ते १२ पर्यंत जशी शर्ती आहे तसे नामनिष्ठेने असले पाहिजे. यावरून अनिर्वाच्य, अकर्तव्य व

निष्काम भक्तीला योग्य पात्र होण्यास निष्ठेचे नाम पाहिजे. याप्रमाणे वागाल म्हणून या शर्तीस उद्युकता, उत्सुकता व्हावी म्हणून प्रार्थना फार फार फार आहे. या जगात प्रवृत्तिमार्गाने धन्य धन्य केला (व्यवहारात यशस्वी झाला) याचे काय वर्णन करावे ? याचप्रमाणे अनिर्वाच्यास व अपरोक्ष ज्ञानास योग्य व पात्र होईल. हे पत्र पोचल्याचे व सर्व शर्ती मनन झाल्याचे उत्तर लिहून येईल असे करावे. सालाबादाप्रमाणे महाराज सोलापुरास जातीलच. कळावे. लोभ पूर्ण असावा ही विज्ञापना.

ज्ञा व ज्ञ दोन्ही एक म्हणता येत नाही. ज्ञा जो आहे तो महंतीतील (व्यवहारातील मोठेपणा); ज्ञ जे आहे त्यात नाही जाणणे, नाही नेणणें. नेणणे–जाणणे गेल्यावर त्या ठिकाणी त्या ज्ञानाने अकर्तव्य, अधिकारी व सायुज्य पदवीस अधिकारी होईल. शंका–आशंकांचे निरसन होऊन उत्तर येईल असे पद्यरचनेने कळवावे. कळावे ही विज्ञापना.

पत्र २२२ (१) पान २१७

नवीन
क्रमांक
२४८ (टिपण :- १६४ पत्रात निःशब्द ज्ञान पद्यरचनेपेक्षा श्रेष्ठ आहे असे सोमनाथपंतांना लिहिले होते. कदाचित त्यांना वाईट वाटले असावे पण महाराजांनी जे लिहिले त्याचे वाईट वाटून घेऊ नका अशी समजूत घालणारे हे पत्र १६४ पत्रानंतर आणले.)

सोमनाथपंथांना पत्र

आपले पत्र पावले । लिहिले ते सर्व समजले । आनंदे मन तल्लीन झाले । वाचत असता ॥१॥ आपुले कवित्व पाहून । मन गेले आनंदून। त्याचे करावया वर्णन । कुंठित होय मती ॥२॥ समर्थांनी जे लिहिले होते । ते सर्व यथायोग्य होते । वाईट वाटण्याचे कारण ते । मुळीच नाही॥३॥ एकाग्रे करुनि मन । करीत जावे नित्य ध्यान । समर्थांनी हे वचन । सांगितले आहे आपणांस ॥४॥

पत्र १६५ | **पान १६२**

नवीन क्रमांक २४९ | इंचगेरी | माघ शु. ५ | १२.२.१९१३, सोमवार

श्रीसद्गुरुसमर्थ

कृपासागर देवमान्य राजमान्य राजश्री रामचंद्रपंत दादासाहेब रानडे स्वामीजींचे चरणारविंदसेवेशी, आज्ञांकित अंबाजी कुलकर्णी इंचगेरी याजकडून कृतानेक अति नम्रतेचा अनंत नमस्कार. माघ शु. ५ सोमवारपावेतो श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र आज पावले. इतके दिवस विसरून राहिले होते. आतला मजकूर समजला. त्याचे उत्तर लिहिले आहे. दुसऱ्यांजवळ पत्र असलेने लिहिण्यास सुस्त झाले. असो. आठवणीने पत्र लिहून समाचार घेता हेही उत्तम होत आहे. असेच निरंतर पत्र पाठवीत जाऊन उत्तर परस्परे (आलेल्या पत्राला उलट उत्तर) आल्याने मनास आनंद आनंद होत आहे. आठव तो ब्रह्म नाठव तो भवभ्रम हे जाणताच आहां. अभिज्ञांप्रति लिहिणे नकोच आहे. तेथील तुमच्या ओळखीची मंडळी, नामधारक यांची गाठ पडेल तेव्हा नामदृष्टी निरंतर असावी, होईल तितके निष्ठेने नेम करीत जावे असे सांगावे. तुम्हांसही याचप्रमाणे सांगणे आहे. आईसाहेब वगैरेंस याचप्रमाणे श्रुत करावे व प्रकृतिभावावर वागत जावे. या एकंदर शर्तीप्रमाणे वागणेबद्दल महाराजांनी अति नम्रतेची प्रार्थना फार फार सांगितली आहे ती श्रुत व्हावी. तसेच करावे. कळावे. महाराज येथेच आहेत. देऊळ कारखाना एक महिन्यात तयार होईल असे दिसते. नंदेप्पा हुबळीस कळस वगैरे आणण्यास गेला आहे. आणखी आठ रोजांनी येईल. याकरिता वडिलांचे राहणे झाले. सोलापुरास जाणे होईल तेव्हा कळवीतच आहे. निंगप्पा (लिंगप्पा सावळगी) हिप्परगीस गेले आहेत. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. हवा वगैरे बरी आहे. बहिणीचे (भागूअक्का) प्रकृतीबद्दल खुलासा कळवावा. कळावे. पंचनदीकर सोमनाथपंत यांनी अष्टके व पद्यरचना वगैरे लिहून पाठवले आहे. त्यांस

उत्तरही लिहिले आहे. त्याची नक्कल तुम्हांस पाहणेस ठेविली आहे. असो. ज्याचे त्याचे बुद्धीप्रमाणे अंतःकरणाचे कार्य होत आहे. तेच अंतःकरण साधनाकडे दिले असता योग्य होईल असे कळविले आहे. कळावे. कृपा लोभ निरंतर असो द्यावा ही विज्ञापना.

त्यांचे पत्र व त्यांस लिहिलेले उत्तर (पत्र १६४ असावे) पाठवले आहे. हे उत्तर बरोबर होईल काय ते लिहून कळवावे म्हणून प्रार्थना.

पत्र १६६ पान १६३

नवीन
क्रमांक
२५० (टिपण :- मागच्या पत्राची तिथी पंचमी असून या पत्राची तिथी द्वादशी आहे. ७ दिवसांनंतर हे पत्र लिहिले आहे. मागच्या पत्राची तारीख १२ आहे. म्हणून या पत्राची १९ येते. ही तारीख पुढच्या पत्रांशी जुळते. पत्रावरील १८ तारीख बदलून १९ केली आहे.)

निंबरगी माघ शु. १२ शके १८३४
१९.२.१९१३

श्रीगुरुसमर्थ

प्रति :- पू बाबा
दा. नागप्पा

कृपासागर तीर्थस्वरूप देवमान्य सभामान्य गुरुमान्य, राजमान्य राजश्री अंबुराव बाबा महाराज मौजे इंचगेरी, वडिलांचे चरणारविंदसेवेशी, आज्ञाधारक दासानुदास बालक नागप्पा भीमण्णा नीलवाणी निंबरगी याचा दोन्ही कर जोडून चरणी मस्तक ठेवून त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग दीर्घ दंडवत. विज्ञापना. तागायत आजमितीपावेतो श्रीसमर्थसद्‌गुरुकृपेने व आपले चरणांचे आशीर्वादेकरून इकडील आपली सेवानुसेवक मंडळी सुखरूप असो. विशेष. तुम्ही भीमण्णा चेटिरक्या याजबरोबर पाठवलेले पत्र येऊन पोचले. तुम्ही पत्रात लिहिलेप्रमाणे आलवणाचे लुगडे एक भीमण्णा यांचे हाती देऊन पाठवले आहे. किंमत ५८-॥ (५ रुपये दीड आणा) आहे. बाकी पान्ह्याबद्दल विचारले.

आज मंगळवार असलेने पान्हा मिळाला नाही (मंगळवार असेलतर तारीख १९ न येता २० येईल). उपाय नाही. काल रोजी मलकारी याचे हाती रोख सुरती २०० रुपये पाठविले आहेत ते पोचलेच असतील. कळावे. बहुत वडिलांप्रत काय लिहिणे ? अधिकोत्तर नाही. कृपा लोभ निरंतर असावा.

–नागप्पा भीमण्णा निंबरगी

पत्र १५५ पान १५५

नवीन
क्रमांक
२५१ (टिपण :– या पत्रावर छापलेली तारीख सप्टेंबरमधील आहे. तिथी माघ महिन्यातील आहे. माघ महिना सप्टेंबरमध्ये येत नाही. शिवाय पत्रातील शिवरात्रीचा उल्लेख सप्टेंबर महिन्याशी जुळत नाही, माघ महिन्याशी जुळतो. हिशोबावरून या पत्राची तारीख १.३.१९१३ असावी.)

इंचगेरी माघ व. ९
भीमरावांना पत्र १.३.१९१३, रविवार

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. माघ वद्य ९ रविवारपावेतो श्रीसमर्थकृपेने इंचगेरी मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. इकडे हवा वगैरे बरी आहे. सोलापुराहून विष्णुपंत (फडके) शिवरात्रीस येत आहेत. तुम्हांकडील हकीकतीचे खुलासेवार खुशालीचे उत्तर जरूर जरूर लिहावे. मास्तरसाहेब वगैरे मंडळींस वडिलांनी अति नम्रतेचा नमस्कार फार फार सांगितला आहे तो श्रुत करावा, ही विज्ञापना.

–अंबाजी इंचगेरी याजकडून

पत्र २१६ **पान २१३**

नवीन फाल्गुन शु. ८

क्रमांक नानासाहेबांना पत्र १५.३.१९१३

२५२

श्री

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री मार्तंडराव नानासाहेब देशपांडे, मौजे उमदी यांसी, नारायण पंडित याचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत फाल्गुन शु. ८ पावेतो उत्तम असो. विशेष. आपण अग्रूबरोबर पत्र देऊन पाठवले ते येऊन पोचले. मजकूर समजला. त्याप्रमाणे करावे, तर गोविंदभट यांचे घोडे गावात नाही. दुसरे कोणाचे मिळत नाही. याकरिता पाठविले नाही. चावराची (एक प्रकारचे धान्य) रास अद्यापि संपली नाही. लुगडे कोष्टी यास सांगत आहे. तयार झालेवर लुगडे पाठवीत आहे. कळावे. बहुत काय लिहिणे ? लोभ करावा ही विनंती.

पत्र २३४ **पान २२५**

नवीन

क्रमांक

२५३ (टिपण :– या पत्रावर तारीख नाही. तिथीनुसार इथे आणले.)

इंचगेरी चैत्र व. ६

भीमरावांना पत्र २७.४.१९१३, शनिवार

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री... अण्णा यांचे चरणांशी, बालक जीवबाळ संगम याचा कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. विशेष. चैत्र व. ६ पावेतो श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. श्रीसमर्थ अप्पा आज सोलापुरास जाणार आहेत. मीही त्यांचेबरोबर जात आहे. वैशाख शु. १५ पौर्णिमेस परत येत आहो. तुम्हांस वरचेवर पत्र घालणेविषयी वडील अप्पांनी सांगितले आहे.

राजश्री जयवंतप्पास पाहि...... सांगून नेण्या.... अप्पांनी सांगितले आहे ते श्रुत करावे. विशेष लिहिण्यास बाळकास शक्य नाही. ही विज्ञापना.

सोलापुरास जाताना हे कार्ड लिहिलेले होते. टपालात टाकले नव्हते. आज खुशाल होर्तीस आलो आहे. पौर्णिमेस इंचगेरीस जात आहो. आनंद आनंद आहे.

–जीवबाळ

पत्र १६७ पान १६४

नवीन
क्रमांक

२५४ (टिपण :– हे पत्र मजकुराप्रमाणे आधीच्या २३४ पत्राशी जुळते. तिथी शु. १२ नसून वद्य १२ पाहिजे. पारमार्थिक पत्रव्यवहार या पुस्तकात २१.४.१९१३ रोजी गुरुदेवांनी लिहिलेल्या पत्रावर (पत्र क्रमांक ६३, पृष्ठ क्रमांक ६१) चैत्र व. १ अशी तिथी आहे. अर्थातच १३ दिवसांनंतर ४.५.१९१३ ला लिहिलेल्या प्रस्तुत पत्राची तिथी वद्यच असणार. ही तिथी यानंतर येणाऱ्या १६८ पत्राच्या तिथीशीही जुळते.)

सोलापूर (क्षेम) चैत्र व. १२
भीमरावांना पत्र ४.५.१९१३

श्रीसद्गुरुसमर्थ

कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. चैत्र वद्य १२ पावेतो श्रीसमर्थ सद्गुरुकृपेने सोलापूर मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. तुमचे कार्ड, गुरुवारी लिहिलेले, शनिवारी येऊन पोचले. मजकूर समजून आनंद आनंद झाला. भक्तिथाट आनंद चालला आहे तो लिहिता येत नाही. असो. ज्याचे ते करून घेत आहेत, त्यात आपले काही नाही. वैशाख शु. १० संधीस होर्ती व सावळसंगास येत आहो. तोपर्यंत

सोलापुरी मुक्काम ८/९ पर्यंत आहे. याप्रमाणे मास्तरसाहेब यांस प्रार्थना कळवावी, अगर सुचवावी. बाकी मजकूर सर्व आनंद आनंद आहे. एकंदर मंडळींस वडिलांनी अति नम्रतेचा नमस्कार व प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. कळावे, ही विज्ञापना.

–जीवबाळप्पा संगम याजकडून

	पत्र १६८	**पान १६५**
नवीन	सोलापूर	वैशाख शु. ४
क्रमांक	भीमरावांना पत्र	१०.५.१९१३
२५५		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग दंडवत नमस्कार. वैशाख शु. ४ सोलापूर मुक्कामी समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे कार्ड पावले. इकडील वर्तमान सर्व आनंदानंद आहे. वैशाख शु. ११/१२ संधीस सावळसंग मुक्कामी येत आहो. नंतर इंचगेरीस जात आहो. तिकडे सर्व आनंद असल्याचा खुलासा लिहून अंबुरावांचे नावे पाठवावे म्हणजे आम्हांस पोचेल. बाकी मजकूर सर्व आनंद आहे. कळावे, ही विज्ञापना.

–नंदेप्पा जमखंडी याजकडून

	पत्र १६९	**पान १६५**
नवीन	सोलापूर	वैशाख शु. ६
क्रमांक	भीमरावांना पत्र	१२.५.१९१३
२५६		

श्रीगुरू प्रसन्न

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. वैशाख शु. ६ श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र पावले. मजकूर समजून आनंद आनंद झाला. पत्रात लिहिलेप्रमाणे जिन्नस घेऊन येत आहो. आम्हीही

११/१२ संधीस सावळसंग व नंतर इंचगेरीस जात आहो. इकडील मजकूर सर्व आनंद आहे. आजवर इकडे पाऊस झाला नाही. तिकडील मंडळींस अति नम्रतेचा नमस्कार सांगितला आहे तो श्रुत करावा. कळावे, लोभ करावा ही विज्ञापना.

–रामभाऊ याजकडून

	पत्र १७०	**पान १६६**
नवीन क्रमांक २५७	तिकोटे	आषाढ व. ५ २३.७.१९१३, बुधवार

श्रीसद्गुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य देवमान्य सभामान्य राजपूजित राजमान्य राजश्री अंबुरावजी बाबासाहेब मुक्काम इंचगेरी, यांस कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. आषाढ व ५ बुधवार तिकोटे मुक्कामी श्रीसमर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. तुमचे पत्र जतेहून आज आले. मजकूर समजून मनास फार फार फार आनंद आनंद झाला. सुज्ञाप्रत लिहिणे, कळविणे नकोच आहे. अभिज्ञच आहां. इकडे पाऊसपाणी हवा वगैरे बरी आहे. कारखानाही लवकर आटपीत आहां. त्याविषयी सांगणे नकोच आहे. नंदेप्पा व तुम्ही दोघेही श्रावण सप्ताहाचा बेत करीतच आहां. लिहिणे नको आहे. एकंदर मंडळींस वडिलांनी नेमाबद्दल प्रार्थना फार फार सांगितली आहे ती श्रुत व्हावी. अष्टमी संधीस विजापुरास जात आहो. नंतर इंचगेरीस येत आहो. बाकी सर्व आनंद आनंद आहे. कळावे. ही विज्ञापना.

–रामभाऊ फडणीस याजकडून

पत्र १७१ पान १६६

नवीन क्रमांक २५८

(टिपण :– या पत्रावर जुलै १९१३ इतकीच तारीख आहे. दिवसाचा उल्लेख नाही. तिथी मागच्या १७० पत्राची आहे. म्हणून तारीखही त्याच पत्राची घातली आहे.)

तिकोटे आषाढ व. ५

बसप्पा मुधोळकरांना पत्र २३.७.१९१३

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक दंडवत नमस्कार. आषाढ वद्य ५ पावेतो श्रीसद्‌गुरुकृपेने तिकोटे मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. इकडे पाऊसपाणी बरे आहे. अष्टमी ८/९ संधीस विजापुराकडे जाणेचा बेत आहे. नंतर इंचगेरीस जात आहो. पाटीलसाहेब[१] यांची वाट जतेस व हट्टीस बरीच पाहिली. परंतु स्वारी निघणेचे झाले नाही. उपाय नाही. असो. तुम्ही बसप्पा मुधोळकर, तुमचीही कलमडीत दोन तीन रोज वाट पाहिली, परंतु निष्ठूर होऊन आला नाहीत. उपाय नाही. मी ककमरी, हट्टी, कलमडीहून येऊन महाराजांबरोबर आहे. तुम्हीच आला नाही, अहो. कळावे.

–पुंडप्पा हट्टी याजकडून

नोंद :-

१. पाटील म्हणजे बसप्पा कोळगिरीकर असावेत. बसप्पा मुधोळकरांच्या तर्फे त्यांना निरोप जात असे. तेव्हा कोळगिरीकरच असावे असे वाटते.

xxxxx

पत्र १७२ पान १६७

नवीन क्रमांक २५९

इंचगेरी भाद्रपद शु. ६

६.९.१९१३

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृपासागर राजमान्य राजश्री हरिपंतदादा लिमये[१] मुक्काम मुंबई स्वामीजींचे चरणसेवेशी, सेवक अंबाजी कुलकर्णी मुक्काम इंचगेरी यांचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती– विज्ञापना. तारीख ६ सप्टेंबर सन १९१३ इसवीपावेतो समर्थकृपेने आनंदरूप असो. विशेष. आपलेकडून २ पत्रे समर्थांच्या नावाने आलेली पोचली. मजकूर पाहून आनंद झाला. श्रावण मास सप्ताह थाटाने आनंदाने झाला. सर्व आनंदच आहे. सप्ताहात उत्तर लिहिण्यास विलंब झाला. हल्ली सद्‌गुरुसमर्थ महाराजांचे आज्ञेवरून विनंती लिहितो. समर्थांनी दिलेली नामदृष्टी चांगले विश्वासाने, अभ्यासाने ठेवलीतर सर्व कामे आपोआप होत आहेत. जैसा भाव तैसा देव सहाय्य होतो हे तो जाणूनैच आहां. नेहमी आठवण ठेवली असता आनंदच होतो. समर्थांनी नेमनिष्ठेने असणेबद्दल फार फार प्रार्थना सांगितली आहे ती श्रुत करावी. घरी आपल्या सौभाग्यवतींना सांगावे. इकडे हवा वगैरे चांगली आहे. नारायणराव देवस्थळी[२] कनूर हे सोलापुरात असतात. त्यांचे घर सोहोनी यांचे वाड्याजवळ, फौजदार चावडीजवळ आहे. कळावे. बाकी सर्व आनंदच आहे. कळावे. बहुत काय लिहिणे ? आपण पत्री लिहिलेप्रमाणे सर्व संतमंडळींस नमस्कार श्रुत केला आहे. कळावे, ही विज्ञापना.

–अंबाजी कुलकर्णी इंचगेरी

आपला राहणेचा पत्ता पत्रात स्पष्ट लिहावा.

नोंदी :–

१. १७२ या पत्रातील 'हरिपंतदादा लिमये मुक्काम मुंबई' व पत्र २४५ वर 'हरी गोपाळ लिमये, ब्रह्मचारीबोवा' अशी सही केलेले लिमये या व्यक्ती एकच असल्यातर एक अडचण येते. यापैकी २४५ पत्रात (२८.२.१९१०) ब्रह्मचारीबोवा असा उल्लेख असून १७२ पत्रात (६.९.१९१३) 'घरी आपल्या सौभाग्यवतींना सांगावे' असे वाक्य आहे. प्रथमदर्शनी या दोन गोष्टी विसंगत दिसतात. कदाचित १९१० नंतर त्यांचे लग्न झाले असेल का ? निश्चित

काहीच कळत नाही. लिमये यांनी ११.१२.१९०५ रोजी नाम घेतले. १९०५ सालच्या नामधारकांच्या यादीत त्यांचे नाव आहे (सोनेरी पाने, पृष्ठ १८३). 'आपण अपराधी आहोत, आपल्याला शिक्षा करावी' अशा आशयाचे एक पत्र (पद्यात) त्यांनी महाराजांना लिहिले आहे. (परमार्थमंदिर, पृष्ठ २११.)

२. इंचगेरी मठाच्या करारपत्रावर यांची सही आहे.

xxxxx

	पत्र १७३	**पान १६८**
नवीन	उमदी	अश्विन शु. ६
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	६.१०.१९१३
२६०		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

कृतानेक अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. अश्विन शु. ६ पावेतो श्रीसमर्थसद्‌गुरुकृपेने उमदी मुक्कामी आनंदरूप असो. विशेष. यल्लडगीस जाणेचा बेत आहे. पाऊस झालेवर जावे अशा बेताने राहिलो आहे. नाहीतर लवकरच जतेस येत होतो, बरे. समर्थकृपेने जैसे होईल तैसे होत आहे. तुमचे पत्र पावले. मजकूर समजला. यल्लडगीस पत्र लिहावें की तिकडे वडील येतच आहेत. काही काळजी करू नये असे कळवावे. शिवलिंगव्वा व राधाबाई वगैरेंस नेमाबद्दल प्रार्थना वडिलांनी सांगितली आहे ती श्रुत करावी. तुम्हीही नेमाने असावे, खरेपणाने वागावे म्हणजे सुगंधवार्ता कानी पडावी अशी वर्तणूक ठेवावी, म्हणजे भक्तिमार्गास योग्य होईल. त्यात तुम्ही सुज्ञच आहांत. शहाणे आहांत. सारांश चांगली निस्पृह वागणूक असावी म्हणून वडिलांनी फार फार सांगितले आहे. सारांश हे कार्ड पावल्यापासून निस्पृह वागणूक ठेवावी असे सांगणे फार फार आहे. कळावे.

–रामभाऊ फडणीस

पत्र २३५ पान २२६

नवीन
क्रमांक
२६१ (टिपण :- १७३ पत्र अश्विन शु. ६ चे असून २३५ पत्र अश्विन शु. ७ चे आहे. तिथीच्या आधारावर १७३-२३५ हा क्रम येतो. २३५ ची तारीख दुसऱ्या दिवसाची म्हणजे ७.१०.१९१३ येते. २३५ व १७४ या पत्रांत विहिरीचे काम थांबवण्याचा निरोप असल्यामुळे मजकुरावरून २३५-१७४ हा क्रमही जुळतो.)

उमदी अश्विन शु. ७
७.१०.१९१३

श्रीसद्‌गुरुसमर्थ

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री महाराज अंबुराव दादा कुलकर्णी मुक्काम इंचगेरी, वडिलांचे सेवेशी, बाळक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणांवर मस्तक ठेवून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. तागाईत मिती अश्विन शु. ७ पावेतो श्रीसद्‌गुरुकृपेने व आपले आशीर्वादिकरून आनंदरूप असो. विशेष. आपलेकडून पत्र आले ते... मजकूर समजला. नागप्पा निंबरगी हे निंबरगीस गेलेवर गुरुबसूस सांगून पाठवीत आहे अगर नागप्पा हे पौर्णिमेस येत आहेत त्या वेळी इंडीस जाऊन रजिस्टर करून घेण्यास सांगितले आहे. विहिरीचे काम पंचवीस रुपयांपर्यंत झाल्यास करावे. त्यात तुमचे सहजी पंचवीस रुपयांत होत असल्यास करवावे. पंचवीस रुपयांत न झाल्यास तीर्थरूप अप्पा येईपर्यंत विहिरीचे काम तहकूब ठेवावे. गुरुबसू हा समक्ष तोंडजबानीने सांगता विदित होईल. कळावे. ही ...खोलीचे काम लवकर तुम्ही....

	पत्र १७४	पान १६८
नवीन	उमदी	कार्तिक शु. १
क्रमांक	अंबुरावांना पत्र	३०.१०.१९१३, गुरुवार
२६२		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

अति नम्रतेचा अनंत शिरसाष्टांग नमस्कार. यल्लडगी, अथणीकडे, नंतर रडरटी, ५/६ संधीस ककमरी याप्रमाणे बेत आहे. खुलासेवार कार्ड लिहिलेच आहे. त्यावरून समजेल. विहिरीचे काम आम्ही आलेवर सुरू करणेस येईल. तुम्ही पत्र लिहिले, खुलासेवार कळविले. विस्तार समजून प्रत्यक्ष इंचगेरी कारखाना विस्तार पाहिल्यासारखा आनंद आनंद झाला. विस्तार मजकूर वाचून संतोष होऊन खुलासा झाल्याने आनंद व संतोष मावेना असा झाला. कानडी पद चडचणची मुले म्हणत होती त्याप्रमाणे निन्न सेवा एष्टंत हेळलि धन्यनादे (तुझी सेवा किती म्हणून सांगू ? धन्य झालो.) आनंद झाला. हे कार्ड पोचल्याचे उत्तर बाळप्पा शिवलिंगप्पा गुड्डोडगी, अथणी या पत्त्यावर लिहावे म्हणजे आम्ही जेथे असू तेथे पोचवतील अगर पोस्टमास्तर यांचे नावे लिहिले असता पोचवतील. खुलासेवार लिहावे. सप्ताहाचा[1] बेत नंदेप्पा व तुम्ही तयारी करवीतच आहां. ते लिहिणे नकोच आहे. ही विज्ञापना.

—रामभाऊ

नोंद :-

१. मार्गशीर्ष सप्ताह. हा महाराजांच्या हयातीतील अखेरचा मार्गशीर्ष सप्ताह.

xxxxx

	पत्र १७५	पान १६९
नवीन	इंचगेरी	मार्गशीर्ष व. ७
क्रमांक	कृष्णरावांना पत्र	२१.१२.१९१३
२६३		

श्रीसद्‌गुरुसमर्थ

दोन्ही कर जोडून त्रिकाळी अति नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. मार्गशीर्ष व. ७ पावेतो श्रीसद्‌गुरुसमर्थकृपेने आनंदरूप असो. विज्ञापना. आपलेकडून मलकारी याने पत्र वगैरे आणून दिले. सर्व हकीकत सांगितली. आनंद झाला. श्रीसद्‌गुरुसमर्थ यांचे प्रकृतीस बरे झाले आहे. चार[1] पाच दिवसांनी उमदीस जाणार आहो. बाकी सर्व मजकूर आनंद आहे. इकडे हवा वगैरे बरी आहे. कळावे. लोभ असो दीजे ही विज्ञापना.

–अंबाजी कुलकर्णी इंचगेरी

नोंद :-

१. ४–५ दिवसांनी न जाता महाराज दुसऱ्याच दिवशी उमदीस गेले. प्रकृती ठीक नव्हती. हे पत्र निर्याणाच्या आधी फक्त पाच एक आठवडे लिहिलेले आहे. लोकांना आजारपण कळू दिले नाही.

xxxxx

पत्र १७६ पान १७०

नवीन
क्रमांक
२६४ (टिपण :- १७५ पत्राची तारीख २१ असून प्रस्तुत पत्राची २३ आहे. १७५ ची तिथी मार्गशीर्ष व. ७ आहे. म्हणून १७६ ची मार्गशीर्ष व. ९ येते.)

उमदी	मार्गशीर्ष व. ९
कृष्णरावांना पत्र	२३.१२.१९१३

श्रीसद्गुरुसमर्थ

वडिलांचे चरणारविंदसेवेशी, बाळक भीमाचा दोन्ही कर जोडून त्रिकाळी चरणांवर मस्तक ठेवून अति नमनपूर्वक नम्रतेचा शिरसाष्टांग नमस्कार. विनंती, विज्ञापना. तारीख... मजकूरपावेतो वडिलांचे

आशीर्वादिकरून आनंदरूप असो. विशेष. तुमचे पत्र येऊन पोचले. लिहिलेला मजकूर समजला. तीर्थरूप वडील अप्पा काल सोमवारी इंचगेरीहून आले. वडिलांचे प्रकृतीस आराम आहे. शिवलिंगव्वांस वडिलांची प्रकृती बरी असल्याचे कळवावे. बाकी मजकूर सर्व आनंद आनंदरूप आहे. मीही आणखी दोन दिवसांत जमाबंदीकरिता इंडीस जाणार आहे. हे कार्ड पोचल्याबद्दल. वडिलांकडील सर्व खुशाल असलेबद्दल सर्व हकीकतीचे उत्तर पाठवावे. तीर्थरूप अप्पा यांचे प्रकृतीस बरे असलेबद्दल जमखंडीस गिरमल्लप्पा अण्णा मेत्री यांस लिहावे. अप्पा उमदीस आले आहेत म्हणून लिहावे.

दादासाहेब (महाराजांचा पुतण्या) यास कन्यारत्न झाले. काल सोमवार दिवशी झाले. आज दोन दिवस झाले. गिरगावचे शेताचे मोजणीचे काम कोणाकडे आहे ते त्यांस सांगून लवकर करणेस सांगावे. कळावे.

पत्र १९०　　　　पान १८९

नवीन
क्रमांक
२६५ (टिपण :- या पत्रावर तारीख किंवा तिथी नाही. शेवटचा परिच्छेद अंबुराव व इतर मंडळींस उद्देशून आहे. हे पत्र महाराजांच्या निर्याणाच्या आधीचे असूनही इथे आणले आहे. या पत्रात महाराजांचा साधकांना संदेश आहे, म्हणून ही जागा ठरवली.)

अंबुरावांना पत्र

श्रीगुरुसमर्थ

कृतानेक अनंत शिरसाष्टांग दंडवत नमस्कार, विज्ञापना. समर्थमहाराजकृपेने आनंदरूप असो. इतके दिवस प्राण्याला महर्गतेमुळे (महागाईमुळे) काळजी होती, त्यायोगे त्याचेकडून काही स्मरण घडत

होते (सामान्यपणे काळजी असली की देवाची आठवण होते.) आता मनाला व प्राण्याला व्यवसायात काही मिळवणेची आणखी काळजी लागली व आपले जन्माचे बंदोबस्ताची काळजी लागली आहे. कोठे कोठे भक्तीत काही काही प्रसंगी दुःख झालेची काळजी कूटस्थात जडून गेल्याने मुख्य काळजी जी आहे ती देहाने निर्भीड करीत आहे (काही वेळा म्हणावी तशी भक्ती होत नाही याचे दुःख मनात खोलवर असले-तरी त्याची जाणीव होत नाही. ते कूटस्थात जडून जाते, नामस्मरण होत नाही. दैनंदिन व्यवहारातील प्रश्नांच्या तीव्रतेमुळे देह नामाकडे दुर्लक्ष करतो, प्राणी बेपर्वा होतो). अशी अवस्था होण्यास कर्ण, मुख व चक्षू चोवीस तास विषयांकडे दिल्याने पापाचा गोळा होतो. घडलेल्या प्रसंगांचा भोग असे म्हणणे ही अज्ञानपणाची गोष्ट आहे. आता तेच ज्ञानमार्गाने कर्ण, चक्षू व मुख समर्थकृपेचे शर्तीप्रमाणे त्या भागाकडे काळजी अंतःकरणापासून ठेवून त्याचेच वेळ दिले असता पुण्याचा ठेवा ठेवा गोळा गोळा होत चालले म्हणजे सर्व निर्विघ्न होऊन अंतःकरणात प्रवृत्ती व निवृत्ती दोन्ही मार्गात आनंद असे वाटून मनास संतोष होऊन अंतःकरणात विवेक होऊन सर्व काळजी त्याचेच लागून विवेकाने अंतःकरणात असा धैर्य होतो (वास्तविक भोग सुटत नाहीत हे खरे आहे. परंतु भोग हा आपल्याच कर्माचे फळ आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. अर्थातच कर्मावर ताबा ठेवलातर त्याचे फळ असलेला भोग सुटू शकतो हेही खरे आहे. यासाठी ज्ञानमार्गाची कास धरली पाहिजे. ज्ञानमार्ग म्हणजे नामस्मरण व गुरुकृपा). येताना कोणताही विषय आणला नाही व बरोबरही काही येत नाही. आपले कर्तव्य म्हणजे निरंतर देवाचे स्मरण. त्यावाचून दुसरे काही नाही. कर्ता करविता तोच आहे. त्याचे आज्ञेवाचून एक काडी हलत नाही. आपण कल्पात (पूर्वी) केलेले भोग, पापाचा गोळा, स्मरणाने, समर्थकृपेने पुण्याचा ठेवा होऊन आपोआप आनंद होत जात आहे. असा ज्ञान अंतःकरणात जडून गेल्याने पुण्याचा ठेवा ठेवा जाल्याने सर्व पातक निरसून जाऊन पुण्याचा ठेवा होऊन विघ्न निर्विघ्न होऊन, मनास, अंतःकरणास व शरीरास आरोग्य

तात्काळ दिसून येते. परंतु हा भाव कूटस्थात आपोआप अपरोक्ष ज्ञानाचा भाव झाला पाहिजे, म्हणजे सर्व कळून येते (याचा प्रत्यक्ष अनुभव आला पाहिजे, केवळ शब्दज्ञान नको). दासबोधातील समर्थ वाक्य 'मुळीच भक्ती केली नाही आणि प्रसन्नता इच्छिती[१]' व समर्थवाक्य– 'मुळीच सेवा केली नाही व मुशाहिरा कोठून येईल[१]' व समर्थवाक्य– 'याकारणें पुण्यमार्गें' चालावें असे समर्थांचे वाक्य कोणते अध्यायी व कोणते समासी व श्लोक किती ते सर्व काढून पाहून उत्तर यावे म्हणून प्रार्थना. आता शरीरभावाची काळजी अगर विषयभावाची काळजी अंतःकरणात व कूटस्थात ठेवून घेऊन त्याचीच काळजी करीत आहे, मनास काळजी करून घेत आहे व करंटपणा भोगीत आहे यास उपाय ज्याचे त्यास समजून येत नाही. यास उपाय अंतःकरणात लज्जा धरून समर्थांचे आठवण निष्ठेने चालले असता प्राण्यास प्रपंचात अगर परमार्थात आनंद आनंद वेळ घडत आहे असा ज्ञानमार्ग आहे. मुख्य सारांश, विवेक व नामस्मरण. त्याचे योगे स्मरणाचा गोळा निश्चय झाला म्हणजे वैराग्य– म्हणजे वाया जे आहे त्यावर राग येऊ लागतो. मग विरक्ती – वीरपणाने – दोन्ही मार्गाने वीर धरून चालणे. दोन्ही माया एकच आहे असे कळू येतो. नंतर भक्तिभाव कळू लागतो. त्यायोगे अग्नी होऊन गेले (तळमळ लागली) म्हणजे ज्ञानास योग्य असे वाटून सर्व कूटस्थातील भाव कळू लागतो, याचे नाव ज्ञान. ज्ञानास मूळ अग्नी, भक्तीस मूळ विरक्ती अशी वाक्ये ज्ञानेश्वरीत आहेत. करिता प्रपंचात असताना दररोज बिनचुकीने योग घडावा म्हणजे पुढेपुढे वाढणेचे प्रसंग घडतात. त्यायोगे भाव कळू लागतात, नेम निष्ठेने केला म्हणजे भाव समजू लागतो.

आता महाराज अंबुराव वगैरे मंडळींस प्रार्थना. पूर्वी सातलगावकरांमार्फत पत्र आपल्यास पोचले असेल अगर आणून घेणेविषयी सूचना होती. त्याचे उत्तर कोणाकडून आले नाही. आता त्याजविषयी तसदी घेऊन, तसदीबद्दल क्षमा होऊन व्यवसायात लक्ष दिलेने काही वेळ व्यर्थ झाल्याने त्याबद्दल क्षमा होऊन, त्याबद्दल काही वेळ देऊन पूर्वीचे पत्राचे उत्तर मेहरबानगीने कृपावंत होऊन उत्तर

येईल अशी इकडील उमेद फार आहे. कोणत्याही कामास सवड काढून वेळ द्यावा लागतो.

नोंद :-

१. कांहींच भक्ती केली नसतां । आणि इच्छिती प्रसन्नता । जैं कांहींच सेवा न करतां । स्वामीस मागती ॥ -(दासबोध, १८.७.२)

xxxxx

पत्र १७९ पान १७५

नवीन
क्रमांक
२६६ (टिपण :- हे पत्र कदाचित मोठे असून हा त्यातला काही भाग असेल. कधी कोठे मिळाले तर पूर्ण करता येईल. यात दोन संतांची पत्रभेट आहे. सध्याचे काम संपताना या दोन संतांची स्मृती सतत मनात राहावी या उद्देशाने हे पत्र अखेरीस घातले.)

श्रीगोंदवलेकर
महाराजांना पत्र

श्रीसद्‌गुरुसमर्थ

